म. ग्रं. सं. ठाणे.
विषय काव्य
सं. क्र. 2586





# शाहीर ग. दि. माडगूळकर

राजा मंगळवेढेकर


संदर्भ
काव्य
२५८७
२५८९३
२५१२८९

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना :—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

18 JUN 1989
2 JAN 1992
17 OCT 1992
21 JUL 1993

(कृ. मा. पहा)
२०००-१२-८८



# शाहीर ग. दि. माडगूळकर

राजा मंगळवेढेकर

प्रतिमा प्रकाशन, पुणे ३०.

प्रकाशन क्रमांक ४३

प्रकाशक :

अरुण पारगावकर
प्रतिमा प्रकाशन,
१३५९, सदाशिव पेठ,
पुणे-४११ ०३०
फोन : ४३७४४४

© राजा मंगळवेढेकर
९, अशोकवन,
मॉडेल कॉलनी,
पुणे-४११०१६

मुद्रक :

मधुकर ल. ठाकर
गुरुसेवा मुद्रणालय,
शाहू वसाहत, सर्व्हे नं. ९२,
लक्ष्मीनगर, पुणे-४११ ००९

प्रथमावृत्ती : २०-१०-१९८८

मुखपृष्ठ : सुरेश नावडकर

मूल्य : साठ रुपये

सन्मित्र

न्या. चंद्रशेखर आणि श्रीमती ताराबाई धर्माधिकारी

यांना सस्नेह...

# अनुक्रमणिका


१. आठवा शाहीर / ५

२. जाहला नाच गणांचा सुरू / १७

३. माडगूळकरांच्या गौळणी / २४

४. माडगूळकरी वग / ३८

५. माडगूळकरी लावणी / ४५

६. माडगूळकरी लावणीतले लावण्य / ६०

७. माडगूळकरी लावणीतील लावण्यवती / ७०

८. माडगूळकरी लावणीतले वैविध्य / ८३

९. माडगूळकरी सवाल-जबाब / ९९

१०. माडगूळकरी पोवाडे / ११३

११. माडगूळकरांची स्तवने / १२५

१२. माडगूळकरांची विविधरंगी शाहिरी / १३३

१३. माडगूळकरांची समरगीते / १४८

१४. माडगूळकरांची स्वातंत्र्य-कवने / १६७

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. २५८८
काव्य २५७३
ग्रं. शाखा २५१४८८
(स्थळ प्रत)

१

# आठवा शाहीर

१९६५ सालातील गोष्ट. श्री. ग. दि. माडगूळकर हे म्हापसे येथील 'गोमंतक साहित्य संमेलना 'चे अध्यक्ष झाले होते आणि त्या निमित्ताने त्यांच्या सत्काराचा एक समारंभ पुणे येथील साहित्य परिषदेत आयोजित केलेला होता. समारंभाचे अध्यक्षपदी होते म. म. दत्तो वामन पोतदार.

माडगूळकरांच्या ' गीतरामायणा ' वर प्रसन्न होऊन महामहोपाध्याय यांनी त्यांना ' आधुनिक वाल्मीकी ' अशी प्रशस्ती याआधीच दिलेली होती.

या समारंभाचेवेळी पोतदारांनी आपल्या खुमासदार भाषणात माडगूळकरांच्या साहित्य निर्मितीचा गौरव करताना माडगूळकरांच्या अस्सल मऱ्हाटीपणाचा आणि त्यांच्या थेट मराठमोळ्या भाषेचा उल्लेख केला होता. माडगूळकरांच्या भाषेला आणि साहित्याला हा जो मराठी मातीचा कस लाभला आहे त्याचे कारणही त्यावेळी पोतदारांनी सांगितले होते. ते म्हणाले होते की, ' याचं कारण म्हणजे माडगूळकर कधी आमच्या विद्यापीठात आलेले नाहीत... '

हे बोलत असताना दत्तोपंत पोतदार हे ' पुणे विद्यापीठा'चे उपकुलगुरु होते, हेही विशेष लक्षात घेण्यासारखे आहे. आणि म्हणूनच ही आठवण दिली आहे.

ग. दि. माडगूळकरांच्या सर्व साहित्यांतूनच हा मराठमोळेपणा उठून दिसतो. त्यांचे ' गीतरामायण ' म्हणजे तशी नागररचना. पण गीतरामायण ऐकल्यावर विनोबांनीही त्यांना ' माडगूळकर, तुमचा राम मराठी आहे ' असे म्हटल्याचे माडगूळकरांनीच मला एकदा सांगितले होते.

मऱ्हाटी मातीचा 'रंग' आणि 'रग' ही दोन्ही ग. दि. माडगूळकरांना जन्मजात उपजतच लाभलेली होती. त्यांच्या व्यक्तिमत्वाचाच ती एक अविभाज्य घटक बनलेली होती. माणदेशातल्या खेड्यात जन्म झाला आणि बालपण गेले. तिथेच आणि तितक्याच सहजपणाने लोकवाणी आणि संतवाणी यांचे सखोल असे संस्कारही झाले. हे अनायासे मिळालेले देणे माडगूळकरांनीदेखील तेवढ्याच निष्ठेने, प्रेमाने आणि भक्तीने अखेरपर्यंत जोपासले होते. एका कवितेत त्यांनीच म्हटले आहे -

"कळस बांधोनी
ठेविला जुन्यांनी
तळी मंदिराचा पाया
आहे भरला रे कोणी ?
जुने पालुपद
जुना हा प्रसाद
जुना कोण, नवा कोण
हा तो फुकाचा विवाद !
माझिया मनाचा
भाव हा सदाचा
'म्हणो'निया गेले त्यांच्या
होत्या अमृताच्या वाचा !
म्हणिले म्हणावे
जाणिले जाणावे
इथे देशिचिये क्षोणी
काय नव्याने सांगावे ?"

ग. दि. माडगूळकरांचा पिंडच असा आस्तिक्यवादी, परंपराभिमानी आणि श्रद्धाळू माणसाचा होता. याच श्रद्धेने त्यांनी विविध तऱ्हेचे नि विपुल लिहिले. त्या सर्वांवर मग स्वाभाविकपणेच मराठी मातीचा ठसा अमिट असा उमटला. अभंग, ओवी, भूपाळी, पोवाडा, लावणी, गवळण हे तर अस्सल मऱ्हाटीच वाण ! माडगूळकरांनी हे सर्व प्रकार मोठ्या समर्थपणाने हाताळलेले आहेत.

'शाहीर' हा शब्द तसा मराठीला परका. पण 'शाहिरी वाङ्मय' म्हणून जी काही रचनानिर्मिती मराठीत झालेली आहे, ती मात्र खास जातिवंत मऱ्हाटीच आहे. कारण तिची प्रकृती आणि स्वभाव हा मऱ्हाटीच असून तिचे प्रेरणा किंवा उत्पत्तिस्थान हे मराठी लोकगीतांशीच येऊन भिडते. लोकसाहित्याचीच जातकुळी सांगते.

लोकगीते काय किंवा लोककथा काय, सर्व लोकसाहित्य हे त्या त्या मातीत जन्मलेल्या नि वाढलेल्या लोकसमूहाचाच सहज, स्वाभाविक, लौकिक आणि कलात्मक उद्गार असतो. माणसाच्या सांस्कृतिक भुकेपोटीच तो जन्माला आलेला असतो. जन्मतानाच तो माणूस त्याची भूक, माती आणि एकूण परिसरच तिथला रंग, रूप, नि गंध यांचे लेणे लेऊन आलेला असतो.

शाहिरी पोवाडा, लावणी, गण-गवळण आदी साहित्यप्रकारही असेच लोकगीतांशी आणि त्या द्वारा मऱ्हाटी लोकसमाज व संस्कृती यांच्याशी दृढ नाते सांगणारे आहेत.

संतांची रचनादेखील लोकसाहित्याचा वारसा मिरविणारी आहे. पारलौकिक जीवनाची महती गाता-गाताच लोकाभिमुख किंवा समाजसन्मुख अशा संतांनीही अशी रचना केलेली आढळते.

" ऐक सज्जना, मनमोहना, संपत्ति पाहता कवणाची ।
जाइल कामा जाइल वाया, उसनी आणिली पांचाची ॥"

अशी लावणीसदृश रचना समर्थ रामदासांची जशी आढळते, तशीच—

'आल्या पांच गौळणी पांच रंगांचे शृंगार करुनी ॥'

ही एकनाथांची पदरचनाही प्रसिद्ध आहे.

'लोक निवती कथा विनोदे ।'

असे लोकशिक्षणातील एक महत्त्वाचे गमकदेखील लोकस्वभावातील आवडी-निवडी हेरून एकनाथांनीच सांगून ठेवलेले आहे.

जुन्या काळापासून लोकरंजनातून लोकशिक्षण साधण्यासाठी कीर्तन, पुरणादी माध्यमांचा उपयोग करण्यात येत आहे. कीर्तन हा एकेकाळी फारच लोकप्रिय प्रकार होता. लोकमानस आकृष्ट करून परमार्थाची शिकवण देण्यासाठी हा प्रकार फारच उपयुक्त ठरला होता. कीर्तन या प्रकारातील हे सामर्थ्य जाणूनच समर्थांनीदेखील कीर्तनात काय काय असावे, हे सांगितलेले आहे :

'कथान्वय लापणिका । नामघोष करतालिका ।
प्रसंगे बोलाव्या अनेका । धाटी माता नेमस्त ॥'

यातील 'लापणिका' ह्या शब्दावरूनच 'लावणी' हा शब्द आला, अशी लावणी या शब्दाची एक व्युत्पत्ती सांगतात. लावणी शब्दाच्या अन्यही काही व्युत्पत्ती आहेत. त्यात लावणीची लक्षणे सांगणारी व्याख्याही कोशकारांनी दिलेली आहे. 'लावणी म्हणजे एक प्रकारचे ग्राम्यगीत— a kind of rural erotic song.'

लावणीची व्युत्पत्ती किंवा तपशीलवार लक्षणे सांगण्याचे हे स्थळ नव्हे, तर लावणीचे प्राचीनत्व व लोकमानसातील तिचे स्थान, एवढेच स्थूलमानाने पाहावयाचे होते.

मराठी शाहिरांनी मऱ्हाटी लावणीची मोठ्या निगुतीने लागण केली. ती जोपासली, वाढवली, अनेक अंगांनी फुलवली आणि रसिकमान्य, लोकप्रिय केली. लावणीच्या लोकप्रियतेत शाहिरांच्या बरोबरीने लावणीचे गायक, गायिका व नर्तिका यांचाही फार मोठा सहभाग लाभलेला आहे.

लावणीच्या खाणाखुणा प्राचीन संत-साहित्यात पुसट, तुरळक आढळल्या, तरी लावणीने आपल्या लावण्याने रसिकांना भुरळ घालायला सुरुवात केलेली दिसते ती सोळाव्या शतकात शिवकालाच्या आगेमागे केव्हातरी. पण ती भरात किंवा वयात आलेली दिसते ती पेशवाईच्या उत्तरकाळात.

याच काळाच्या आसपास राम जोशी, होनाजी, अनंतफंदी, प्रभाकर, सगनभाऊ व परशराम हे विख्यात शाहीर होऊन गेले. त्या सुमारास आणि त्यानंतर देखील बरेच शाहीर झाले, आजही आहेत. आपल्या शाहिरी थाटाच्या रचनांनी मराठी शाहिरी वाङ्मय या शाहिरांनी समृद्ध केले आहे. तथापि, अलीकडच्या काळात पेशवाईतल्या सहा शाहिरांनंतर तेवढ्या तोलामोलाचा पठ्ठे बापुराव हा एक शाहीर झाला. त्याला मी सातवा गणतो आणि या चार दशकांत रचनादृष्टचा तेवढाच नव्हे, तर त्यांच्याहूनही काकणभर थोडा वरचढच ठरेल असा जो 'आठवा शाहीर' झाला, तो म्हणजे ग. दि. माडगूळकर !

गदिमांनी साहित्य-लेखनात आपली गुरुपरंपरा क्वचितच सांगितलेली आहे. 'चैत्रबन' हा आपला चित्रपटगीतांचा संग्रह त्यांनी 'अण्णासाहेब किर्लोस्कर आणि गोविंद बल्लाळ देवल यांच्या गीतरचनास सादर समर्पण' केलेला आहे; परंतु त्यांच्या गुरुत्वाचा उल्लेख केलेला नाही. किर्लोस्कर, देवल यांच्या गीतरचनेशी अत्यंत जवळचे नाते सांगणारी अशी माडगूळकरांची गीतरचना निश्चितच आहे !

एकदा सहज बसल्या बसल्या एका कागदाच्या कपटयावर त्यांनी लिहिले होते :

ज्ञानियाचा वा तुक्याचा हाच माझा वंश आहे ।
माझिया रक्तामध्ये ईश्वराचा अंश आहे ॥

हा कपटा नंतर लगेच त्यांनी चुरगळूनही टाकला होता...परंतु या दोन ओळींवरूनही त्यांच्या मनीचा भाव आणि स्वतःच्या कवित्वाबद्दलचा सार्थ आत्मविश्वास स्पष्टपणाने दिसून येतो.

परंतु शाहिरी रचनेच्याबाबतीत मात्र माडगूळकरांनी अनेकवेळा या क्षेत्रातल्या आपल्या गुरूचा उल्लेख केलेला आहे. 'पोवाडा-लावणीचं कसब मी शिकलो ते आमच्या कोल्हापूरच्या शाहीर लहरी हैदर यांच्यापासून' असं ते दिलखुलासपणानं सांगायचे.

शाहीर लहरी हैदर हे राजर्षी शाहूमहाराजांच्या कारकीर्दीत होऊन गेले. त्यांना शीघ्र कवित्वाची देणगी लाभलेली होती. कोल्हापुरातली शाहिरी परंपरा तर त्यांनी जपली, वाढवली; इतकेच नव्हे तर ती समृद्धही केली आणि कोल्हापुरातल्या अलीकडच्या काळातल्या मान्यवर शाहिरांचे ते अग्रदूत ठरले !

लहरी हैदर हे तसे फारसे शिकलेले नव्हते. परंतु प्रतिभेचा प्रसाद त्यांना उपजतच लाभलेला होता. ते जन्माने मुसलमान होते, तरी मराठी भाषेवरील त्यांचे प्रभुत्व वाखाणण्यासारखे होते. मराठीतील संत, पंत आणि तंत कवींच्या कवितांचे त्यांनी सखोल वाचन व चिंतन केलेले होते. शाहिरी रचनेवर त्यांची विलक्षण पकड होती. लहरी हैदर हे प्रामुख्याने पोवाडे, लावण्या इत्यादी शाहिरी रचनात्मक लिहिणारे शाहीर होते. गाणारे नव्हते. ऐतिहासिक आणि सामाजिक विषयांवर त्यांनी बरेच पोवाडे रचले होते. झाशीची राणी, नरवीर तानाजी मालुसरे, राजर्षी छत्रपती शाहूमहाराज अशा वीरांचे पोवाडे तर त्यांनी रचलेच; पण हिंदुस्थानचे दारिद्र्य, आधुनिक फाजील सुधारणांचा पोवाडा, रशियन राज्यक्रांती.. अशा आधुनिक विषयांवरही त्यांनी पोवाडे लिहिले होते.

माडगूळकर कधीकधी लहरीत आले म्हणजे लहरी हैदर यांच्या त्या काळात गाजलेल्या 'फाजील सुधारणांच्या पोवाड्यातील' काही ओळी म्हणत असत :

'स्त्रियांच्या शिक्षणात न्यारी
फॅशन झाली भारी मुद्दाम डोईवरी ।
केस सारे उलटेच विंचरणार ।
मुरगुळे मारून फुगे पाडणार ।
हाही एक शिक्षणाचा प्रकार ॥...'

'या फॅशनला लाज मुळी नाही', 'काकणे बरी न वाटे–रिस्टवॉच मनगटी छोटे', 'मी हो तुमच्याजवळ पुढे बसते ! जरा सायकल मारावी असते', 'ठेच लागल खाल–पोरी पाहून चाल' अशा अन्य काही लावण्यांची तोंडेही ते गुणगुणत असत. लहरी हैदरांची 'दारूबाजाची लावणी' देखील कधीकधी शाहिरीच्या आविर्भावात म्हणत असत.

शाहीर लहरी हैदर यांचा सहवासही त्यांना घडलेला होता. माडगूळकरांचे ते उमेदीचे वय होते. त्या काळात ग्रामोफोन कंपनीने शाहीर लहरी हैदरांच्या काही रचना शाहीर पिराजीराव सरनाईक यांच्या बुलंद आवाजात ध्वनिमुद्रितही केल्या होत्या.

शाहीर लहरी हैदर यांच्या शाहिरी रचनेतील रसरशीतपणा, प्रासादिक

सुलभता, आवाहनातील जोष आणि नर्मविनोद इत्यादी गुणांनी माडगूळकरांना आकर्षित केले असले पाहिजे. त्यांच्यातील शाहिरी वृत्ती-प्रवृत्तीशी जुळतील-मिळतील असे पुष्कळसे समान धागे लहरी हैदरसाहेबांच्या व्यक्तिमत्त्वात होते.

लावणी हे दृश्यकाव्य असल्यामुळे तिला प्रेक्षकही आहे आणि श्रोताही आहे. वाचक नंतरचा आहे.

लावणीचा श्रोता हा आज जरी बदलला असला; तो ग्रामीण, शहरी, स्त्री-पुरुष, असंस्कृत-सुसंस्कृत असा सर्वसमावेशक बनलेला असला, तरी माडगूळकरी लावणी चित्रपटाच्याद्वारा रजतपटावर येऊन दाखल होईपर्यंत तो, तथाकथित शिष्ठ संस्कृतीपासून शेकडो पावले लांब असलेला असा खेडूत, अडाणी, शेतकरी, मजूर, शिपाईगडीच होता. सामान्य होता. उघडा होता. त्याच्या नित्याच्या कष्टमय लौकिक जीवनात प्रणय आणि पराक्रम ह्यांनाच प्रमुख स्थान होते. लावणी, पोवाड्यात त्याला हे गवसले. प्रणयाने रंगलेल्या लावणीने त्याला रिझवले, तर मर्दुमकीच्या वीरगाथेने दुमदुमलेल्या पोवाड्याने त्याला साहसाचे स्फुरण दिले !

या श्रोत्यांची लावणीशी गाठभेट व्हायची ती जत्रे-यात्रेच्या किंवा उरसाच्या ठिकाणी बोर्डावर उभे ठाकलेल्या तमाशाच्या फडात. गावकुसाच्या बाहेर कनातीत.

अशाच एका 'जत्रेच्या रात्री' चे विलक्षण वेधक चित्र माडगूळकरांनीच आपल्या एका कवनात अगदी रेखीवपणे शब्दांकित केलेले आहे. ती रांगडी रात्र आणि त्या रात्री रंगलेले ते इष्कबाज गडी, यांची बेहोष अवस्था कशी होती ते माडगूळकरांच्या तेवढ्याच रांगड्या नि रंगेल भाषेतून समजून घेतले पाहिजे-

दुणावून लय स्वरांत चढल्या शिरले सुरते गडी,
मुरावट भाषेहून रांगडी.
डफदिमड्यांची गरम जाहली कडाडुनी कातडी,
पुढे ये सोंगाड्या सौंगडी,
शीळ चढवूनी केली त्याने कल्लोळांवर कडी,
उडविली सुरत्यांची वावडी !
झरझरा उतरली वाद्यांची ती लय,
पोंचला शिगेला श्रोत्यांचा विस्मय,
वाजले चाळ अन् तालावर तक्थय,
कंबर लचकत येई छोकरी छेलाटी गुलछडी
अंगलट भुवईसम वाकडी !
झडल्या टाळ्या, शिट्या, अरोळ्या, वर चवल्यांच्या झडी
स्वीकरी मुजऱ्यासह फाकडी
हिरवे पातळ, हिरवी चोळी, वरी चमकते खडी

छातीवर मोत्यांच्या दुल्लडी
नथणीखाली हलू लागली अधरांची लालडी
वाहिली रसगंगा दो थडी
कुणि गालावरच्या खळींत बसले दडून,
कुणि ओठ चाविले आपुलेच कडकडून,
कुणि पदरामागिल करवंदे घे खुडून,
खमिजावरि तो कुणी ठसविली तिच्या चोळिची खडी
कुणितरी कातरली काकडी
स्वप्न समोरी, स्वप्न अंतरी, रतले, भुलले गडी,
चालली घडीमागुती घडी
नाहि उमगले घुसल्या केव्हा जत्रेच्या झुंबडी
बाजुची कनात हो उघडी
मधेच आली मधी चांदणी शुक्राची चोंबडी,
रेकली वेडचापरि कोंबडी
जाहले पुसट तो वेळूंवरचे दिवे,
ती इष्कबाजिची ज्योतीही मालवे,
जागीच राहिले बसुन जनांचे थवे,
कशी संपली रात्र कळेना इतक्यांतच तोकडी,
रिचविता ताडीच्या कावडी !

ग्रामीण भागातील जत्रेच्या रात्रीचे इतके वेधक चित्र मराठी कवितेत क्वचितच दुसरे असेल. जत्रेच्या रात्रीचा या काव्यचित्रात विशिष्ट तपशील तर बारकाव्यांसह आहेच; पण रगेल नि रंगेल मनांचा रांगडा शृंगारही आहे. आणि हा खास मऱ्हाटमोळा भाव आहे. माणदेशी मातीत जन्मलेल्या आणि वाढलेल्या माडगूळकरांना हे मऱ्हाटमोळेपण सहजरीतीने विनासायास लाभले होते.

ग. दि. माडगूळकरांची काव्यप्रतिभा हा मराठी-सारस्वतामधील एक अपूर्व चमत्कार म्हणूनच गणावा लागेल इतकी त्यांची प्रतिभा बहुमुखी आणि बहुप्रसव अशी आहे. काव्याच्या प्रांगणात तिला कुठेच मज्जाव नाही. कुठल्याही दालनात सहज प्रवेशासाठी ती सदैव 'सज्जाव' असलेलीच दिसते !

**'सुश्लोक वामनाचा । आर्या मयूरपंताची**
**ओवी ज्ञानेशाची । अभंगवाणी प्रसिद्ध तुकयाची ।'**

अशी एक आर्या-उक्ती लोकश्रुतीमध्ये प्रचलित आहे. या उक्तीमध्ये त्या त्या श्रेष्ठांच्या रचनाकृतींचा यथार्थ गौरव करण्यात आलेला आहे. श्लोक म्हटला की वामनपंडितांची आठवण व्हावी, आर्या म्हटली की, केकावली आणि अनेक

पौराणिक आख्यानांसह मोरोपंतांची याद यावी, ओवी कानी पडताच संतश्रेष्ठ ज्ञानदेवांचे स्मरण व्हावे, आणि अभंग ऐकताच तुकाराममहाराजांच्या गाथेची पाने मनश्चक्षूंपुढे फडफडू लागावीत, अशी ही मराठी रसिकता भक्तमन-संत-पंत कवी आणि त्यांची विशिष्ट रचना, किंवा रचना-वैशिष्टच या त्रिगुणांची एकात्मता, एकरूपता आज अनेक वर्षे इये मराठीचिये नगरी नांदत आहे.

या चार वैशिष्टयांव्यतिरिक्त आणखीही काही वैशिष्टयांचा उल्लेख करता येण्यासारखा आहे. उदा., पंतकवीनंतर झालेले तंतकवी. लावणी म्हटली की रामजोशी, भूपाळी म्हणताच होनाजी, पोवाडा म्हणताच अज्ञानदास, गौळण-भारूड स्मरताच एकनाथ, अशी ही कालानुसार जुनी-प्राचीन, तशी आधुनिक काळातील निसर्ग-कविता म्हणजे बालकवी, गेय, संगीतानुकूल रचना म्हणजे तांबे येथपासून ते मुक्तछंद म्हणजे अनिल आणि नवकविता म्हणजे मर्ढेकर येथपर्यंत. याशिवाय आणखीही काही...

ग. दि. माडगूळकरांच्या संदर्भात असा रचना-वैशिष्टयांचा विचार करताना एखाद-दुसऱ्याच आकार-प्रकारात वावरताना ती आढळत नाही. कितीतरी आविष्कारांमधून आविष्कृत होताना ती दिसते. आणि आश्चर्य असे की, तिचा प्रत्येक आविष्कार हा तेवढाच दर्जेदार, रसरशीत नि डौलदार असतो. आविष्कारासाठी त्यांची प्रतिभा माध्यम म्हणून रचनेचा जो आकार-प्रकार निवडते, त्या आकार-प्रकाराची सर्व गुणवैशिष्टचे ती अत्यंत समर्थपणाने व्यक्त करते. त्या त्या प्रकारातील ती ती आवाहने आणि आव्हाने ती मोठ्या तयारीने स्वीकारते आणि पेलून दाखविते. तिला कठीण जसे काही नाही, तसेच वर्ज्यही काही नाही. आणि म्हणूनच ग. दि. माडगूळकरांची प्रतिभा मला एखाद्या कसबी, प्रतिभाशाली बहुरूप्यासारखी वाटते. अंतरंगी नाना कळा असलेला बहुरूपी ज्याप्रमाणे कसल्याही वेषाने आणि मिषाने अवतरतो, त्याचप्रमाणे माडगूळकरी प्रतिभा देखील नाना कलांनी, विविध रूपांनी प्रकट होते. कसलीही वेशभूषा ती सहज-स्वाभाविक अशी परिधान करते. नाना चमत्कार दाखविते. प्रेमरंगात ती रंगून जाते, हळुवार भावमधुर बनते, तर पोवाड्यात तीच बलदंड, शौर्यशाली होते. लावणीत ती सुकुमार लावण्यवती बनते, तर क्रांतिकवनात किंवा समरगीतात ती रणरागिणी, आवेशधारिणी होते. अभंग-ओवीत ती भक्तीने भिजून, पान्हावून निघते, तर गणगौळणीत ती लाडिक शृंगार लेवून येते. काव्यकथेत ती आख्यानपर बनते, तर संगीतिकेत विविध विभ्रमांत प्रकट होते. द्वंद्वगीतात संवादिनी बनते, तर बालगीतात तीच वत्सल, लडिवाळपणा करते. ग्रामगीतात ती मऱ्हाटमोळी असते, तर गीतरामायण-गीतगोपाळ यांसारख्या गीतमालिकांमधून ती अभिजातसंपन्न दिसते ..अशी तिची किती रूपे ! किती दर्शने !

या विविध दर्शनांतच शृंगार आणि वीर हे दोन रस हातात हात घालून वावरताना दिसतात. मराठीत बहुतेक सर्व शाहिरांनी लावणी आणि पोवाडा यांची रचना केलेली आहे. शाहीर माडगूळकरांनीदेखील बरेच ओजस्वी पोवाडे रचलेले आहेत. पण इतर जुन्या शाहिरांच्या रचनांमध्ये न आढळणारी उत्कट देशभक्तिपर रचना माडगूळकरांनी केलेली आहे. त्यांच्या ठायीची स्वातंत्र्यनिष्ठा जाज्वल्य आहे ! त्यांनी रचलेल्या स्वातंत्र्य-कवनांमधून आणि समरगीतांतून त्यांच्या या निष्ठेचे तेजस्वी दर्शन घडते !

पारतंत्र्याचे जू झुगारून देण्यासाठी भारताने परकीय साम्राज्य सत्तेशी एक प्रदीर्घ झुंज दिली. लढा दिला. या लढ्यात अनेक स्वातंत्र्यवीरांनी, देशभक्तांनी, नागरिकांनी स्वार्थत्यागपूर्वक, हालअपेष्टा सोसून, देहदंड भोगून, प्रसंगी प्राणांची आहुती देऊनही भाग घेतला. नानापरींनी स्वातंत्र्ययज्ञात आपला हविर्भाग अर्पण केला. त्यांत प्रतिभावान लेखक, कवीही होते. मराठी भाषेत सेनापती बापट, साने गुरुजी, स्वातंत्र्यवीर सावरकर, कवी गोविंद, कुसुमाग्रज, वसंत बापट आदींनी ऊर्जस्वल अशा स्वातंत्र्यगीतांची रचना केली आणि याच तेजस्वी परंपरेत गदिमां-नीही तेवढीच तेजस्वी स्वातंत्र्यगीते लिहून आपले योगदान दिलेले आहे.

राष्ट्रभावना किंवा समाजमन जागृत असणाऱ्या प्रतिभावंतांसमोर त्या काळी स्वातंत्र्यलढ्याच्या रूपाने एक राष्ट्रीय आव्हानच उभे ठाकलेले होते. ते दिवसच तसे संवेदनशील मनांना भारून टाकणारे होते. गदिमांनी त्या काळाला 'मंतरलेले दिवस' असे सार्थ नामरूप दिलेले आहे. या मंतरलेल्या दिवसांतली आपली तरुण वयातली मंत्रसिद्ध अवस्था निवेदन केलेली आहे. हे निवेदनही तेवढेच रसरशीत व मंत्रमुग्ध करणारे आहे. त्यात त्यांच्या स्वातंत्र्यगीतांच्या स्फुरणाची कथाही ओघाने आलेली आहे.

विद्यार्थीदशेत असताना गणिताने 'टांग' मारल्यामुळे महाविद्यालयाच्या अंगणातच आपण कसे कोसळलो आणि भरकटलेल्या आयुष्याने फैजपूर काँग्रेसला कसे नेऊन पोचविले ही हकीकत सांगून गदिमा म्हणतात,

"...तिथेच माझे मन कशाने तरी झपाटले. मेणासारख्या कोवळ्या मेंदूवर भलत्याच विचाररेखा मुद्रित झाल्या. माझे डोके पार बिथरले. घर विसरले... सारे काही विसरले. आपण देशासाठी बलिदान केले पाहिजे, हा एक छंद मनाने घेतला...'गृहप्रपंच सारेच करतात, मला हुतात्मा व्हायचे आहे' हा विचार मनात पक्का ठसला होता."

आणि या झपाटलेल्या तरुणाला सातारा जिल्ह्यातील औंध संस्थानातल्या कुंडलगावी 'देशभक्तीच्या भुताने झपाटलेली काही झाडे' गवसली. गोत्र जमले. कथा-कहाण्या ऐकून ते यांना 'गुरुजी' म्हणू लागले. मठाची स्थापना झाली.

गुरुजींना कवनविद्या जन्मजात, एखाद्या अवयवासारखीच लाभलेली. झपाटलेल्या झाडात शंकर निकम नावाचे खड्या आवाजाचे, शाहिरी ढंगाचे एक झाड होते. गुरुजी त्याला रोज 'देशार्थ जगेन। देशार्थ मरेन। देशार्थ करीन। सर्व दान' अशी प्रातःस्मरणे लिहून देऊ लागले. शंकर निकम या नव्या विचाराने गाव जागवू लागला. गुरुजींनी ठरविले याला 'स्वातंत्र्य-शाहीर'च करावा. वाटचालीत वाकणे, वळणे आली, पण प्रवास सुरूच राहिला.

त्यावेळी स्वातंत्र्यार्थ लढणारी 'राष्ट्रीय सभा' म्हणजे काँग्रेस हा आघाडीवरचा पक्ष. 'काँग्रेस एक देशाचे दैन्य हरणार! लाविती पणाला प्राण गांधी-जवाहर॥' अशी एक रचना गुरुजींनी निकमाला करून दिली.

पुढे बेचाळीस साल आले. गांधीजींनी ब्रिटिश सत्तेला उद्देशून 'चले जाव' म्हटले. आठ ऑगस्टचा ठराव पास झाला. 'करेंगे या मरेंगे' मंत्राने देश सळसळला. बघता बघता बेचाळीसच्या क्रांतीने रौद्ररूप धारण केले. सातारा जिल्ह्यात नाना पाटील यांच्या नेतृत्वाने भूमिगत तडफदार तरुणांनी प्रतिसरकारच स्थापन केले. या सरकारचे कवित्व या गुरुजींनीच केले.

'सत्यासाठी सुखे लुटावा 'सत्ते'चा पैसा
शिवरायांनी घालुन दिधला धडात्र हा ऐसा-'

क्रांतिकारकांनी 'पे ट्रेन' लुटली. लढ्यासाठी द्रव्य मिळविले. गुरुजींची ओजस्वी रचना निकमाच्या मुखातून क्रांतिकारकांच्या कानावर पडली रे पडली की त्यांचे बाहू फुरफुरू लागत. छाती रुंद होऊन जाई, डोळ्यात नवे साहस तरळू लागे.

'नाना पाटील नाही एकला। त्याच्या दिमतीला।
उभा ठाकला। मर्दांचा सारा सातारा प्रांत।'

शाहीर निकम पोवाडा म्हणे. प्रतिसरकारचे कार्य गुरुजींच्या शब्दांतून गावकऱ्यांना सांगे. आणि या कार्यात विघ्न आणणाऱ्या सूर्याजी पिसाळांना तो गुरुजींच्याच भाषेत सांगे–

'याला प्रतिबंध जे जे करणार
दिवा नाही त्यांच्या वंशी उरणार।'

अशी दमदार शापवाणी उद्गारणारा हा स्वातंत्र्यशाहीर स्वातंत्र्यार्थ क्रांतीत प्राणार्पण करून हौतात्म्यपदी चढणाऱ्या हुतात्म्यांना तेवढ्याच भक्तिभावाने व आदराने वंदन करायला विसरलेला नाही :

'मायमाउली भारतमाते, घे पहिला मुजरा
स्वातंत्र्याचा उमदा शाहीर आला दरबारा।
घडण कराया स्वातंत्र्याची स्वर्गी जे गेले
वीर हुतात्मे दरबारी तव मानाने बसले।'

या दरबारात वासुदेव बळवंत फडके, चाफेकर बंधू, कान्हेरे, मदनलाल धिंग्रा, भगतसिंग, सुखदेव, राजगुरु, धनशेट्टी, शिंदे, सारडा, उधमसिंग आदी क्रांतिवीरांबरोबरच

**‘ बेचाळिसच्या लढ्यात मरुनी अमरपदी गेले**
**या, ते तुम्ही वीर मर्द हो दरबारी सगळे ।**
**या दरबारी जागा तुमच्या खास राखलेल्या**
**तुमच्या पायी पायघड्या ह्या प्राणांच्या केल्या ।’**

असे आवाहन केलेले आहे. आणि मग त्यानुसार–

**‘ वंदे मातरम् वंदे मातरम्...झाली ललकारी**
**बेचाळिसचे विजयी योद्धे आले दरबारी ।’**

त्यांत हेमू कालाणी आहे, भाई कोतवाल आहेत, गारगोटीचे वीर आहेत, कोल्हापूरचा बिंदू नारायण आहे, किर्लोस्करवाडीचे पंड्या आहेत...असे ज्ञात-अज्ञात कितीतरी आहेत, त्या सर्वांना स्मरुन हा शाहीर म्हणतो–

**‘ मृतवीरांना करा मंडळी लक्षवार नमने**
**कान करुनी जीवाचे मग ऐका ही कवने ।।’**

माडगूळकरांची बहुतेक शाहिरी रचना चित्रपटाच्या माध्यमातून रसिक प्रेक्षकांपुढे आली. याचा एक फायदा असा झाला की ती उच्च वर्गीयांपासून ते सर्वसामान्य लोकांपर्यंत जाऊन पोचली. लोकांच्या तोंडी घोळू लागली. निरनिराळ्या सांस्कृतिक कार्यक्रमांमधून रंगमंचावर येऊ लागली. तमाशाच्या बोर्डावरही रंगू लागली. ती खऱ्याखुऱ्या अर्थाने लोकप्रिय बनली. परंतु चित्रपटाच्या माध्यमामुळे तोटा असा झाला की, या अभिजात, अस्सल रचनेकडे ‘ सिनेमातली गाणी ’ म्हणून एकप्रकारच्या तुच्छतेने, तथाकथित समीक्षकांनी पाहिले आणि तिची दखल घ्यावी तशी घेतली नाही. माडगूळकरी लावणीच्या अभिजातपणाकडे त्यांनी दुर्लक्ष केले आणि ऊर्जस्वल समरगीतांना ‘ प्रासंगिक ’ म्हणून बाजूला सारले. माडगूळकरांसारख्या श्रेष्ठ दर्जाच्या शाहिरावर हा मोठा अन्यायच झाला!

माडगूळकरांनी, कोणाही शाहिरांपेक्षा कमी तर नाहीच, पण काही बाबतीत काकणभर जास्तच अशी दर्जेदार रचना केलेली आहे. शाहिरीची सर्व अंगोपांगे त्यांनी यशस्वीपणानेहा ताळली आहेत. आपल्या सिद्धहस्त लेखणीने शाहिरी-वाङ्मयाची सर्व दालने त्यांनी पादाक्रांत केलेली आहेत ! अतिव्याप्तीचा कदाचित होणारा आरोप पत्करुन देखील मी असे विधान करतो की, कालक्रमाने हा ‘ आठवा शाहीर ’ असला तरी गुणक्रमाने बहुधा हा ‘ पहिला शाहीर ’ देखील ठरण्याची शक्यता आहे ! माडगूळकरांनी व्यापलेला शाहिरी प्रांत औरसचौरसहि आहे. विस्तृत आणि सखोल देखील आहे.

ग. दि. माडगूळकर यांना इतर निकटवर्तियांप्रमाणेच मी 'अण्णा' म्हणत असे. अण्णांच्या पन्नाशीला आम्ही 'गदिमा–नवनीत' प्रसिद्ध केले होते. साठीच्या निमित्ताने त्यांच्या दुर्लक्षिलेल्या शाहिरीवर लिहून पुस्तक काढावे, असे मनी होते. त्यादृष्टीने मी तयारीही चालविली होती. खुद्द अण्णांशीही चर्चा केली होती. माझे विद्वान मित्र श्री. नरहर कुरुंदकर यांनी पुस्तकाला प्रस्तावना लिहिण्याचे मान्य केले होते. परंतु दुर्दैवाने अण्णा आणि कुरुंदकर दोघेही मैफल सोडून गेले ! प्रस्तावना राहून गेली. पण अण्णांच्या शाहिरीचे हे सणंग, जमेल तसे, मी रसिकांपुढे ठेवीत आहे. यातील काही लेख मी दिवाळी अंकांतून लिहिले होते. त्यामुळे कुठे कुठे पुनरुक्तीही आढळेल. अण्णांची यच्चयावत, समग्र शाहिरी यात आली आहे, असा माझा दावा नाही.

या लेखनासाठी संदर्भ म्हणून मला शाहिरीवरील अनेक ग्रंथांचा उपयोग झाला. काहींनी आपल्याजवळच्या रचना उपलब्ध करून दिल्या, तर काहींशी मी विचारविनिमयही केला. या सर्वांचा मी ऋणी आहे.

'आठवणीतील अण्णा– गदिमा' या माझ्या पुस्तकाप्रमाणेच 'शाहीर-ग. दि. माडगूळकर' या पुस्तकाचे अण्णांचे चाहते व रसिक वाचक स्वागत करतील अशी आशा आहे.

□

२

# जाहला नाच गणांचा सुरू

मराठी मुलुखात शुभकार्याची सुरुवात श्रीगणपती पूजनाने करण्याची फार प्राचीन प्रथा आहे. लग्नकार्य, मुहूर्त, शांत, उद्‌घाटन, असं कुठलंही धार्मिक, सांस्कृतिक, शैक्षणिक कार्य असो, प्रारंभी गणेशवंदना होणारच ! घराच्या किंवा मंडपाच्या प्रवेशद्वारावर गणपतीचं चित्र लागणारच ! काही जुन्या घरांच्या लाकडी नक्षीदार दारांच्या चौकटीवर सुबकरीतीनं कोरलेली गणेशपट्टीच असे. जुन्या-पुराण्या वाड्यांच्या चौकटीवर अजूनही ती दिसते.

गणेशवंदनाची ही प्रथा मराठी सारस्वतांनीही सोडलेली नव्हती. कुठल्याही लेखनाचा आरंभ ते गणेशवंदनानेच करीत असत. ज्ञानदेवांनी 'ज्ञानेश्वरी' सारखं देशीकार लेणं अमृताते पैंजा जिंके अशा एकेका अक्षरांनी निर्माण करून शांत रसात ब्रम्हविद्येचा सुकाळ करून सोडण्यासाठी जेव्हा नेवाशाला 'पैसा 'च्या खांबाशी लेखणी हातात धरली तेव्हा प्रथम गणेशवंदनेचीच ओवी लिहिली :

'ओम् नमोजी आद्या । वेदप्रतिपाद्या ।
जय जय स्वसंवेद्या । आत्मरूपा ।।'

हे निर्गुणब्रम्हा आत्मरूपा तू सर्वांचा आदी असून तुझे वेदांनी वर्णन केलेले आहे. तुझ्या स्वरूपास जाणणारा तू स्वतःच आहेस. तुला माझा नमस्कार असो ! तुझा जयजयकार होवो !

गणेशाचा असा जयजयकार केल्यानंतर ज्ञानदेवांनी पुढील काही ओव्यांत गणेशवर्णनाबरोबरच गणेशस्तुतीही केलेली आहे :

देवा तूंचि गणेशु । सकलार्थ मतिप्रकाशु ।
म्हणे निवृत्तिदासु । अवधारिजो जी ।।
शब्दब्रह्म अशेष । तेचि मूर्ति सुवेष ।
तेथ वर्णवपु निर्दोष । मिरवत असे ।।
स्मृति तेचि अवयव । देखा आंगीक भाव ।
तेथ लावण्याची ठेव । अर्थशोभा ।।
अष्टादशपुराणे । तींचि मणिभूषणें ।
पदपद्धती खेवणें । प्रमेयरत्नांचीं ।।
पदबंध नागर । तेंचि रंगाथिले अंबर ।
जेथ साहित्य वाणे सपूर । उजाळाचे ।।
देखा काव्यनाटका । जे निर्धारितां सकौतुका ।
त्याचि रुणझुणती क्षुद्रघंटिका । अर्थध्वनि ।।
नाना प्रमेयांची परी । निपुणपणें पहातां कुसरी ।
दिसती उचित पदें माझारीं । रत्नें भलीं ।।
जेथ व्यासादिकांची मती । तेचि मेखळा मिरविती ।
चोखाळपणे झळकती । पल्लवसडका ।।
देखा षड्दर्शनें म्हणिपती । तेचि भुजांची आकृती ।
म्हणऊनि विसंवादें धरिती । आयुधें हातीं ।।
तरी तर्कुतोचि फरशु । नीतिभेदु अंकुशु ।
वेदान्तु तो महारसु । मोदकु मिरवे ।।
एके हाती दंतु । जो स्वभावता खंडितु ।
तो बौद्धमतसंकेतु । वार्तिकाचा ।।
मग सहजे सत्कारवादु । तो पद्मकर वरदु ।
धर्मप्रतिष्ठा तो सिद्धु । अभयहस्तु ।।
देखा विवेकवंतु सुविमळु । तोचि शुंडादंडु सरळु ।
जेथ परमानंद केवळु । महासुखाचा ।।
तरी संवादु तोचि दशनु । जो समता शुभ्रवर्णु ।
देव उन्मेषसूक्ष्मेक्षणु । विघ्नराजु ।।
मज अवगमलिया दोनी । मीमांसा श्रवणस्थानीं ।
बोधमदामृत मुनी । अली सेविती ।।
प्रमेयप्रवाल सुप्रभ । द्वैताद्वैत तेचि निकुंभ ।
सरिसेपणें एकवटती इभ । मस्तकावरी ।।
उपरि दशोपनिषदें । जियें उदारज्ञानमकरंदें ।

तियें कुसुमें मुकुटीं सुगंधें । शोभती भाळीं ।।
अकार चरणयुगुल । उकार उदर विशाल ।
मकार महामंडल । मस्तकाकारें ।।
हे तिन्ही एकवटले । तेथ शब्दब्रम्ह कवळलें ।
ते मियां श्रीगुरुकृपा नमिलें । आदिबीज ।।

मराठी शाहिरांनी देखील गणेशवंदनाची ही प्रथा पाळलेली आहे. शाहीर ‘ गणाची लावणी ’ म्हणूनच आपल्या पुढच्या वगाला सुरुवात करतो. लावणीच्या अनेक प्रकारांत ‘ गणाची लावणी ’ असा एक प्रकार आहे. या लावणीत प्रामुख्यानं गणेशस्तवन केलेलं असतं. रीतीप्रमाणं आधी गण होतो. अनेक ठिकाणी गणाच्या वेळेला रंगभूमीवर प्रत्यक्ष गणपतीलाच आणले जाते. मुखवटचाचा हा गणपती गणाच्या तालावर शाहिरांच्या सुराबरोबर नाचतही असतो. मराठी शाहिरांनी आपापल्या फडासाठी पुष्कळच ‘ गण ’ लिहिलेले आहेत. शाहीर प्रभाकर आपल्या गणाच्या मुखडचात गणपतीला आळवताना म्हणतो :

‘महाराज गौरिनंदना अमरवंदना दैत्यकंदना हे मंगलमूर्ती ।
ठेवी कृपादृष्टि एकदंत दीनावर पुरती ।।
हे स्वयंभु शुभदायका हे गणनायका गीतगायका अढळ दे स्फूर्ति ।

शाहीर होनाजी गणेशस्तुती अशा प्रकारे करतो :

श्रीवक्रतुंड गणपती, गणाधिपती, तुझी जे स्तुति ।
नर निशिदिनी करती, ते नर निर्विघ्न प्रपंची, जग विचरती ।’

सगनभाऊ हा आपल्या गणात म्हणतो :

‘नमो गणा आदिगणा निर्गुणा संगे सारजा आदिमाया ।
आले सभेसी उभे गाया भक्तजनांला ताराया ।।

पठ्ठे बापूराव या शाहिरानं तर गणाच्या बऱ्याच लावण्या लिहिल्या आहेत. त्यातील काही लोकनाटचाच्या प्रारंभी आजही म्हटल्या जातात. पठ्ठे बापूरावाच्या एका गणाचा मुखडा असा आहे :

‘लवकर यावे सिद्ध गणेशा
आतमध्ये किर्तन करून तमाशा
माझा भरवसा तुम्हावर खासा–
विघ्न पिटविशी दाहिदिशा–’ ।

शाहिरी वाङ्मयाची रचना करताना ग. दि. माडगूळकर यांनीदेखील काही गण लिहिलेले आहेत. माडगूळकरांच्या रसाळ, प्रासादिक आणि सुलभ अशा काव्यगुणांचं दर्शन त्यांच्या गणांमधूनही घडतं.

श्री. व्यंकटेश माडगूळकर यांनी लिहिलेल्या ' बिनबियांचे झाड ' या वगनाटयातील पदरचना गदिमांनीच केलेली आहे. या वगनाटयाला प्रारंभीच लिहिलेला त्यांचा गण रचनेच्या दृष्टीनं उत्कृष्ट असाच आहे. एका बाजूनं खास मऱ्हाट मोळा शाहिरीबाज जसा या गणात दिसतो, तसाच दुसऱ्या बाजूनं आशयाचा थाटही ज्ञानेश्वरांच्या गणेशपूजनाची आठवण करून देतो. ज्ञानेश्वरांच्या गणेशपूजनाचा गदिमांनी केलेला हा शाहिरी ढंगातील त्रोटक अनुवादच आहे. गदिमा लिहितात :

' कविता नाटक दोन्ही चरणी रुणझुणती घुंगरू
ओंकारस्वरूपी, पूर्ण प्रतापी नाच गणाचा सुरू !
अठरा पुराणें तीच भूषणें, भाषा पीतांबर
व्यासमतीची रुळे मेखला त्याच्या कमरेवर.
सभा-रंगणीं गणहि रंगला वंदन त्याला करूं,
जाहला हो नाच गणाचा सुरू !
दोन मिमांसा हलती त्याच्या कानामधीं कुंडल
शुकसनकादिक करिती म्हणुनी ही त्याभंवती मंडल.
उपनिषदांची फुलं लागली हारामधुनी झरू,
जाहला हो नाच गणाचा सुरू !'
आकार चरणीं, उकार उदरीं, मकार तो मस्तकीं
आशीर्वादा देइ, गणपति मायेच्या हस्तकी
कृपाप्रसादें या रे त्याच्या, रंग गायनी भरूं,
जाचला हो नाच गणाचा सुरू !'

जुन्याकाळच्या तमाशालाच अलीकडं 'लोकनाटय' असं म्हटलं जातं. जुन्या तमाशातली बरीचशी अंगं नव्या लोकनाटयात लुप्त होताना जरी दिसत असली, तरी जुनी ढंगं मात्र कायम ठेवण्याचा प्रयत्न दिसतो. पारंपरिक तमाशात असलेला गण नव्या लोकनाटयांनीही जतन केलेला आहे.

गदिमांनी वरीलप्रमाणंच, माझ्या माहितीनुसार, आणखी दोन लोकनाटयांसाठी गण-गौळण-वग-लावणी अशी रचना केलेली होती. त्यांतील एक लोकनाटय 'गाढवाला भेटला गुरू' हे एका लोककथेवर आधारित, पण त्यांनी स्वत:च लिहिलेले होते. गद्य-पद्य सर्व त्यांचेच होते. त्याचे एकदोन प्रयोगही झाले होते. परंतु आज ते अनुपलब्ध असल्यामुळे त्यातील गण इत्यादी काहीच देता येत नाही.

श्री. द. मा. मिरासदार यांनी लिहिलेल्या 'मी लाडाची मैना तुमची' नामक वगनाटयासाठी देखील गदिमांनीच गीतरचना केलेली होती. या वगनाटया-

साठी लिहिलेला गदिमांचा गण असा आहे :

‘ श्रीगणेशा, विद्याधीशा, आम्हा पाठी रहा उभा !
रसिकजनांची बसे सभा ।।
वरदकरी हे गजवंदना
वर आम्हासी दे
इंद्रधनूसम रंगपीठ हे
रंगांनी शोभु दे ।
अभिनय-गायन उभय कलांवर तुझी पडू दे प्रभा !
रसिकजनांची बसे सभा ।।
या रसिकांचे मनोविनोदन
नाट्य-दर्शने करू ।
भाव-विभावा आणि नवरसा
सद्‌भावे आदरू ।
आम्हांमधल्या मुक्या गुणांना मधुर फुटू दे जिभा ।
रसिकजनांची बसे सभा ।।

गदिमांनी त्यांच्या अगदी सुरुवातीच्या काळात कोल्हापूरला असताना गणेशोत्सवातील मेळ्यांसाठी गणाच्या धाटणीची गणेशस्तवनं लिहिली होती. तसे ते स्वत: गणेशभक्तच होते. त्यांनी ‘ गणपत्यथर्वशीर्षा ’चे मराठीकरण-‘ गणेश-गौरव ’ या नावानं केलेलं आहे. स्तोत्र मूळ मराठीत असल्याइतकंच सुंदर, सरळ, सोपं आणि रसाळ झालेलं आहे. ‘ गणेश-गौरव ’ वाचून विनोबांसारख्या महान आचार्यानं म्हटलं होतं, “ गणेश स्तोत्राचे मराठी पाहिले. माडगूळकर सिद्धहस्तच आहेत. रूपांतर उत्तम झाले आहे. ”

सिद्धहस्त गदिमांनी चित्रपटांसाठी देखील प्रसंगानुरूप काही गण लिहिलेले आहेत. ‘ सुरंगा म्हणतात मला ’ या चित्रपटासाठी लिहिलेल्या गणात त्यांनी अष्टविनायकांनाच कार्यसिद्धीसाठी पाचारण केलेलं आहे:

अष्टविनायक या हो;
वरदान आम्हाला द्या हो ।।
या मयूरेश्वर मोरगावचे
सिद्धीविनायक सिद्धटेकचे
पालीगावचे बल्लाळश्वर
या चिंतामणी सोडून थेऊर
धावा झणी ध्या हो

वरदान आम्हाला द्या हो ।।
वरदविनायक महड गावचे
गिरिजात्मक या लेण्याद्रीचे
रांजणगावाहून गणेशा,
ओझरहून या; या विघ्नेशा
शुभकार्य तडीला न्या हो ।
वरदान आम्हाला द्या हो ।।

'मी तुळस तुझ्या अंगणी' नामक चित्रपटातही गदिमांचा श्रीगणेशाला आवाहन करणारा सुंदर गण आहे :

सभा रंगणात यावे, गणराज गणपती
मोरावरी नाचत यावे, मांडली हो सरस्वती
गायनात भरू द्या रंग
सभाजन होतील दंग
सात सूर अवघे ताल तुम्हा बोलविती
सभा रंगणात यावे गणराज गणपती ।।

आपण आपल्या मुखानं जरी गात आणि बोलत असलो तरी आपला बोलविता धनी वेगळाच आहे, याची श्रद्धायुक्त जाणीव शाहिरांना होती आणि या श्रद्धेनंच 'मु. पो. ढेबेवाडी' नामक चित्रपटातील गदिमांचा शाहीर गण आळविताना म्हणतो :

गणराज गजानन गौरीसुता
धनि तूच आमुचा बोलविता ।।
सभामंडपी यावे गणेशा
पुरव आमुची पुरव मनीषा
आज मांडिला खेळ तमाशा
होई आम्हांसी तू यशदाता ।।
भरव कवीच्या मुखात वाणी
गळचात गात्या रागरागिणी
लय नाचाची पेर पैंजणी
कळसूत्रधार तू नाचविता ।।

कार्यक्रमाच्या प्रारंभी 'गण' गाण्याची शाहिरी परंपरा आहे याची आठवण ठेवून 'मल्हारी मार्तंड' नामक चित्रपटातील सवाल-जबाबांची सुरुवातच त्या धाटणीने झालेली आहे. पारंपरिक गणाहून ही रचना वेगळी असली, तरी

अस्सल शाहिरी बाजाची आहे. बकुळा आणि तिची प्रतिस्पर्धी यांच्यातील खटके-बाज सवाल-जबाब गदिमांनी असा रंगवलेला आहे :

बकुळा-एक दांताचा दो मातांचा तीन आगळ्या गोतांचा
चार भुजाचा देव कोण ग पाच थुलथुलित हातांचा

प्रतिस्पर्धी-कोण लाभला गुरू एवढा प्यालीस अक्कल काढा ग
शाहीरकीच्या उजळणीतला हा तर पहिला पाढा ग
एकदंत श्रीगजाननाला कोण ओळखत नाही ग
सती पार्वती पहिली माता दुसरी गंगामाई ग
सत्वरजांतून देव वेगळा ही शास्त्राची वाणी ग
चार भुजांसह सोंडहि त्याची असते हातावाणी ग
(झाली की नाही सलामीला तोड)

बकुळा-नकोस हरकून जाऊं मी हा सवाल नव्हता केला ग
रीत पाळली स्मरण गणाचे केले आरंभाला ग

गदिमांनी शाहिरीतला श्रीगणेशा अशा तऱ्हेनं उत्तम रीतीनं गिरवून शाहिरीची रीतभात पाळलेली आहे !

उंच टिपेच्या आवाजात शाहिरानं प्रसन्न-सुंदर-प्रासादिक भाषेतला गण गायिल्यावर पुढच्या कार्यक्रमाची रंगत वाढतच जाते. उघड्यावरले किंवा कनातीतीतले रसिक श्रोते गणानं खूष झालेले असतात आणि पुढच्या गौळणीसाठी बोर्डाकडं उत्सुकतेनं डोळे खिळवून बसतात.

□

३

# माडगूळकरांच्या गौळणी

जुन्या तमाशात किंवा नव्या लोकनाटचात परंपरेनुसार 'गणा'नंतर 'गौळण' सुरू होते. 'कडकड बिजली मारी तोडा गणगौळण हो सुरू-' असं गदिमांनीही एका कवनाच्या मुखडचात म्हटलेलं आहे.

'गौळण' हा मराठी काव्यातील एक रसमय, प्रेममय, काहीसा लाडिक, तर काहीसा लटका रागीट, पण तरीही निश्चितपणानं भक्तिकाव्याचाच एक प्रकार आहे. गौळणीत चित्तवेधकता अधिक आहे. कारण त्यात संगीत आणि नाटच-देखील भरपूर आहे.

गौळणीचा मुख्य विषय असतो कृष्ण आणि गोपी यांच्यातील संघर्षाचा किंवा खेळीचा. कृष्ण-चरित्रात कृष्णाचे बालपण हे मोठे अद्भूत, पराक्रमी, तसेच अत्यंत खोडसाळ स्वरूपात दिसते. कृष्णाला 'नटखट' असे म्हटलेच आहे! बाल-पणातल्या त्याच्या या कृतींना अध्यात्माच्या भाषेत 'लीला' म्हणून संबोधिले असले, तरी व्यवहाराच्या भाषेत त्यांना 'खोडचा' असेच म्हटलेले आहे.

मराठी संतांनी देखील बऱ्याच गौळणी रचिलेल्या आहेत. कृष्णाच्या लीला किंवा खोडचा नामदेव, एकनाथ, तुकाराम आदी संतांनी मोठचा कौतुकानं-भक्तीनं आपल्या गौळणीतून वर्णिलेल्या आहेत.

संतांच्या गौळणी हा एक रूपकाचाच भाग आहे. नाथांनी भारूडाची रचना केली. तुकारामांनी अनेक रूपके लिहिली. ही रूपके लिहिण्यामागचा त्यांचा उद्देश लोकरंजनातून लोकशिक्षण साधण्याचाच होता. कृष्णाच्या लीला किंवा खोडचा

हा मराठी रसिक मनाला आकर्षित करून रिझविणारा भाग आहे, हे मर्म संतांनीही जाणले होते आणि म्हणूनच त्यांनी जनसामान्यांना रिझविता रिझविता परमार्थाची वाट दाखविण्याकरिता गौळणींची रचना केलेली आहे. तिला अध्यात्माचा पदर आहे. परंतु शाहिरांची गौळण ही संतांच्या गौळणीपेक्षा निराळी आहे. संतांच्या गौळणीपासून शाहिरांना प्रेरणा आणि स्फूर्ती मिळालेली आहे. परंतु हिचा घाट शाहिरी बाण्याचा असून ती मनोरंजनाला प्राधान्य देणारी आहे. म्हणून ती शृंगारीकही आहे. शिवाय तिला दृश्य-परिमाण असल्यामुळे ती भरपूर नाट्यमय देखील आहे. कारण समोर बसलेल्या श्रोत्यांना केवळ आनंदानं रिझविण्याचं काम तिला करायचं असतं.

गण झाल्यानंतर शाहिराला त्याचा सोबती, हा बहुधा त्या वगनाट्यातील सोंगाड्याच असतो, तो म्हणतो, "वा वा शाहीर ! गण तर फक्कड झाला. आता गौळण अशीच ठसकेदार होऊ द्या ! समदं पब्लिक कसं खुश झालं पाहिजे !"

शाहीर म्हणतो, "ऐका ऽऽ--"

डफ-तुणतुणं-ढोलकी-झांज-ट्रँगल इत्यादी वाद्यं एका विशिष्ट लयीत घुमू लागतात आणि त्या लयीला साथ देतच पायातील घुंगरांचा झुमझुमाट करीत, पदर उंचावलेल्या पाठमोऱ्या गवळणी लचकत-मुरकत बोर्डावर येतात. वाद्यांची लय वाढत जाते. कडे-ढोलकीचा तोडा कडकडतो आणि पाठमोऱ्या गवळणी श्रोत्यांना सन्मुख होतात. दह्या-दुधाचे माठ डोक्यावर घेतल्याचा आविर्भाव करीत मथुरेच्या बाजाराला निघतात. त्यांच्याबरोबर पुरुषी थाटातली एक मावशीही असते. त्या मथुरेला निघाल्या की कृष्णाचा सोंगाड्या मैतर त्यांची वाट अडवतो. शाब्दिक संघर्षाला सुरुवात होते. ही चकमक मोठी विनोदी असते. द्व्यर्थीही असते. हावभावही अर्थवाही असतात. गवळणींच्या वतीनं मावशी आणि कृष्णाच्या वतीनं सोंगाड्या अशा या दोघांतच ही चकमक झडत असते आणि श्रोते त्यातील कोटीबाजपणानं खो खो हसत असतात.

कृष्णाच्या वतीनं सोंगाड्या त्यांच्याकडं टॅक्स मागत असतो. बरेच आढेवेढे घेतल्यानंतर गवळणी टॅक्स द्यायला तयार होतात. कृष्णाविषयी त्यांच्या मनोमनी भक्तीचा प्रेमभावच वसत असतो. हा टॅक्स म्हणजे एक प्रकारचं त्यांचं समर्पणचं असतं.

या सगळ्या प्रकारात गौळणी ठसक्यानं गौळण म्हणत असतात. या गौळणीत बहुधा मथुरेच्या बाजाराला जाण्याची लगबग दिसून येते.

गदिमांनी मराठी संतांच्या आणि शाहिरांच्या परंपरेला उजळून टाकतील अशा दोन्ही प्रकारच्या गौळणी बऱ्याच लिहिलेल्या आहेत. 'बिनबियाचं झाड' या लोकनाट्यात गणानंतर त्यांची गवळण अवतरते ती अशी :

चल ग सखू, दहिदूध विकू
चल ग मथुरा बाजाराला,
तुजी माजी घरं शेजाराला !
सान्या गेल्या पुढं, उचल तुझं घडं
दिस तरी बघ बाई मोहोरला,
चल जाऊ मथुरा बाजाराला !
झपझप चाल बाई, झपझप चाल
गावठाण गेलं आली गवळ्याची ताल
यमुनेच्या आलो बाई किनान्याला
चल जाऊ मथुरा बाजाराला !
ओचं वर धरून, धार पार करून
न्याहारीच्या आत जाऊ ठिकाण्याला
चल जाऊ मथुरा बाजाराला !

'मी लाडाची मैना तुमची' या वगनाट्यालादेखील अशाच धाटणीची गदिमांची जी गौळण आहे, ती अशी आहे :

शिरी घट लोण्याचे
मुखी स्वर गाण्याचे
झपाझप चाला गं, मथुरा दूर ॥
निघायास हो उशीर फार
इथेच झाली ऐन दुपार
झपाझप चाला गं, मथुरा दूर ॥
हा यमुनेचा आला घाट
इथेच घेती पोरे पाठ
झपाझप चाला गं, मथुरा दूर ॥
कदंबबुंध्यामागे चोर
यशोमतीचा चावट पोर
झपाझप चाला गं, मथुरा दूर ॥
तो मुरलीचे घुमतील सूर
नका होऊ ग त्यातच चूर
झपाझप चाला गं, मथुरा दूर ॥

याच वगनाट्यात गदिमांची आणखी एक गौळण आहे. मऱ्हाटमोळा रांगडा शृंगार या गौळणीत गदिमांनी मोठ्या खुमासदार रीतीनं रंगवलेला आहे. गोकुळातली ही गवळण नंदाच्या लेकाला कशी समजावते आहे पाहा :

तुझी मूठ भारी दणकट, सोड मनगट नंदाच्या लेका।
पुढं निघुन गेल्या गवळणी मारिती हाका ।।
या वेळी मला दे मुभा, जाऊ दे
घट अफुट शिरी वल्लभा, राहू दे
सखिजना आपुल्या जिभा, चावु दे
करू नको जराही लगट, नीट दे वाट,
सोडुनि हका, नंदाच्या लेका।।
बाजार करुनी परतते नदितटी
एकांती तुला भेटते, एकटी
खांद्यास अशी टेकते, हनुवटी
लाडात उभयता हसू, जोडीनं बसू
शिळेवर एका, नंदाच्या लेका ।।
हे वचन तुला मी देते, माधवा
कालिंदी शपथ-सांगते, यादवा
थोडचात गोडी नांदते, केशवा
चौमुखी गोष्ट जाईल, आणि होईल
नगरभर डंका, नंदाच्या लेका ।।

'लोकशाहीर राम जोशी' या गाजलेल्या चित्रपटात गदिमांनी अशीच एक रांगडी गवळण चितारलेली आहे. कृष्ण-गोपींच्या अवखळ शृंगाराचे चित्र या गौळणीत फारच सुंदर रीतीने रेखाटलेलं आहे. वाटेल तशा खोड्या काढणाऱ्या कृष्णाला चापणारी ही एक धीट गवळण आहे. ती कान्हाला बजावते आहे :

एकवार सांगते कान्हा
नको येऊ वाटेला पुन्हा
भरल्या घरच्या आम्ही कामिना
नाही सोसणार तुझा हूडपणा !
परवा धरलास हात
कदंबाच्या वनात
पाप तुझ्या मनात
रंगावाणी कावा तुझा काळा
काय मिटतोस अर्धाच डोळा ?
काल मारलास खडा
माझा फुटला घडा
दहचा-दुधाचा सडा

मुलखावेगळाच करिसी चाळा
काय मिटतोस अर्धाच डोळा ?
आज ध्यानात धर
आधी बाजूस सर
आई ग धरला पदर
भिडला केतकीला भुजंग काळा
काय मिटतोस अर्धाच डोळा ?

दुसरी एक अशीच धीट परंतु आपल्या रूप-लावण्याची जाण असलेली गर्विष्ठ गवळण आहे. ही तर आपल्या ताकालाच दुधाचा भाव सांगते आहे :

मी गवळ्याची उमदी पोर
जणु चंद्राची चढती कोर
चालले मी थाटात
भरलेल्या हाटात
गाव गेला भुलून झोकाला
दुधाचा भाव माझ्या ताकाला !

अंग गोरटे , उमदा थाट
तंग कंचुकी , उघडी पाठ
घागऱ्या घोळात
रुणुझुणु चाळात
बांधुनी नेते मी कैकाला !

तिरपी भिवई, कलती मान
ओठी गाणे, फिरतीं तान
चव काय लोण्यात
रस माझ्या गाण्यात
वेड लागे नगरच्या लोकांला !

बघणाऱ्यांच्या डोळां पाप
बघून भरते अर्धे माप !
लटकीच लाजून
दाम घेते मोजून
सोडु का कुणाच्या काकाला !

बोर्डावरची ही गदिमांची गवळण लौकिक रूपातली आहे, तर दुसरी संतवळणाची गवळण अलौकिक स्वरूपातली आहे.

संतांची गवळण भजन-कीर्तनात रंगली तर शाहिरांची गवळण तमाशा-बैठकीत नाचली. आशूक-माशूक अदाकारी करून नाचली. म्हणून तिला उच्चभ्रूंनी नाकंही मुरडली. कसेही असो, मराठी रसिकांना गवळणींनी रिझविले, हे खरेच. गदिमांच्या बहुरूपी प्रतिभेनेदेखील तिची नाना ठिबक-ठाकडी-रूपडी अक्षर-चित्रांनी नटवली.

गदिमांची प्रतिभाच संतवाणी आणि लोकवाणी यांवर पोसली गेली होती. त्यामुळे त्यांच्या गौळणीत ह्या दोन्ही घरचा प्रसाद दिसून येतो.

कृष्णाच्या बालक्रीडा गदिमांच्या प्रतिभेने केवढ्या कौतुकाने वर्णिल्या आहेत पहा :

सांगडी छोटा माझा चेंडू खेळतो
माझिया जिवाचा राजा नंदबाळ तो !
मोरपिसे मुकुटी डुलती
केश कुरळ भाळी रुळती
भान नाही बाई डोई सूर्य तापतो !
सावळ्या मुखावर बाई
घाम किती डवरूनि येई
वाळवंटि कोमल त्याचा पाय पोळतो !
वाटते ग जवळी जावे
कडेवरी उचलुनि घ्यावे
पोर परी थोरापरि हा खेळ खेळतो !

थोरापरी खेळ खेळला तरी पोर तो पोरच ! बाल तो बालच! मग बालहट्ट आलाच. तो घालवण्यासाठी मग आर्जवं आलीच...

हरि थेंब घे रे दुधाचा
चांदण्याचा रंग याचा, गोडवा रे मधाचा !
सोनियाची बाळवाटी
सोनियाची शिंप छोटी
वाटीमध्ये ओघ साचे वात्सल्याच्या नदाचा !
फूल फुले आपसूक
उघडी रे तसे मुख
थांबु दे ना चाळा थोडा सावळ्या या पदाचा !
गोकुळीच्या गाउलीचा
नंदिनीच्या माउलीचा
तुझियासाठी अमृताचा घडा भरे रे सदाचा !

दूध घेतले. एक हट्ट संपला. एक आर्जव मिटले आता दुसरे-

माय यशोदा हलवी पाळणा गोड गीत गाई
बाळ मुकुंदा मेघःश्यामा करी गाई गाई !

असा हा मुकुंद मेघःश्याम गोकुळातल्या गवळणींचा लाडका, जीव की प्राण बनला होता. त्याच्या संगतीत त्यांचा काळवेळ मोठ्या आनंदात चालला होता. क्षणभरही त्याला विसरणे त्यांना अशक्य झाले. हीच एक गवळण काय म्हणते बघा :

बाळ तुझे नवसाचे यशोदे । बाळ तुझे नवसाचे
निळेसावळे रूप तयाचे, फूल जसे जवसाचे ।।
लळा लागला मनोहराचा विसर पडे मज संसाराचा
याच्यासंगे पळती पळासम प्रहर उभ्या दिवसाचे ।।
दिवस संपला, दीप लागले, घरा परतले गोप भागले
जिवावरी पण येते माझ्या गेहि परतायाचे ।।
यास संगती कशि मी नेऊ, घरात सासू, नणंद जाऊ
सासुरवासी जिणें जाणिसी, माझें वनवासाचें ।।

एका सासुरवाशिणीची ही व्यथा. पण ह्या व्यथेच्या अनुपम भाग्यकळा ज्या भाग्यवान जीवाला लागल्या असतील त्यांनाच त्या ठाव्या. नाहीतर ही राधा, ह्या गोपी, कृष्णासाठी एवढा आपला जीव का पाखडतात ह्याचे रहस्य अन्य अभाग्यांना कसे कळणार ? गदिमांनी या भूमिकेतूनच रचनादृष्टया संतवळणाची, अध्यात्म-दृष्टया आडवळण न स्वीकारता सरळ वाटेने चालणारी ही गौळण लिहिली आहे- 'लंगडा ग बाई, लंगडा !'- या लंगडयावरून नामदेवाच्या लंगडयाची आठवण सहजच होते. गोपी राधेला विचारताहेत :

लंगडा ग बाई, लंगडा
नंदाचा कान्हा लंगडा !
रंगाने काळा
वाणीने बोबडा
त्या काळ्याचा लळा
राधिके, काय तुला एवढा !

मग त्या अज्ञ गोपींना राधा ब्रह्मज्ञान सांगते-

बाळकृष्ण हा दिसे लंगडा
परी मला ज्ञात
तिन्ही जगाला घाली वळसा
तीन पावलांत

वेद जयाची वचनें गाती–
तो कैसा बोबडा ?
काळा म्हणता घननीळाला
का हो गोपीजन ?
सूर्यचंद्रही वेंचित फिरती
त्याचे तेज:कण !
चैतन्याची अतर्क्य माया
काय कळावी जडा ?

जडमूढांच्या बुद्धीपलीकडल्या ह्या गोष्टी त्यांना कळणार नाहीत हे खरेच; पण ज्यांना ही चैतन्याची अतर्क्य माया कळली, त्यांची अवस्था काय झाली ?... दर्दंदिवाणी मीरा गदिमांनी मराठीत आणली, आणि ती अवस्था ठावकी करून दिली. मीरेचे मराठीकरणही कसे मीरापण न सांडता गदिमांनी साधले आहे ! 'घायल की गत घायल जाने'–हे मीरेचे शब्द 'आर्ताची गत आर्ता ठावी' ह्या शब्द-भावात त्यांनी अचूक उतरवले आहेत ! इतकेच नव्हे तर 'घायल'च्या ठिकाणी 'आर्त' शब्द योजून अर्थाची सखोलता आणखी साधलेली आहे–

मी तर प्रेमदिवाणी
माझे दु:ख न जाणे कोणी !
आर्ताची गत आर्ता ठावी
कळ ज्या अंत:करणी
स्थिती सतीची सतीच जाणे
जिती चढे जी सरणी !
शूळावरती शेज आमुची
कुठले मीलन सजणी ?
गगनमंडळी नाथ झोपती
अमुच्या दैवी धरणी !
दुखणाइत मी फिरते वणवण
वैद्य मिळेना कोणी
या मीरेचा धन्वंतरि हरी
श्यामल पंकजपाणी !

या अशा मुलखावेगळ्या दुखणाइतांची सगळी तऱ्हाच आगळी असते. त्यांचे वागणे-बोलणे-चालणे, हे सगळेच कृष्णमय–निराळे असते. त्याच्या धुनीत, लयीत चाललेले असते. अशा कृष्णमय होऊन गेलेल्या काही गोपी ज्ञानेश्वरांनाही भेटलेल्या आहेत :

दुडीवर दुडी गौळणी साते निघाली ।
गौळणी गोरसु म्हणो विसरली ।।
गोविंद घ्या वो दामोदर घ्या वो ।
तव तव बोलती मथुरेच्या वो ।।
गोविंद गोरसु एकचि नांवा ।
गोरसु विकु आले तुमच्या गांवा ।।

'गोरस घ्या वो' म्हणायच्याऐवजी या बया 'गोविंद घ्या वो', 'दामोदर घ्या वो' म्हणत कृष्णालाच विकायला निघाल्या ! अशी खुळ्यासारखी अवस्था !

गदिमांनाही अशा मुलखावेगळ्या कृष्ण-खुळ्या गवळणी भेटलेल्या आहेतच. त्यांपैकीच ही एक. हिने त्याला विकले नाही; तर विकत घेतले आहे,–आणि ते सुद्धा पै-पैसा न मोजता ! अजब खरेदी !

नाहि खर्चिली कवडीदमडी, नाहि वेचला दाम ।
बाई, मी विकत घेतला श्याम ।।
कुणी म्हणे ही असेल चोरी
कुणा वाटते असे उधारी
जन्मभरीच्या श्वासाइतके मोजियले हरिनाम ।
बाळ गुराखी यमुनेवरचा
गुलाम काळा संताघरचा
हाच तुक्याचा विठ्ठल आणि दासाचा श्रीराम !
जितके मालक तितकी नावे
हृदये तितकी, याची गांवे
कुणि न ओळखी तरिही याला दीन अनाथ-अनाम !

अशी ही मातब्बर खरेदीदारीण खरीच; पण ही तिच्याहून वेगळी, कृष्ण-खुळीच, पण वेगळी. हिनं काय केलं ? तर–

नेसली पीतांबर हरीचा, जरीचा पीतांबर हरीचा ।
माधववेडी राधा ल्याली, पीतांबर हरीचा ।।
कळीस लाभले पर मधुपाचे, रंका आले रूप नृपाचे ।
चरणांना मग सुचला चाळा, यमुना लहरींचा ।।
एकान्ती ती नाच नाचली, आनंदाच्या शिगीं पोचली ।
कंठामधुनी सहज उमटला, सूर पावरीचा ।।
गात गीत ती यमुना डोही, निज पडछाया जळात पाही ।
राधे ठायी ठसा दिसे तिज, श्याम मुरारीचा ।।

आपल्या ठायी कृष्ण पाहणारी, कृष्ण जाणणारी, कृष्ण अनुभवणारी राध एकदा कृष्णाला भेटायला निघाली होती. तर ती कशी होती, काय होती, कशी चालली होती, काय म्हणत होती, याचे अत्यंत हृद्य चित्र गदिमांनी या गौळणीत शब्दांकित केले आहे–

रुमझुमती पैंजण ते पायि चालता
चमचमती नीलमणी कानि डोलता !
वेणींतुन गळति फुले कुंदमालती
सादाविण 'कृष्ण कृष्ण' ओठ बोलती
कुजबुजती खिडक्यांतुन तरुण गोपिका
भेटाया श्रीहरिला जाय राधिका !
वाऱ्यावर पदर उडे, भान कोठले
मुरलीचे सूर वनी तोच दाटले
हृदयाच्या नयने ती पाहि मोहना
मोरासम देह करी धुंद नर्तना !
वृक्षांना कथिति गूज हंसुन मल्लिका
भेटाया श्रीहरिला जाय राधिका !
अंधारी धारांतुन चिंब भिजे सुंदरी
दुरुन तरी कृष्ण सखा वाजवितो पावरी
नाचुनिया देह थके भूमितळी कोसळे
मिटलेल्या नयनीं हरिरूप उभे सावळे
मुरलीचा साद कधी वावरुनी वादका
भेटाया श्रीहरिला जाय राधिका !

अशी ही तर भेटायला निघालेली अभिसारिका आहे. पण ही बसल्या ठिकाणीच आभासाचे लेणे लेऊन, जगावेगळा शृंगार करून सजली आहे. हिच्या डोळ्यांत घनश्यामच आलेला आहे; म्हणून ही सखीला विचारते आहे. 'सखी, मी काजळ घालू कशाला ?' कारण त्याच्या कृष्णवर्णाने हिचे डोळे काजळ न घालताच घातल्यासारखे झाले आहेत ! गदिमांच्या समर्थ काव्यप्रतिभेचा हा आविष्कार किती प्रसन्न आहे !

सहच एक विपरीत गंमत जाणवली. होनाजीची राधा कृष्णाला एकदा धारेवर धरताना दिसते,

" राधा म्हणे श्रीहरी तुम्ही रात्री होता कोणे ठाई।
ते सांगा मजप्रती आता सत्वर भूधरशाली ।।
सुरसगंध केशरी टिलक वर कस्तुरी भाळी ।

घर्माने पुसिला, भोगिली कोणी तरी वेल्हाळी
दिसती नेत्र आरक्त मुखावर तेज क्वचित नाही ।। "

यावर कृष्णाने काहीबाही सांगून तिचा गैरसमज दूर करण्याचा प्रयत्न केला आहे. पण राधेचा गैरसमज गेलेला नाही. म्हणून ती म्हणते,

" प्रवर्तला काही म्हणा तुम्ही रात्री स्त्रीच्या प्रसंगा ।
गालाला अंजन लागायचे कारण काई ।। "

कृष्णावर केवढा हा आळ घेणारी राधा ! याउलट गदिमांची ही आभास-लुब्धा--

घनश्याम नयनी आला
सखे, मी काजळ घालू कशाला ?
रोमांचांनी नटली काया
हिरे, माणके कशास वाया ?
कशास मोहनमाला ?
कटीभोवती कर कृष्णाचे
लेणे ल्याले आभासाचे
कशास मग मेखला ?
कृष्ण सख्याची मोहक मुरली
रात्रंदिन या कानी भरली
शृंगार सर्व झाला !
सखे मी काजळ घालू कशाला ?

हा भास-आभासाचा लपंडाव झाला. पण गोपींना यमुनेवर पाणी भरायला गेल्यावर तो साक्षातच दिसला, तेव्हा त्या पाणी भरायचे विसरल्या आणि कृष्ण-रूपच डोळयांत भरून घेऊ लागल्या ! गदिमांनी रेखलेले हे ते शब्दरूप---

गोकुळिचा राजा
माझा गोकुळिचा राजा !
देवकिनंदन
श्यामसुलोचन
गोप गडयांसह खेळे हासुन
लेवुन पानफुलांच्या साजा !
गोकुळिचा राजा !
वामबाहुवर कपोल डावा
अधरि आडवा धरितो पांवा
मोहन कुंजविहारी माझा
गोकुळिचा राजा !

यमुनातीरी उभ्या गौळणी
रूप घेति ते नयनी भरूनि
सोडुनि जलभरणाच्या काजा
गोकुळिचा राजा !

आणखी ही राधा तर माधवाला भेटायला वृंदावनातच गेली आहे. एकांत साधून. पण राधा झाली म्हणून काय झालं? तीही एक स्त्रीच. मग स्त्रीसुलभ लज्जा, प्रेम वगैरे वगैरे जसं तिच्या व्यक्तित्वात असणार तसा राग, द्वेष, मत्सर आदी षड्रिपूही असणारच. निदान असायला हरकत तरी नाही. गदिमांची ही राधा अशी गुणदोषयुक्त मानवी आहे. हिलाही मत्सरबाधा झाली---

वृंदावनांत राधा
साधून येइ वेला
घननीळ माधवाला
एकान्ती भेटण्याला !
अधरी धरून मुरली
होता उभा विहारी
दोघात येई तिसरी
तिज राग येई भारी !
हिसकून घेई मुरली
हृदयास लावि राधा
करितो विनोद कान्हा
हसुनी हळूच साधा !
वक्षावरी तुझ्या ही
मुरली सुरेख सजली
स्वैरवैभवाविना गे,
ती बीनरूप झाली !

पण अशी मुरलीवर रागावणारी मत्सरबाधित राधा एखादीच. नाहीतर मुरलीने मोहून जाणाऱ्या व मुरली-रवासाठी आसुसलेल्या राधा-गौळणीच अधिक. मीराबावरी तर श्यामसुंदराला मुरली वाजव म्हणूनच सांगते आहे :

वाजवि मुरली श्यामसुंदरा
तुझ्या मंदिरी नाचे मीरा
करि करताळा, पायी घुंगुर
जन्म तुडविते हा क्षणभंगुर
देह नव्हे हा मोरपिसारा !

कसले कलियुग ?– मी द्वापारी
गोपवधू मी, तू कंसारी
कालिंदीचा रम्य किनारा !
गोपिनाथ तू, मी तर गोपी
पुण्यशील तुज, जगास पापी
आले आले मी अभिसारा !
मिठीत मिटले विश्वमुकुंदा
मी आपणिले ब्रह्मानंदा
तू मी दोघे–अमृतधारा !

गौळणीतला बराचसा भाग कृष्णाच्या खोड्यांचा आणि त्यांविषयी यशोदामाई-कडे गाऱ्हाणी गाणाऱ्या गोपी, यांनी व्यापलेला आहे. तुकारामबुवांनी आपल्या एका गौळणीत अशी कृष्णखोडी वर्णिलेली आहे :

स्त्रीपुरुष निजली होती समया लावूनी चारी ।
कृष्णदेव गेले पलंगासमोरी ।।
दाढी–वेणिची गाठ मारिली ।
त्या दोघां सामोरी । आपण मग पळून आले बाहिरी ।।

पुढे व्हायची ती गंमत झाली. 'तमाशा पाहती सारी ।। '......वगैरे.

नामदेव–नाथांनीही अशा कृष्णखोड्या वर्णिल्या आहेत. शाहिरांनी तर कडीच केली आहे ! गदिमांनीदेखील अशा नटखट गौळणी लिहिल्या आहेत. इथे त्यांच्या गौळणींनी शाहिरी ढंगाचे वळण घेतलेले आहे, तमाशा किंवा लावणीप्रधान चित्र-पटांसाठीच ह्या गौळणी अवतरलेल्या असल्यामुळे हे वळणही स्वाभाविक होते. पण असे असूनही शाहिरांच्या काही गौळणींमधून दिसून येणारा अतिउत्तान किंवा अश्लीलतेकडे झुकणारा शृंगार गदिमांच्या गौळणींमधून आढळत नाही. संयत, सूचक असाच शृंगार आहे, आणि तो रचनादृष्ट्या कलात्मक पातळीवरचाही आहे. हीच गौळण पहा--

डोईवरी पाण्याचा ग माठ
मी हळुहळु चढता यमुना–घाट
कशी पडली अचानक गाठ !
गोकुळातला चोर आला
नंदाचा हा पोर आला आडवा
कुणी मला सोडवा !
त्यानं माझी रोखिली ग वाट
खडा मारला अन् फोडिला की माठ !
उभा राहून हासे वर धीट !

खट्याळ हा श्रीरंग, बाई
भिजविले अंग, झोंबे गारवा !
काय म्हणू मी याच्या खोडिला ?
ओला पदर की माझा ओढिला
चंद्रहार गळ्यातला तोडिला--
कुणीतरी धावा ! --
कुणी ऐका माझी हाक, बाई
घाला थोडा धाक, वेड्या माधवा !
कुणी नाही इथं चिटपाखरू
माझी मला मी कशी सावरू ?
सूर मुरलीचे झाले सुरू
पुढे पडेना पाय, बाई
आता करू काय ? -मोही गोडवा !

माडगूळकरी गौळणींची ही अशी वानगी. त्यांच्या विविध प्रकारच्या गौळणींतून विविध प्रकारचे स्त्री--स्वभाव, कृष्ण-गोपी-राधा-यांच्या प्रीतीचा विविध प्रेमाविष्कार आणि विविध प्रकारचा शृंगार रसिक मनाला मोहवून टाकतो. त्याचबरोबर गदिमांची शब्दकला, चित्रकला, नादकला, तालकला आदी रचनादृष्टचा श्रीमंती पाहून रसिक मन प्रसन्न होऊन डोलू लागते. वाटते, संत आणि शाहीर या दोहोंचीही परंपरा समर्थपणे पुढे नेणारा, पण दोहोंतीलही सुवर्णमध्य साधणारा हा आधुनिक मराठीतला थोर शाहीर आहे ! □

४

# माडगूळकरी वग

पारंपरिक तमाशाच्या किंवा आधुनिक लोकनाटयाच्या प्रथेनुसार गण-गौळणीनंतर तमाशाच्या बोर्डावर शाहिरी वगाचा थाट उभा राहतो. तत्पूर्वी बतावणी-छक्कड अशा नावाचे काही प्रकार असतात. परंतु बतावणी ही बहुधा उस्फूर्त आणि प्रचलित घटनांवर उपहासात्मक विनोदाने सोंगाडया आणि त्याचे मैतर या मंडळींकडून रंगवली जाते. गदिमांनी हाताळलेला 'छक्कड' ह्या लावणी-प्रकाराबद्दल पुढं एका प्रकरणात विवेचन केलेलं आहे.

गदिमांनी लिहिलेल्या 'गाढवाला भेटला गुरू' या संपूर्ण वगाचा उल्लेख मागं केलेलाच आहे. हा वग अनुपलब्ध आहे. म्हणून दुर्दैवानं दुधाची तहान ताकावरच भागवावी लागणार आहे.

गदिमांचा तसा एक शाहिरीबाजानं संगीतिकेच्या म्युझिकल फ्यूचर-अंगानं जाणारा 'शशांक-मंजिरी' नामक एक वग उपलब्ध आहे. परंतु तो मुलांसाठी लिहिलेला असल्यामुळं त्याला 'बाल-वगनाटच' असंच म्हणावं लागेल.

या बाल-वगनाटयात गदिमांनी एका लहानशा लोककथेलाच वगाचा साज चढवलेला आहे. एका शापित राजपुत्राची ही गोष्ट आहे.

निलगिरी पर्वतात शशांक नावाचा राजपुत्र शिकारीला गेला होता. शिकारीमागे हिंडता हिंडता त्याला तहान लागली. त्या अरण्यात राम-रावण युद्धा पासून तपश्चर्येला बसलेल्या एका ऋषीच्या आश्रमात तो गेला आणि त्यानं पाणी मागितलं. ऋषी त्याला म्हणाला, 'पाणी देतो, तू मला आपलं राज्य देणार असशील

तर !' तहानलेल्या शशांकानं ती अट मान्य केली. ऋषीनं पाणी दिलं. शशांकानं पाणी पिऊन तहान शमविली आणि मग कमंडलू फेकून त्यानं घोड्याला टाच दिली. त्याचे हे वर्तन पाहून संतापलेल्या ऋषीनं शाप दिला, 'सशासारखा भिवून पळालास; ससाच होशील !' राजकुमार शशांक ससा झाला.

वीरसेन राजाची कन्या मंजिरी ही एकदा उद्यानात चेंडू खेळत असताना तिचा चेंडू वाहत्या पाण्यात पडला. तेव्हा हा ससा तिथे आला आणि त्यानं एका अटीवर तो रत्नांनी मढवलेला चेंडू पाण्यातून काढून देण्याचं कबल केलं. सशाची अट अशी होती :

तुझ्या संगतीला राहयचं आहे
राजाच्या पंगतीला खायचं आहे
तुझ्या बशीत जेवेन
तुझ्या कुशीत झोपेन
आहे कबूल, तर आणतो चेंडू.

मंजिरीनं सशाची अट मान्य केली. सशानं चेंडू आणून दिला. पण नंतर किळसवाण्या सशाला ताटात घेऊन जेवायला किंवा कुशीत घेऊन झोपायला ती टाळाटाळ करू लागली. वीरसेन राजानं 'काय प्रकार आहे' हे विचारून घेतलं. मंजिरीनं सगळी हकीकत सांगितली. ती ऐकून राजा म्हणाला :

बोललं तसं वागलं पाहिजे,
दिल्या वचनाला जागलं पाहिजे.

पुढं शशांक शापमुक्त होऊन राजकुमाराच्या वेषात प्रकट होतो. शशांक-मंजिरी यांचा विवाह होतो. अशी ही सद्‌गुणांची मातब्बरी सांगणारी रंजक आणि बोधक कथा आहे.

गदिमांनी वगाच्या धाटणीनुसार या कथेतले निवेदनाचे दुवे शाहिरामार्फत जोडलेले आहेत. वगनाट्यातील कथा अशा शाहिरी निवेदनाच्या साहाय्यानेच प्रवास करत असते. कथेच्या मधेमधे शाहीर हे जे निवेदन करत असतो त्या पद्यमय भागालादेखील वग असंच म्हणतात.

'शशांक-मंजिरी' या बाल-वगनाट्याच्या प्रारंभी शाहीर असाच एक वग सादर करीत आहे :

शाहीर : वीरसेन राजा एक नांदे उत्तरभारती
मंजिरी कन्या एक त्याची गुणवती
चांदाचा तिचा मुखवटा, गव्हाची कांती
सोळा वर्षं वयाला झाली, त्यांत रूपवती

तळहातातल्या अतिनाजुक फोडापरी,
राजानं वाढवली होती कन्या मंजिरी,
बाळपणा राहिला होता अफूट तिच्या अंतरी,
कधी नव्हती पडली ती बाला वाड्याबाहेरी
देशोदेशीची खेळणी आणि बाहुल्या,
राजानं तिजसाठी होत्या आणविल्या,
सदाकदा ती दंग राही छंदी आपुल्या,
कुणी नव्हत्या सख्या–मैत्रिणी तियेने केल्या,
तिच्या अंवतीभवती नव्हत्या दास आणि दासी,
तिचे हितुगुज चालले तर चाले फक्त राजासी,
राजा नसताना खेळे ती बाला फुला-पांखरांसी,
अशी होती कन्या राजाची भोळी सुखवासी,
आईविना पोर पोरकी होती मंजिरी,
तिच्यासाठी अविवाहित राहिला राजा, राणी गेल्यावरी
आपल्या जीवाहून प्रीत त्याची होती कन्यकेवरी,
तिच्याविना दुजे कुणी राजास नव्हते संसारी,
त्या लाडक्या मंजिरीला हिंडण्या-खेळण्यासाठी
वाड्याच्या आतमध्ये होती बागशाही मोठी
ठायी ठायी लतामंडप तरूंची दाटी
जागोजाग बांधिले पार तरू-तळवटी
त्या बागेमधें डोंगर–टेकड्या होत्या जागोजाग
कृत्रिम सांचविली तळी, वाहते ओघ
हुबेहुब होता उठवला जंगलाचा भाग
जागोजाग हिरवी मैदाने वाकडे माग
अशा एका मागावरुनी चालता चालता
एका ओढ्याच्या काठी आली राजाची सुता
रत्नखचित चेंडू एक तिच्या हातामधी होता
चेंडूशी लागली खेळू सहज नाचता–

या वगानंतर पुढली कथा घडते. कथेच्या शेवटी शाहीर सांगतो–

सद्‌गुणांची असते अशी मातबरी,
दिले वचन तरीहि मोडती लोक घरोघरी.

'पुढचं पाऊल' या चित्रपटात अशीच शाहिरीबाजानं संगीतिकेच्या अंगानं जाणारी वग–रचना आहे. या रचनेत शाहीरीवरची गदिमांची पक्की पकड तर

दिसून येतेच, पण तिच्यातले काव्यसौंदर्यदेखील भुरळ पाडते. ही रचना अशी आहे :

राजधानी धन्य धनवंत हस्तिनापुर
उंच उंच इमारती, भारी उंच गोपुरं
गुणवंत राजा तेथला प्रतापी चतुर–
कीर्तिवंत धुरंधर त्याचे नाव जगभर !

शांतनु–राजा रूपवंत गौर मनोहर
पाच पोषाख मुगुट धनुष्यबाण कटिस तलवार
वय झाले अर्धे तरी शरीर कसदार
बघताच भाळावी रती असा झोकदार !

वेष पालटून राजा एकदा निघे शिकारीला
दुपारची वेळ मध्यान्ही दिवस की आला
तो दुरुनी वाऱ्याच्यासंगं सुगंध फार सुटला
कुठं फुललं हजार पारिजातक कळेना त्याला !

वासासंगं राजा चालला
चालता चालता आला यमुनातीराला
तिथं एक मदमस्त पाहिली बाला
माशासाठी फेकुनी जाळं, गाई गीताला !

नट : हे सुंदरी, तू कोण आहेस ? हजार पारिजातक फुलल्याचा सुगंध तुझ्या रूपाचा किंवा काय ?

नटी : आपण कोण ? आपलं नाव काय ? गाव कोणतं ?

नट : तूच सांग अगूदर.

नटी : सांगते ऐका–

मच्छगंधा हो देवा, माझं नाव
आपुन कोन सांगा नाव गाव ?
कां हो असं बघता टक लावूनी ?
मी रानवट पोरगी गेले भारी लाजुनी
समींद्राची आम्ही लेकरं, मच्छ खेळणी
कधी नाही नगर पाहिले भोळा सभाव…
मच्छगंधा हो देवा, माझं नाव
आपुन कोन सांगा नाव गाव !

नट : अग तू जळातळी जळवंती
पाहताच जडली प्रीति तुजवरती
काय गंगेवाणी खाली उतरली रती ?
काय ओले लावण्य लाभले ? काय हावभाव !

नटी : मच्छगंधा हो देवा, माझं नाव
आपुन कोन सांगा नाव गाव !
वाळवंटी का उभं रहावं
या बसू नौकेमंदी राव

दोघं नौकेमंदी बसली,
नौका पाण्यावर पोहू लागली
हंसावर बसून जणू काही विष्णु-लक्ष्मी चालली !

नट : ने अशीच सुंदरी नाव-
मी हस्तिनापुराचा राजा शंतनुराव !

नटी : प्रत्यक्ष महाराज !... महाराज, आपण कोन... मी कोन ?

सोंगाड्या : ऐका-

ही अशी तऱ्हा प्रीतीची
नाही शुद्ध जाती-गोतीची
तात्यारावाची रचना वेगळी अस्सल जातीची-

नटी :-सभेपुढं गाई मोगरी करून हावभाव
मच्छगंधा हो देवा, माझं नाव
आपुन कोन सांगा नाव गाव !

वग हा बहुजनसमाजातील रसिक श्रोत्यांचा अत्यंत आवडता असा नाट्य-प्रकार आहे. अलीकडे वग किंवा लोकनाट्य हे नाटकासारखे लिहिले जाते. परंतु जुन्या तमाशात अशी लिखापढी नव्हती. कारण ती कलावंत तमासगीर मंडळीच मुळी लिहिण्या-वाचण्यापासून लांब होती. 'लिहिणं बामणाघरी, आणि लावणी महाराघरी' अशीच समाजाची शैक्षणिक अवस्था होती. त्यामुळे वगाचे हस्त-लिखित असे नसायचे. पुराण, इतिहास, लोककथा, आख्यायिका, दंतकथा यांतील एखादे कथानक निवडून ही मंडळी नाट्याचा साज रंगमंचावर उस्फूर्तपणे चढवीत असत. त्यात त्यांचे प्रसंगावधान, हजरजबाबीपणा आदी चातुर्य प्रकट होत असे. लिखित नाट्याची नक्कल पाठ करण्याची तसदी त्यात नसे. ते खरेखुरे ताजेतवाने लोकनाट्य-तमाशा. ही कलावंत मंडळी तथाकथित शिक्षण, संस्कृती, शिष्टाचार इत्यादी गोष्टींपासून वंचित राहिलेली होती आणि तळागाळातले दलित जीवन

जगत होती. त्यामुळे त्यांच्या या तमाशाची भाषा देखील तशीच रांगडी, शृंगारिक आणि अश्लीलतेकडे झुकणारी असे. कधी कधी बीभत्सपणाही आढळून येई. त्यांचा श्रोताही त्यांच्यासारखाच कनिष्ठ समजल्या जाणाऱ्या वर्गातील असे. तथाकथित उच्चभ्रू, सुशिक्षित, संस्कारी म्हणवून घेणाऱ्या वर्गातला नसे. तमोगुणाची म्हणजे तमाची आशा किंवा ओढ लावणारा असा जो, तो तमाशा उच्च वर्णियांनी त्याज्य ठरवलेला होता. त्या काळच्या पाठ्यपुस्तकातून ' मुलांनी वाटेत तमाशा पाहात थांबू नये ' असा बोध करणाऱ्या कविताही असत. तमाशा या शब्दाचा हिंदी भाषेतील अर्थ ' दृश्य ' असा जरी चांगला असला तरी मराठीत मात्र तो विद्रूप झालेला आहे.

रांगड्या तमासगिरांतही काही लिखापढी करणारे मातब्बर शाहीर झाले. त्यात पठ्ठे बापुराव यांचे नाव अग्रक्रमाने घ्यावे लागेल. ते वग लिहीत असत. पठ्ठे बापुरावांचा ' मिठ्ठा राणी ' नावाचा वग खूपच लोकप्रिय होता. अलीकडच्या लोकनाट्याच्या काळात शाहीर अण्णाभाऊ साठे, शाहीर साबळे, व्यंकटेश माडगूळकर, पु. ल.देशपांडे, वसंत सबनीस, शंकर पाटील इत्यादी साहित्यिकांनी देखील उत्तम वग लिहिले आहेत. याच पठडीत गदिमांचाही उल्लेख गौरवाने करावा लागेल.

' बिनबियाचे झाड ' या लोकनाट्यातील वग गदिमांचेच आहेत. कथेतल्या शूरसेन राजाची महती सांगणारा, प्रास्ताविकासारखा प्रारंभीचा त्यांचा वग असा आहे :

शूरसेन राजा एक होता, अवंति नगरीला,  
डुयान डुया राजधरी, काही कमी नव्हतं त्याला,  
बारा औक्षणी सैन्य पदरीं, बारा हजार हत्ती साळला,  
लाखभर घोडं नामांकित होता थोरला रिसाला,  
शूरसेन रुपाचा मोठा, गुणाचा साठा कीर्ति गगनाला...

शूरसेन राजा पुढं शिकारीला निघालेला आहे. त्यावेळच्या गदिमांनी लिहिलेल्या वगाची पदरचना कशी चित्रमय आणि नादमय आहे पहा :

हटा हटा दूर चालली हो स्वारी शिकारीला,  
दणादणा घंटा वाजते, अंबारी झुलते हत्ती चालला.  
कुत्र्यांचा कळप संग, मनगटी बाज, चित्ता गाडीला.  
पहा घोड्यावर, किती नरवीर, रानकाढ्यांचा जथा चालला.  
उभ्या सज्यांत, टकमका पहात, नारी राजाला.

' मी लाडाची मैना तुमची ' या लोकनाट्यातील गदिमांनी लिहिलेले वगही असेच सुंदर शाहिरी शब्दकळेने सजलेले आहेत :

नवलपूर नगर आहे एक भारतवर्षात
राजवंश जुना तेथला बहुत विख्यात
संपत्ती महामूर त्याची थोर दानत
दासदासी, प्रजाजन सारे असती सौख्यात, हां जी ॥
त्या वंशी नांदला एक राजा खंडेराव
एकुलती एक राणी त्याची मदालसा नाव
दोघांचाही वंशपंरागत उदार स्वभाव
त्यांना कलांची आवड मोठी
दोन दरबार दिवसाकाठीं
मनरंजन करण्यासाठी
राजकामात दक्कल थोडी
राजाराणीला नाचात गोडी
असाच एकदा भरला मनरंजनाचा दरबार
राजाराणी बसली, सभोवताली अवघा परिवार
कलावती कुणी नाचे मस्त गुलजार
छुन छुनन् छुनन् वाजे घुंगरू, घुमे झंकार
हो घुमे झंकार ॥

याच लोकनाटयात गदिमांचा आणखी एक वग आहे. पैसा हा कसा अनर्थकारक आहे, हे त्यांनी या वगात कथेच्या ओघात सांगितलेले आहे. हा वग असा :

पैशासाठी कुणी जगामधि लबाडी करतो
पैशासाठी भाऊ भावाची मानहि चिरतो
पैशासाठी पती पत्नीला तोडुनि पुरतो
पापाची पोसवित राने पैका भिरभिरतो ॥
पैशासाठी स्वामिभक्तीला मारुनी टांग
सोकाजीनं ठीक घेतलं मेल्याचं सोंग
रोधून धरीं तो श्वास आखडी अंग
म्हणे, 'आता जाऊनि मैने, राजाला सांग' ॥
राजा होता निघाला कराया शिकार
सभोवती जामानिमा चार सरदार
पाहिजे नको बघती जातीनं राणीसरकार
निघणार तोच ठाकली मैना त्या म्होरं–
हां जी–॥

गदिमांची वग-रचना त्यांच्या इतर काव्यरचनेइतकीच सरस आहे. या वगांमधून त्यांच्या ठायीची सहज, सुलभ व प्रासादिक अशी निवेदनशैली व्यक्त होते. एक उत्तम निवेदक–'नॅरेटर'–त्यांच्या ठायी होताच ! □

५

# माडगूळकरी लावणी

मराठी लावणी मराठी शाहिरांनी लोकप्रिय केली. या शाहिरांत राम जोशी, होनाजी, प्रभाकर, अनंत फंदी, सगनभाऊ आणि परशराम हे पेशवाईच्या काळात बिनीचे लावणीकार शाहीर झाले. नंतरच्या काळात गंगू हैबतीपासून ते पठ्ठे बापुरावापर्यंत अनेक शाहिरांनी लावणीची रचना केली. अलीकडल्या पन्नास वर्षांत ग. दि. माडगूळकर यांनी तर मराठी लावणी अधिकच समृद्ध केलेली आहे. गदिमांनी विपुल आणि विविध रंगा-ढंगांची लावणी लिहिलेली आहे.

माडगूळकरी लावणी 'जुने पालुपद' आळवणारी आणि ती परंपरा पुढे वृद्धिगत करणारी तर आहेच आहे, पण 'नवा आविष्कार' ठाशीवपणानं दाखवणारीही आहे. गेयता, शृंगार, नर्मविनोद, याबरोबरच ती अभिजात काव्यरम्य अशी सुभगसुंदरी आहे.

गदिमांच्या लावणीशी मराठी रसिकांचा मोठ्या प्रमाणावर परिचय झाला, तो त्यांच्या विविध तऱ्हेच्या चित्रपटांमुळे. शाहिरी जीवनावर लावणीप्रधान असा मराठीतला पहिला चित्रपट 'लोकशाहीर राम जोशी' हा गदिमांनीच प्रथम लिहिला, आणि लावणीचे व लावणीकारांचे उपेक्षित जग व जीवन त्यांनीच प्रथम रजतपटावर दाखल केले. चित्रपटाच्या आधी त्यांनी 'राम जोशी'च्या जीवन-कथेवर नाटक लिहिलेले होते. त्याचेच रूपांतर पुढे चित्रपटात झाले. या चित्रपटा-पासून लावणीप्रधान चित्रपटांचे एक पर्वच मराठीत सुरू झाले !

ते १९४६ साल होते. राम जोशी चित्रपटाच्या द्वारा गदिमांनी लावणी लोकप्रिय केली हे जरी खरे असले, तरी त्या आधीही त्यांनी लावणीची निर्मिती

केलेली होती. त्यातील काही लावण्या शाहीर पिराजीराव सरनाईक, शाहीर नानिवडेकर आदी कोल्हापुरातील तत्कालीन प्रसिद्ध शाहीर आपल्या कार्यक्रमांतून गात होते. गदिमांच्या काही लावण्या त्या काळात ग्रामोफोन कंपनीने ध्वनिमुद्रितही केलेल्या होत्या. रजतपटाच्या आधीच रेकॉर्डच्या द्वारा गदिमांची लावणी गावोगाव पोचलेली होती.

शाहीर पिराजीराव सरनाईक यांच्या आवाजातील ध्वनिमुद्रिकेवरील एक लावणी अशी होती :

तू कोण कोणाची राणी । तुझा मुखडा ग चांदावाणी ।। ध्रृ. ।।
मी ग मोठ्याचा ल्योक । बघ येऊन झोक ।
लाख रुपय रोख । माझा वाडा ग बावनखणी ।। १ ।।
ठाण्यावरतं घोडा । दारी शिपाई खडा ।
मी ग पाटील बडा । भरी लक्ष्मी घरात पाणी ।। २ ।।
बघ वळून थोडी । तुझी माझी जोडी ।
कशी येईल गोडी । होऊ दे मिलाफ साखर लोणी ।। ३ ।।
तुला करीन बहाल । एक ऐनी महाल ।
खेळू रंग खुशाल । मी ग राजा, तू माझी राणी ।। ४ ।।
हिरे माणिक मोती । तुला देऊ किती ।
कर नारी छाती । चल हातात हात घालुनी ।। ५ ।।
म्हणे अमर कविराव । बघा पैक्याचा प्रभाव ।
हीच तऱ्हा गावोगाव । शाहीर पिराजी उजेडात आणी ।। ६ ।।

एका परीने, गदिमांचा हा या क्षेत्रातील उगवतीचा काळ होता. उमेदवारीचे दिवस होते. म्हणूनच पूर्वसूरींच्या शाहिरीची काहीशी झाक गदिमांच्या या लावण्यांवर दिसते. या प्रारंभीच्या लावण्यांतून त्यांनी घेतलेले ‘ कवी अमर ’ हे नावही गुंफलेले आढळते. पूर्वसूरींच्या बहुतेक लावणी–रचनेत त्यांची अशी नाममुद्रा आहे. जुन्या लावणीत रचनाकाराची नाममुद्रा गुंफण्याची पद्धत होती. राम जोशीने ‘ कविराय ’ असे नाव घेतलेले होते. लावणीच्या शेवटी तो याचा उल्लेख असा करतो :

कविरायाने यापरी नेली रासामधी गोमटी
होरी खेळतो हरी करून राधा नट आपण नटी !

शाहीर प्रभाकर आपल्या रचनेच्या शेवटी लिहितो :

प्रभाकराचे छंद दिसंदिस कवना गोडी चढे !

अनंतफंदी आपली नाममुद्रा मिरवताना इतरांचा उपहास करीत म्हणतो :

अनंतफंदीचे छंद जसे कटिबंद जडण नवी ज्ञानानी !

लांगे लुंगे कवि ना ठरती जशा भोरड्या मनानी !

शाहीर होनाजी हा तर आपला गायक शाहीरमित्र बाळा याच्याही नावाचा उल्लेख नाममुद्रेत करतो :

होनाजी बाळा म्हणे येतील घरी परतून पाही !
नको पडू संशयात सखये किंचित सहसाही !

पठ्ठे बापूराव हा शाहीर तर आपली नाममुद्रा मोठ्या अभिमानाने मिरवताना दिसतो :

पठ्ठे बापुराव कवीची वैखरी करी नखऱ्याची खरी जोडी
लवड सवडीने मार्क आक्रमिला पतपेढीवर ऋण फेडी !
पठ्ठे बापुराव कवी गुणी फार फार फार
नको बाजा मला संसार !

गदिमांनी कवी अमर नाममुद्रिकेसह लिहिलेली आणि शाहीर पिराजीराव सरनाईक यांनी गायिलेली, जुन्या पारंपरिक वळणाची आठवण करून देणारी ही आणखी एक लावणी अशी आहे :

गुलछडी नार हासरी । अंगावर लाल शालू भरजरी ।
नजरेत खुमारी न्यारी ।। धृ. ।।

गोरं गुलाबाचं गाल । नवा मखमालीचा माल ।
आली नटुनी । हे आलंय कबुतर कुठूनी ।। १ ।।

तटतटे उरावर चोळी । वर सोन्याची गरसोळी ।
चमकते माळ मोत्याची । ही नार कुणारं हौश्याची ।। २ ।।

पायी पैंजण वाजती । हिची चाल गजगती ।
कैक भुलूनिया जाती हिच्यावरती । उतरली नार सरगाची
होती लाही बघुन अंगाची ।। ३ ।।

म्हणे अमर कविराव । नको दावू नारी भाव ।
बोल हसूनी । गाई पिराजी शाहीर नटूनी ।
घे अशात नवरस लुटूनी ।। ४ ।।

'अमर' या नाममुद्रेप्रमाणेच गदिमांनी कधी कधी गमतीने स्वत:साठी 'बोऱ्या भगवान' अशीही नाममुद्रा वापरलेली आहे.

एकदा गप्पांच्या मैफिलीत 'ळ' चा प्रास साधणारी रचना करून दाखविण्याचे आव्हान एका मित्राने गदिमांना दिले. 'ळ' चा प्रास साधणे तसे अवघड. पण त्यांची रचनेवरची आणि शब्दांवरची हुकूमत अशी दांडगी की, त्यांनी ते आव्हान

स्वीकारून तिथल्या तिथे बसल्या बैठकीलाच ही लावणी रचून दिली :

भोळं तुझं ग निळं डोळं ।
अन् कैक गडी त्वा केलं खुळं ॥ धृ० ॥

तुझी नखरेल चाल
गोरं गुलाबी गाल
नाजूक त्यावरी काळा तीळ ॥

पाऊल मागं घे रं, नको येऊ पुढं
इष्काचं जरी तुला खुळं
मदनाचं हे इथं जाळं ॥

तू ग रिती पणती
तुझा उजेड किती
मी ग चांदवा तेजाळ ॥

सांगे बोऱ्या भगवान
ऐका शहाण्यानु ग्यान
वाट इष्काची खडकाळ
जरी चुकुन जाल
तरी पुरे फसाल
जाळं नव्हे ह्यो जंजाळ ॥

लावण्यवतीची मुद्रा किंवा मुख हे जसे भुरळ घालणारे, चित्त ओढणारे, आकृष्ट करणारे असते, तसेच लावणीचे तोंड किंवा मुखडादेखील दिलखेचक असावा लागतो. लावणी ही रचनाच मुळी लोकानुरंजनासाठी असल्यामुळे आपल्या श्रोत्यांची मने उल्हसित, आनंदित होतील अशी मुखड्याची रचना शाहिरांनी केली. लावणीचे तोंड सहज तोंडात घोळेल असे बांधण्याकडे माडगूळकरांनीही आपले रचनाकौशल्य पणास लावल्याचे दिसते. ही वानगीच पाहा :

लाडे लाडे आले मी मोहना,
जवळ जरा या ना, विडा तरी घ्या ना,
माझ्या भरला मनात तुमचा शिपाईबाणा !
........................

तुझं कबुतर सहजच बसलं माझ्या कौलावर
सख्या रे, माझ्या कौलावर
काळिज माझं उडुनी गेलं तुझिया डौलावर !
........................

चिचा आल्यात पाडाला
हात नको लावूस झाडाला–माझ्या झाडाला !
..........................
माझ्या नथीच्या आकडचामधी गुंतली तुझी बाही
सुटका आता नाही !
..........................
बुगडी माझी सांडली ग, जाता सातार्‍याला
चुगली नका सांगू ग माझ्या म्हातार्‍याला !
..........................
बसा रावजी बसा
हृचा एकांतीं काळचा राती खुल्या दिल्याने हसा !
.........   ..........
दर रात सुखाची नवसाची
मज झोपच येते दिवसाची !
..........................
पदरावरती जरतारीचा मोर नाचरा हवा
आई मला नेसव शालू नवा !
.........   ............
फड सांभाळ तुर्‍याला ग आला
तुझ्या उसाला लागंल कोल्हा !

असे नुसते मनात येताक्षणीच भराभर आठवणारे कितींतरीं मुखडे !

‘ का हो तुम्ही येणं जाणं सोडलं ’, ‘ तोतापुरी आंबा, तोडू नका थांबा ’ ‘ हुकमाची राणी माझी ’, ‘ तुम्ही माझे हो रंगलाल ’, ‘जाळीमंदी पिकली करवंद’, ‘ छबीदार नार गुलजार... ’ माडगूळकरी लावणींचे हे मुखडे म्हणजे मराठी शाहिरीतले रसिकांना वेडे करणारे रत्नखडेच आहेत ! किती म्हणून वेचावे ! आणि त्यातही कितीं परी, किती तर्‍हा !

शृंगाराच्या विविध छटा रंगतरंगांसह माडगूळकरी मुखडचातूनच अशा विलक्षण नादमय, नाटचमय, रूपरसगंधमयरीतींने कधी हळुवारपणाने, सौम्य-शालीनतेने, तर कधी खटचाळ–खटकेबाजपणाने व्यक्त होतात !

भिवईच्या कमानीत राहून
प्रीत हासे कुणाला ग पाहून
ऐन ज्वानीचा लेऊन साज
काय झालं बाई तरी आज ?
जागी झाली डोळचामंदी लाज !

अशी कुणी नवखी लाजवंती कधी भेटते, तर कधी ज्ञानेश्वरांच्या चंदनी विराणीची आठवण देणारी -

चंदनाची चोळी माझे अंग अंग जाळी ।
सरेना की ग बाई, रजनी काळी काळी ॥
दिलेल्या वचनांची प्रीतीला स्मृती नाही
एकांती काकुळतीं कितीदा येऊ बाई ?
विरही करपते देहाची चाफेंकळी !

अशी विरहिणी तळमळताना दिसते.

मज लाज वाटते सांगाया ते धनी
घ्या तुमचं तुम्ही जरा तरी समजुनी
पाळणा उद्याचा हलतो माझ्या मनी
दऱ्या टेकडचा चला धुंडु या होऊन बेबंद !
जाळीमंदी पिकली करवंद !

अशी 'आंबटगोडी चाखू' वाटणारी, टेकडीवरती 'चढता चढता धरा हात की वाट नसे रुंद' म्हणणारी आणि आपले हे डोहाळे सांगून 'पुरवा की छंद' अशी आर्जवं म्हणा की हट्ट म्हणा, धरणारी लावणीतली नवोढा सीतामाई कधी आढळते, तर कधी -

डोईवरी पाण्याचा ग माठ
मी हळुहळु चढता यमुना-घाट
कशी पडली अचानक गाठ !
गोकुळातला चोर आला
नंदाचा हा पोर आला आडवा
कुणी मला सोडवा !

अशी 'कुणी ऐका माझी हाक बाई' म्हणून मदतीसाठी बोलावणारी गोकुळातली असहाय्य गवळण दिसते.

राम राम घ्या, दूर करा जी भवतीचा घोळका ।
दिलवरा ! दिल माझे ओळखा ॥ धृ० ॥
बांधला बादली साफा जरि मी वरुन
रुळतात केस हे कुरळे भालावरुन
नसत्या पदराकडे धावतो हात गडे सारखा ।
ही पैरण मेली चोळीहून कांचली
हालचाल कटिची शेल्याने जाचली

ग्रंथालय ठाणे
२५८८०
काव्य २५८९३
२५१४६८
शाखा (स्थळ प्रत)

पाउले महाली कशीबशी पोचली
सोंग घेतल्या काजवा कधी बनेल हो जाळ का ?
तुजसाठी दौड मी केली घोड्यावरून
मर्दानी वेष हा दुनियेसाठी करून
चोरुनि निघाले रात्री माझ्या घरुन
एकांती घेई जवळी सख्या, असा वेळ का ?

अशी प्रियकराच्या भेटीसाठी पुरुषीवेष परिधान करुन येणारी अभिसारिका कधी दृष्टीस पडते, तर कधी–

माझ्या नथीच्या आकड्यामधी गुंतली तुझी बाही
सुटका आता नाही !
ज्याचा त्यालाच पडला फासा
कसा गळास लागला मासा
आरपार रुते अणकुची, तलखी ग होई !
दूरदुरून पोहत होता
कसा हातास आला आता
विसरला पार सुरकांडी, लटकुनी राही !
कल्ले हलवीत हलतो बाया
तुला वाळूत फेकीन राया
पाण्यातुनी येई बाहेरी, मजा तरी पाही !
दिस सोन्याचा दिसतो ग बाई
झाली शिकार बसल्या ठायी
शिकाऱ्याच्या बसूनी मनगटी पाखरूच गाई !

अशी प्रियकरालाच फासात पकडून त्याची शिकार साधणारी आणि रूपकाच्या भाषेत बोलणारी खटचाळ-खोडसाळ मैना नजरेस पडते.

नको नदीवर भेटू
नको रस्त्यामधी गाठू
नको असे पाय चाटू
नको अंग अंगा खेटू
सरपंचाची मी रे मुलगी
नको करुस माझ्याशी सलगी !

अशी दुसरी आणखी सवाई वरचढ. जरा उर्मट. गुर्मीनं बोलणारी. अशा एखाद्या गर्वितेशी कधी गाठ पडते, तर कधी–

अशी साथ जन्मभर द्याल का ?
हो राया तुमची सखी म्हणवाल का ?
अगदी जवळ जवळ मला घ्याल का ?
माझ्या गळचात मणी बांधाल का ?

अशी प्रियकराची आळवणी करणारी विनीत सौभाग्यकांक्षिणीदेखील लक्ष वेधून घेते.

माडगूळकरी लावणी अशा नाना रंगाने नि ढंगाने आपल्या प्रेक्षक श्रोत्याला रिझवीत आहे.

माडगूळकरी लावणीच्या मुखडचाप्रमाणे तिचे अंतरंगही असेच वेधक आणि चित्रमय आहे. माडगूळकरी लेखनशैलीच अशी चित्रमय आहे. रंगरूपासह बारीक-सारीक तपशील ते शब्दांनी चित्रित करतात. लावणीतही त्यांची ही किमया उठून दिसते. वानगीदाखल ही पहा 'साताऱ्याची तऱ्हा' :

घोळ निऱ्यांचा पदी अडखळे, जलद चालणे जरा ।
दिसे ही साताऱ्याची तऱ्हा ॥ धृ० ॥
तुरुतुरु चालसी नारी, चवडचावरी ग
उमटती फराटे पाउल वाटेवरी ग
येतसे कुणी का मागुन मागावरी ग ?
पदराआडच अरधा मुरधा लपे तुझा चेहरा
दिसे ही साताऱ्याची तऱ्हा !
डोळचात बावळा अजुन नेणतेपणा ग
भाबडचा मुखावर गोंदवणाच्या खुणा ग
डोलतो उरावर मदनाचा पाळणा ग
पाळण्यातले पोर उसविते चोळीचा कोपरा
दिसे ही साताऱ्याची तऱ्हा !
सांवळी तरी तू गोऱ्याहून गोमटी ग
पट्टचात चांदिच्या कशी बसविसी कटी ग
थोराड हाड या मुलखाचे शेवटी ग
बुलंद दिसते तुझी इमारत, ठीक चिऱ्यावर चिरा
दिसे ही साताऱ्याची तऱ्हा !
जाहली तुला ना चवदा वर्षे पुरी ग
पोवळी उमटली दोन्ही गालांवरी ग
इतक्यात निघे का मुरमातुन बाजरी ग

माहित नाही इष्क तुला पण भुइवरल्या पाखरा
दिसे ही साताऱ्याची तऱ्हा !
असतील ओठी तव अजुन उखाणे म्हणी ग
तुज कशी कळावी रंगाची लावणी ग
का उगाच मिटते माझी मग पापणी ग
खरीच मोठी होशिल तेव्हा भेटच या शाहिरा
दिसे ही साताऱ्याची तऱ्हा !
राहू दे तोवरी असेच निरसे हसे ग
मी जपून ठेविन आंबट माझे पिसे ग
मंथनी पहा मग लोणी निघते कसे ग
आवडी प्रीतिने तूच पसर त्या लोण्यावर शर्करा
दिसे ही साताऱ्याची तऱ्हा !

'चिऱ्यावर चिरा' अशी ठाकठीक 'बुलंद इमारत' म्हणून सातारी हाडापेराचे जसे ठाकठीक वर्णन माडगूळकरांनी या लावणीत केले आहे, तसेच दुसऱ्या 'लवचिक, नाजूक' देहलतेचे वर्णनही तेवढ्याच रेखीवपणाने केलेले आहे–

छबीदार नार गुलजार चालली नटून
नाकात नथ झोकात कशी लाखात, दिसे ही उठून !
नेसली शालू भरजरी गडद अंजिरी–
दाटली बरी चोळी तटतटून
अर्धाच मिटे ही डोळा, टपोरी काळा–
इष्काचा चाळा शिकली ही कुठून !
ही कंबर हलवी शंभर जागी लवुन
खेळते पाठिवर वेणीची नागिण
बघताच मदन ये मनातला खवळुन
शालूचा झोळ हातात, पदर दातात,
लोक पाहतात सुंदरा झटून !

माडगूळकरांनी एखादे 'पोर्ट्रेट' रंगकुंचल्याने काढावे, तसे हे गुलजार नारीचे शब्दांकन केलेले आहे. यातली नार त्यांनीच म्हटल्याप्रमाणे 'ही कंबर हलवी शंभर जागी लवुन' अशी नाजुकसाजुक आहे. पण मला वाटते, की त्यांची या लावणीतली नारच केवळ तशी नसून संपूर्ण माडगूळकरी लावणीच अशी सौंदर्यवती आहे! माडगूळकरी लावणीलादेखील त्यांच्या ह्याच शब्दात तोलता येईल ! सौंदर्यदर्शन

वाङ्मयातून घडावे अशी एक अपेक्षा असते. हेतूही असतो. माडगूळकरी लावणी ही अपेक्षा आणि हेतू कधी घटना-सौंदर्याने, तर कधी आकारसौंदर्याने, तर कधी विचार-सौंदर्यानेदेखील सफल करते.

क़ाठेवाडी घोडयावरनं सजणाच्या पुढयात बसून जेजुरीला जाणाऱ्या लावण्यवतीला उमद्या छातीवर मान टेकल्यावर–

'घमघमाट करती दवन्याची वावरं'

अशा सुगंध–सौंदर्याने ती वेडावते, तर ही दुसरी म्हणते,–

पावसात मी भिजले नाथा, गाल निथळती जळी
ओठांनी ते टिपा नि सांगा शराब का वेगळी !

गालावरच्या शराबीनं तिनं असं धुंद केल्यावर तो घायाळ होणारच! आणि म्हणणार--

तुज्या डोळयाचं पडलं चांदणं
कानी आलं ग लाडिक हासणं !
भरझोक राहिलीस उभी
तुझी राजसवाणी छबी
उकलून ओठ डाळिंबी
गूज सांगशी बोलल्याविण !
हात हाति दिला गुलबशी
त्या गोड आठवासरशी
सात जन्माचं फिटलं रिण !

गुलबशी हाती हात आणि गोड आठवणी यानं तो 'भर उन्हात सुखावाशी' झाला खरा, पण हा 'आला नाही तोवरच जातो म्हणायला' लागल्यावर ही तिसरी–

'गुलजार चांद तुम्ही, मी चांदणी नव्हं का
घ्या मौज चांदण्याची सरदार अर्ज ऐका !–'

म्हणून विनवणी करते आहे आणि सांगते आहे--

बारा महिनं पडंल चांदनं तुम्ही राहिल्यावरी
पुनव रोजची होइल राया नांदा माझ्या घरी !

ह्या चौथीची मात्र आशा–अपेक्षा फलद्रूप झाली आहे. मनात असावं नि तसं घडावं, यातला आनंद नि समाधान काही वेगळंच–

बसा रावजी, बसा
या एकांती काळया राती खुल्या दिलाने हसा !

आतुर होते रसा
जसा की चातक हो पावसा
मनात होता तसा
आज हा योग साधला कसा
यालच ऐसा माझा मजही नव्हता जी भरवसा !

पण हा भाग्ययोग सगळ्यांच्याच नशिबी कुठून असणार ? एखादीच अशी–
घेणे तितके घ्याच आवघे ! कशास ओंजळ पसा !

म्हणून सुखावणारी पण ही पाचवी बघा कशी तगमगते आहे–

झोप आली, आली जांभई
राया, कसे अजून आला नाही !
आळसात मिणमिणे समई
पायात चुरगळे दुलई
भरलीच राहिली सुरई
सेजेवरी सुकलि की हो जाई !
किती वेळ तळमळू अशी
लागली रुताया उशी
मिटु तरी पापण्या कशी
पुरविली हौस माझि नाही !
अग बाई, वाजली कडी
आला माझा सखासौंगडी
गेली उडून झोप जांभई !

तगमगीनंही 'कडी वाजली' आणि हिची झोप उडाली. हा भास की सत्य ? काही असेल, ही क्षणकाल सुखावली एवढे खरे ! पण ही सहावी पाहा कशी उखाण्याच्या भाषेत सांगते आहे–

राती उकडतं अंगनी पडतं, चैताचं चांदनं...

अशा किती जणींच्या किती तऱ्हा ! कुणी म्हणते आहे, 'थंडीची झोप मला लागंना', तर कुणी सांगते आहे, 'माझ्या व्हटाचं डाळिंब फुटलं', कुणी म्हणते आहे, 'अशी मारीन तीर', तर कुणी सांगते आहे, 'चंदनाची चोळी माझे अंग अंग जाळी...'

बरं ही असली तिरकस भाषा त्या नारींनाच येते, आणि त्या ज्यांना खिजवताहेत त्या पठ्ठ्यांना येत नाही असे थोडेच आहे ! एक तर तशाच आडवळणानं विचारतो आहे––

ओल्या हुरड्यास आली शाळू ग
हिला कशी कशी सांभाळू ग ?

तर दुसरा खट्याळपणानं तिला सांगतो आहे–

फड सांभाळ तुऱ्याला ग आला,
तुझ्या उसाला लागंल कोल्हा !

परंतु असले बेरकी पठ्ठे माडगूळकरी लावणीत एकंदरीत कमीच, हे मात्र खरे ! त्यांच्या लावणीत यौवनगंधाच अधिक आणि त्याही संस्कृत साहित्यात वर्णिलेल्या शृंगारनायिकांसारख्याच आहेत. ही पाहा त्यांची एक 'रूपगर्विता'–

अशी मारीन तीर, डोळा तिरपा करून
कैक जातिल मरून अन् येतिल फिरून !
हे तरुणपणाचं बन
माझी मीच त्यास राखण
ऐटींत ठाकले उभी, बिनधोक धिटावा करून !
माझ्या बनात असतिल ससे
त्यांना शिकारी शिवतिल कसे ?
लांडग्यांना लोळविन पायी, खोट्या हसण्याचा फासा करून !
अंगरंगी फुले केवडा
नाग येऊन देतिल वेढा
कांटे-बरचीनं चेचिन फणा, नेम अचूक साधिन दुरून !

तर ही पहा माडगूळकरी 'उत्कंठिता'–

मी रे झाले तुझ्यावर फिदा, भेट एकदा,
मला एकटा
लाजेन जरा मी गडे, करिन पण पुढे, हात गोरटा !

तर ही पहा त्यांचीच, प्रियकराचा अपराध जाणूनही प्रेम करणारी 'उत्तमा'–

तो आला नि निघून गेला
मान लवून बघते त्याला
त्याची सूरत मनी ठसवली !
चोळी माझी पाठीवर उसवली !

तर ही पहा, प्रियकर परदेशी गेल्यामुळे व्याकुळलेली माडगूळकरी 'प्रोषितभर्तृका'–

उठउठुनी रातीची रडते
तळमळत पलंगी पडते
माझ्या संगती जळती समया,

मी जागी–निजता दुनिया !

कुठे असाल, कधी याल, जवळी घ्याल !

तुम्ही माझे, माझे हो रंगलाल !

आणि जिच्या अधीन तिचा प्रियकर असतो अशी ही खटचाळ ‘ स्वाधीनपतिका’–

माझ्या नथीच्या आकडचामधीं गुंतली तुझी बाही

सूटका आता नाही !

दिस सोन्याचा दिसतो ग बाई

झाली शिकार बसल्या ठायी

शिकाऱ्याच्या बसुन मनगटी पाखरूच गाई !

तर ही प्रियकराच्या आगमनाने हर्षित होणारी ‘ आगतपतिका ’–

बहर उडाला–

आज पडली तुमची आमची गाठ

अहो रावजी, फार पाहिली वाट !

खरंच, एकदा बघुन तुम्हांला खूष मनी मी फार

गर्व रूपाचा गळून गेला; पार वितळली गार !

मनात आलं काही

बोलाया धीर नाही

चांदरातिला जुळून आला घाट !

अशीच माडगूळकरी अभिसारिका आहे, वासकसज्जा आहे, मुग्धा आहे, स्वीया आहे, विप्रलब्धा आहे आणि मानिनीही आहे.

माडगूळकरांच्या ह्या लावणी–नायिका अर्थातच ग्रामीण आहेत. त्यांची अभिव्यक्तीची तऱ्हा, रीतभात, भाषा, संकेत हे सर्व त्यांच्या जीवन-परिसरातलेच आहे.

माडगूळकरी लावणी ही इतर शाहिरांच्या लावणीप्रमाणेच लौकिक आहे, ग्रामीण आहे. पण ती ‘ ग्राम्य ’ (erotic) किंवा बीभत्सतेकडे झुकणारी नाही. शृंगारातही ती संयमिनी आहे. उत्तान नाही. जुन्या शाहिरांनी बरेच वेळा अशी ग्राम्य, बीभस्त किंवा उत्तान रचना केलेली आहे. त्यांचा संयम किंवा तोल अनेक ठिकाणी ढळलेला दिसतो. पण माडगूळकरांची कुलीन, संस्कारी लेखणी आपला आब आणि तोल सावरूनच आहे. उदाहरणच द्यायचे तर जुन्या शाहिरांतील प्रभाकर हा शाहीर नायिकेच्या वक्षःस्थलाचे वर्णन करताना––

उरी गेंद गलुं दे गे उभार तरतरेल !

असे म्हणतो, तर गंगु हैबती–

चहुकडून डळमळित झळाळित कोंबडीचे केवळ अंडे
चरकि धरुनियां विधिने उतरले सुवर्ण जैसे आज भांडे !

असे म्हणतो, तर होनाजी--

अनार दाणेदार तंग चोळी जतीवर जोबन कोवळे रसरसले !

असे म्हणतो, तर सगनभाऊ--

होती किल्ल्यावर हल्ले खबुतर लोटन घेती पल्ले उरी गेंद रसरसले !

असे म्हणतो, तर अनंतफंदी--

वय वरुषे पंधरात सकुमार गे ।
रसति गेंद भरून आले ते उरावरी ॥

असे म्हणतो, परंतु माडगूळकर गेंद, जोबन असले शब्द न वापरताच मोठ्या मार्मिकपणाने सूचित करतात-

डोलतो उरावर मदनाचा पाळणा ग !
किंवा
राहसी उभी उर्वशी, घेउनी कुशी वारुणी कुंभा !

या बाबतीत साम्य किंवा जवळीकच सांगायची तर ती राम जोशी यांच्याशीच सांगावी लागेल. पण रचनेचा सुभग सुलभपणा पाहायचा तर माडगूळकरी लावणीच उजवी ठरण्याची शक्यता आहे. राम जोशी हा व्युत्पन्न संस्कृत पंडित होता, आणि परिणामी रचनेवर त्याची पकड असूनही ती कधी हठाकृष्ट, तर प्रसंगी पांडित्याने बोजड बनलेली दिसते. राम जोशीशिवाय बाकीचे अन्य शाहीर हे अशिक्षित होते. म्हणून त्यांच्या रचनेत शैथिल्यही बऱ्याच वेळा आढळते. पण माडगूळकरी रचना सुलभ, अर्थवाही, चित्रमयी, रसाळ, बंदिस्त आणि सफाईदार आहे. काव्यात्म व कलात्मक तर आहेच आहे !

जुन्या शाहिरांच्यापुढे कनातीमधला ग्रामीण, अशिक्षित, श्रमजीवी असाच श्रोतृवर्ग होता. एवढेच नव्हे, तर तो फक्त पुरुषवर्गच होता. जिथे त्यांची लावणी कनात सोडून श्रीमंती हवेलीत काही काळ गेली, तिथेही लंपट पुरुषोत्तमच जमलेले होते आणि त्यांची अभिरुचीही सामान्यच होती.

परंतु माडगूळकरांना त्या श्रोत्यांबरोबरच नागर, तथाकथित उच्च विद्याविभूषित, शिक्षित, संस्कारी आणि स्त्री-पुरुष असा संमिश्र स्वरूपाचा श्रोताप्रेक्षक उपलब्ध झाला होता. चित्रपटांसाठी तो बोलपटगृहात येऊ लागला होता. त्यामुळे लावणी म्हटली तरी शिष्ठ समाजाचे काही मूल्यसंकेत पाळणे आलेच. शृंगाराचा अतिरेक, अश्लील बीभत्सता यांना लांब ठेवणे आलेच. तशात माडगूळकरांचे व्यक्तित्वही संस्कारी, शिक्षित अशा घरात व समाजात पोसलेले. त्यामुळेही

त्यांच्या लावणीने कधी आपली विशिष्ट पायरी ओलांडली नाही. हे तर केले नाहीच, पण इतके दिवस खालच्या पायरीवर वावरत असलेल्या लावणीला त्यांनी अभिजातपणाचा कलात्मक स्पर्श घडवून वरच्या पायरीवर नेण्याचा सफल प्रयत्न केला.

याशिवाय, दुसरे आणखी पथ्य पाळावे लागले ते रचनेच्या विशिष्ट मर्यादेचे. श्रोत्यांच्या सामाजिक संमिश्रतेमुळे त्यांची लावणी जशी सैरभैर झाली नाही, तशी मुक्तही झाली नाही. जुन्या शाहिरांनी लावणी स्फुरली तशी आणि तेवढी लिहिली. माडगूळकरांचे लावणीलेखन तसे झाले नाही, तर ते एका कथेत व कथेतल्या प्रसंगानुरोधाने झाले आहे. म्हणजेच चित्रपटातला प्रसंग (सिच्युएशन) लक्षात घेऊन लावणी लिहावी लागली आहे. चित्रपटातले हे प्रसंग म्हणजे बहुधा तमाशांचे फडच जरी होते आणि ते फड बोर्डावर किंवा मैफिलीत असले तरी ती मैफिल चित्रपटांच्या कथेतील होती, हे लक्षात ठेवणे भाग आहे. म्हणूनच चित्रगीतांची जी ३-३॥ मिनिटांची बांधीव वेळ (ड्यूरेशन) असते, तीही त्यांना सांभाळावी लागली आहे. त्यामुळेच ती प्रकाराने जशी बहुविध झालेली आहे तशी आकाराने पसरलेली नाही. दीर्घ बनलेली नाही. ३–४ कडव्यांतच तिचा विकास भावगीतासारखा झालेला आहे. आणि लावणी हेदेखील अस्सल विशिष्ट मऱ्हाटीबाजात बांधलेले भावगीतच नव्हे काय ? आणि म्हणूनच तथाकथित शहरी, सुशिक्षितांना ही लावणी खालची व उपेक्षित न वाटता, आपली वाटली असेल काय ? कनातीत रंगणाऱ्या व असभ्य मानल्या गेलेल्या लावणीला यामुळेच या मंडळींनी आपल्या घरात रेडिओ, टेलिव्हिजन यांसारख्या माध्यमांद्वारे प्रवेश दिला असेल काय ? काही असो, पिढचान् पिढचा उपेक्षित राहिलेल्या लावणीला या ३०–४० वर्षांत शिष्ठ व सभ्य संमिश्र समाजात जी नांदणूक मिळालेली आहे, त्याचे फार मोठें श्रेय ग. दि. माडगूळकर या शाहिराला आहे, हे निःसंशय मान्य केले पाहिजे. माडगूळकरांनी अशी सुरेख, कलात्मक लावणी रचून मराठी लावणी–वाङ्मयात मोलाची भर घातलीच आहे, पण ती लावणी समाजात सर्वत्र नेऊन मराठी माणसांची रसिकताही समृद्ध केली आहे. एका दृष्टीने, लांब ठेवलेल्या लावणीला जवळ करून, तिची अस्पृश्यता घालवून त्यांनी मराठी लावणीवरही उपकार केलेले आहेत.

पेशवाईत होऊन गेलेल्या सहा शाहिरांनंतर ती परंपरा मध्यंतरी समर्थपणे पुढे चालविणारा पठ्ठे बापूराव हा एक सातवा शाहीर होऊन गेला आणि त्याच्या नंतर त्या परंपरेत मोलाची भर घालून लावणीला रचनादृष्टचा अभिजातपणा आणि सामाजिकदृष्टचा प्रतिष्ठा प्राप्त करून देणारा ग. दि. माडगूळकर हा एक श्रेष्ठ 'आठवा शाहीर' इये मराठीचिये नगरी झाला.

□

६

# माडगूळकरी लावणीतील लावण्य !

हृदयाला चटका लावणारी, मनाला मोहून टाकणारी, भल्याभल्यांना भुलवणारी लावणी असतेच तशी लावण्यवती ! ही लावण्यवती मोठी लडिवाळ. लाडे लाडे हिचे बोलणे, तुरुतुरु हिचे चालणे, ठिबकठाकडे हिचे दिसणे, झुल्यासारखे हिचे झुलणे, नागिणीसारखे हिचे डुलणे, केवड्यागत हिचे घमघमणे आणि नटखट असे हिचे रुसणे-फुगणे ..

ही लावण्यवती लावणी जर अशी, तर हिला शब्दांच्या कोंदणात जडवणारे लावणीकारही तसेच मर्द-फाकडे रचनकार ! 'धन्य तुझे लावण्य प्रीतीचे बाण जैसे सणाणी ! ' अशी देखणी रेखणी करणारा शाहीर स्वतःबद्दल म्हणतो,

अनंतफंदिचे छंद जसे कटिबंध जडन नवी झनानी !<br>
लांगेलुंगे कवि ना ठरती, जशा भोरड्या मनानी !

राम जोशी तर 'कविराय चमकला हीर लोकजाहीर इतर शाहीर काजवे वांग !' अशी दर्पोक्ती जाणवणारी, पण त्याच्या प्रतिभेला, कवित्वाला शोभणारी भाषा वापरतो.

आधुनिक लावणीकार ग. दि. माडगूळकर असे स्वतःविषयी कुठे काही म्हणत नसले, तरी त्यांनीही असा यथार्थ गर्व जरूर वाहावा, अशीच त्यांचीही लावण्यवती लावणी आहे.

माडगूळकरी लावणीतल्या लावण्यवती तर 'बुलंद दिसते तुझी इमारत, ठीक चिऱ्यावर चिरा ! दिसे ही सातान्याची तऱ्हा' अशा जडण-घडणीच्या आणि

'ही कंबर हलवी शंभर जागी लवून–' अशी छबीदार, गुलजार आहेतच; परंतु त्यांची बहुतेक लावणी–रचनाच अशी लावण्यवती आहे. 'कंबर हलवी शंभर जागी लवून' हे वर्णन आपल्या लावणीतल्या लावण्यवतीचे जरी गदिमा करीत असले, तरी ते त्यांच्या लावणी–रचनेलाही तेवढेच यथार्थ शोभते ! इतकी त्यांची शब्दकळेने देखणी असलेली भाषा लवचिक, सहज लवलवणारी आहे. त्यामुळेच तिच्यातून नाना परीच्या काव्याची मनोरम इंद्रधनुष्ये ठायी ठायी फुलून बहरून आलेली दिसतात.

रचना, शब्द, अर्थ, अलंकार, उक्ती, रस, गंध, रंग, स्पर्श, चित्र, नाट्य– अशा कितीतरी प्रकारवैशिष्ट्यांनी त्यांची लावणी नटूनथटून समृद्ध सजलेली आहे.

खरं तर शब्द तेच असतात, वेगळे नसतात. परंतु रचना अशी खूबीदार असते की, त्यामुळे ते काव्यमय, नवीन वाटतात. 'कौशल्य सारे रचनेत आहे.' गदिमा तर शब्दसम्राटच होते. शब्दांवर त्यांची हुकूमत विलक्षण होती ! त्यांच्या सदैव सतेज प्रतिभेतून ते नवनवीन रूप आणि आशय घेऊन अवतरत असत. त्यांची प्रतिभाही अशी की 'सहज बोलणे काव्य' होऊन जावे !

पंचकल्याणी घोड्यावरचा रुबाबदार स्वार पाहिल्यावर कुणा एकीच्या मनात तो भरला, ठसला. पण हे ठसलेपण व्यक्त करताना ती म्हणते,

'साठवायासी रूप केला डाव्या डोळ्याचा ऐना !'

आरसा जसे प्रतिबिंब धरून ठेवतो तसे हिने डोळ्यांचाच ऐना केला !

अशी वेडीपिशी, प्रीतदिवाणी पण सांगते,

'झाले कुर्बान तुझ्यावर, पीरत मनामधी माईना ?'

आपली पीरत अशी उदंड, अशी उदंड की जपण्यासाठी हिला आपलं मनही तोकडं, लहान वाटू लागलं !

काठेवाडी घोड्यावरून राजसाच्या पुढ्यात बसून जेजुरीला जाऊ इच्छिणारी ही दुसरी प्रेमिका जेव्हा सजणाच्या उमद्या छातीवर आपली मान टेकते तेव्हा म्हणते–

'घमघमाट करती दवन्याची वावरं !' जेजुरीच्या परिसरात खंडेरायाला आवडणाऱ्या दवण्याची वावरं असणार हे खरेच, पण या प्रादेशिकतेबरोबरच दवण्याचा सुगंध आपल्या छातीवर मान ठेवताच तिला धुंद करतो, हे किती रसीले आहे !

गदिमांनी आपल्या लावणीतून अशी कितीतरी प्रीतीची रसीली रूपके योजिलेली आहेत.

'माझ्या व्हटाचं डाळिंब फुटलं
सांगा राघू, मी नाही कधी म्हटलं ?'

व्हटाचं फुटलेलं डाळिंब आणि राघू हा संकेत जसा या रूपकातून व्यक्त झाला आहे, तसाच–

'चिंचा आल्यात पाडाला
हात नको लावूस झाडाला–माझ्या झाडाला –'

यातूनही तितक्याच समर्थपणाने व्यक्त झालेला आहे.

प्रीतीची भाषा सरळ नसते, ती आडवळणाचीच असते. अशी आडवळणाची भाषा बोलण्यात चतुर कामिना तर पटाईतच असतात. गदिमांच्या लावणीत अशा आडवळणाची सूचक भाषा बोलणाऱ्या चतुर कामिना तर पुष्कळच आढळतात.

रानात गुरं सावलीत बसली आहेत, संध्याकाळपर्यंत आता त्यांची चिंता उरलेली नाही. तर अशा वेळी–

'चल दोघं मिळूनी चढूं टेकडीवर
चढता चढता धरा हात की वाट नसे रुंद
जाळीमंदी पिकली करवंदं ! ...'

अरुंद वाटेवरल्या जाळीमंदी पिकलेल्या करवंदांचा हा इशारा खरं तर पुष्कळच बोलका आहे. पण ती आहे धीट. म्हणून पुढे सरळ जवळजवळ उघडपणानेच सांगून टाकते आहे–

'कुणी बघत नाही तो चला गडे लौकर
आंबट गोडी चाखु वाटते, पुरवा की छंद ! ...'

पण हा भलताच रांगडा गडी असावा, की समजूनउमजून न समजण्याचा बहाणा करतो आहे, कुणास ठाऊक ! काही असो; ही धीट असली तरी एक नारीच. लज्जाभाव आहेच. म्हणून तीही म्हणते–

'मला लाज वाटते सांगाया ते धनी
घ्या तुमचं तुम्ही जरा समजुनी
पाळणा दुधाचा हालतो माझ्या मनी ! उद्याच्या
दऱ्या-टेकड्या चला धुंडुया होऊन बेबंद ! ..'

अस्सं ! आता तरी याला कळायला हरकत नाही. 'मायला, म्हंजे तुला ढवाळं लागल्याती म्हन की !'– असंही आता तो कदाचित म्हणेल. रानावनात जावं, लतावेलींशी गुजगोष्टी कराव्या, पाखरांची गाणी ऐकावी, असे डोहाळे सीतामाईलाही लागले होते. तिनं ते वेगळ्या भाषेत रामरायाला सांगितले असतील, हिनं 'जाळीमंदी पिकली करवंदं' अशा भाषेत सांगितले. पण ही चतुर खरीच !

आपल्या गरोदरपणाचा उल्लेख ती ' पाळणा दुधाचा हालतो माझ्या मनी ' अशा प्रतीकात्मक भाषेत किती संयमाने करते आहे.

मुळात लावणी हीच अस्सल मराठमोळी, ग्रामीण. गदिमांची वृत्ती–प्रवृत्तीही तशीच ! ग्रामीण जीवनाशी एकरूपता पावलेली, तिथेच रमलेली. त्यामुळे त्यांची लावणीही तेच शब्दरूप घेऊन अवतरते. हे सहजच घडते. असेच हे एक अस्सल रूपडे रूपक–

ओल्या हुरडयास आली शाळू ग ?
हिला कशी कशी सांभाळू ग ?
हिच्या मायेत लपला चोर
तो हिच्यावरी शिरजोर
त्याला कुठे कुठे धुंडाळू ग !
हिरव्या मोत्यांचा सुटला वास
हे आवातणं की त्यास
ही मुकी उभी लाजाळू ग !
कधी पानात फुलतिल पंख
कधी बसेल कणसा डंख
अशा चिंतेत ही स्वप्नाळू ग ! ...

'शृंगार हा लावणीचा आत्माच' म्हटले तर वावगे ठरणार नाही. बहुसंख्य मराठी लावणी शृंगारसात न्हाऊन, निथळून निघालेलीच आहे. त्या लावणीतला शृंगारही पुष्कळसा उघडावाघडा, खोल रांगडा आहे; पण गदिमांच्या या लावणीत तो कसा अभिजात, रमणीय दिसतो. खुला शृंगारही गदिमांच्या लावणीत आढळतोच :

बसा रावजी, बसा
घ्या एकांती काळचा राती खुल्या दिलाने हसा !
आतुर होते रसा
जसा की चातक हो पावसा
मनात होता तसा
आज हा योग साधला कसा ! ...

पुढे ही उत्कंठिता रावजीला

पेला देते भरून
परत घ्या अर्धा उष्टा करून

असे विनवीत असतानाच म्हणते आहे–

काचेवरती धुंद उमट्र द्या देवघेविचा ठसा !

अत्यंत तरल, नाजुकसाजुक भावना गदिमांनी देखील कशी काचेइतक्याच रंगीत आणि नाजूक शब्दात ठसवलेली आहे !

रमणीय वक्षःस्थळाचे वर्णन जुन्या शाहिरांनी आपल्या लावण्यांमधून मुबलक केलेले आहे :

'उरी गेंद गलुं दे गे उभार तरतरले' असे प्रभाकर शाहिराने म्हटले आहे, तर डळमळती हृदयावर जोबन दोन आंबे आले पाडा' किंवा 'अनार दाणेदार तंग चोळी- छातीवर जोबन कोवळे रसरसले' असे होनाजीने वर्णिलेले आहे. 'गजगति चाले हळूहळू उरिं ग जोबन उमटले हुडे' असे शाहीर परशराम म्हणतो, तर 'चिमणे जोबन याने केला आमचा मारा' असे सगनभाऊ म्हणाला, पण गदिमा गेंद, जोबन असले शब्दही न वापरता सांगतात-

'डोलतो उरावर मदनाचा पाळणा ग।
पाळण्यातले पोर उसविते चोळीचा कोपरा ।।

गदिमांच्या लावणीलाही असा एक मर्यादशील संस्कार लाभलेला आहे. संतवाणी, लोकवाणीप्रमाणेच पंतकाव्यही त्यांनी अभ्यासलेले होते. अभिजात संस्कृत वाङ्मयाशीही त्यांचा परिचय होता. कथा-कीर्तने आणि घरगुती बाळबोध रीतभात-या सगळ्यांनीच त्यांची प्रतिभा संस्कारित झालेली होती. त्यामुळे शृंगारिक लावणीतही ती आपली कुलीनता सोडत नाही. काव्यात्म पदर ढळू देत नाही. त्यांची लावण्यवती आपल्या ओठावरचे 'निरसे हसे' आणि मनातले 'आंबट पिसे' जपणारी आहे. 'भिवईच्या कमानीत' राहून हसणारी, 'रात्री समईसंग जळणारी', 'आठवणीनं उचकीसरशी 'हृदयाची पालखी' वरखाली होणारी, 'बोलाचा फुलवरा' वाहून प्रीतीच्या शंकराला पूजणारी, 'तरुणपणाच्या बनात' तिची तीच राखण करणारी, 'अंतरंगी केवडा' फुललेली, 'काळजाच्या तिजोरीत' प्रीतीचा ठेवा लपवणारी, 'दिठी दिठीच्या नजरमिठीचा' सराव इच्छिणारी, नटूनथटून 'जलातली जलराणी' बनून आषुक माशाला जाळ्यावाचून गुंतवणारी ही चतुरिका, सौंदर्यसारिका आहे !

'चित्रमयता' ही तर गदिमांच्या सर्वच-गद्य आणि पद्य-लेखनातली उठावदार अशी वैशिष्ट्यपूर्ण बाजू आहे. चित्रकार जसा रंग-कुंचल्यानं चित्रफलकावर चित्र रेखतो, तसेच गदिमा शब्द-लेखणीने कागदावर शब्दचित्र साकार करतात.

हे एक चित्र पहा-प्रीतीच्या मधुर भावछटांनी रंगलेले :

जिंकून फड आला माझा ग पैलवान
सोन्याचं कडं हाती, बादली फेटा छान !
हलगी-लेजिमाची एकच झाली घाई

गावात मिरवीत विजयी वीर येई
बघून हरपलं डोळ्याचं माझ्या भान !
नको रे, असा होऊ आपुल्या नादी धुंद
माडीच्या खिडकीत पडद्याआड चांद
नजर वर फेकी, कळू दे थोडी मान !
उतरू कशी खाली ? भोवती लोक किती
लाजरी मुलखाची आले मी काकुळती
काढू मी दृष्ट कशी, उतरू लिंबलोण ?

अशाच एका ललनेचे रूपलावण्य गदिमांनी किती सुंदर वर्णिलेले आहे पाहा–

न्हाऊन, उभी ग राहून उदविशी केस
लक्ष्मी यावी सागरजळातुनी परी तशी ग दिसतेस !
चंद्रमा मुखावर जडे, काय तुजपुढे कौस्तुभ शोभा ?
भुवईचे धनु खेचवी, रसिक नाचवी, लोचनी रंभा
राहसी उभी उर्वशी, घेउनी कुशी वारुणी कुंभा
अधरात सौख्यसंपदा, सांडते सुधा जधीत हसतेस !
इंद्राच्या घरचा करी तुझा ऋणकरी
अशी मदभरी चालसी मंद
प्राजक्त तुझ्या श्वासात
त्याच वासात तुझी तू धुंद
अशी अमोल रत्नावली, येसी भूतली
म्हणून वर्णिली, का ग रुसतेस ?
हा तुझ्या धुपाचा वास, रुपाचा श्वास
जाईल ग खास तयाच्या मार्गी
येतील रसिक धावुनी, तुला पाहुनी
मनी मोहुनी थांबतिल जागी
झुरतील, किती ग मरतील, आत फिरशील
तुला ग दरवेश !

अनुप्रास खटक्यासह गदिमांची शब्दकला इथे कशी बहरून आलेली दिसते ! माडगूळकरी लावणीतील लावण्याची विविध धाटणी मोठी चित्तवेधक, मनोरम आहे :

माघाची रात
चांदणं त्यात
कुशी बदलून काही भागेना

थंडीची झोप मला लागेना !
डावा डोळा
लवतो खुळा
तशीच बाई काही जागेना !

अशी कुणी आसुसलेली विरहिणी भेटते, तर

इष्काच्या रंगात
वीज भरे अंगात
सोड माझा हात, राया उजाडलं !
सोडवेना संगत
मोडवेना रंगत
लाज करी घात, तिनं पछाडलं !

अशी कुणी सुखावलेली मोहिनीदेखील भेटते :

तुम्हावाचुनी गंध येईना
धुंद केतकी दलं
तुम्हासंगती सुगंध सुटतो
माझ्या मृदु कुंतला

स्नेह असा आपुला
नका सोडून जाऊ मला !
तुम्हावाचुनी वसंत येता
नयन सांडती जला
तुम्हासंगती शिशिर बांधतो
कळचा फुलांचा झुला
कंठी ये कोकिळा
नका सोडून जाऊ मला...!

प्राणप्रिया प्रेमळाला अशी पदर पसरून आर्जव करणारी ही स्नेहलुब्धा, तर ही पाहा हौशी ललना :

एक हौस पुरवा महाराज
मला आणा कोल्हापुरी साज !
अंग अंग बघा तरि माझं, केतकीचा मळा
निमुळता कंठ घाटदार, सुरईचा गळा
उरी आले ओथंबुन वय, घाट आगळा
रूपासारखे दागिने माझ्यासाठी घडवा
पुखराज सोन्यामधी अंगठी बोटामधी चढवा

एवढी अर्जी ऐका गडे आज !
गळ्यामधी साज कोल्हापुरी, आंगठी बोटी
घोड्यावर पुढ्यामधी घेऊन बसा तुम्ही पाठी
राजाराणी दोघेजण हिंडू नदीच्या काठी
घोडा टप् टप् पौंडावर निघू द्या
मला बेहोश अलक्ष जगु द्या
लोक पाण्यात बघतिल, बघु द्या
कुणी म्हणेल, म्हणो रंगबाज !
कुठे तरी आंबराईत, चांदण्याराती
दोघेजण राहू मुक्कामा, शांत-एकांती
तुम्ही मला-मीच तुम्हाला, एक सांगाती
करा सुचेल तो तो चाळा
आवडेल तशी कुरवाळा
उभी रात मधामधी घोळा
घ्या हो पिऊन माझी लाज !

ह्या हौशी ललनेप्रमाणेच दुसरी एक लाडाची मैना देखील आहे. तिलाही आपल्या रूप-लावण्याचे चांगले भान आहे. आणि म्हणूनच ती त्याला शोभेल असे दागदागिने आणि उंची वस्त्रे मागत आहे :

रूपासारखे दागदागिने हवेत कपडे उंची ।
मी लाडाची मैना तुमची, तुम्ही प्यारे पंछी ।। धृ. ।।

कानी झुमके, वेलभोकरे नव्या तऱ्हेची करा
सर मोत्याचा गळ्यात माझ्या, पदकामध्ये हिरा
नवरत्नांच्या करून अंगठ्या नटवा बोटं पाची ।।

गोरे माझे दंड त्यावरी बाहुभूषणे चढवा
गोठ पाटल्या तोडे बिल्वर शंभर नंबरी घडवा
कमरेवरती झुलवा माझ्या झुबकेवाली कांची ।।

पाच मण्याची चमकी नाकी, घाट नथीचा जुना
मनापासुनी आवडतो मज फक्कड तो दागिना
राणीहुनी मग दिसेल सुंदर लक्ष्मी तुमच्या घरची ।।

साड्या आणा, तलम साजणा, सुती रेशमी जरी
घाटदार या अंगलटीला दिसेल जी जी बरी
बनारसीची, बऱ्हाणपुरची, सवंग सुंदर मदुरेची ।।

या लावणीतल्या शारीरिक लावण्याबरोबरच दागदागिन्यांच्या आणि उंची वस्त्रांच्या नावा-गावावरून तत्कालीन समाजात मराठमोळ्या सुखवस्तू घरातली स्त्रियांची आवड-निवड कशी होती, ह्याची कल्पना येते. एका समाज-अंगाचे दर्शन घडते.

माडगूळकरी लावणीत अशा सगळ्याच काही हौसेच्या, लाडाच्या मैना नाहीत. जनलोकांची भीती बाळगणाऱ्या व रीतभात पाळणाऱ्याही काही सुशीला आहेतच. हेच एक सुशील लावण्य पहा :

हात सोडा पिचेल कांकण
गावभरी होइल बोभाटा, विनाकारण !
घुसळण झाली शरीराचि चोरिता अंग
लालेलाल झाला गालांचा लाजेनं रंग
आपल्या खेळातच तुम्ही जाहला दंग
सभोवती नाही आडोसा, थिटे कुंपण !
वेळावूं मान मी किती, लपवुं हो मुख
नाही तेव्हा कसे इच्छिता नाही ते सुख
सुगी आधी कशाला सख्या कापता पिक
एकवार तरी ऐकुनी घ्या हो मागणं !
संपला माघ, मग फाग, चैत्र-वैशाख
धरतील तिथी-लग्नाची घरातिल लोक
घ्या हात हातामधी माझा उघड बिनधोक
तोवरी नव्हे हे बरं असं वागणं !

ह्या सुशील लावण्याप्रमाणेच काही खटयाळ लावण्यही माडगूळकरी लावणीत आढळते. ते लावण्य शिकारीही बनते.

पण मदनाच्या राज्यात उलटे-पालटेदेखील होते आणि मग एखाद्या रूपगर्वितेवर असे म्हणायची पाळी येते—

एका पायावर भार ठेवुनी अश्शी मी उभी राहिले
नजरेशी नजर भिडली...आणि खाली मी पाहिले !
काय सांगू आता ?
झाली चित्तरकथा !
नाही सोसली नेटकी नजर
खांद्यावरून गळला पदर !
त्याला आवरिता
झाली चित्तरकथा !

पायाखाली ठरेना जागा
नखे काढती भुईवरती रेघा
केतकी भुलली ग नागा !
अशी उलटी कथा–
झाली चित्तरकथा...!

माडगुळकरी लावणीतल्या लावण्याने भुलून जाणाऱ्या रसिक श्रोत्यांचीही अशी चित्तरकथा झाल्यास नवल नाही ! इतकी त्यांची लावणी लावण्याच्या विविध आविष्कारांनी श्रीमंत, समृद्ध आहे. तिच्यात शब्दसौंदर्य आहे, अर्थसौंदर्य आहे, अलंकारसौंदर्य आहे, रचनासौंदर्य आहे; स्थळ, व्यक्ती नि घटनासौंदर्य आहे, वर्णनसौंदर्य आहे, आकार नि प्रकारसौंदर्यही आहे. सौंदर्य–लावण्याने ती इतकी चहूअंगांनी लवथवलेली आहे की, माडगूळकरांनी मराठी सारस्वताच्या उद्यानात लावणीच्या द्वारा रसरंगाची मुक्त, धुंद 'लावणी'च केलेली आहे. मराठी रसिकता तृप्त आहे !

□

७

# माडगूळकरी लावणीतील लावण्यवती

माणसाच्या मनाला लावण्याची भुलावण फार. लावण्य-सुंदराची ओढ जबरदस्त, विलक्षण, इतकी की ती लावण्यवेड ठरावी !

हे वेड हृदयाला चटका लावणारे, मन मोहून टाकणारे, चित्त चोरणारे, गोड हुरहुरीने अस्वस्थ-बेचैन करून सोडणारे...असे भुलभुलैया करणारे !

जी गोष्ट लावण्याची तीच लावण्यवतींची. किंबहुना भुलभुलैया करण्यात लावण्यवतीच अधिक वरचढ !

म्हणून तर यच्चयावत् विश्वातील ललितसाहित्याच्या दालनातील केवढा तरी प्रांत या लावण्यवतींनीच बळकावलेला आहे. व्यापलेला आहे.

यांचे अंग-प्रत्यंग, नेत्रकटाक्ष, करपल्लवी, हास्यसंकेत, मधुमितभाषण, लज्जाभाव, आळोखेपिळोखे; इतकेच नव्हे, तर यांचा रुसवाफुगवा, हट्ट-अबोला, मान-अपमान, गर्व-ताठा, राग-अनुराग, संताप-शाप...आदींनी रसराज शृंगार मंडित झालेला आहे. तो जणू त्यांच्यासाठीच राबत आहे, तिष्ठत आहे. पण त्याचे असे राबणे, तिष्ठणेही उगाच नाही. शृंगार-निर्मितीचे विलक्षण अमोघ, अद्‌भुतरम्य सामर्थ्य या लावण्यवतींना लाभलेले आहे.

प्राचीन संस्कृत साहित्यात देखील अशा विविध गुणरूपिणी शृंगारनायिकांची भली मोठी मांदियाळी नांदत आहे. मग त्या मऱ्हाटमोळ्या लावणीत न आल्या तरच नवल ! लावणी तर हृदयाला चुटपुट लावणारी. मदनशरांनी घायाळ करणारी. येडंखुळं बनवणारी ! खरं तर–

'स्त्रीपुंसयोर्मिथो रागवृद्धिः शृंगार उच्यते ।'

-नर-नारींची परस्पर अनुरागवृद्धी म्हणजेच शृंगार; किंवा-

पुंस स्त्रियां स्त्रियाः पुंसि संयोगं प्रति या स्पृहा।
स शृंगार इति ख्यातो रतिक्रीडादिकारणम् ॥

-शृंग म्हणजे मदनोद्भव. त्याच्या आगमनाला हेतू असणारा आणि स्त्रीपुरुष यांच्यावर आधारून असणारा तो शृंगार! अशी शृंगारलक्षणे किंवा व्याख्या नोंदवून कोशकार म्हणतात-

'शृंगाररसाचे संभोग व विप्रलंभ असे दोन प्रकार आहेत. परस्परानुकूल कामीजनांचे रतियुक्त दर्शन, स्पर्शन, आलिंगन, इत्यादी व्यापार यांना संभोग ही संज्ञा आहे...कामीजनांचे रत्यात्मक व्यापार अनंत असल्याने संभोग-शृंगार अनंत प्रकारचा आहे.' या प्रकाराचे 'अमरुशतक' नामक ग्रंथातील मूळ संस्कृत श्लोल उद्‌धृत करून त्याचा भावार्थ ते असा देतात-

'जी नायिका प्रियकराने अधरदंश केला असता हस्तविक्षेप करते आणि विस्मित होऊन ' हे शंढा, जा, दूर हो असे कृतककोपाने बोलते, रागाने आपल्या भुवया चढवते, दंशाच्या वेदनांनीं चित्कार करते व डोळे मिटून घेते, अशा मानिनी स्त्रीचे जे चुंबन घेतात, त्यांना अधरसुधेची सहजपणे प्राप्ती होते. देव खरे म्हणजे मूढ आहेत. त्यांनी अमृतासाठी वृथाच क्षीरसागराच्या मंथनाचा खटाटोप केला.'

संभोग-शृंगाराचे हे उदाहरण, तर विप्रलंभ-शृंगाराचे हे असे उदाहरण-

प्रियकर-प्रेयसी एकाच शय्येवर पण एकमेकांकडे पाठ करून झोपली होती. ती एकमेकांशी बोलतही नव्हती. चित्तात जरी अनुनय करण्याची इच्छा असली तरी दोघेही मानीपणा धरून राहिली होती. पण ती अवस्था फार वेळ टिकली नाही. त्या प्रेमिकांचे डोळे अपंग दृष्टीने एकमेकांना भिडले. हळूहळू मानीपणा गळून पडला आणि मग त्या दोघांनी हास्ययुक्त अशी एकमेकांना दृढ गळा मिठी घातली.'

शृंगारातही स्त्रीला प्राधान्य आहे. अभिनवगुप्त 'स्त्रीति नामापि मधुरम्'- स्त्री हे नावच मुळी मधुर आहे, असे म्हणतो. तर भरत सांगतो, 'सुखस्य हि स्त्रियो मूलम्' -सर्व सुखाचे मुळ स्त्रीच आहे. तिचे प्रकृति-स्वभावादी भेदावरून उत्तमा, मध्यमा, अधमा असे प्रकारही सांगितलेले आहेत.

तर जशा या संस्कृत, नागर नायिका, तशाच शाहिरी-वाङ्मयातील ग्रामीण जडणघडणीच्या लावणीतील लावण्यवती. संस्कृत काय, प्राकृत काय किंवा मऱ्हाटी काय, सर्व रचनाकारांची शृंगार-भावना एकाच तऱ्हेची दिसते. फरक पडतो तो केवळ अभिव्यक्तीच्या पद्धतीत. म्हणून लावणीतला शृंगार हा अनिष्ट, हीन

मानण्याचे जसे कारण नाही, तसेच लावणीतील लावण्यवतीही निकृष्ट ठरवण्याचे कारण नाही. ज्या ग. दि. माडगूळकरांनी नागर नायिकेसाठी 'आला वसंत देही मज ठाऊकेच नाही' अशा सुरेख संयत, सूचक ओळी लिहिल्या त्याच माडगूळकरांची लावणीतील धीट, मोकळी लावण्यवती म्हणते–

'काय झालं बाई तरी आज ?
जागी झाली डोळ्यामंदी लाज ! ...'
भिवईच्या कमानीत राहून
प्रीत हांसे कुणाला ग पाहून
ऐन ज्वानीचा लेऊन साज ?
का हो उघडून मिटता तिनदा
मऊ पापण्यांचा नाजूक पडदा
कोण दिसला गडी ऐटबाज ?
का हो, दुरून बघता तरी ?
सारं वाहीन पायांवरी
माझ्या डोळ्यांत या महाराज !

आपल्या डोळ्यांत येण्याचं निमंत्रण देणारी ही लावण्यवती धीट खरीच! हा धीटपणा, मोकळेपणा हेच या लावणीतल्या लावण्यवतीचे खास वैशिष्ट्य म्हटले पाहिजे. आणि हेही स्वाभाविकपणेच त्यांना लाभलेले आहे. कारण त्या मुळात आहेत उघड्या सृष्टीत वावरणाऱ्या निसर्गकन्या. म्हणून त्यांचा शृंगारही उघडा, खुल्लमखुल्ला आणि रांगडादेखील. गदिमांच्या विपुल लावण्यांतूनही अशा लावण्यवती भेटतात. हीच पहा की राजसाला कशी म्हणते आहे –

काठेवाडी घोड्यावरनं पुढ्यात घ्या हो मला
राजसा, जाऊ या जेजुरीला !
भरधांव धावुं दे घोडा रस्त्यावर
टेकते मान मी उमद्या छातीवर
घमघमाट करती दवण्याची वावरं
मुंग्या आल्या सर्वांगाला सख्या, सोडवा मला !
विळख्यांत धरा हो, कवळून कवळी कुडी
वाऱ्यांत झालि की पदराची वावडी
मज अलगद उतरा निराबाईच्या थडी
गार लागतंय पाणि पायाला, खांद्यावर घ्या मला !

'माझ्या डोळ्यात या' म्हणणाऱ्या पहिल्या धीट सुंदरीपेक्षा ही दुसरी 'खांद्यावर

घ्या मला ' म्हणणारी आणखी धीट ! पण या दुसरीहून ही तिसरी किती धीट म्हणावी ! ही तर म्हणते आहे –

माझ्या व्हटाचं डाळिंब फुटलं
सांगा राघू, मी नाही कधी म्हटलं ?

आणि अशा धिटाईनं ही मैना आपल्या राघूशी झालेलं भांडण मिटवायला बघते आहे –

आता नका रुसूं
जरा जवळ बसूं
खुदूखुदू हंसूं
दोन जिवांचं भांडण मिटलं !

नका वळवूं ही मान
करा शब्दाचा मान
बघा देऊन ध्यान
माझ्या अंगावर काटं उठलं !

शेवटी तर ही खास प्रीतीचे गुह्य सांगून ठेवते म्हणा, किंवा प्रीतीच्या राज्यात ह्या भाषेचे अर्थ कसे उलटे घ्यायचे हे सांगून टाकते म्हणा; ती म्हणते –

आम्हा बायकांची संवय
नाही म्हणजेच होय !
आता कशाचा संशय ?
राजाराणीचं नातं पटलं !

या धिटाईसारखीच आणखी कुणाची मोकळीढाकळी तऱ्हा. ही सरळ मन खुलं करणारी म्हणते –

थंडगार सुटली हवा
ग बाई, मी जाते सख्याच्या गावा !
दिवसा मनाला एकच चाळा
राती डोळ्याला लागता डोळा
सारखं वाटतं सखा भेटावा !
एकदा दोनदाच झाल्या भेटी
घट्ट बसल्या रेशिमगाठी
ओढ लागली नं माझ्या जिवा !
लइ दिवस जिव्हारी दडलं
जे घडू नये ते घडलं

त्येंच्या डोळ्यांनी साधला दावा !
त्यो येत न्हाई तर न्हाई
मी होवून जाईन बाई
बायकांनी मान इसरावा !

हा हिचा समजूदारपणा म्हणा, किंवा माघारीचे लटके समर्थन म्हणा, पण आहे मोकळी. जसं घडलं तसं सांगून टाकणारी. हिच्यासारखीच ही आणखी एक – पहिल्या मुहूर्तावर सौदा कसा पटला हे सांगणारी – पण कबुतराला मधे घालणारी –

तुझं कबुतर सहजच बसलं माझ्या कौलावर
सख्या रे माझ्या कौलावर
काळिज माझं उडुनी गेलं तुझिया डौलावर !
गिर्रेबाज पाखरू हळूच मी पकडलं
तू काळिज माझं नजरेनं झडपलं
अदलाबदलीमधें गुंतली दोन खुळी पाखरं !
तुझं कबुतर झालं जरा घाबरं
माझं मन थरथरतंय बावरं
गोड भीतिनं दोन पाखरां भरलं रे कापरं !
मी कोमल हाताने कुरवाळित पाखरू
तू अंतर माझे नको गडे कुस्करू
लाडिगोडिचा सौदा पटला पहिल्या मुहूर्तावर !

परंतु ही मात्र पहिलीसारखीच किंबहुना तिच्याहूनही मोकळी, सरळ. हिचा सरळपणा इतका की ही आपला निलाजरेपणादेखील सांगून टाकणारी, मोकळी होणारी, उतावीळ –

कसे करू बाई मन आवरेना
लाभ घडेना लोभ सरेना !
तुम्ही शुक्र स्वामी दिसता विरागी
तुम्हा पाहिलिया प्रीत होई जागी
भाव बहरासी येता भान उरेना !
सुटे पावसाचा वारा मेघ झाले गोळा
नाव नाही ऐसे काही जसे तुझ्या डोळा
थेंब चातकाच्या तोंडी झरता झरेना !
लाज आज ल्याली राया निलाजरी साडी

तना मना लागे आता तुझी मात्र गोडी
रूपाविना तुझिया कोठे पापणी ठरेना !

मात्र ही लावण्यवती जरा तिरकस रूपकाच्या भाषेत बोलणारी, –

आला चमकत बिजली जसा
माझ्या जाळ्यात गावला मासा !

आणि हिला आपल्या रूपाचा कर्तबगारीचा विश्वास तरी केवढा ! ही म्हणते –

उद्या येनार नटुनीथटुनी
जशी जलातली जलरानी
थाट रूपाचा माझ्या बघुनी
जाळ्यावांचून गुंतला मासा !

पण ही काहीच नाही, अशी ही दुसरी रूपगर्विता. भलतीच फटकळ. म्हणते कशी–

चिचा आल्यात पाडाला
हात नको लावूस झाडाला
माझ्या झाडाला !
माझ्या कवाच आलंय ध्यानी
तुझ्या तोंडाला सुटलंय पाणी
काय बघतोस राहून आडाला ?
मी झाडाची राखणवाली
फिरविते नजर वरखाली
फळ आंबुस येइल गोडाला !
माझ्या नजरेत गोफण खडा
पुढंपुढं येसी मुर्दाडा
काय म्हणू तुझ्या येडाला ?

ही आणखी एक रूपगर्विता तर आहेच आहे, पण तेवढीच खट्याळ देखील आहे. शिकाऱ्याची रग आणि धग तिच्या व्यक्तित्वात दिसते. कशी, ते तिच्याच रगेल भाषेत पाहा. ती म्हणते–

माझ्या नथीच्या आकड्यामधी गुंतली तुझी बाही
सुटका आता नाही !

ज्याचा त्यालाच पडला फांसा
कसा गळास लागला मासा
आरपार रुते अणकुची, तल्खली होई !

दुरदुरून पोहत होता
कसा हातास आला आता
विसरला पार सुरकांडी, लटकुनी ग राही !
कल्ले हलवित हलतो बायां
तुला वाळूत फेकीन राया
पाण्यातुनी येई बाहेरी, मजा, तरी पाही !
दिस सोन्याचा दिसतो ग बाई
झाली शिकार बसल्या ठायी
शिकाऱ्याच्या बसुन मनगटी पाखरूच गाई !

'माझ्या रंगात तुझी साउली, तुझ्या डोळचात मी बाहुली !'–असे सांगणारी माडगूळकरी आत्ममग्ना लावण्यवती काही औरच आहे ! मधाच्या कैफाशी आपल्या रूपाने होड देणारी ही आपल्या नाथालाच सरळ विचारते–

पावसात मी भिजले नाथा, गाल निथळती जळी
ओठांनी ते टिपा नि सांगा शराब का वेगळी !
तो कैफ उतरतो एका घटकेमधी
या धुंदपणाला उतार नाही कधी
लक्ष्मीनंतर मध भावले क्षीरसागरातळी !

परंतु या आत्ममग्नेला आत्मस्थितीचीही जाण आहे. म्हणून ती पुढे म्हणते–

संपला बोलांच्या फुलवरा
होता तितुका वाहुन पुजिले प्रीतीच्या शंकरा !
मज म्हणा आपुली किंवा टाका दुरी
मी छाया होउनि फिरेन मागावरी
रानात असा वा बसा सुखाने घरी
धरी मस्तकी किंवा प्रीती पायदळी अंथरा !

माडगूळकरी लावणीतल्या विरहिणींची तगमगदेखील अस्वस्थ करणारीच आहे. पतीच्या वाटेकडे डोळे लावून बसलेली ही विप्रलब्धा आपली तळमळ अशी व्यक्त करीत आहे–

उठउठुनी रातीची रडते
तळमळत पलंगी पडते
माझ्या संगती जळती समया
मी जागी निजता दुनिया !
कुठे असाल, कधी याल, जवळी घ्याल ?
तुम्ही माझे, माझे हो रंगलाल !

चैत्र-वैशाख नाही कळला
माझा दिमाख फुलुनि जळला
आखाडात बरसले ढग
उलघाल माझी तगमग !
किती कराल माझे हाल, सुकलं गाल !

भादव्यात आल्या हो गौरी
मी निराश तुमची नवरी
दसरा दिवाळी आली गेली
का हो पातळ माया केली ?
झाली कमाल, गेले साल कधी याल ?

मार्गेसर मार्गी लागला
थंडीचा कडाका पडला
भर पुसात मी एकली !
उसळते आस झाकली !
कधि दिसाल, कधि याल, विडा घ्याल ?
तुम्ही माझे, माझे हो रंगलाल !

तशीच ही आणखी एक विरहिणी. चंदनाच्या चोळीवरून ज्ञानदेवांच्या विराणीची आठवण करून देणारी. प्रियतमाच्या विरहाने बिचारीची काय आणि कशी दशा झाली आहे, पाहा तरी ! ती सांगते आहे–

चंदनाची चोळी माझे अंग अंग जाळी
सरेना की ग बाई, रजनी काळी काळी !
दिलेल्या वचनांची प्रीतीला स्मृति नाही
एकांती काकुडली कितीदा येऊ बाई ?
विरही करपते देहाची चाफेकळी !
पहाटवाऱ्यासंगे येईल का रे हाक ?
होईल का रे खरी दिलेली आणभाक ?
थांबेल दाह माझा कोणत्या लाभवेळी ?
नसू दे शुक्रतारा, दिसू दे तुझे मुख
तापल्या जीवावरी घेऊ दे हिमसेक
माझ्याच आसवांच्या होतील मुंडावळी !

आणखी ह्या एकीची दशा तर फारच केविलवाणी ! विरहाच्या व्याकुळतेने ही इतकी उदास, निराश झाली आहे की जिवाचा सखा देखील हिला वैऱ्यासारखा

वाटू लागला ! या विरही–दाह–छळातून सुटका व्हावी म्हणून बिचारी वादळवाऱ्याला आपली प्राणज्योत मालवून टाकण्याची विनवणी करीत आहे. आपली असहाय्य स्थिती सांगताना ही प्रोषितभर्तृका म्हणते–

चांद उगवला, नाही आला माझा प्राणसखा
तळमळे जीव गडे सारखा !
वाळ्याचा हा पडदा ओला
चंद्रकरांनी किती तापला
झळा लागती सर्वांगाला
शय्येवरचा गुलाब टोचे मज काट्यासारखा !
माझी मी तर आधी व्याकुळ
दुष्ट चांदणे जाळी घरकुल
अजुन न वाजे की तव पाउल
सखा जीवाचा आज कसा हो मज वैऱ्यासारखा !
वादळवाऱ्या, तू तरि येई
मालवुनी जा इथली समई
मालव तारा, चंद्रकोर ही
मालव माझी प्राणज्योत ही, ये देवासारखा !

ह्या आणखी एका व्याकुळहृदयेची अवस्था थोडी वेगळी आहे. हिचा बहारीचा बादशहा आलेला आहे. पण त्याला कसली चिंता लागून राहिली आहे कुणास ठाऊक ? त्याला घडीभर बसायलाही वेळ नाही, इतकी कसली घाई आहे कुणास ठाऊक! एक वेळ सजण आला नाही तरी प्रतीक्षेत, तळमळीत रात्र जाईल, पण इथे त्याने येऊन असे लगेच जाणे म्हणजे केवढी घोर निराशा ! बिचारी दीनवाणी बनली आहे. अर्ज–विनंती करीत आहे. लग्नाची अस्तुरी करते तशी चाकरी करीन म्हणून शब्द देत आहे–

गुलजार चांद तुम्ही, मी चांदनी नव्हं का
घ्या मौज चांदण्याची सरदार अर्ज ऐका !–
आला नाही तोवर तुम्ही जातो म्हणता का ?
बारा महिनं पडल चांदनं तुम्ही राहिल्यावरी
पुनव रोजची होइल राया, नांदा माझ्या घरी
मी करीन चाकरी तुमची जैसी लग्नाची अस्तुरी !
का हो ऐकत नाही का ?
राया हासत नाही का ?

आला नाही तोवर तुम्ही जातो म्हणता का ?
माझ्या संगं करा संगती, रंगवु या जिंदगी
बहारीच्या बादशहा घ्या लाखवार बंदगी
घ्या विडा जुळविला प्रीतीची वानगी
का हो बोलत नाही का ?
राया हासत नाही का ?
आला नाही तोवर तुम्ही जातो म्हणता का ?

या विरहिणींची व्याकुळता वेगळी, तर ह्या मुग्धेची दैना आगळी ! ही मोठी नखरेल, धीट, अहंमन्य, पण कोणा एकाच्या नजरेशी नजर भिडली आणि हिची स्वतःवरचीच सत्ता गेली. तीच आपली चित्तरकथा सांगत आहे–

एका पायावर भार देवुनी अश्शी उभी राहिले
नजरेशी नजर भिडली...आणि खाली मी पाहिले !
काय सांगू आता ?–
झाली चित्तरकथा !

नाही सोसली नेटकी नजर
खांद्यावरून गळला पदर !
त्याला आवरिता
झाली चित्तरकथा !

चहू बाजूच्या लपल्या वाटा
साऱ्या शरीरी भरला काटा !
मान उंचाविता–
झाली चित्तरकथा !

पायाखाली ठरेना जागा
नखे काढती भुईवरती रेघा
केतकी भुलली ग नागा !
अशी उलटी कथा–
झाली चित्तरकथा !

कधी नाही लाजले कुणा
आज तोऱ्याचा लवला फणा
माझ्या नखऱ्याचा मोडला कणा !
माझी गेली सत्ता–
झाली चित्तरकथा !

ह्या दुसरीची चित्तरकथा काही झालेली नाही, पण ही मस्तानी भर दरबारी उरी घाव लागून घायाळ मात्र झालेली आहे. ह्या चळलेल्या परप्रांतीय नारीला आता या मराठ्या मर्दुमकीपुढं आपला निभाव लागणार नाही हे कळून चुकले आहे. म्हणून ती त्या बाजीरावाकडे विनवणी करीर सरळ डेरेदाखलच झाली आहे. या बाजीरावानेही तिच्या प्रीतीची कदर करून या अनोढेची खास तैनात ठेवली आहे. तीच सांगते आहे–

माझ्यासाठी दिली राहुटी, इतरांना मज्जाव
तुम्हि माझे बाजिराव !
मी मस्तानी हिंदुस्तानी बुंदेली पेहराव
झिरझिरवाणी निळी ओढणी, वाळ्याचा शिडकाव
तुम्ही मराठे नव्हे छाकटे, अगदी सरळ स्वभाव
शूर शिपाई तुमची द्वाही, चारी मुलखी नाव
उभी अंगलट तांबुस फिक्कट, नयनि दाटला भाव
बोलावांचुन घ्या जी वाचुन अर्जी आविर्भाव
काल दुपारी भर दरबारी उरी लागला घाव
या पायांशी मज दासीसी मिळेल का कधि वाव ?
दिठी दिठीचा नजर मिठीचा होऊ द्याच सराव
मीपण कळले, तुम्हा भाळले, आता नाहि निभाव !

पण हिच्याच सारख्या सगळ्या समजूतदार, सरळ, सोज्वळ थोड्याच असतात ! बाजी उलटवणाऱ्या आणि डाव जिंकणाऱ्याही काही जबर महत्त्वाकांक्षिणी असतातच. त्यासाठी त्या कट, कारस्थाने, कावा असल्या प्रकारातही निष्णात असतात. त्यांपैकीच ही एक अधमा. म्हणते आहे–

हुकुमाची राणी माझी
राया, मी डाव जिंकला !
लागला रंग तुम्हाला, साधले डाव दोन
कैफात गुंग होता राहिले नाही भान
बायकी कावा माझा
राखून पत्ता ठेवला !
उतारी करा आता, चवऱ्या दुऱ्या टाका
आताच मारला ना बदामी माझा एक्का ?
कटाप रंग सावे
हुकूम हाती राहिला !

मघाचा डाव कसा ध्यानात नाही आला
हातात राणी माझ्या, गुलाम सर केला
तुम्ही गुलाम सर केला !
उलटली बाजी आता
राणीनं राजा मारला !

हिनं तर एवढाच कावा केला नि हुकुमाच्या राणीनं राजा मारला. पण ही जनावरांच्याच जगात वावरणारी उद्दाम, आढ्यतेखोर, काहीशी हिंस्र, पारध करणाऱ्या व्याधवृत्तीची उद्धता. हिची भाषाच बघा कशी आहे ! ती म्हणते–

अशी मारीन तीर, डोळा तिरपा करून
कैक जातिल भरून अन् येतील फिरून !
हे तरुणपणाचं बन
माझी मीच त्यास राखण
ऐटीत ठाकले उभी, बिनधोक धिटावा धरून !
माझ्या मनात बनात असतिल ससे
त्यांना शिवारी शिवतिल कसे ?
लांडग्यांना लोळविन पायी, खोट्या हसण्याचा फांसा करून !
अंतरंगी फुले केवडा
नाग येऊन देतिल वेढा
काटे-बरचीनं चेचिन फणा, नेम अचूक साधिन दुरून !
माझ्या ओठिं मधाचा कंद
कुणि घेतिल त्याचा छंद
बोल डसतिल चिडून त्याला, नांगी नांगी विखाने भरून !
हे जनावरांचे जग
हर एकाची जिरविन रग
येण्याआधीच पाजीन पाणी, नथणीचा आडोसा करून !

परंतु सुदैवानं या अशा थोडक्याच; नाही म्हटलं तरी या उद्दामपणातही एक न्यारी लावण्यछटा असतेच. जशी ती खडचाळ–खोडकरपणात असते, निर्भीड, वस्तादपणात देखील असते. हा नमुनाच बघा–

नको नदीवर भेटू
नको रस्त्यामधी गाठू
नको असे पाय चाटू
नको अंग अंगा खेटू

नको करूस माझ्याशी सलगी
सरपंचाची मी रे मुलगी
धर थोडीशी अक्कल
काढ बाजूला सायकल
कुणी बघंल ऐकंल
वाळल्या गवतात पडंल ठिणगी !
सरपंचाची मी रे मुलगी !

व्यक्ती तितक्या प्रकृती; तशाच या लावण्यवती. कुणी नरम तर कुणी गरम. कुणी उद्धट तर कुणी सोज्वळ, कुणी मोकळ्या तर कुणी आतल्या गाठीच्या, कुणी झगमगत्या तर कुणी तगमगत्या, कुणी चढेल तर कुणी पडेल, कुणी हौशी-नखरेल, तर कुणी आर्जवी-आदबशीर, कुणी सुलभ-सरळ बोलणाऱ्या, तर कुणी द्व्यर्थी भाषेचा-रूपकांचा आश्रय करणाऱ्या, कुणी अनघड तर कुणी वस्ताद, कुणी खटचाळ तर कुणी मवाळ,-नाना तऱ्हा ! नाना परी ! आणि गदिमांनी यांची अक्षर-चित्रे रेखली आहेत तीही किती रंगतरंगांनी आणि विलोल विभ्रमांनी !

लावणीतली लावण्यवती जशी असावी, तशीच ती माडगूळकरी लावणीत भेटते. कधी ती 'बुलंद दिसते तुझी इमारत, ठीक चिऱ्यावर चिरा' अशा रांगड्या सातारी तऱ्हेत दिसते, तर कधी 'डुइवर घागर, हाती कळशी' अशा थाटात चढणीची वाट चढताना आढळते. कुणाच्या 'गालांवरती रसरस करती मुरमाच्या पुटकुळ्या, चुरडल्या ओठांच्या पाकळ्या', तर कुणाचा ' शब्द झाला महाग आली ज्वानीला जाग', कुणी तरी म्हणते आहे, ' भज उचकी लागे गाताना सारखी, वरखाली होतसे हृदयाची पालखी ', तर कुणी सांगते आहे, 'ये, पिऊन घेऊ प्रीतीची ओंजळ, इष्काच्या कैफात गात या ओघ नदीचा तरू !' कधी ' छबीदार नार गुलजार चालली नटून' अशा थाटात आणि ' ही कंबर हालवी शंभर जागी लवुन' अशा डौलात भेटते, तर कधी ' न्हाऊन उभी गं राहून उदविशी केस ' अशी सागरजळातून लक्ष्मी वर यावी तशा स्वरूपात नजरेला पडते. कुणी ' डाव्या डोळ्याचा ऐना ' करून मोहनाचे रूप साठवण्याच्या प्रयत्नात दिसते, तर कुणी सजणीच्या 'डोळ्याचं पडलं चांदणं पाहून सात जन्माचं रिणं फिटल्यागत तृप्त होताना आढळतो. कुणी ' मुरकी मारून गिरकी'सारखी जाताना दृष्टीस पडते, तर कुणी ' उकलून ओढ डाळिंबी ' अशा राजसवाण्या छबीत नजरेत भरते...माडगूळकरी लावणीतल्या लावण्यवतींचे असे नाना रंग-नाना ढंग पाहून थक्क, चकित व्हावे ! माडगूळकरांच्या बहुप्रसव, अष्टपैलू समर्थ लेखणीचे किती गुण गावे !!

८

# माडगूळकरी लावणीतील वैविध्य

लावणी म्हटली की रसराज शृंगारानं ती नटलेली असणार, अशी सर्व-सामान्यपणे कल्पना असते. मराठीतल्या लावणी-वाङ्मयात अशा शृंगारिक लावण्याचे प्रमाण पुष्कळच आहे. बहुतेक शाहिरांनी शृंगारिक लावणी लिहिलेली आहे. परंतु शृंगारिक लावणी–रचनेबरोबरच शाहिरांनी अन्य विविध प्रकारच्या लावण्याही रचलेल्या आहेत. या प्रकारात आध्यात्मिक, भेदिक, कूटात्मक जशा लावण्या आहेत, तशाच उपदेशपर, वैराग्यपर आणि कथनपर अशाही लावण्या आहेत. काही लावण्यांमधून तर देवतावर्णन, तीर्थवर्णन, स्थलवर्णन, गुरुमाहात्म्य, व्यक्तिमहात्म्य, उपहास-विनोद, संघर्ष, आदी विषयही आलेले आहेत. 'भला जन्म हा तुला लाभला...' ही राम जोशींची आणि 'लंडे गुंडे हिरसे तट्टू हचांची संगत धरूं नको। नरदेहासी येऊन प्राण्या दुष्ट वासना धरूं नको' ही अनंत फंदींची उपदेश-पर लावणी प्रसिद्धच आहे. अनंत फंदींच्या या लावणीला 'फटका' म्हणून ओळखले जाते.

तीर्थक्षेत्राचे वर्णन करणाऱ्या लावण्या राम जोशी, प्रभाकर आदी शाहिरांनी लिहिलेल्या आहेत. राम जोशींनी तुळजापूर, बार्शीचा भगवंत यावर, तर प्रभाकराने पंढरीचे व काशीक्षेत्राचे वर्णन करणाऱ्या लावण्या लिहिलेल्या आहेत. अन्य शाहीरांनी देखील अशा क्षेत्र व स्थल-वर्णनाच्या लावण्या लिहिलेल्या आहेत. पठ्ठे बापूरावांच्या मुंबई-पुण्यावरील लावण्या सुप्रसिद्धच आहेत.

या परंपरेला अनुसरून गदिमांनी सुद्धा क्षेत्र आणि देवतावर्णनपर लावण्या रचलेल्या आहेत. महाराष्ट्रातील बहुजनसमाजाचे दैवत म्हणजे जेजुरीचा खंडोबा!

गदिमांनी जेजुरी या क्षेत्रावर आणि तिथल्या खंडेरायावरही लावणी–रचना केलेली आहे. 'मल्हारी मार्तंड' या चित्रपटात जेजुरी क्षेत्राचे माहात्म्य सांगणारी त्यांची लावणी अशी आहे :

दक्षिण देशी कऱ्हा नदीच्या किनारी
टुमदार दिसे वसलेले नगर जेजुरी
तिथं कडेपठारा शेजारी डोंगरावरी
सदानंद सांब नांदतो देव मल्हारी
मल्हारी हो मल्हारी...
(सदानंदाचा येळकोट येळकोट येळकोट ..जय मल्हार !)
येळकोट येळकोट बोलत वरचेवरी
भक्तजन चढती गड नवलाख पायरी
भंडारा खोबरे उधळण करिता दारी
चिरेबंदी दिसे मंदिर, कळस सोनेरी
मल्हारी हो मल्हारी
खंडोबा देव नवसाला पावतो
संकटी धावतो कौतुका दावतो
चुकार मेंढरा, वाटेला लावतो
खंडोबा देव नवसाला पावतो
देवाचे भगत सोन्यानं न्हाती
नवसाची लेकरं देवाला वाहती
वाघ्या मुरळी म्हणून त्यांचा जन्मभरी संचार
खंडोबाचे नांव घुमविती जगती जय मल्हार
जय मल्हार ! जय मल्हार! ...
वाघ्या देतो हरळी ग नाचू लागते मुरळी ग
वाघ्याची दिमडी मुरळीची घाटी
वाज वाजते देवासाठी
जत्रा जमते सगळी ग, जय मल्हार !

'छोटा जवान' या चित्रपटात गदिमांनी जेजुरी आणि मल्हारी यांची महती गाणारी लावणी द्वंद्वगीतासारखी संवादात्मक रचलेली आहे. वाघ्या, मुरळी, सूत्रधार, साधू आणि मल्हारी देवाचे भक्तजण–कोरस–अशा पात्रांच्या तोंडून ही लावणी अशारीतीने साकार होते :

वाघ्या-जेजुरीसम पुण्यक्षेत्र या नाही धरणीवरी
अन् इथे नांदतो सदानंद हर उंच डोंगरी, गडावरी

येळकोट येळकोट जय मल्हार, मल्हारी देव मल्हारी
देवगणांचा सेनापती जो मणिमल्लांचा नाश करी
अन् कऱ्हा नदीकिनारी तोच राहिला होऊन साधा संसारी

कोरस–मल्हारी देव मल्हारी

मुरळी–सदैव जागा खंडेराया भक्तजनांचा कैवारी
सती म्हाळसा असुनी कांता बाणाईशी प्रीत करी

कोरस–मल्हारी देव मल्हारी
काय गडाचे वैभव सांगू दुसरी इंद्रपुरी
गड सोन्याचा, चढ सोन्याचा सोन्याची ही जेजुरी

कोरव–मल्हारी देव मल्हारी
मार्गेसरी ग भरते जत्रा उत्सव होतो परोपरी
देवासाठी भक्त रांधती भरीत–रोडगा घरोघरी

कोरस–मल्हारी देव मल्हारी

वाघ्या–निघे पालखी मार्तंडाची आभाळ ढाळी वर चवरी
'येळकोट घे खंडेराया,' भक्त गर्जति उंच स्वरी

सूत्रधार–अशीच एकदा निघाली होती स्वारी देवाची
गंगा तिथं वाहात होती भक्तीभावाची
वाघ्या मुरळी गाती गाणी खंडेरायाची

वाघ्या–कुणी भंडारा उधळुन देई
कोणी देवास दवणा वाही
झांज घंटांची उठली घाई

मुरळी–लाखो भक्तांची झाली दाटी ग
पोरं हुडकती खोबऱ्याची वाटी

कोरस–मल्हारी देव मल्हारी

सूत्रधार–गडावर चालला होता असा आनंद
पुरा उमलून आला एकेका काळजाचा कंद
जो तो झाला होता त्या सुगंधाने धुंद

वाघ्या–झाली अवचित समाधी भंग
आला दिल्लीपती नवरंग अ
सेना घेऊनिया चतुरंग
त्याने गडाला घातला वेढा हो

काय प्रसंग म्हणवा वेडा
दीन दीन शब्द एकाएकी उठला
कोणास कळेना हल्ला आला कोठला
जो तो नाकापुढे पळत सुटला
आल्या बादशाही फौजा चढून
मारा अवचित मागून-पुढून
कुठे बसणार सारे दडून
देवमंदिरी शिरला वैरी
असून पालखीत श्रीमल्हारी
कोरस-देवाच्या देवळातला रत्नांचा ठेवा
लुटून आपुल्या खजिन्यात न्यावा
असा होता त्या बादशहाचा कावा
मुरळी-बघून तलवारी बरच्या भाले
भक्त देवाचे भलते भ्याले
असे कसे हे अघटित झाले ?
कोरस-वाघ्या-मुरळ्यांनी मारल्या हाका
'आता खंडोबा अब्रू राखा !'
सूत्रधार-ऐका भक्तांच्या हाकेसाठी
देव धावला कसा उठाउठी
एक खिडार उपजलं भिताडापोटी
मुरळी-थवे भुंग्यांचे उसळून आले
त्यांनी फौजांना जर्जर केले
झाले बोथट बरची भाले
फौज बादशाची लागली पळू
भुंगा सोडीना उसळी जळू
बादशहाचे सैनिक भ्याले
वाघ्या-'तोबा तोबा' करत पळाले
पळता पळता कितितरी मेले
सूत्रधार-असा आहे प्रभाव माझ्या देवाचा
अन् माझ्या जेजुरीच्या खंडेरायाचा
करा गजर त्याच्या नावाचा
कोरस-सदानंदाचा येळकोट
येळकोट येळकोट जय मल्हार

कोरस–देव या देशाचा रक्षिता
कोण जिंकील रे भारता !

बालगंधर्व रंगमंदिराच्या उद्‌घाटनप्रसंगी पुण्याची प्रशस्ती गाणारी एक लावणी गदिमांनी रचली होती. ही लावणी त्या प्रसंगी गायलीही गेली होती.

पठ्ठे बापूराव यांनी रचलेली पुण्याची लावणी पूर्वीच्या तमाशाच्या फडा-मधून लोकप्रिय ठरलेली होती :

कसबा पेठ देतो गहाण । नारायण पेठ तारण गहाण ।
वेताळ पेठेवरती देतो दस्त नवा–
पाहून तुझी हूल । नारी, मोठी झाली भूल ।
तुला देतो लकडीपूल । तिथं चांगली हवा–

असं पुणे शहरामधल्या पेठांचं, हवेचं आणि सुधारणांचं मिष्किलपणानं वर्णन करणारी पठ्ठे बापूरावांची लावणी आहे.

त्यानंतर 'पुढारी पाहिजे' नावाच्या लोकनाट्यात पु. ल. देशपांडे यांनीही पुण्याचं खुमासदार वर्णन करणारी फक्कड लावणी लिहिलेली आहे :

उभ्या जगात झालिया कीर्ती रं
शहर पुन्याची निराळी धर्ती ॥ धृ ॥
देवदेवतांची झाली दाटी । भांग्या मारुती, उंबऱ्या गणपती ।
जिलब्या, पत्र्या, सोन्या मारुती । बायक्या इष्णूची करत्यात भक्ती ।
मुरलीधराला खुन्या मानती । इठोबालाहि उपाशि ठेवती ।
गावाबाहिर नेली पर्वती ।
जिथं देवाची झालिया दैना। तथ मानसाची नाही हो गणना ।
मुलखावेगळी शहराची रीती रं, शहर पुन्याची निराळी धर्ती ॥१॥

गदिमांनी रचलेल्या 'असे आमुचे पुणे' नामक लावणीत शिवकालापासूनचे पण चित्रित झालेले आहे. पेशवाई, आंग्लाई, फुले, टिळक, गोखले यांचा राज-कीय, सामाजिक काळ आणि साहित्य, कला आदी क्षेत्रांतील बालगंधर्वांपर्यंतचा काळ धावत्या, ओघवत्या भाषेत फारच उत्कृष्टपणाने या लावणीत आलेला आहे. आणि शहर पुणे हे कसल्याच बाबतीत उणे नाही, हे मोठ्या अभिमानाने या माण-देशी शाहिराने सांगितले आहे :

विद्या, उद्यम, कला, संस्कृती इथें न कांहीं उणे
उभ्या भारता भूषण व्हावें असें आमुचें पुणें

हल सोन्याचा करवुन घेउन स्वामिनिष्ठ हातें
दादाजींनी गांवठाण हें नांगरलें होतें
दिव्यत्वाची निपज होतसे येथें सहजपणें

लालमहालीं इथें नांदली माय जिजाबाई
पहिले वहिले खेळ खेळली येथें शिवशाही
इथल्या मातीमधुन चालली शिववांची चरणें

इथेंच तुटलीं परसत्तेचीं पहिल्यांदा बोटें
स्वातंत्र्याची पहाट येथें शिवनयना भेटे
इथेंच चढली अंधारावर तेजोमय तोरणें

उदया आले इथें पेशवे बाळाजी, बाजी
इथुन उत्तरेकडे दौडले उमदे रणगाजी
रणमर्दांनीं इथल्या जितलीं असंख्य समरांगणें

ओलांडुनिया अटक निसटलीं सेनेची घोडीं
सेनानायक तर परक्यांचे सिंहासन फोडी
पराक्रमास्तव जन्म येथले, मानास्तव मरणें

अक्षय ठेवुन नाम शेवटीं गेले निजधामीं
स्फुरण देति ते अजुन आपणां रयतेचे 'स्वामी'
रमा–माधव यांची पूजी जनमन वृंदावनें

देहांताची सजा ठोठवी राजवंशियाला
या नगरीतच न्यायाधिश तो होउनिया गेला
पुण्यात घडल्या कथा, लाभली इतिहासा भूषणें

स्वातंत्र्याचा सूर्य येथल्या उदयाचलिं आला
पेशवाईसह इथेंच वाटे अस्तंगत झाला
चिरंतनाला कुठुन परी ही मर्त्याचीं लक्षणें

'स्वराज्य हा तर आहे माझा जन्मसिद्ध हक्क'
तडिल्लतेसम तिलकवैखरी चमचमली लख्ख
गर्जुं लागला उग्र केसरी, घुमली रानें–वनें

पुन: पुण्यातच वाढिस पडल्या बिजलीच्या वेली
स्वातंत्र्याची पुन्हा उठावण पुण्यांतुनी झाली
राजकारणासहचि भराला आली जन–कारणें

जिकडे तिकडे मुक्त लागले तेजतत्त्व नाचूं
अगणितांतल्या किती कणां मी वाणीनें वेचूं ?
प्रगत दिशेला वाहुं लागले वारे अभयपणें
टिळक, गोखले, फुले किती मीं नामांतें घेऊं
युगच मोहरे युगंधरांचे कितींजणां गाऊं ?
कालाचेही दिपले डोळे, फिटलें जणुं पारणें
साहित्यादिक कला उमलल्या फुले ध्येयनिष्ठा
नक्षत्रांसम चमकुं लागला नवा नवा सृष्टा
नवी अस्मिता उजळुं लागली आळसलेलें जिणें
त्याच संधिला कुणा अनामिक रसिकाची हौस
टिळकांपुढती ठेवि बोलका एक राजहंस
राजहंस तो नेत्यासन्मुख गीत मनोहर म्हणे
देवदत्त तो साद मनोहर ऐकुनिया कानीं
बाल गायका अमोल पदवी दिधली टिळकांनीं
शिरोधार्य तें दान मानिलें इवल्या नारायणें
तो तोच बालगंधर्व
जाणिती सर्व
वाढला पुढती
यशसिद्धि राहिली त्याचि सदोदित चढती
वाढला बालगंधर्व युगंधर झाला
वर्षाव प्रीतिचा रसिकजनांनी केला
सन्मान असा ना मिळतो सम्राटाला
मंत्रमुग्ध जन होत राहिले त्याच्या मधुगायनें
जन्म पावली पुण्यांत पदवी सत्यत्वा गेली
गंधर्वाची स्मृती पुण्याची धनदौलत झाली
उभी राहिली वास्तू धन ते रक्षाया कारणें
नवल अलौकिक ! स्वयें लाडक्या गंधर्वाहातीं
कोनशिला या शुभवास्तूची स्थापियली होती
नगरजनांनी आतां इजसी, जपणें सांभाळणें

महाराष्ट्रात काही कुळांत 'गोंधळ' नामक कुळधर्म शुभकार्यानंतर पाळण्याची प्रथा आहे. जगदंबेचे गोंधळी हा गोंधळ घालत असतात. गोंधळी ही एक जमातच आहे. गोंधळ–जागर रात्रभर चालतो. संबळ, तुणतुणे, दिमडी, झांज अशा वाद्यांच्या

तालावर प्रमुख गोंधळी, याला नाईक म्हणतात, एखादे आख्यान लावीत असतो. हे आख्यान बहुधा पौराणिक कथेवर आधारलेले असते. नाईक गाता गाता अधूनमधून नकलाही करीत असतो. त्यामुळे गोंधळाचा नाट्याभिनयाशी संबंध येतो.

गोंधळातही आख्यानाच्या आधी नाईक गण म्हणतो. 'गोंधळ' या शब्दाची व्युत्पत्ती, गण + दल-गण गाणारे जे दल तो, म्हणजे गोंधळ-अशी लावली जाते. गणानंतर जगदंबेचे स्तवन होते आणि त्यानंतर गोंधळाला येण्यासाठी अन्य देवदेवतांना पाचारण केले जाते :

मोरेश्वरा गणा गोंधळा ये,
तेहेत्तीस कोटी देवा गोंधळा ये
वाईच्या गणपति गोंधळा ये
कृष्णा कोयना गोंधळा ये
कोल्हापूर लक्ष्मी गोंधळा ये
तुळजापुरची भवानी गोंधळा ये
जुन्नरचे शिवाबाई गोंधळा ये...

अशा गोंधळ घालणाऱ्या गोंधळ्यांचेच एक गीत गदिमांनी लिहिलेले आहे. 'शोधा म्हणजे सापडेल' या चित्रपटातील गोंधळ-गीतात, 'अंबाबाईच्या कृपेने एक आगळी शक्ती आम्हाला लाभलेली आहे, मूळ मायेची मुळी आम्हाला गवसली आहे,' असे नाईक सांगतो आणि गोंधळाला दैवी पातळीवर नेतो. गदिमांचे हे गोंधळगीत असे आहे :

गोंधळी— आम्ही देवा, अंबेचे गोंधळी
नाचतो अवघ्या भू-मंडळी !
उदे ग अंबे, उदे ! उदे ग अंबे, उदे !
होऊ दे सर्व दिशी मंडळ
झडवितो रात्रंदिन संबळ ऽऽ उदे ! उदे ! उदे !
फुलवितो दिवटी दीपकळी
आम्ही अंबेचे गोंधळी ।।
घरोघरी हिंडतो न् गोंधळ आईचा मांडतो
भवानी, भवानी, भवानी बसली ओठी गळी
आम्ही अंबेचे गोंधळी
आम्ही अंबेचे गोंधळी ।।
सान थोर नेणतो आम्ही दैवाशी जाणतो
गावली, गावली, गावली मूळ मायेची मुळी
आम्ही अंबेचे गोंधळी ।।

एक–दैव जाणतोय !

गोंधळी–दैव जाणतो, दादा जाणतो
एक–सांग, मग याला पगार किती ?
गोंधळी–सांगतो, सांगतो, चार इसावर दहा–
शिरावर पोरं पोरी सहा–
दुसरा– तुला रं कसं कळलं ?
गोंधळी–आता कसं कळलं ?
आम्हाला शक्ती जगाआगळी
आम्ही अंबेचे गोंधळी ।।
तिसरा–यांचं चाललंय कसं, सांग बरं !
गोंधळी– सांगतो, सांगतो, उदे ! उदे ! उदे !
इमाने करितो हा चाकरी
दुवेळी खातो मीठ-भाकरी
निजेला पांघरतो कांबळी, आम्ही देवाचे गोंधळी ।।

गदिमांनी विपुल अभंगरचना केलेली असली तरी शाहिरी धाटणीनं देखील देवता-वर्णन केलेलं आहे. 'मु. पो. ढेबेवाडी' नामक चित्रपटात जगदंबेची स्तुती केलेली आहे. या कवनात गदिमांची काव्यप्रतिभा कशी फुलून आलेली दिसते :

चांदणं काय पुनवेचं नेसली
ग माय माझी हंसावर बैसली
आईच्या ढवळचां कांतीमुळे
दिवाळी बहुदिशी पाजळे ।
सारजा सभांगणी हासली ।।

उचलता आशीर्वादा कर
आईच्या वीणा मांडीवर
प-सा-सा-प-ध–नि–सा बोलली ।।

आता काय रसरंगाला उणं
लागलं बोलाया तुणतुणं
ढोलकी बिजलीगत वाजली ।।

पुढं या भिऊ नका रं कुणी
भिजूं द्या रंगानं लावणी
घुंगरं माझी उल्लासली ।।

'संत जनाबाई' नामक चित्रपटात 'पंढरीचा देव चांगला–' अशा तोंडाचं

स्तवन गदिमांनी लिहिलेलं आहे. पंढरीचा पांडुरंग म्हणजे विष्णू, आणि राम व कृष्ण हे विष्णूचेच अवतार, या कल्पनेचे तथाकथित शास्त्रीय भाषेत जडजंबाल विवेचन न करताही भोळ्याभाबड्या खेडूत माणसाची देवाच्या ठिकाणी एकत्व पाहण्याची दृष्टी अत्यंत सुलभरीतीनं लीलाचमत्कारांच्या दाखल्यानं व्यक्त केली आहे. गदिमांचा हा पंढरीचा देव पहाच :

पंढरीचा देव चांगला–
पुंडलिकाच्या भेटीसाठी इटंवरी थांबला !
शिवद्येवाचा ह्येनं मोडला सहजी तिरकामठा
जनकाच्या वाड्यात दाविला चिमत्कार मोठा
सीताराणी जितली ह्येनं, बळि रावन मारिला

यमुनेकांठी ह्येनं राखिल्या हौसेनं गाई
गोपाळांची शिळी शिदुरी आवडिनं खाई
कौंस मारुनी गांव सोन्याचा समिंदरी थाटिला ।

हांक मारितां हरी घालितो भक्तासाठी उडी
तिन्ही जगांचा राव इठोबा दुबळ्यांचा सौंगडी
सुमरण करितां ह्याचें, मेळा पापांचा पांगला !

'गुरुकिल्ली' चित्रपटात गदिमांनी सद्‌गुरूंची महती गायिलेली आहे. 'गुरुबिन कौन बताये वाट' याचा गदिमांनी सरळ–सुलभ 'गुरुविण कोण दाखविल वाट' असा झक्क अनुवाद केलेला आहे. गुरूची महती गाताना मानवी जीवन कसे क्षणभंगुर आहे, आयुष्याची वाटचाल किती दुर्गम आहे, आणि मनुष्यप्राणी कसा असहाय्य आहे, याचे विवेचन अत्यंत सुलभरीतीने दृष्टान्त–दाखले देऊन गदिमांनी केलेले आहे. या भवसागरातून बुडत्या जीवाला परमार्थाच्या पैलतीरावर पोचवणारा सद्‌गुरूच आहे, हा पारंपरिक पण शाश्वत विचार त्यांनी अशा रीतीने मांडलेला आहे :

गुरुविण कोण दाखविल वाट ?
आयुष्याचा पथ हा दुर्गम अवघड डोंगर–घाट !
अजाणता मी पथिक एकटा
झांजड पडली, लपल्या वाटा
अंवतीभवती किर्र्र दाटले काटेबन घनदाट !
दिशा न कळती या अंधारी
नसे आसरा, नसे शिदोरी
कंठ दाटला आले भरुनी लोचन काठोकाठ !

भुकेजलो मी तहान लागे
पुढे जाऊ की परतू मागे
सांजेपाठी सुदीर्घ रजनी दिसणे कुठून पहाट !

क्षणभंगुर हे जीवन नश्वर
नेतिल लुटुनी श्वापद तस्कर
ये श्रीदत्ता, सांभाळी मज, दावी रूप विराट !

लावणीच्या विविध प्रकारात ‘ झगड्याची लावणी ’ असाही एक प्रकार आहे. या प्रकारच्या लावणीला ‘ झगडा ’ असेच म्हटले जाते. झगड्यात खटकेबाज संवाद असतो. अर्थात हा संवाद स्त्री आणि पुरुष यांच्यातील असतो. झगडा म्हणजे भांडण. हे भांडण आशुक-माशुक यांच्यातील असते. झगड्याला ‘ छक्कड ’ असेही म्हणण्यात येते. आशुक-माशुकातील हा जरी झगडा असला, तरी त्याला विनोदाची एक सुखद झालर असते, जुन्या शाहिरांपैकी परशरामाचे झगडे खुसखुशीत आहेत. पठ्ठे बापूराव यांनीही बऱ्याच झगड्यांच्या लावण्या लिहिलेल्या आहेत. झगडा रंगतो-खुलतो तो त्याच्या म्हणण्याच्या ठसकेबाज धाटणीवरून, हावभाव आणि अभिनयावरून.

गदिमांच्या प्रतिभेने झगड्याच्या लावणीलाही स्पर्श केलेला आहे. झगड्याची सगळी वैशिष्ट्ये, म्हणजे गर्विष्ठपणा, एकमेकांचे वर्म काढणे खुशाल थापा मारणे, वाह्यात बडबडणे, इत्यादी गदिमांच्या झगड्यातही खटकेबाज अशा पद्यमय संवादातून उतरली आहेत.

‘ देवा तुझी सोन्याची जेजुरी ’ या चित्रपटात गदिमांचा एक झकास झगडा आहे. एक तरुण आणि तरुणी यांच्यातील हा झगडा श्रोत्यांची मने काबीज करतो. खदखदा हसवतो देखील. गदिमांचा झगडा हा असा आहे :

तरुणी– नको नदीवर भेट
नको रस्त्यामधी गाठू
नको असे पाय चाटू
नको अंग अंगा खेटू
नको करूस माझ्याशी सलगी
सरपंचाची मी रे मुलगी ॥

धर थोडीशी अक्कल
काढ बाजूला सायकल
कुणी बघंल, ऐकंल
वाळल्या गवतात पडेल ठिणगी
सरपंचाची मी रे मुलगी ॥

तरुण–अग मी कोन वाटलो तुला
मी कडक टॉप मुंबईवाला
नुकताच माझा पगार झाला
वर बोनस लई मिळाला
आता लगीन जमवावं म्हनून आलो गावाला
आता एकटयानं कशी सरल जिंदगी
सरपंचाची मी रे मुलगी ।।

तरुणी– माझा बाप काढील तुझा बाक
साऱ्या जिल्ह्यावर आहे त्याचा धाक
त्याच्या बँकेत रुपये हैती लाख
घरी मोत्यानं भरल्या कणगी
सरपंचाची मी रे मुलगी ।।

तरुण– तुझ्या वाडयापरीस लई चांगला
माझा मुंबईमध्ये आहे बंगला
खोली–खोलीत इजेचा झुंबर वर टांगला
रोज खातो मी मटण–मुरगी
सरपंचाची मी रे मुलगी ।।

सोंगाडया– मी पाहिलिया याची खोली
हयो ऱ्हातो मोडक्या चाळित जिन्याच्या खाली
हयो गंडेऱ्या इकतो, कमावतो एक पावली
आम्ही मैतर पुरवतो चोटगी
सरपंचाची लेका ही मुलगी ।।

पोलिस– ए, काय छेड काढतो पोरीची
तुझी सायकल दिसते चोरीची
तुला हौस तुरुंगाच्या वारीची
चल, करतो तुझी मी रवानगी
सरपंचाची ही रे मुलगी ।।

'दैवाचा खेळ' नावाच्या चित्रपटात तो आणि ती यांच्यामधील झगडाही असाच मस्त रंगलेला आहे. या झगडयातला तो आहे दारूबाज आणि ती आहे त्याची गांजलेली बाईल. मग झगडा रंगायला आणखी मसाला कशाला हवा? गदिमांचा हा झगडा असा आहे :

ती– दारूबाजाची बाइल झाले– गेले सासर, माहेर मेले
गेले घरदार, विकला मळा– नाही पोटाला तुकडा शिळा
काय कुंकवाचा लावून टिळा ? दैन पेल्यांत वाहून गेले !

तो– नको दारुला दूषण देऊ, माझ्यापुढे नको उभी राहू
खाऊ घालतील तुझे बाप, भाऊ, भारी आहेत पैकेवाले

ती– बिब्बा घालाल कां तुम्ही पोटीं ?

तो– गल्लोगल्ली आहे हातभट्टी
आज दिलीं तुला सोडचिठ्ठी
आमचे दारूशी लगीन जुळले
दारु लक्ष्मीची बहीण सख्खी
आमची सोयरीक झाली पक्की
गाठ जन्माची जमणार नक्की
आमचे आम्हास दे, ते डोरले !

[ पोलिस येतो, त्याला पकडून नेऊ लागतो : ]

ती– कुठे नेता हो माझा कारभारी ?

पोलिस– गजागजांच्या घरीं सरकारी

ती– कधी येतील ते माघारी ?

तो– मला मारतील पोलिसवाले

ती– आता जाऊ मी कोणाच्या दारी
छी: थू: करतील माझी सारी
गेला तुरुंगात की कारभारी
उभ्या जन्माचे वाळवंट केले !

'प्रीतिसंगम' नामक चित्रपटात 'तो आणि ती' मधला असाच एक खटके-बाज झगडा आहे. झगड्यात अनुस्यूत असणारी एकमेकांची वर्मं तो आणि ती यांनी काढलेली आहेत. एकमेकांने एकमेकाची पायरी दाखवली आहे. त्याशिवाय, गदिमांच्या या झगड्याचं वैशिष्टय रचनेच्या दृष्टीनं आगळंवेगळं असं आहे की या रचनेत त्यांनी 'ळ' या अक्षराचा अनुप्रास फार सहज आणि सुंदर रीतीनं साधलेला आहे. 'ळ' या अक्षराचा अनुप्रास अथवा यमक जुळवणं तसं कठीणच आहे; परंतु शब्दांवर हुकूमत गाजवणाऱ्या गदिमांना ही गोष्ट किती सुलभरीतीने साधलेली आहे, हे दिसून येते.

दुसरं एक वैशिष्टय असं की गदिमांनी शाहिरी रचनेत इतर शाहिरांप्रमाणं क्वचितच स्वतःची नाममुद्रा वापरलेली आहे. अगदी प्रारंभीच्या काळात, कोल्हापुरी असताना, ज्या काही लावण्या व पोवाडे त्यांनी रचले व शाहीर पिराजी सरनाईक यांनी ते गायिले, त्या रचनेत मात्र त्यांनी त्यावेळी घेतलेली 'अमर' ही नाममुद्रा आढळते. त्याच्या आगेमागेच आणखी एक गमतीची नाममुद्रा त्यांनी धारण केलेली

होती. ते स्वत:ला विनोदानं ' बोऱ्या भगवान ' असं म्हणवून घेत असत. कारण जमिनीवर अंथरलेल्या बोऱ्यावर यांची बैठक असायची. म्हणून हे बोऱ्या भगवान !

' बोऱ्या भगवान ' ही नाममुद्रा या झगडयात त्यांनी ' तो ' साठी वापरलेली आहे. गदिमांचा हा खणखणीत झगडा असा आहे :

तो– हास पांखरा, हास ?
भोळं तुझं ग निळं डोळं
अन् कैक गडी तू केलंस खुळं
तुझी नखरेल चाल
गोरं गुलाबी गाल
अन् नाजुक स्थावर काळा तीळ !

ती– पाऊल मागं घे रं
नको येऊंस म्होरं
अरे, विषयाचं जरी तुला खूळ
पर मदनाचं हे हितं जाळं
उगा येशील यांत
फुका पडशिल गोत्यात
पर नाही शिजायची तुझी डाळ !

तो– अग, नको दावुस तोरा
आहे ठाऊक पुरा
तरुणपणाचा तुझा चळ
अन् तू ग मुलखाची तोंडाळ
तुझ्यासारख्या पोरी
लाख येतील घरी
अग, डौल तुझा हा पोकळ !

ती– तू रे बोऱ्या भगवान
नाही खायाला आन
करिसी कशाला असला चळ
अरे, इंगळासंगती हा खेळ !
तुझी-माझी संगत
त्यात नाही रंगत
जणू शालूशेजारी वाकळ !

तो– अग, नको झाडाझाडी
जरा धर गोडी

अग, पोलिस-पाटलाचं माझं कूळ
अन् तू ग पायाची पायधूळ !
तू ग रिती पणती
तुझा उजेड किती ?
अन् मी ग चांदोबा तेजाळ !
ती– अरे, हाय माहित सारं
तुझं पडकं घर
तुझ्या छपरावरती हिरवाळ
तुझ्या न्हाणींत फुटकं घंगाळ
एरंड लावला उसात
जरी वाढला जोसात
पर लावतंय् का कुणी गुऱ्हाळ ?
तो– म्हणे बोऱ्या भगवान
ऐका शाण्यांनो ज्ञान
अहो, वाट इष्काची खडकाळ
अन् होतं स्वतःचं वाटोळं !
जर चुकून याल
तुम्ही पुरं फसाल
जाळं नव्हे हे–जंजाळ !

'वैभव' नावाच्या चित्रपटातही गदिमांचा एक असाच आकडेबाज फाकडू झगडा आहे, तो असा :

तो : नाकात वाकडा, नथीचा आकडा
मोत्याचं कुलुप, ओठांच्या कवाडा
बंदोबस्त का ग केलास एवढा ?

ती : बोलांचं माणिक, हसण्याचं हीरक
रत्नांनी भरला रुपाचा वाडा,
तुझ्यावाणी वेडा, घालिल दरोडा
बंदोबस्त केला म्हणुन एवढा !

तो : येऊन गुपचुप तोडीन कुलुप

ती : भलतेच नको रे बोलू उनाडा !

तो : घालिन दरोडा, धुंडीन वाडा

ती : पायात पडेल रे जन्माचा खोडा

तो : सोशिन खोडा, हवा तेवढा
आधीच कशाला तंटाबखेडा ?
तुझा माझा जोडा, पायीं घाल खीडा
अंगणी झडू दे सनई–चौघडा !

माडगूळकरी लावणीतल्या वैविध्याची झलक दाखविणारे हे काही नमुने मात्र आहेत. परंतु या नमुन्यांमधूनही त्यांचे सुडौल रचनाकौशल्य दिसून येते. प्रतिभेची चमक जाणवते. शाहिरीबाजावरची त्यांची पकड पाहून मन स्तिमित होते !

रचनादृष्टचाच शाहिरीबाजावर गदिमांची पकड केवळ दिसते असे नाही, तर त्या त्या प्रकाराच्या अंतरंग–प्रकृतीवरही त्यांची तेवढीच हुकूमत दिसून येते. प्रत्येक तऱ्हेच्या रचनेची एक अंतरंग–प्रकृती असते, तीही गदिमांनी आत्मसात केल्याची साक्ष या रचनांवरून पटते.

गदिमांचा आणखी एक मजेदार झगडा आहे तो असा :

तो– चिच गाभुळी तुझी ग मूर्ति । देतो पन्नास रुपये सूर्ती
ती– मेल्या त्याचं घेऊन खा जा फुटाणं-डाळं
अन् त्वांड कर तुजं काळं ।
सव्वा लाखाची जवानी माझी ।
कशी होईन तुला मी रं राजी ।।
तो– नारे, नऊ खंड पिरती मी । दहावं खंड काशी ।
तिथला हाय मी बापू जोशी । कोल्हापुरी सिनेमात हाय गं
नाव पडद्यावर जाऊन पहा गं ।।
ती– सिनेमावाला ?... अ रा रा रा !
सिनेमाल्यांची संगत नाही बरी ।
नुसती चित्रात बहाद्दुरी । नव्हे खरीखुरी ।
थांबता इंजन कोराच पडदा
महाग लागंल तुला माझा सौदा ।।
ऐकून नारीच्या उत्तराला । गडी मनामधी गार झाला ।
न बोलता निघून गेला माघारा । बोऱ्या भगवान
रंगेल भारी । सप्रे गातुया लयच न्यारी ।।

□

१

# माडगूळकरी सवाल–जबाब

हा प्रसंग आहे शिवकालीन. सुमारे साडेतीनशे वर्षांपूर्वीचा. समर्थांचा मुक्काम चाफळगावी होता. तर काही शाहीरमंडळी हा मोका साधून तिथे गोळा झाली. बरोबर चाहते, दोस्त असणारच आणि शाहीरमंडळी आली म्हटल्यावर चाफळातले आणि पंचक्रोशीतलेही लोक कदाचित जमा झाले असणार. एकनाथांनी म्हटलेच आहे, 'लोक निवती कथाविनोदे!'

समर्थांच्या भोवती ही 'शाहिरी मंडळी' का गोळा झाली होती, किंवा त्यांनी हा मोका का साधला होता? तर या शाहिरांच्या मुख्याने आपल्या कवनाच्या जोरावर अन्य कित्येक शाहिरांना हरवले होते आणि त्यांची निशाणे जिंकून घेतली होती. ही हार-जीत कवनातून होत असे. एकाने प्रश्न विचारायचा आणि दुसऱ्याने उत्तर द्यायचे. एकाने कोडे–उखाणा घालायचा आणि दुसऱ्याने तो सोडवायचा. ज्याला उत्तर देता यायचे नाही, किंवा उखाणा सोडविणे जमायचे नाही, तो प्रश्नकर्त्याला शरण जायचा. हा शाहिरी म्होरक्या असा अनेक शाहिरांना शरण आणलेला–जिंकून घेतलेला– होता. आता याचा गर्व, यशाची धुंदी त्याला चढली नसती तरच नवल!

पठ्ठ्याने या धुंदीतच बेत केला की, समर्थही कवन करतात तर त्यांच्याशीच होड घ्यावी. परीक्षा बघावी. त्यांना जिंकून घ्यावं आणि शिवरायाला अशी आपली कर्तबगारी दाखवावी, दिपवून टाकावं, शाबासकी मिळवावी आणि इनाम–जहागिरी पदरात घेऊन कायमच्या भाकरीची सोय करावी.

समर्थांना शाहिरांचे मानस कळले, तेव्हा त्यांनी फड जमवायला सांगितले. फड जमला. समर्थ आले. शाहीर आले. सुरुवात झाली शाहिरांच्या मुख्यानं ताठ्यानं प्रारंभीच समर्थांना म्हटले,

**पुसेन ते सांगा म्हणे निवाड । किंवा जे असेल अवघड ।**
**सिद्ध असे मी सांगावया ।।**

समर्थांनी स्मित केले आणि त्याला तेवढाच टोला हाणला,

**कासया इतुके । देवमायेचे नेणसी कौतुक ।**

शहाणा आहेस जा नांद सुखे । जन्म सार्थक हे नव्हे की ।

असा हा खरमरीत टोला खाऊन शाहीर काय गप्प बसणार? तो तर गर्वाच्या धुंदीतच आलेला. इरेला पडला आणि समर्थांनाच वादाला आव्हान देऊ लागला. मग समर्थ तरी काय करणार? त्यांना डफगाण्याच्या या आखाड्यात उतरावे लागले. उतरले.

शाहीर खुमखुमीतच म्हणाला, 'पहिला सवाल तुमच्याचकडून येऊ द्या!'

डफ कडाडले, झांज-झालर खणखणली आणि डफ-गाण्याच्या धाटणीत समर्थांनी प्रश्नामागून प्रश्न आणि सवालामागून सवाल टाकले—

किती पृथ्वीचे वजन । किती अंगुळे गगन ।
सांग सिंधूचे जीवन । किती टाक ।। १ ।।
वायूसरिसे उडती । सांग अणूरेणू किती ।
लक्ष चौऱ्यांशी उत्पत्ती । रोम किती ।।२।।
किती आकाशीचा वारा । किती पर्जन्याच्या धारा ।
तृण भूमीवरी चतुरा । सांग किती ।।३।।
सर्व सरितांची वाळू । सप्तसागरी केवाळू ।
किती आहे ते हरळू । सांग मज ।।४।।
बीजे वडी आणि पिंपळी । किती आहेत भूमंडळी ।
सर्व धान्याची मोकळी । संख्या सांग ।।५।।
अठरा भार वनस्पती । भूमंडळी पाने किती ।
फुले फळे मजप्रती । सांग आता ।।६ ।
जे जे पुसले म्या तुज । ते ते सांग आता मज ।
अनंत ब्रह्मांडी बेरीज । किती झाली ।।७।।
सांग माझे डफगाणे । की ते सोडी जाणपणे ।
देहबुद्धीची लक्षणे । सोडवीन ।।८।।

बिचारा शाहीर ! या प्रश्नांना काय उत्तर देणार नि हे सवाल कसे सोडवणार ? निरुत्तर झाला. गर्व उतरला. धुंदी ओसरली.

श्रोतेमंडळी समर्थांच्याकडे पाहू लागली. कान टवकारून बसली. समर्थांनी चातुर्य वेठीला धरले आणि म्हणाले,

श्रोती व्हावे सावचित्त । आता सांगतो गणित ।
सर्व आहे अगणित । सत्यवाचा ॥
रामदासाचे विनोदे । सोडा अहंतेची ब्रिदे ।
मग सर्वस्वी स्वानंदे । सुखी रहा ॥

ग्रंथ संग्रहालय शाखा
२४८०
काव्य २४८९३
२४१४८८

कारणापुरताच घेतलेला प्रसंग संपला. निष्पत्ती इतकीच की, सवाल-जबाबांची परंपरा अशी जुनी-पुराणी आहे. जाणते तर याहूनही ती मागे, म्हणजे वेदकालापर्यंत नेतात. 'ब्रह्मोद्य' ह्या नावाने ती त्यावेळी अस्तित्वात असल्याचे श्रीमती दुर्गा भागवत यांनी आपल्या 'लोकसाहित्याची रूपरेखा' ह्या ग्रंथात दाखवून दिले आहे. ब्रह्मोद्य हा शब्द वेदात यज्ञप्रसंगी, विशेषतः राजसूय यज्ञाच्या वेळी अश्वमेधात पुरोहित एकमेकांना जे उखाणे घालीत, त्यांना उद्देशून आलेला आहे. ब्रह्मोद्य म्हणजे ब्रह्माला किंवा आध्यात्मिक प्रश्नांना अनुलक्षून केलेली उक्ती, ब्रह्मोद्यात दोन बाजूंनी प्रश्नोत्तरे व स्पर्धा व्हायची, अशी माहिती देऊन त्यांनी ऋग्वेद व यजुर्वेद यांतील काही ब्रह्मोद्यांची सारांशाने वानगीही दिलेली आहे. त्यांपैकी एक अशी आहे. 'होता' प्रश्न विचारीत आहे आणि 'अध्वर्यू' उत्तरे देत आहे.

होता – आपल्या मार्गाने एकटाच कोण जातो ?
नव्याने फिरून सदैव कोण जन्माला येतो ?
थंडीला औषध कोणते ?
धान्याच्या सर्वात मोठ्या कोठाराचे नाव काय ?

अध्वर्यू – सूर्य आपल्या मार्गाने एकटाच जातो.
चंद्र नेहमी नव्याने जन्माला येतो.
थंडीवर विस्तव हे औषध.
पृथ्वी हे सर्वात मोठे धान्याचे कोठार.

यानंतर अध्वर्यू प्रश्न विचारतो आणि होता उत्तरे देतो, असा हा प्रकार चालत असे.

कोड्यासारखी किंवा कूटासारखी अशी रचना, प्रश्नोत्तरीच्या स्वरूपात नसली तरी ज्ञानेश्वर, एकनाथादी संतांनीही केलेली आहे. शाहिरांनी ती डफगाणे,

उमानपदे किंवा भेदिक या नावाने लोकप्रिय केलेली दिसते. तिचा ढंग आणि बाज हा अर्थातच शाहिरी थाटाचा आहे. ‘ भेदिक ’ हा खरे तर लावणीचाच एक प्रकार आहे. या प्रकारात लावणीने आध्यात्मिक वळणाचे रूप घेतलेले आहे. शृंगारिक लावणीपेक्षा ही भेदिक लावणी स्वभावाने व गुणाने वेगळी असली तरी तिची मूळ जातकुळी शाहिरीतच आहे. अध्यात्मातील एखाद्या रहस्याचा, कोड्याचा, गूढाचा, भेदाचा ठाव घेण्याचा इथे प्रयत्न दिसतो, म्हणून ही ‘ भेदिक ’ बनली.

अशी कूटे किंवा उखाणा, उमाणा, हुमान, हुमाणा यांनी लोकसाहित्य भरपूर समृद्ध केलेले आहे :

सरसर गेला साप नव्हे,
गडगड गेला गाडा नव्हे,
गळ्यात जानवं ब्राह्मण नव्हे...तर कोण ?

याचे उत्तर ‘ रहाट ’ असे असते.

बारा गाठी आठ फासे
माझा उखाणा ओळखील त्याला शेरभर बत्तासे

याचे उत्तर ‘ शिंके ’ असे असते.

असे कितीतरी उमाणा, उखाणे लोकसाहित्यात आहेत, पण त्यांचे स्वरूप लौकिक मनोविनोदनाचे आहे. उमान म्हणजेच मोजणे, तोलणे. प्रतिस्पर्ध्याच्या बुद्धीचे म्हणा, ज्ञानाचे म्हणा किंवा चातुर्याचे म्हणा; पण माप काढण्याचाच हा खटाटोप आहे. यात बौद्धिक कसरतीचाच भाग प्रामुख्याने दिसतो.

शाहिरीत ‘ कलगी-तुरा ’ या नावाने भेदिक प्रश्नोत्तरीही प्रसिद्ध आहे. यातही अशाच प्रकारची आध्यात्मिक कूटे आहेत.

अशा या प्राचीन परंपरेतूनच शाहिरी सवाल–जवाबांची निष्पत्ती झालेली आहे आणि ग. दि. माडगूळकरांनी ही परंपरा आपल्या खुबीदार, ढंगदार रचनेने पुढे तर नेली आहेच; पण ती आशय, रचना व काव्य या दृष्टींनी अधिक समृद्धही केलेली आहे. ‘ माडगूळकरी सवाल-जबाब ’ म्हणून संबोधावी इतकी ती वैशिष्टय-पूर्ण खासच आहे !

गदिमांच्या बहुमुखी आणि बहुरंगी कविप्रतिभेत एक अस्सल शाहीर आहे. संतवाणी व लोकवाणी या धनाढ्यावर त्यांचा पिंड पोसलेला आहे. कथा-पुराणे आणि प्राचीन साहित्य यांवर वाढलेला आहे. संस्कारित झालेला आहे. याच्या सर्व खाणाखुणा त्यांच्या अन्य साहित्यनिर्मितीत जशा दिसतात तशाच त्यांच्या शाहिरीबाजाच्या या सवालजबाबातूनही ठसठशीतपणे उमटलेल्या आढळतात.

माडगूळकरी सवाल-जबाबांचे पहिलेवहिले देखणे रूप दिसले, ते त्यांच्या 'लोकशाहीर रामजोशी' या चित्रपटात. बया आणि राम जोशी यांच्यातले हे सवाल-जबाब :

बया–

पंचांग सांगता जन्म गमवला, उगाच घालता काय भीती ?
चंद्रकोरीपुढं तुमचा काजवा चमकुन चमकंल तरी किती ?
पोथ्यापुराणं वाचुन वाचुन अक्कल आली असंल अती–
तर चंद्राचं चांदणं उष्ण का शीतल, सांगा मजप्रती !

राम जोशी–

क्षयी कोर तू सूर्यापुढती तेज ओकिसी किती ?
विरहामध्ये उष्ण चांदणे, शीतल पतिसंगती !

बयाच्या मार्मिक सवालाला रामजोशींनी समर्पक जबाब दिलेला आहे, तो माडगूळकरांच्या तेवढ्याच मार्मिक आणि यथोचित शब्दांत.

सवाल-जबाबांच्यावेळी दोन प्रतिस्पर्धी फड एकमेकांसमोर एकमेकांवर कुरघोडी करण्यासाठीच उभे ठाकलेले असतात. तेव्हा एक दुसऱ्याला तुच्छ लेखून आपली महती मिरवतो यात नवल नाही. बया रामजोशींच्या भिक्षुकीपणाचा तुच्छतेनं उल्लेख करत स्वत:ला चंद्रकोर म्हणवून घेते आणि त्याला काजवा ठरवून सवाल टाकते. पण रामजोशी काय कमी आहे ? आपल्या जबाबात त्याने स्वत:ला सूर्य म्हणवून घेतले आणि बयेनं स्वत:ला घेतलेल्या चंद्राच्या उपमेचा, चंद्राला दक्षाकडून मिळालेल्या शापाचा सूचक उल्लेख करून मर्मावरच बोट ठेवले आहे.

तसा हा सवाल लौकिक शृंगाराची झाक असलेला आहे. पण यापुढचा रामजोशी जो सवाल टाकतो आणि बया त्याला जबाब देते तो महाभारतातल्या कथेवर आधारित आहे :

राम जोशी –

पाण्यामधली एक अप्सरा सहज भाळली नरावर !
कधी, कोण, ते सांगून द्यावे सवालास उत्तर !

बया –

पुराणांतली वांगि राहु द्या पुराणांत असली !
नागकन्यका उलपी पूर्वी पार्थावर भुलंली !

'पुराणातली वांगी' म्हणून राम जोशीच्या सवालाची वासलात लावल्यावर बयेनं टाकलेला सवाल सामान्य ज्ञानाची चाचणी घेण्याइतका नीट, पण धीट आणि कुशल असा आहे.

बया –

पती सोडुनी सती कोणती रतली अविरत परक्याशी ?
खारट त्याचे चुंबन घेई, कैक मुखांनी दिवस-निशी ?

राम जोशी असल्या चाचणीला थोडीच भीक घालणार ? तो एखाद्या हजरजबाबी बिरबलासारखा पटकन जबाब तर देतोच, पण गर्वानं फुगलेल्या बयेला, ' निंदु नको ' अशा शब्दात जाताजाता फटकारतोही आहे.

राम जोशी –

पतित पावन त्रिभुवनजीवन मुनिजन बोलति स्वर्गंधुनी
निंदु नको जरि सिंधुस मिळते गंगा गंगाधर त्यजुनी !

संस्कारनिष्ठ माडगूळकरी रचनेचे वळण जसे इथे आकृष्ट करते, तशीच त्यांची प्रासानुप्रासाने नटलेली प्रासादिक भाषा आणि शब्दही भुरळ घालतात !

यापुढचा जो सवाल रामजोशीने बयेला टाकलेला आहे, तो तर उघड उघड उखाण्यासारखाच आहे. ' दोन भाऊ शेजारी पण गाठ नाही जन्मभरी ' या जुन्या उखाण्यासारखाच, पण अधिक आशयघन आणि सुंदर काव्यात्म !

राम जोशी –

तुझीच दौलत, परंतु दैवे भाळि तुझ्या नाही !
तुझेच असुनी, तुझ्या दृष्टिला दुर्मिळ ते पाही !
तुझ्याचपाशी आजवरी ते रम्य दोन पेले
सुधा, हलाहल आणिक मदिरा यांनी भरलेले !

पण चतुर बयेलाही याचे उत्तर जेव्हा सुचत नाही तेव्हा रामजोशी उखाण्याचे उत्तर द्यावे तसेच सांगतो.

' तुझे डोळे ! ' आणि ते कसे, त्याचे विवरण तशाच नि तेवढ्याच सुंदर अर्थवत्तेने करतो :

कवडि पांढरी, लोलक काळा, लाल जरा कोने
जगती, मरती, जीव झिंगती, आतिल नजरेने !
शुभ्र पांढरे असते अमृत, हलाहलाचा रंगच काळा
सांग, गुलाबी नेत्रकडांहुन मद्याचा का रंग निराळा ?
जगवी अमृत, मारि हलाहल, मद्य झिंगवी कैफात
ताडुनि बघ हे गुण तीनही असती तुझिया नेत्रांत !

अखेरचा सवाल आणि त्याचाही जबाब बयेला न देता आल्यामुळे रामजोशीला पुढीलप्रमाणे द्यावा लागतो–

सवाल-

सूर्य उगवता गगनामाजी,
जळीं कमलिनी का फुलती ?
पूर्ण चंद्रमा नभात दिसता,
सागरास का ये भरती ?

जबाब-

सूर्य उगवता कमल उगवते,
सिंधु उसळतो चंद्रा बघुनी
शुद्ध प्रीति हे कारण त्याचे-
ज्ञात्यांनो, घ्या हृदयी भरुनी !

शुद्ध प्रीतीचे हे लक्षण तसे खास नवीन नसले तरी त्याची सवाल-जबाबातली माडगूळकरी गुंफण मात्र निश्चितच मनोज्ञ आहे.

या सवाल-जबाबाच्या फडात बया हरलेली आहे, आणि रामजोशींच्या कवित्वाचा विजय झालेला आहे, असा भाग चित्रपटात आहे. चित्रपटात खुद्द रामजोशींच्या काही रचनाही माडगूळकरांनी समाविष्ट केलेल्या आहेत. रामजोशी हा शाहीर असला, तरी मोठा व्युत्पन्न पंडित होता. त्याच्या रचनेवर या त्याच्या पांडित्याचा प्रभाव पडलेला दिसतोच. तो स्वतःला 'कविराय' म्हणवून घेतो. 'सदा हरि कविरायावर फिदा ' किंवा 'कविराय चमकला हीर लोकजाहीर इतर शाहीर क़ाजवे वांग ' अशी थोडी दर्पोक्ती मिरवतो आणि ' होरी ' नामक रचनेच्या शेवटी तर-

' या होरीची कोणी तऱ्हा बांधिल कविजन खरि तरी न ये या कविरायाची सरी ! '

अशी सरळ सरळ गर्वोक्तीच व्यक्त करतो. पण माडगूळकरांनी याच चित्रपटासाठी हे जे सवाल-जबाब किंवा इतर लावण्या लिहिल्या आहेत, त्या रचनाही काव्यदृष्टया तेवढयाच उत्कृष्ट आहेत. म्हणून तर राम जोशीबुवांच्या पंक्तीत पाटाला पाट लावून माडगूळकरांची रचना मानापानाने बसलेली आहे. ती उणी तर पडलेली नाहीच, पण जाणकाराखेरीज इतरांना ती राम जोशीबुवांचीच वाटेल इतकी मिळूनमिसळून गेलेली आहे. सुबोध आणि रसाळपणाच्या बाबतीत तर राम जोशींच्या समग्र निर्मितीच्या तुलनेत माडगूळकरी रचना क्वचित वरचढ ठरण्याचीच शक्यता आहे. पांडित्याच्या जोरावर राम जोशी चमत्कृतिपूर्ण, पण दुर्बोध असा शब्दप्रभु असेल तर माडगूळकर हे 'आबाल सुबोधे' असे प्रासादिक सिद्धहस्त शब्दांवर हुकूमत असणारे कवीश्रेष्ठ आहेत. राम जोशींनी तर खुद्द असे सवाल-जबाब लिहिलेलेच नाहीत. काही पोवाडे, आध्यात्मिक व शृंगारिक लावण्या

छेकापन्हुतीसारखी चमत्कृतिजन्य रचना, पदे इत्यादी स्वरूपाचीच रचना केलेली आहे.

चंद्र हा प्रियजनांचा आवडता तर कविजनांचा लाडका म्हणून तो प्रेम-काव्यात वारंवार डोकावतो. माडगूळकरांच्या काव्यातही त्याने पुष्कळ वेळा शिर-काव केलेला आहेच. त्यांच्या शृंगारिक घाटाच्या लावणीत तर तो आहेच, पण सवाल-जबाबासारख्या भेदिक लावणीतही तो आहे, हे आताच पाहिले. तसाच तो 'सांगते ऐका' नामक चित्रपटातल्या तो आणि ती यांच्या सवाल-जबाब सदृश द्वंद्वगीतातही प्रीतीबरोबरच अवतरलेला आहे.

ती-चंद्र पाहता सइ प्रीतिची तरुण मना का येते ?
चंद्र आणखी प्रीती यांचे काय असावे नाते ?

तो-कलावती तू, तुला असावी अचुक तयाची जाण ग
प्रीतनगरचा राजा मन्मथ, चंद्र तयाचा प्रधान ग
प्रीतनगरची प्रजा तयाच्या मुजऱ्यासाठी येते
प्रधान साक्षी ठेवून राणी आण प्रीतिची घेते

ती-तोंडावरती जडे काळिमा झिजते ज्याची कला कला
तो मदनाचा मंत्री कैसा समजून सांगा तुम्ही मला
गुरुपत्नीशी पाप करी हा, शाप बाधला याते
चंद्र आणखी प्रीती यांचे काय असावे नाते ?

अशा प्रकारे या द्वंद्वगीतात प्रश्नोत्तरे आहेत. पण तरी या काव्याचे स्वरूप सवाल-जबाबासारखे नाही. खरे पाहता माडगूळकरी सवाल-जबाब हेसुद्धा एका परीने त्यांनी रचलेली द्वंद्वगीतेच आहेत. पण त्याचा थाट आणि घाट, हा शाहिरी वळणाचा असतो. तिथे प्रश्नोत्तरांचे स्वरूप इथल्यासारखे 'परिप्रश्नेन सेवया' असे नसते, किंबहुना आपल्या प्रश्नाचे उत्तर देऊन प्रतिपक्षाने आपले समाधान करावे, ज्ञानात भर घालावी असे अपेक्षित नसतेच, तर प्रतिपक्षाला ते सुचूच नये, तो भांबावून जावा, गडबडून-गोंधळून जावा, निर्बुद्ध ठरावा आणि शरण यावा व आपली सरशी व्हावी, असेच अपेक्षित असते. माडगूळकरी सवाल-जबाब हे द्वंद्वगीते खरीच; पण त्यांचे स्वरूप आक्रमक, लढावू असल्यामुळे तिथे दोघांत एक-मेकांविषयी अवहेलनेची, तुच्छतेची भाषा येते आणि एकमेकांमध्ये दुसऱ्याला जिंक-ण्याचीच ईर्षा, जिद्द फुरफुरत असते. त्यामुळे भाषेतही खणखणाट आणि झणझणाट अपरिहार्यपणे ऐकू येतो. साध्या द्वंद्वगीतात हा आवेश नसतो. भावगीतासारखेच ते बहुधा ललित, कोमल असते.

ती आणि ती याचाच वापर करून 'वैजयंता' चित्रपटात माडगूळकरांनी 'सवाल-जबाब' लिहिले आहेत. या रचनेत सवाल-जबाबाची सर्व लक्षणे उतर-

लेली आहेत. मात्र या ठिकाणी निरनिराळ्या तऱ्हेचे सवाल नसून, एका विषयावरचे आहेत. हा विषय आहे–नर श्रेष्ठ की नारी श्रेष्ठ, पुरुष श्रेष्ठ की स्त्री श्रेष्ठ, असा दोघांमधील श्रेष्ठत्वाच्या वादाचा. तो स्वतःला श्रेष्ठ समजतो, तिला कनिष्ठ समजतो.

म्हणून याची सुरवातच 'तो' अशी करतो–

काय सामना करू तुझ्याशी, नारीजात तू दुबळी ग
हुकूम पाळिता पुरुष जातिचा सरे जिंदगी सगळी ग
बाळपणी तुज धाक पित्याचा, तरुणपणी तुज हवा पती
वृद्धपणा तव पुत्राहाती, स्वतंत्र बुद्धी तुला किती ?

पण 'ती'ही कमी नाही. 'ती' तर इथे पायात चाळ बांधून बोर्डावरच्या फडात उतरलेली आहे. म्हणून 'ती' देखील तेवढ्याच तालेवारपणाने, चढेलपणाने सांगते–

नको वाढवण सांगू शाहिरा, पुरुषजातीचे फुकाफुकी
स्त्रीजातीच्या अकलेपुढती तुझी बढाई पडेल फिकी
सावित्रीच्या चतुरपणाने यमधर्माला दिला धडा
असेल ठावी कथा जरी ती, बोल मजपुढे धडाधडा !

सावित्रीचा दाखला देऊन 'ती'ने स्त्रीची महती पटवायचा प्रयत्न केला, पण 'तो' वस्ताद. तिचाच दाखला तिच्यावरच उलटवीत तो म्हणतो–

तूच सांग ग, कोणासाठी सावित्री ते दिव्य करी
सावित्रीची कथा सांगते पुरुषप्रीतिची मातबरी !
पतीवाचुनी कसे जगावे हाच जियेला प्रश्न पडे
इथेच ठरला पुरुष श्रेष्ठ ग, चतुर सारिके बोल पुढे ?

या उत्तराने 'ती' थोडी भांबावली हे खरेच; पण लगेच सावरून शाहिराचे आव्हान स्वीकारून बोलली–

पुरुषावाचुन जन्मे नारी, या पृथ्वीचा कोण पती ?
पित्यावाचुनी जन्मा आली, काय थांबली तिची गती ?

'पुरुषेवाचून जाली। आपणा आपण व्याली॥'–संत वाङ्मयातील या एका जुन्या दुमाण्याची आठवण हा तिचा सवाल ऐकून होते. पुरुषनिरपेक्ष स्त्रीत्वाचा वानवळा तिने पृथ्वीच्या रूपाने दिला. पण शाहिराने तोही तितक्याच सहजतेने झटकला,–

अज्ञानाने नकोस बोलू आभाळाची सुता धरा
गती कशाची, सूर्याभोवती फिरे नार ती गरागरा !

पुरुषासाठी नार जन्मते, पुरुषासाठी जन्म तिचा
वृक्षावाचुन जन्म पांगळा फुलारणाऱ्या वेलीचा !

या बिनतोड जबाबाने 'ती' मात्र नरमली; आणि स्त्रीचीच श्रेष्ठता पटवण्याचा तिने जो अट्टाहास धरलेला होता. त्याला थोडी मुरड घातली. तडजोडीच्या पवित्र्यात येऊन म्हणाली–

सांग शाहिरा नारीवाचुन पुरुषहि झाला कधी पुरा ?
पुराण-शास्त्र धुंडुन पाही, धुंड गगन की वसुंधरा
ताऱ्यामाजी शुक्र नांदतो, वाऱ्यापाठी उभी हवा
पृथ्वीभोवती चंद्र फिरतसे वेष घेऊनी नवा नवा !

शेवटी, नर आणि नारी मिळूनच उत्पत्ती होते, म्हणून एक श्रेष्ठ नि दुसरा कनिष्ठ, असे नसून दोघेही तेवढेच तोलामोलाचे आहेत, हे सत्य तिला पटते म्हणून तिला किंचित डिवचून तो म्हणतो–

चकला ना गे, चतुरपणा तव, माझ्या मार्गी तूच पुढे
नारि-नराच्या प्रेमावाचुन जगावरी या काय घडे ?
हत्रा कशाला कलह सांग हा आपसातला खुळ्यापरी
हारजीतिची हौसच खोटी, तुझी नि माझी बरोबरी !

ही शब्दकुस्ती समंजसपणामुळे अशी बरोबरीने सुटली पण या आखाड्यात बहुधा असे कधी घडत नाही. इथे सगळा अटीतटीचा नि चितपटीचाच मामला. 'चिमण्यांची शाळा' चित्रपटातल्या माडगूळकरी सवाल-जबाबांची ही दमदार चकमक ऐका–

ती–महेशमूर्ती तुम्ही सभाजन, करा निवाडा हवा तसा
तुरेवाल्याच्या उरी उठविते मी कलगीचा पाय ठसा !
तो– मर्यादेने बोल जराशी धर श्रोत्यांची भीड जरा
खडबडीने का पडले खाली विद्वत्तेचे चिन्ह तुरा !
ती– विद्वत्तेची उडविन पगडी मी जातिने नार तरी
सवालास दे जबाब माझ्या मग विद्वत्ता तुझी खरी !
तो–गाडा भरुनी ग्रंथ वाचले तुरा लाविला म्हणुनि शिरी
तू मातीची जिती बाहुली कर मुजरा अन् परत घरी !

अशा या पहिल्याच चकमकीनंतर ती सवाल पुसते–

ती–एकच पुसते सवाल त्याचे उत्तर दे मग बोल पुढे !
आभाळाहून काय थोरले, काय धाकटे तिळापुढे ?

या सवालाला तोंडातली पिंक टाकावी इतक्या सहजपणाने तो जबाब देतो–

तो–मन मनुष्याचे विशाल होते आभाळाहुन कधी कधी
कधी आकसुन होते हलके काचुन बसते तिळामधी !

हा जबाब ऐकून बहिणाबाई चौधरींच्या 'मन' या कवितेची सहज आठवण येते. 'मन एवढं एवढं, जसा खाकसाचा दाना। मन केवढं केवढं ? त्यांत आभाय मायेना ॥'– बहिणाबाईंनी तर तिळाहूनही लहान अशा खसखशीच्या दाण्याची उपमा मनाच्या लहानपणाला दिलेली आहे. ही जशी मनाबद्दलची आठवण, तशीच ह्या सवाल-जबाबांच्या सुरवातीला 'ती'च्या 'तोंडी 'महेशमूर्ती तुम्ही सभाजन' असे जे शब्द आलेले आहेत, त्यावरून श्रोत्यांना उद्देशून ज्ञानेश्वरांनी 'प्रभो, तुम्ही महेशाच्या मूर्ती' म्हणून जी विनवणी केली आहे तिची आठवण येते. संतसाहित्य काय, लोकसाहित्य काय, वेद-पुराणे नि महाकाव्ये हे सगळे प्राचीन साहित्य म्हणजे आपले सांस्कृतिक धन. संचित. त्यातून नित्य नवे असे आविष्कार फुलतच राहणार. माडगूळकरांनीच एके ठिकाणी म्हटले आहे, 'म्हणिले म्हणावे, जाणिले जाणावे, इथे देशीचिये क्षोणी, काय नव्याने सांगावे ?' याच भावनेचा, विचाराचा अनुसरणात्मक ध्वनी त्यांच्या पुष्कळशा रचनांमधून जसा ऐकू येतो, तसाच तो त्यांच्या सवाल-जबाबांमधूनही कानी येतो. 'चंद्राचे चांदणे शीतल का उष्ण ?' हा सवाल सगनभाऊही विचारतो आणि जुन्या उमानपदातही आढळतो.

'तो' ने 'ती' च्या सवालांचे 'मन' असा जबाब दिल्यावर 'ती' ला सवाल विचारण्यासाठी 'तो' वर पाळी येते. त्यावेळी तिने पुसलेल्या एवढ्या सामान्य सवालाची टवाळी करून तिला तो म्हणतो–

प्रश्नावरुनी कळते अक्कल आम्ही मापतो उंची ग
विद्वत्तेची शाल अम्हाला, तुला मुलाची कुंची ग !

यानंतर 'घड्याएवढ्या भोपाळ्याचा बोटभर वेल, आणि पाच पुरुष उंच वृक्षाची चिमुकली फळे कशी ?' असा एक मायेच्या सृष्टीतला उखाणा तिला विचारला आहे आणि सांगितले आहे–

दोन दिसाचा देतो अवधी उत्तर शोधून आण इथे
नाही गावले तर मग ठरले मस्तक बाई तुझे रिते !

अशा प्रकारे एकमेकांच्या बुद्धीची, ज्ञानाची टर उडवण्याची प्रथाच जणू पडलेली होती ! शाहीर परशरामाचा फड त्याच्या काळी खूपच गाजला होता. विरोधकांबद्दल गर्वोक्तीने तो असेच म्हणतो– 'परशरामाचे अजब भिन्हाके अशा फुकण्या मोजाव्या किती ?', 'शिकून शिकोरे गाती नाचति चुलिभाणोशा जवळी', होनाजीबद्दलही 'होना गवळ्याचा झाला चुना' असे त्याच्या एका विरोधकाने

म्हटले होते. शाहिरीतला हा प्रकार अटीतटीच्या शब्दझोंबीचा. हारजितीच्या महत्त्वाकांक्षेचा, आणि यात सहभागी होणारी, तसेच हे पाहणारी-ऐकणारी मंडळीही ग्रामीण, खेडूत, शेतकरी, मजूर, शिपाईगडी अशा समाजस्तरामधली ! त्यामुळे भाषेला रांगडा रंग चढलेला आणि ती रंगेल बनलेली !

'मल्हारी मार्तंड' चित्रपटातल्या सवाल-जबाबातली बकुळा आणि तिची दुसरी प्रतिस्पर्धी यांची ही शाब्दिक झटापट पहा-

बकुळा-

एक दाताचा दो मातांचा तीन आगळचा गोतांचा
चार भुजांचा देव कोण ग पाच थुलथुलित हातांचा ?

प्रतिस्पर्धी-

कोण लाभला गुरु एवढा प्यालीस अक्कल काढा ग
शाहिरकीच्या उजळणीतला हा तर पहिला पाढा ग !

अशी रेवडी उडवल्यावर ती सवालाचा जबाब देताना- अशी सलामीलाच तोडीस तोड तोंडावरती फेकते :

एकदंत श्रीगजाननाला कोण ओळखत नाही ग
सती पार्वती पहिली माता, दुसरी गंगामाई ग
सत्त्वरजांतुन देव वेगळा ही शास्त्राची वाणी ग
चार भुजांसह सोंडहि त्याची असते हातावाणी ग !

'देवा तुझी सोन्याची जेजुरी' या चित्रपटातील गदिमांनी लिहिलेले सवाल-जबाबदेखील खटकेबाज, मनोरंजक आहेत. कनातीत जमलेला श्रोतृवर्ग हा मनोरंजनाच्या अपेक्षेनेच गोळा झालेला असतो, याचे भान गदिमांच्या नर्तकीने राखलेले असले तरी मनोरंजनाबरोबरच ज्ञान, भक्ती आणि चातुर्य यांची उत्तम झलक या सवाल-जबाबातून दृष्टीस पडते :

गायिका-घुंगुर बांधुन उभी राहसी माझ्यापुढती जिद्दीनं
सुर-तालांनी नाच रंगतो, सवाल सुटती बुद्धीनं

नर्तकी-उभ्या जगातील बुद्धी दिधली तुलाच का ग देवानं
सांग सवाल, जबाब देईन, न्याय करावा गावानं

गायिका-देता देता अधिक वाढते, साठवणीचे फळ नाही
अशी संपदा सांग कोणती, दाव बुद्धीची चतुराई

नर्तकी-पदर पसरुनि तूहि मागशील, भीक दहादा मानाची
देता वाढे, सरे साचता, अशी संपदा ज्ञानाची
मनोरंजना समाज जमला, कशास गोष्टी ज्ञानाच्या

ऐक फेकते सवाल माझा, उघड ओंजळ कानाच्या
कानामध्ये झुलवित जोडी सुंदर बुगड्या-बाळ्यांची
काजळ फासुन करिती नारी विटंबना का डोळ्यांची
गायिका-कान ऐकती हरिगुण गायन, मिळे शांतता जीवाला
जडतेवरती जडती डोळे, बघू न शकती देवाला
भाविक नारी देती काना देणगी मोती-पवळ्यांची
काळे फासून धिंड काढती रस्तोरस्ती डोळ्यांची

नर्तकी-अग ज्ञान-भक्तिच्या करिशी गोष्टी झालिस का तू म्हातारी
हवा कशाला नाच तमाशा? बैस जाऊनी कांतारी
रसरंगाचा सवाल करते, नकोस बिचकू प्रश्नाने
सवती सवती कशा सुखविल्या एका वेळी कृष्णाने
गायिका-भामा आणि रुक्मिणी राणी बसल्या शेजाशेजारी
इतक्यांमध्ये आले अवचित शयनमंदिरी गिरिधारी
लाजलाजुनी उठल्या दोघी हासत सावरित पदराशी
एकावेळी दोघींवरती मोहुन गेले हृषिकेशी
पाठी येऊन नयन झाकले त्यांनी एका हसरीचे
उभ्या-उभ्याने मान कलवुनी ओठ चुंबिले दुसरीचे
तुझ्या सवाला दिली उत्तरे सवाल माझा घे कानी
पाण्यावरती फुलती कमळे जगात रानोरानी
आम्ही पाहिले कमळफुलातून पाणी पाझरताना
घडे कसा ग चमत्कार हा? केव्हा दिसतो नयनांना
नर्तकी-वसंतकाळी विरह कपाळी, नाथ रणांगणी जाई ग
कमललोचना तरुण नववधू डोळे गाळित राही ग
पिसाट शत्रू करिती अचानक देशावरती स्वारी ग
कमलामधुनी झरते पाणी तेव्हा शयनागारी ग
गायिका-शुभ्र पांढऱ्या कळ्या लहडती परी राहती आडाला
सळसळणारे एकच असते पान तांबडे झाडाला
त्या पानातून कधी झिरपते धुंद सुधेची गोडी ग
हलाहलाहुन कडू विषारी पाझर कधी तो सोडी ग
त्या झाडाचा, त्या पानाचा ठावठिकाणा तरी कुठे?
सांग नाही तर सभेत तूझे चतुरपण वांझोटे
नर्तकी- खाली फांद्या, मुळे शिरावर झाड मानवी गोताचे
कळ्या कशाच्या वर्णन केले शुभ्र पांढऱ्या दातांचे

जीभ तांबडी पानावाणी, गोड बोलते प्रीतीने
कडूपणाला तिच्या न सीमा, विश्व कापते भीतीने !

माडगुळकरी सवाल-जबाबांचे आणखी वैशिष्टय असे की, माडगूळकर हे काही कोणा एका फडाचे शाहीर नव्हते. सवाल-जबाब दोन फडांत होत असत आणि दोन फडांचे दोन वेगवेगळे शाहीर असत. एका फडाचा शाहीर सवाल टाकत असे तेव्हा जी लावणी तो रचत असे, तिला ' चढावाची लावणी ' म्हणत असत आणि त्याच्या जबाबादाखल जी लावणी दुसरा शाहीर रचत असे, तिला ' उताराची लावणी ' म्हणत असत.

माडगूळकरांनी चित्रपटातील फडासाठी रचना केल्यामुळे चढावाची आणि उताराची म्हणजे सवाल आणि जबाब हे दोन्हीही एकाच वेळी त्यांना रचावे लागले आहेत. मराठी शाहिरीत असा एकानेच प्रश्न व त्याचे उत्तर अशी रचना केल्याची क्वचित काही उदाहरणे आहेत, पण ती फारच अल्प आणि एकाच वेळी एकाच बोर्डावर दोन्ही फडांसाठी अशी रचना तर केवळ माडगूळकरांनीच केलेली आहे. चित्रपटांसाठी ही रचना असल्यामुळे ती वेळेचे भान ठेवून दोन, चार, सहा एवढ्या ओळींचेच सवाल व जबाब यांना बांधावे लागलेले आहेत.

□

१०

# माडगूळकरी पोवाडे

मराठी शाहिरी वाङ्मयात पोवाडा आणि लावणी यांचा समावेश होतो, किंबहुना पोवाडा आणि लावणी म्हणजेच शाहिरी वाङ्मय असे समजले जाते. याशिवाय शाहिरी वाङ्मयात भेदिक, डफगाणे, देहावरचे गाणे, सवाल-जबाब, गण-गौळण, पदे इत्यादी साहित्यप्रकारही येतात. परंतु पोवाडा व लावणी यांची रचना विपुल झाली आणि ती जनसामान्यापर्यंत पोचलीही ढंगदारपणाने. त्यांचे विषय हे नित्यजीवनातले होते. म्हणून ते लोकांनाही आपलेच वाटले. शिवाय त्यांची जडणघडण ही शुद्ध मऱ्हाटी होती. मराठमोळे लोकजीवन या रचनेत चित्रित झालेले होते. रांगडे रंगेल आणि फाकडे रगेल अशी या लोकजीवनाची भिन्न दिसणारी पण एकच असणारी बाजू आहे. मराठी शाहिरांनी डफावर कडकडीत थाप हाणून पराक्रमाच्या वीरगाथा पोवाड्यांतून गायल्या आणि ढोलकी-तुणतुण्याच्या व घुंगराच्या नादावर लावण्यवती लावणीही फुलवली. 'महाराष्ट्र-सारस्वत' कार भावे म्हणतात, 'वीररसाशिवाय पवाड्याची बहार नाही आणि शृंगाराशिवाय लावणीची मजा नाही. असे हे कवनांचे दोन प्रकार बाहेरून दिसण्यात जरा विरोधी दिसतात खरे; परंतु ते विरोधी किंवा भिन्न नसून ती एकाच वीररसाची दोन अंगे आहेत. दोन निराळी रूपे आहेत. ज्या पुरुषांच्या अंगात सामर्थ्य आणि वीररस पूर्णपणे खेळत असतील त्यांनाच त्यांचे रहस्य व मर्म कळेल आणि त्यांनाच त्यापासून आनंदाच्या गुदगुल्या होतील...'

राम जोशी, होनाजी, अनंत फंदी, प्रभाकर, सगनभाऊ, परशराम आदी नामवंत शाहिरांनी पोवाडा आणि लावणी या दोन्हीही प्रकारची बहारदार

रचना करून मराठी शाहिरी संपन्न केलेली आहे.

या संपन्नतेत, अर्वाचीन काळात, तशीच अस्सल शाहिरी रचना करून शाहीर ग. दि. माडगूळकर यांनी मोलाची भर घातली आहे, याची दखल घेणे आवश्यक आहे.

गदिमांची प्रतिभा तशी बहुगुणी, बहुरंगी आणि बहुढंगी होती. किती तरी विविध तऱ्हेचे काव्यप्रकार त्यांनी यशस्वीपणे हाताळले आहेत. त्यावर आपला असा 'माडगूळकरी' ठसाही निःसंशय उमटविलेला आहे. माडगूळकरी लावणी चित्रपटामुळे जेवढी घरोघर पोचली आणि तोंडोतोंडी बसली तेवढे त्यांचे पोवाडे पोचले नाहीत. हे खरे असले तरी, हा त्या दोन वाङ्मयप्रकाराच्या प्रकृतीतलाच फरक आहे. लावणीची रचना सुटसुटीत, सुरेल आणि जेवढी दिलखेचक तेवढी पोवाड्याची नाही. वीररसाचे आकर्षण रसिकाला असते हे खरे, तरीसुद्धा शृंगाराचे प्रलोभन अधिक. त्यामुळेही पोवाड्यापेक्षा लावणीच पुढे सरसावलेली दिसते. आणि हे गदिमांच्याच बाबतीत असे घडलेले नसून राम जोशी, होनाजी आदी बहुतेक सर्वच शाहिरांच्या बाबतीत घडलेले दिसते. मात्र मराठी मनाला लावणी-प्रमाणेच पोवाड्यानेही रिझवलेले आहे हे खरेच. 'पोवाडा किंवा पवाडा म्हणजे वीरांच्या पराक्रमांचे, विद्वानांच्या बुद्धिमत्तेचे, तसेच एखाद्याच्या सामर्थ्य, गुण, कौशल्य इत्यादी गुणांचे काव्यात्मक वर्णन, प्रशस्ती किंवा स्तुतिस्तोत्र' अशी व्याख्या कोशकारांनी केलेली आहे. मराठी शाहिरी वाङ्मयाचे गाढे अभ्यासक श्री. म. ना. सहस्रबुद्धे यांनी पोवाड्यांचा परामर्श घेताना म्हटले आहे की, 'एखाद्याची एखाद्या चांगल्या कामाबद्दल स्तुती करण्याची रीत वैदिक कालापासून चालत आलेली आहे. वैदिक वाङ्मयातील गाथा या अशाच स्तुतिपर आहेत. त्यांतल्या नाराशंसी किंवा नरप्रधान गाथा म्हणजे महापुरुषांच्या आयुष्यातील महत्त्वाच्या प्रसंगांवर व त्यांच्या दानशूरतेबद्दल रचलेले पोवाडेच आहेत. अथर्ववेदात परीक्षितगाथांचा उल्लेख आहे. त्याचप्रमाणे सम्राटाभिषेक झाल्यावर इंद्र आसंदीवर बसला असता, विश्वेदेवांनी अभ्युत्क्रोश केला, असे ऐतरेय ब्राह्मणांत म्हटले आहे. हा अभ्युत्क्रोश म्हणजे इंद्राचे गुणसंकीर्तनच होय, असे सायनाचार्यांनी त्यावर भाष्य केले आहे. इंद्राला त्याच्या पराक्रमाची आठवण करून दिल्यावर तो अधिक उत्साहसंपन्न व कार्यक्षम होईल, या हेतूने विश्वेदेवांनी त्याचे हे स्तुतिस्तोत्र गायिले आहे. हाच अभ्युत्क्रोश कालौघात परिवर्तन पावला. यादवकालात भाटांच्या बिरुदगायनात प्रकट झाला आणि तोच पुढे शिवकालात भाटांच्या जागी आलेल्या शाहिरांच्या मुखाने पोवाड्यात प्रकट झाला ..'

शिवकालातला शिवाजीमहाराजांवर पहिला पोवाडा लिहिणारा आणि महाराजांना तो ऐकवणारा पहिला शाहीर अज्ञानदास याने जी ही तेजस्वी परंपरा

मराठी काव्यसृष्टीत सुरू केली ती पुढे अनेक शाहिरांनी अनेक प्रकाराने पोवाडे रचून, म्हणून टिकवून धरली. या शाहिरांनी आपल्या पोवाड्यातून देशस्थिती, समाजस्थिती, लोकजीवन यांचेही दर्शन घडवलेले आहे. त्या त्या काळातले पडसाद मराठी पोवाड्यांत उमटलेले आहेत. म्हणून इतिहासाचार्य राजवाडे यांच्यासारख्या पंडितांनी सुद्धा 'पोवाडे हे इतिहासाचे साधन आहे,' अशी भलावण केलेली आहे.

देशभक्ती, स्वातंत्र्यप्रेम, राष्ट्रनिष्ठा ह्या पवित्र, तेजस्वी भावना लोकमानसापर्यंत नेऊन त्या तिथे रुजविण्याच्यादृष्टीने पोवाडा हे एक फार प्रभावी माध्यम आहे. पोवाड्यातले हे मर्म किंवा बलस्थान राष्ट्रभक्त कवींनी आधुनिक काळातही जाणलेले होते. आणि म्हणूनच स्वातंत्र्यवीर सावरकर, स्वातंत्र्यकवी गोविंद यांच्यासारख्या कविश्रेष्ठांनीही पोवाडे लिहिले आणि जनजागृतीचा प्रयत्न केला. अलीकडे स्वातंत्र्यगीताबरोबरच राष्ट्रीय आंदोलन, हुतात्मे व लो. टिळक, म. गांधी यांच्यासारख्या विभूतींवरही वसंत बापट, ग. दि. माडगूळकर यांच्यासारख्या प्रतिभावंतांनी पोवाड्यांची ओजस्वी रचना केलेली आहे.

अण्णाभाऊ साठे, अमरशेख, गव्हाणकर यांनीही साम्यवादी प्रचाराचे पोवाडे लिहिले. सत्यशोधक चळवळीतही तमाशा आणि पोवाडा यांचा प्रचारासाठी उपयोग करून घेण्यात आलेला होता. दारूबंदी, सुधारणा वगैरे विषयांवरही काही शाहिरांनी पोवाड्यांची रचना केली आहे. कोल्हापूरचे शाहीर पिराजी सरनाईक, नानिवडेकर, लहरी हैदर ह्यांच्याही रचना प्रसिद्ध आहेत. लहरी हैदरांचा फॅशनवरचा पोवाडा गाजला होता. ग. दि. माडगूळकर याच लहरी हैदरांना शाहिरी रचनेच्या संदर्भात गुरुस्थानी मानत होते. पिराजी सरनाईक व नानिवडेकर यांनी गायिलेले माडगूळकरी पोवाडे ध्वनिमुद्रितही झालेले आहेत.

गदिमा त्या काळात, म्हणजे सुमारे ४५ ते ५० वर्षांपूर्वी, ऐन तरुण वयात कोल्हापुरी असताना 'कवी अमर' या नावाने काव्यरचना करीत असत. पिराजी सरनाईक यांनी गायिलेल्या त्यांच्या एका लावणीचा शेवट अन्य शाहिरांच्या पारंपरिक रचनेप्रमाणेच असा झालेला आहे :

म्हणे अमर कविराव । बघा पैक्याचा प्रभाव ।  
हीच तऱ्हा गावोगाव । शाहीर पिराजी उजेडात आणी ।।

कवी-रचनाकार आणि म्हणणारा शाहीर, अशा दोघांचीही नाममुद्रा रचनेत गुंफलेली असे. म्हणणारा व रचणारा दोघांनाही शाहीर म्हटले जात असे. रचना करणाराच आपली रचना म्हणतही असे.

'समर्थांचे सामर्थ्य' नामक रामदासांवरील पोवाड्याच्या अंतीही अशा ओळी आहेत–

धन्य कवीची माय अमर त्या कविराया व्याली।
शाहिर पिराजी कवने गाऊन मोह जगा घाली ॥

त्यानंतर पुढे लिहिलेल्या 'लोकमान्य टिळक' किंवा 'हुतात्म्यांना वंदन' या पोवाड्यांच्या अंती, तसेच पुढे लिहिलेल्या कित्येक लावण्यांच्या शेवटी देखील ही नाममुद्रा आढळत नाही. गदिमांनीच केव्हातरी तिला आपल्या रचनेतून विर्सजित केलेले दिसते.

लावणीत शृंगाराने लवथवलेली किंवा भावगीतात हळुवार भावनेत भिजलेली माडगूळकरांची लालित्यपूर्ण शब्दकळा पोवाड्यात अवतरताना कशी कडकडीत, रुद्रावतार धारण करून येते–

कोकणचे काळे मावळे। झेंड्याखाली आले
सरसावून भाले।
घालता साद शिवबाजींनी। पाडिले उलथुन राज्य यवनी।
तशी काहीतरी करा करणी। जी ऽ जी ऽ जी ऽ

गदिमा जेव्हा एखादा काव्यप्रकार हाताळतात तेव्हा ते त्यातील सर्व वैशिष्ट्ये बारकाव्यासह आत्मसात करून आपल्या प्रतिभेचा ठसा उमटवून साकार करतात. शिवकालापासून मराठी पोवाड्यांची एक पारंपरिक रचना सिद्ध झालेली आहे. रचनेप्रमाणेच त्या प्रकाराचीही एक संकल्पना रूढ झालेली आहे. गदिमा ह्या सर्वांसह किंबहुना त्याहून सरस अशी रचना पुढे ठेवतात. अन्य काव्यप्रकारांप्रमाणे पोवाड्यावरची त्यांची पकडही लक्षात यायला उशीर लागत नाही. तसे पाहिले तर गदिमांचे हाताच्या बोटांवर मोजता येतील एवढे ८-१० पोवाडेच असतील. 'समर्थांचे सामर्थ्य', 'धर्मवीर संभाजी', 'लो. बाळ गंगाधर टिळक', 'अण्णासाहेब खाजगीवाले', 'राष्ट्रीय सभा कॉंग्रेस', 'बेचाळीसचा संग्राम', 'हुतात्म्यांना वंदन', 'शारदेचा दरबार', असे काही पोवाडे त्यांच्या नावावर आहेत. काही त्या काळी छोट्या पुस्तिकारूपाने छापलेले होते, काहींच्या ध्वनिमुद्रिका होत्या, तर काही तोंडोतोंडीच होते, म्हणून आज उपलब्धही होत नाहीत. कारण 'अशाश्वत संग्रह कोण करी' असे एक पालुपद ते आळवीत असत. त्यानुसार त्याची प्रत, कात्रण, काहीच नाही. बेचाळीसच्या क्रांतीच्या वेळी शाहीर निकमांच्या तगाद्याने जे लिहिले ते त्यांना देऊन टाकले. निकमांनी आपल्या बुलंद आवाजात ते म्हटले, सारा सातारा प्रांत जागा केला आणि नंतर ते विस्मृतीच्या अडगळीत लुप्त झाले ..

आपल्या पवाडरचनेच्या प्रेरणेविषयी 'मंतरलेले दिवस' नामक सुंदर लेखात गदिमाच म्हणतात, 'सावरकरांचे पोवाडे मी मुलांना वाचून दाखवले होते. जुन्या हेंगाड्या पोवाड्यांपेक्षा त्या पोवाड्यांची रचना मला आवडली होती.

'थांबा बाजी, जखम जराशी बांधू या थांबा
हरहर रणिचा ऐकुन वीरा, उसळू नका थांबा।'

-अशांसारख्या ओळी मी इतक्या साभिनय वाचल्या होत्या की, आश्रमातली पोरे शहारून गेली होती. सारी रात्र ती ऐतिहासिक कथा ऐकत जागली होती.

सावरकरांसारखे पोवाडे आपण लिहावे आणि शंकर निकमाला 'स्वातंत्र्य शाहीर' करावे हे मी मनाशी पक्के ठरविले होते ..

गदिमांच्या वृत्तीतच स्वातंत्र्यप्रेम होते. पारतंत्र्याबद्दल चीड होती. ही चीड, संताप त्यांच्या शब्दांच्या ठिणग्यांतून विलक्षण आवेशाने व्यक्त होतो. ही वानगीच पहा--

प्रसंग आहे संभाजीमहाराजांना औरंगजेबापुढे दरबारात कपटाने कैद करून आणले आहे. औरंगजेब त्यांना मुसलमानी धर्म स्वीकारलास तर जीवदान व सरदारकी देतो, असे आमिष दाखवीत आहे. धर्मवीर संभाजीराजांना याची विलक्षण चीड आलेली आहे. त्यांची धर्मनिष्ठा, स्वाभिमान दुखावला गेलेला आहे-

जखडुनी बेडचा पायाला। खेचुन दोरखंडाला।
महाराणा तेथे आणला। ताठ्यात पुढे येऊन वीर ठाकला।
बेफिकीर चेहरा पाहून शहा गांगरला।
'तबीयत है क्या ठीक आपकी ?' बोले कपटाने।
होकाराची मान हलविली शूर मराठ्याने।
'बच्चेसरिका तू हैं मुझको समज बात मेरी।
जब मानोगे कहना मेरा दुंगा सरदारी।'
भुवया चढवुन संभाजीने कथिले मग त्याला।
'काय सांगता बोला आलमगीर स्पष्टपणे बोला।'
'पत्थर-पूजा करनेवाला धर्म छोड तेरा।
प्यारा खुदाका धर्म इस्लाम ले ले तू मेरा।
'काफिरा' म्हणे शंभूला। या क्षणी मारीन तुला।
शेवटच्या ऐक वचनाला। हो मुसलमान समयाला
जीवदान देऊनी करीन सरदार तुला॥'
संभाजी हसून बोलला। 'सरदारी ठेव शिलकिला
बाटवा कोल्ह्या-कुत्र्याला। तुझी बेटी देऊनि मला।
जावई जरी त्वां केला। लाथेच्या ठोकरीनं उडवीन त्या मोहाला॥'

प्रसंग-चित्र आणि प्रसंग-नाट्य या दोन्ही दृष्टींनी ही रचना केवढी प्रभावी आहे!

चित्रमयता हे माडगूळकरांच्या गद्य-पद्य लेखनातलेच वैशिष्ट्य आहे. चित्रपटासाठीच पुष्कळसे लिहावे लागल्यामुळे त्यांना कॅमेऱ्याचा एक विशेष डोळाच लाभलेला होता. त्यामुळे कॅमेरा जसे यथातथ्य चित्र टिपू शकतो, तशीच क्षमता माडगूळकरी प्रतिभेमध्ये अंतर्भूत होती. त्याचीही वानगी त्यांच्या एका पोवाड्यातील वर्णनावरून पाहायला मिळते. पोवाडा आहे 'अण्णासाहेब खाजगीवाले' यांचा आणि वर्णन आहे भोजनाच्या पंक्तीतील एका वाढलेल्या पानाचे. पेशवाईत जेवणाचा थाटमाट कसा असे, हे नाना फडणीसांनी श्रीमंत माधवरावांच्या लग्नप्रसंगी भोजन-पंक्तीसाठी काय काय नि कसे कसे पदार्थ असावेत याची जी सूचनायादी केलेली आहे तिच्यावरून लक्षात येते. नानांच्या त्या यादीची आठवण व्हावी असाच हा थाट आहे. पण माडगूळकरांनी किती चित्रमय अशा रंगीत शैलीने तो चितारलेला आहे पहा तरी–

काय वाढले पानावरती । ऐकुन घ्यावा थाट संप्रती ।
धवल लवण ते पुढे वाढले । मेतकूट मग पिवळे सजले ।
आले लोणचे बहु मुरलेले । लिंबु कागदी रसरसलेले ।
किसुन आवळे मधूर केले । कृष्णाकाठचे वांगे आणले ।
खमंग त्याचे भरीतच केले । निरनिराळे चटके नटले ।
चटण्यांचे बहु नवे मासले । संमेलनचि त्यांचे भरले ।
मिरची, खोबरे तीसह ओले । तीळ भाजुनी त्यात वाटले ।
कवठ गुळांचे मीलन झाले । पंचामृत त्या जवळी आले ।
वास तयांचे हवेत भरले । अंतरी अप्पा अधीर जाहले ।
भिजल्या डाळीनंतर आल्या । काही वाटल्या काही मोकळ्या ।।
काही वाटुन सुरेख तळल्या । कोशिबिरीच्या ओळी लागल्या ।
शुभ्र काकड्या होत्या किसल्या । मुळा कोवळा मिरच्या ओल्या ।
केळी कापुन चकल्या केल्या । चिरून पेरू फोडी सजल्या ।
एकरूप त्या दह्यात झाल्या । भाज्या आल्या आळू, घोसाळी ।
रानकारली वांगी काळी । सुरण, तोंडली आणि पडवळी ।
चुका, चाकवत, मेथी कवळी । चंदनबटवा, भेंडी कवळी ।
फणस कोवळा, हिरवी केळी । काजुगरांची गोडी निराळी ।
दुधी भोपळा आणि रताळी । किती प्रकारे वेगवेगळी ।
फेण्या पापड्या आणि सांडगे । कुणी आणुनी वाढी वेगे ।
गव्हल्या, नकुल्या धवल मालत्या । खिरी तयांच्या शोभत होत्या ।
शेवयाच्या खिरी वाटल्या । आमट्यांनी मग वाट्या भरल्या ।
सार गोडसे रातांब्याचे । भरले प्याले मधुर कढीचे ।
कणीदार बहु तुप सुगंधी । भात वाढण्या थोडा अवधी । ..

वगैरे वगैरे वगैरे ! केवढा थाट ! किती पदार्थ ! कसे त्यांचे वैशिष्ट्य ! आणि केवढे बहारदार वर्णन ! वाचून देखील तोंडाला पाणी सुटावे आणि जठराग्नी क्षुब्ध व्हावा !

पोवाड्यातला हा माडगूळकरी भोजनकटाव सुरेख नि चित्तवेधक आहे.

जुन्या पोवाड्यांमध्ये तत्कालीन समाजस्थितीचे चित्रही आढळते. माडगूळकरी पोवाड्यातही पेशवाईतले आणि आंग्लाईतले पुणे दृष्टीस पडते.

लोकमान्य टिळकांचा पोवाडा गदिमांनी लिहिलेला आहे. प्रारंभी म्हटले आहे–

गणपति हे विद्यापति । मला दे मति ।
गातो पोवाडा । गातो पोवाडा ।
श्रोत्यांनो कवि संगति । करावे गोडा ।
करावे गोडा । जी जी...
हिंदुस्थान देश पुरातन । दैवसंपन्न । भाग्यसंपन्न ।
धुरंधर पुरुष जन्म घेती । युगंधर पुरुष जन्म घेती ।
कृतीने जगद्वंद्य होती ।
त्रिखंडी अशी अमर ख्याति । जी जी...
जगद्वंद्य महापुरुषात । श्रेष्ठ निश्चित ।
टिळक बळवंत । टिळक बळवंत ।
तयांचे पुण्यस्मरण होता । मनी साकार होई गीता ।
लोचने मिटुन झुके माथा । जी जी ..

टिळक म्हणजे मूर्तिमंत गीता ! कर्मयोगी टिळकांची अतिअल्प शब्दातली. केवढी थोर नि उचित शब्दरेखा ! याच टिळकपर्वात पुण्यात प्लेगने थैमान मांडले होते. घरोघर लोक प्लेगने मृत्यू पावत होते. पण ह्या अस्मानीबरोबरच इंग्रजी सत्तेची सुलतानीही तेवढीच लोकांच्या बोकांडी बसलेली होती. रँडसाहेबाने लोकछळ आरंभला होता. धुमाकूळ माजवला होता. शाहीर माडगूळकरांच्या लेखणीने हा अत्याचार–छळ वर्णिलेला आहे–

टिळकांच्या राजधानीत । पुणे नगरात ।
आला अकस्मात । प्लेग तो सत्त्याणव सालात ।
अडकले पुणे मृत्युदारात । उडाला हाहाकार आकांत । जी जी...
अस्मानी तीच सुलतानीची लाट एक आली ।
दो पाळ्यांचे दगडी जाते पुणे तयाखाली ।
रोगनिवारक म्हणूनि आले दूत इंग्रजांचे ।
रोगाहुनीही भीषण झाले जाच सोजिरांचे ।

बेगुमान अंमलदार । रयतेला छळती फार । जी जी ..
फोडुनि घराचे दार । घुसविती आत पेंढार । जी जी...
चिट ओली बाळंतीण । काढिती तिला ओढून ।
देव्हारा गुंडाळून । फेकिती मूर्ति उचलून ।
न्यायाची नुरली याद । अर्जाची कसली दाद ।
लोपले जनांचे साद । आणि रुजलासा दबला नाद ।
अबलांच्या अंगावरती । टाकिती सोजिरे हात ।
रक्षावे, त्यांनी केला । जनतेचा ऐसा घात । जी जी...
मवाळातही क्रोध उपजला । बघूनी त्या लीला ।
का न सुचावी समरगर्जना । टिळक केसरीला ।
लोकमान्य की जय ।
जळजळित टिळक लेखणी । सरकारा झाडी ।
काढि वाभाडी । भीतीचा उरि लेश नाही ।
'केसरी' स्पष्ट म्हणूनि जाई । जाहली सुरू रँडशाही । जी जी...

माडगूळकरांच्या बेचाळीसच्या क्रांतीवरील पोवाड्यातही त्यावेळच्या पोलिसी अत्याचारांचे वर्णन आहे–

सन एकोणिसशे बेचाळिसात । ऑगस्ट महिन्यात । मुंबई नगरात ।
ठराव पास झाला स्वराज्याचा ।
मूहूर्त झाला अंतिम युद्धाचा ।
गर्जल्या पुढाऱ्यांच्या वाचा । जी ऽ जी ऽ जी ऽ
पकडले महात्मा गांधी । सर्वांच्या आधी । बुद्धिचा निधी ।
जवाहरलाल कैद झाला ।
पकडले आझाद पटेलांना ।
अटक झाली सरोजिनीदेवीला ।
पकडले पुढारी सारे । देशात सांगती वारे । जी ऽ
कल्लोळ पाखरे करिती । संग्रामगीत घुमविती । जी
ठायीठायी फडकले झेंडे ।
गोऱ्यांची उतरली तोंडे । जी
चहुकडून पेटली आग देश धगधगला । जी
शहरोशहरी नोकरशाहीनं हल्ला चढविला । जी
गोळीबार लाठीमाराला, ताळ ना उरला । जी
पोलिसांनी गळ्यात कुत्र्याचा पट्टा घातला । जी
कुऱ्हाड दांडा बघा कसा आला काळ गोताला । जी

असे त्यावेळच्या अत्याचाराचे वर्णन केल्यावर साताऱ्यातल्या प्रतिसरकारच्या लढ्यात भाग घेण्यासाठी जनतेला आवाहनही केलेले आहे. शाहिरी पाणी आणि लेखणी अशा केवळ वर्णनातच गुंतलेली नव्हती. खरं तर अशा वर्णनाचा हेतूही लोकमानसात अत्याचाराविषयी तीव्र चीड निर्माण व्हावी असाच होता. अन्याय, अत्याचार, गुलामगिरी यांच्याशी दोन हात करण्यासाठी शाहिरांनी जनतेला सादही घातली होती. माडगूळकरांची जळजळित लेखणी लोकांना उठवताना म्हणते–

एक पाय तुमच्या गावात । दुसरा तुरूंगात ।
किंवा स्वर्गात । तमा नाही त्याची शाहिराला ।
गुलामी उभी जाळण्याला । वाणीचा हिलाल पेटविला । जी
नका घेऊ नुसते ऐकून । बोला कोण कोण ।
घरटं सोडून । गरुड होऊन उंच उडणार ।
देशापायी स्वर्गलोकी जाणार । धरणीवर अमृतास आणणार ।।
पूर्वजांचा पराक्रम स्मरा । बलिदान करा । प्राण अंथरा ।
आम्ही स्वातंत्र्य खास आणणार । त्याला प्रतिबंध जे जे करणार ।
दिवा नाही त्यांच्या वंशी राहणार । जी जी ।

बेचाळीसच्या लढ्यात किंवा पूर्वीच्या लढ्यात आणि वैयक्तिक साहसाने देखील स्वातंत्र्यभावनेने पेटून ज्यांनी प्राणाची बाजी लावली, तेजस्वी बलिदान करून हौतात्म्य पत्करले अशा वीरगतीला पोचलेल्या 'हुतात्म्यांना वंदन'ही माडगूळकरांनी एका पोवाड्यात केले आहे. हा पोवाडा नुसताच ओजस्वी, ऊर्जस्वल नाही, तर भारतीय स्वातंत्र्यासाठी बलिदान करणाऱ्यांची वीरगाथाही यात गुंफलेली आहे. भारतमातेच्या दरबारात हे मानकरी मोठ्या मानाने जमले आहेत. त्यांच्या नामावलीचे व पराक्रमाचे हे संकीर्तन म्हणजे पवित्र वीर नामस्तोत्रच आहे :

माय माउली भारत माते, घे पहिला मुजरा ।
स्वातंत्र्याचा उमदा शाहीर आला दरबारा ।। जी-जी–
घडण कराया स्वातंत्र्याची स्वर्गी जे गेले ।
वीर हुतात्मे दरबारी तव मानाने बसले ।।
सशस्त्र क्रांती ध्वजा जयाची त्रिखंडात फडके ।
स्वतंत्रते तव बाळ लाडके वीरमणी फडके ।।
एक हुतात्मा बळी दोन परि पाडियले समरा ।
क्रांतिदेवीचा थोर पुजारी मदनलाल धिंगरा ।
गणेशखिंडीमधी घेऊनी वेध सावजाचा ।
चाफेकर हे खून योजिती रॅन्डसाहेबाचा ।

सान वयाने थोर कृतीने शौर्याचे सिंधू ।
लवांकुशापरि वंद्य अम्हाला कान्हेरे बंधु ।
नाटचगृहामधि सशस्त्रतेचा उघडूनिया पडदा ।
या वीरांनी आडवा केला जॅक्सनचा मुडदा ।।
अचाट सत्तेविरुद्ध फुंकून बंडाचे शिंग ।
फासावरती होती चिरंजीव वीर भगतसिंग ।।
मरणावरती स्वार होऊनी जाई सुखेनैव ।
हौतात्म्याचे सौख्य लुटी तो तरणे सुखदेव ।।
क्रांतिकारका गुरू शोभतिल राजगुरू नित्य ।
काळचा पाण्यावरी डांबले बटुकेशर दत्त ।।
सोलापुरच्या अत्याचारा थोपविण्यासाठी ।
न्यायाकरिता तोंड उघडिता पडले धनशेट्टी ।।
इतिहासीही पूर्वज ज्यांचे राष्ट्राचे बंदे ।
सहज घालिती मिठी मरणाला बहादूर ते शिंदे ।।
छाती काढुनि जिंकी मरणा देशभक्त करडा ।
मल्लाप्पाच्या संगे स्वर्गा गेले की सारडा ।।
फर्ज वतन का आदा करने मारा तू मौतको ।
कुर्बान किया है जान हुसेन तू कुर्निसात तुझको ।।

जालियनवाला बागेमधला तो अत्याचार ।
स्मरण ठेवुनि सूड घ्यावया टपला जो वीर ।।
दोन तपांनी डाव साधला ओडवायर मेला ।
मारुन त्याला मरता मरता उधमसिंग हसला ।।
भलेबहादूर हीच रीत रे गनिमीकाव्याची
तुझ्या यशावर कवी गुंफतिल शतके काव्याची ।।
मृतवीरांनो, तुमची स्फूर्ती संचारुन अंगी ।
आज मितीला तरुण रंगले पुनरपि रणरंगी ।।
बेचाळीसची क्रांती राहील अमर इतिहासी ।
प्राणपणाने लढले लाखो प्यासी, उपवासी ।।
बेचाळीसच्या लढ्यात मरुनी अमरपदी गेले ।
या, ते तुम्ही वीर मर्द हो, दरबारी सगळे ।।
या दरबारी जागा तुमच्या खास राखलेल्या ।
तुमच्या पायी पायघड्या या प्राणांच्या केल्या ।।
वंदे मातरम् ! वंदे मातरम्...झाली ललकारी ।

बेचाळीसचे विजयी योद्धे आले दरबारी ।।
' निगा रखो महाराज जरा तुम आदतसे उठना । '
हेमुकलानी आला मिरवित क्रांतीचा बाणा "
सैन्य शिबंदी घेऊनि आले, आले कोतवाल ।
खालि करा रे नजरा अपुल्या डोळे दिपतील ।।
नोकरशाही परी मिरविते हिजड्याची नीती ।
बेसावध या वीरालागी ठार कुणी करिती ।।
हाय, हाय ! जरि आले त्यांना बेसावध मरण ।
त्यांच्यामागे सावध होऊ आपण सारेजण ।।
नीच अशा या सरकाराला फसवुन ठेचावा ।
कपटनीतीचा काटा कपटे खुशाल काढावा ।।
स्वातंत्र्याच्या मार्गी टाकले पाऊल शिवबांनी ।
कल्याण खजिना मार्गावरुनी आणविला लुटुनी ।।
सत्यासाठी नित्य लुटावा सत्तेचा पैसा ।
शिवरायांनी घालुनि दिधला धडाच हा ऐसा ।।
गारगोटीचा खजिना लुटता सापडले वीर ।
गारगोटिच्या पायी हरपले हिरे कोहिनूर ।
मानाचे द्या पानविडे ह्या वीर वारक्यांना
या वीरांना पाहुन श्रोते वाकवाच माना ।
सिंधूत घेई करुनि अपुले बिंदु आत्मार्पण ।
कोल्हापुरचा बळी धन्य तो बिंदु नारायण ।।
कुस्ती लढता सरकाराशी परशुराम पडला ।
वडुज गावचा खुनी आखाडा त्याने गाजविला ।।
मायभूमिचा लाल लाडका पंड्याही पडला ।
पराक्रमी जणू आमुचा अर्जुन कसा कुठे दडला ?
इस्लामपुरचे दोन फरारी चुकवुन सरकारा ।
पृथ्वी सोडून देवलोकी ते करिती पोबारा ।।
स्वर्गलोकिचे तीन फरारी इथे सर्व जमले ।
शाहिराच्या रसवंतीला म्हणुन स्फुरण चढले ।।
मृतवीरांना करा मंडळी लक्षवार नमने ।
कान करुनी जीवाचे मग ऐका ही कवने ।।

ह्या कवनांची थोरवीच तशी श्रेष्ठ आहे यात काय संशय ! ती थोरवी गाता-गाताच गदिमांनी या कवनात आपल्या सुभग रचनेचे चातुर्य तर ठायी ठायी

११

# माडगूळकरांची स्तवने

देव–देवतांचे किंवा असाधारण व्यक्तिमत्त्व लाभलेल्या विभूतींचे स्तवन किंवा स्तोत्र गाण्याची परंपरा भारतीय संस्कृतीत आहे. संस्कृत साहित्यात जशी देव-देवतांची अनेक स्तोत्रे आढळतात तशीच मायबोली मराठीतही दिसतात. व्यंकटेश स्तोत्र, शनी माहात्म्य, रामरक्षा, हिंदीत हनुमानचालीसा, इत्यादी स्तोत्रे सर्वसाधारण लोकांच्या तोंडी असतात.

शाहिरी वाङ्मयात 'कीर्तिकाव्य' नावाचा प्रकार 'पोवाडे' या नावाने प्रसिद्ध आहे. या पोवाडे-प्रकरणाचा परामर्श गदिमांनी रचलेल्या पोवाड्यांच्या संदर्भात घेतलेलाच आहे. पोवाड्यातही स्तवनच असते. परंतु पोवाड्याचा स्वतंत्र असा एक ढंग असतो, धाटणी असते, बंदिश असते.

गदिमांनी जसे पोवाडे रचलेले आहेत तशीच प्रसंगानुरूप काही स्तवनेही रचलेली आहेत. त्यांच्या उपलब्ध स्तवनांकडे दृष्टी टाकल्यास राष्ट्र, राष्ट्रध्वज आणि राष्ट्रपुरुष यांची प्रशस्ती अभिमानाने गायिलेली दिसून येते.

आपला प्रियतम भारत देश किती महान आहे हे एका स्तवनात गदिमांनी ओजस्वी शब्दात शब्दबद्ध केलेले आहे. 'या महान राष्ट्राचे स्वातंत्र्य पृथ्वीतलावर जोवर सूर्य-चंद्र उगवत आणि मावळत आहेत तोवर अखंड राहो' अशी चिरंजीवी प्रार्थनाच या स्तवनात त्यांनी केलेली आहे :

हे राष्ट्र देवतांचे, हे राष्ट्र प्रेषितांचे
आचंद्रसूर्य नांदो, स्वातंत्र्य भारताचे ॥ धृ. ॥

कर्तव्यदक्ष भूमी, सीतारघूत्तमाची
रामायणे घडावी, येथे पराक्रमाची
शिर उंच उंच व्हावे, हिमवंत पर्वताचे
आचंद्रसूर्य नांदो, स्वातंत्र्य भारताचे ॥ १ ॥
येथे नसो निराशा, थोडया पराभवाने
पार्थास बोध केला, येथेच माधवाने
हा देश स्तन्य प्याला, गीताख्य अमृताचे
आचंद्रसूर्य नांदो, स्वातंत्र्य भारताचे ॥ २ ॥
येथेच मेळ झाला, सामर्थ्य संयमाचा
येथेच जन्म झाला, सिद्धार्थ गौतमाचा
हे क्षेत्र पुण्यदायी, भगवान् तथागताचे
आचंद्रसूर्य नांदो, स्वातंत्र्य भारताचे ॥ ३ ॥
हे राष्ट्र विक्रमाचे, हे राष्ट्र शांततेचे
सत्यार्थ झुंज घ्यावी, या जागत्या प्रभेचे
येथे शिव–प्रतापी, नरसिंह योग्यतेचे
आचंद्रसूर्य नांदो, स्वातंत्र्य भारताचे ॥ ४ ॥
येथे परंपरांचा सन्मान नित्य आहे
जनशासनातळींचा पायाच 'सत्य' आहे
येथे सदा निनादो, जयगीत जागृतीचे
आचंद्रसूर्य नांदो, स्वातंत्र्य भारताचे ॥ ५ ॥

राष्ट्रध्वज म्हणजे राष्ट्राचा मानबिंदू ! राष्ट्रध्वज म्हणजे स्वदेशाभिमानाचे फडफडते प्रतीक ! राष्ट्रध्वजाच्या प्रतिष्ठेसाठी कितीतरी हुतात्म्यांनी बलिदानही केलेले आहे. देहदंड सोसलेला आहे. कारावास भोगलेला आहे.

विजयी विश्व तिरंगा प्यारा । झंडा ऊँचा रहे हमारा ॥
सदा शक्ति सरसानेवाला । प्रेमसुधा बरसानेवाला ॥
वीरों को हरषानेवाला । मातृभूमि का तन, मन सारा ॥

स्वातंत्र्यलढयाच्या काळात देशभक्ताच्या तोंडी हे झेंडागीत घोळत होते.

भारत स्वतंत्र झाला आणि स्वतंत्र भारताचा राष्ट्रध्वज म्हणून अशोक चक्रांकित तिरंगी ध्वज आपण स्वीकारला. गदिमांनी एका ऊर्जस्वल गीतात भारताच्या राष्ट्रध्वजाचे यथार्थ गुणगान गायिलेले आहे :

अशोक चक्रांकिता
ध्वजा ही राष्ट्राची देवता...
वंदनीया ही स्फूर्तिदायिनी

सार्वभौम भारता
ध्वजा ही राष्ट्राची देवता...

रंगालय-भूषिता भगवती
घोषितसे एकता
मानव विश्वालागीं अवघ्या
आश्वासी शांतता
पुण्यदर्शनें हिच्या स्फुरावी
दास्याते मुक्तता
ध्वजा ही राष्ट्राची देवता .

छायेखाली हिच्या नांदते
समानता, अस्मिता
शतकोटी कर हिची रक्षिती
प्राणपणे योग्यता
भव्य भविष्या हिची उजळिते
तेजस्विनी दिव्यता
ध्वजा ही राष्ट्राची देवता...

अखंड फडकत राहिल ही या
भारतीय व्योमी
हिच्या पदतळी सुवर्ण उगविल
भारतीय भूमी
सदा विजयिनी, भाग्यशालिनी
पंचशील पूजिता
ध्वजा ही राष्ट्राची देवता ..

शस्त्रे, शास्त्रे सर्व वाहिली
हिच्या प्रतिष्ठेप्रती
हिच्या प्रतिष्ठेसाठी सारी .
धृती, कृती, जागृती
धर्मध्वजही हिची मानिती
सर्वंकष श्रेष्ठता
ध्वजा ही राष्ट्राची देवता...

राष्ट्राभिमानाप्रमाणेच प्रांताभिमानही माणसाच्या मनी वसत असतो. स्वदेश, स्वराज्य, स्वभाषा, स्वधर्म याविषयी प्रत्येकाच्या मनीमानसी आदराची

व अभिमानाची भावना नांदणे उचितच आहे. महाराष्ट्र हे भारतातील एक अग्रेसर असे राज्य आहे. महाराष्ट्राची मर्दुमकी भारतभर गाजलेली आहे. मराठी माणसाला मराठी मातीचा आणि मराठी भाषेचा अभिमान वाटणे स्वाभाविकच आहे. अ. ब. कोल्हटकरांनी 'बहु असोत सुंदर संपन्न की महा। प्रिय अमुचा एक महाराष्ट्र देश हा ॥...' असे गीत रचले आणि ते महाराष्ट्र-गीत म्हणूनच प्रचलित झाले. अनेक मराठी कवींनी महाराष्ट्राचे गुणवान गाणारी गीते रचलेली आहेत. गदिमांनी देखील एका गीतात महाराष्ट्राचे स्तवन गायिलेले आहे :

शिवनिष्ठा जेथ असे सतत जागती
अग्रेसर प्रांत महाराष्ट्र, भारती !

भीमकाय सह्यगिरी पाठिशी उभा
बलशाली आकांक्षा भेदिती नभा
सरितांसह प्रगति इथे नित्य वाहती–

पैठणचे प्रेम अमित देश कोकणा
पंढरीस ये विदर्भ देवदर्शना
अजरामर ऐक्यभाव येथ दृढमती–

इतिहासा ज्ञात असे शौर्य येथले
यज्ञाग्नि सर्वप्रथम येथ चेतले
देशास्तव प्रथम दिल्या इथुनि आहुती–

परदास्ये होते जधि राष्ट्र घेरले
संतांनी सद्विचार येथ पेरले
ज्ञानाचे अमरदीप अजुन तेवती–

समतेचा बोध करी क्षेत्र पंढरी
वेरूळची एक एक अतुल ओवरी
अजुन अजिंठ्यांत उभी चित्र-संस्कृती–

शिवराजा, टिळक, भीम, गोखले, फुले
अभ्यासित आदर्शा वाढती मुले
साहित्यिक नवविचार येथ सांगती–

वाढतसे ज्ञान इथे खडक फोडुनी
साकळल्या रुढींचे बंध तोडुनी
विद्यार्थ्या येथ नसे वाण कोणती–

देवदत्त जो निसर्ग, अम्हां पुरे

उद्योगे उद्याने उभवू गोपुरे
सहकारा धुरीण इथे पूर्ण जाणती–
सुस्थिरल्या पंचायती, भाग परिषदा
वाढविती श्रमिक कृषिक खपुन संपदा
भवितव्य कोटि हात कसुन कोरिती
पूर्णत्वा जाति इथे गृहित योजना
सार्थकता लाभतसे नव-नियोजना
प्रांत न हा, प्रगतीची सघन आकृती–
चक्रांकित तीन-रंगी राष्ट्रियध्वजा
देवदूत मानि तिला येथची प्रजा
वाढविते आप्तभाव हा सभोवती–

महाराष्ट्राचा ऐतिहासिक अभिमानबिंदू म्हणजे छत्रपती शिवाजी महाराज! महाराष्ट्राचे भाग्य खरोखरच थोर म्हणून असा युगंधर राजा लाभला! ह्या 'श्रीमान योगी' राजाची पराक्रमी चरितकथा कवी भूषण व शाहीर अज्ञानदास यांच्यापासून ते अलीकडल्या काळापर्यंतच्या कवी–शाहिरांनी मोठ्या अभिमानाने गायिलेली आहे.

गदिमांनी देखील 'श्री शिवराय' नामक एक सुरेख 'शिव–स्तवन' रचलेले आहे.

शिवछत्रपतींच्या लोकोत्तर जीवनावर महाकाव्य लिहिण्याची इच्छा गदिमांना होती. पण ती दुर्दैवानं पूर्ण झाली नाही.

शिवछत्रपतींप्रमाणेच आणखी काही लोकोत्तर वीरपुरुषांची पराक्रम–पूजा गदिमांनी आपल्या स्तवनातून केलेली आहे. वीरपुरुषांचा पराक्रम हा तर शाहिरांच्या काव्यप्रतिभेला स्फुरण देणारा प्रेरणा–स्रोत आहे.

गदिमांनी भारताच्या स्वातंत्र्यलढ्यातील नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्यावर लिहिलेले आवाहनपर स्तवन हे रचना आणि काव्य या दृष्टींने अत्युत्कृष्ट आहे. नेताजींनी भारतीय स्वातंत्र्यलढ्यात एक आगळेवेगळे अद्भुत वीरनाटच घडविले होते. त्यांच्या या परदेशात जाऊन 'आझाद हिंद सेने' सारख्या परकी सत्तेविरुद्ध लष्करी उठाव करणाऱ्या प्रयत्नाबद्दल देशातील तथाकथित राजकारणी विद्वानांमध्ये मतमतांतरांचा गदारोळ माजलेला होता. आणखीही भिन्न भिन्न राजकीय विचारांच्या वादळात भारताचा स्वातंत्र्यलढा धुसमत होता. अशावेळी भारतीय जनतेच्या वतीने गदिमांनी नेताजींना स्तवनपूर्वक केलेले हे आवाहन जितके हृद्य तितकेच स्फूर्तिदायी आहे :

मतामतांचा पुरे गलबला, पुरेत पंडित, पुरेत काजी ।
प्रगूढतेच्या लाल धुक्यातुन गर्जत गर्जत या नेताजी !
कैक योजना, कैक घोषणा, स्वैर बरळती देशामाजी
घूकांना या मूक कराया, उगवतीतुनी या नेताजी ।
मानव-दानव करिती मंथन, जनतासागर खवळे आजी
भूमिगतांच्या पाताळांतुन अमृत होऊन या नेताजी ।
भरास आले संगर तांडव, रुद्र नाचती राष्ट्रामाजी
आभाळाचा पडदा फाडुन स्वर्गंगेसम या नेताजी ।
माय यशोदा फोडी टाहो, कहर उसळला गोपांमाजी
सर्पफणीवर नाचत नाचत, घननीळासम या नेताजी ॥
लुटालुटीने देश गांजला अराजकांच्या रात्रीमाजी
त्या थोरांच्या पाक मनांतुन चंद्र होऊनी या नेताजी !
स्वार्थ होमिला, वित्त होमिले, प्राण होमिले यज्ञामाजी
धन्यात्म्यांच्या धन्य चितांतुन अग्नी होऊनी या नेताजी
अनल होऊनि, अनिल होउनि, क्रोधाने वा होऊनी राजी
स्वर्गंधरेतुनि पाताळातुनि, दिक्कालांतुनि या नेताजी ।
या नेताजी, या नेताजी, साद कोंदला गगनामाजी
हांकेसरशी गजेंद्रमोक्षा गरुडावरुनी या नेताजी ।

पंडित जवाहरलाल नेहरू हे 'भारतभाग्यविधाते' म्हणूनच ओळखले जातात. आजच्या या भारताला 'गांधी-नेहरूंचा भारत' असेच म्हटले जाते. ह्या दोन्हीही वीरपुरुषांनी अनेक कवींच्या आणि शाहिरांच्या काव्यप्रतिभेला प्रेरणा दिलेली आहे. गदिमांनी गांधीजींच्या जीवनावर बरीच कवने रचलेली आहेत. पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या निर्याणानंतर 'जय नेहरू काका !' या शीर्षकाची, शाहिरी वळणानं जाणारी एक प्रदीर्घ संगीतिका मुलांसाठी लिहिलेली होती. जवाहरलालजींची जीवनकहाणी या रचनेतून गदिमांनी मुलांना फार सुरेख आणि सुबोधरीतीने सांगितलेली आहे. या रचनेतील हा प्रारंभीचा भाग :

समूह : रविकिरणांकित हिमशिखरांचा मुकुट धरी माथां
समुद्रवसना, सुपुत्रप्रसवा जय भारतमाता
मातीमधुनी हिच्या उपजती गंधभरली फुले
हिच्या मुलींच्या उदरी येती दिगंतकीर्ति मुले
महाकाव्यासम सुरस तयांच्या चरिताची गाथा
–जय भारतमाता !

उत्तरदेशी गंगातीरीं प्रयाग शुभतीर्थी
नेहरूवंशी एक जन्मली अतुल बालमूर्ती
मोतिलालजी जनक निवडले, स्वरुपराणी माता
–जय भारतमाता !

हा प्रारंभ असा आहे, तर शेवट असा आहे–

नेहरू : माझ्या अस्थी, माझी रक्षा क्षेत्रोक्षेत्री पेरा

निवेदक : ही आकांक्षा जाता जाता सुचली त्या वीरा

समूह : जवाहराच्या अस्थीमधुनी आज उमलती फुले
जवाहरांच्या आस्थेमधुनी उद्या वाढतिल मुले !
पंडित जवाहरलाल नेहरू की जय !

समूहगीत : चेतविली जी मशाल त्याने आम्ही हातीं धरू
अपुरे जे जे कार्य तयाचे आम्ही पुरते करू
जय काका नेहरू ! जय चाचा नेहरू !
समभावाने सौख्ये चाखू
मने नेहमी निर्मल राखू
आरामाला हराम लेखू
श्रम, बुद्धीने आम्ही अमुच्या राष्ट्राते उद्धरू
जय काका नेहरू ! जय चाचा नेहरू !

'बांगला देश' निर्मितीस भारताच्या तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांचा फार मोठा साहसपूर्ण असा हातभार लागलेला आहे. बांगलादेशचे प्रमुख नेते शेख मुजिबुर रहमान यांनी तर त्यावेळी मोठ्या कृतज्ञतेने त्यांच्याविषयी 'मदर ऑफ दि मनकाइंड'--'मानवतेची माता' असे उद्‌गार काढले होते. इंदिराजींच्या साहसाने सारे जगच स्तिमित झाले होते.

त्या सुमारासच इंदिराजी पुण्याजवळील खडकवासला येथील लष्करी संस्थेत भारतीय सैनिकांना भेटण्यासाठी आलेल्या होत्या. त्यांच्या आगमनप्रसंगी गदिमांनी रचलेले 'विजयी रणदेवता' हे स्तवनगीत गायले होते. या स्तवनगीतात इंदिराजींच्या ठायी असलेल्या शौर्य, साहस, पराक्रम इत्यादी गुणांचा गौरव अत्यंत उचित शब्दात केलेला आहे. काव्यदृष्टयाही हे स्तवनगीत गदिमांच्या गीतरचनेचे वैभव फुलवणारे आहे. 'विजयी रणदेवता' हे स्तवनगीत असे आहे :

आज सैनिकांपुढे प्रगटली विजयी रणदेवता
सुमने म्हणुनी मनें अर्पितो आम्ही तव स्वागता !

लक्ष लोचनी उजळुन ज्योती, करितो तव आरती
नवेच 'भारत' घडविलेस तू देवी, या भारती
तुझ्या वचांना हृदयी अमुच्या गीतेची योग्यता !
निर्भय झाले जनगणमानस उन्नत झाली शिरे
तुझ्यामुळे या उभ्या भारती, तेज नवे संचरे
उपखंडावर तूच निर्मिली शक्तिमती शांतता !
तुझ्यामुळे ध्वज उंच जाहला, या राष्ट्राचा जगी
तू महिलांना दिली थोरवी या समतेच्या युगी
पददलितांच्या मनी निर्मिली, मृत्युंजय अस्मिता !
भद्रकालि तू, तूच शारदा, तूच खरी इंदिरा
सामर्थ्याने तूच पेलिसी या राष्ट्राची धुरा
तुझ्यामुळे, नव-बंग पावला दास्यातुन मुक्तता !
भारतकन्ये काय वानणे, तव गुणरत्नावली
प्रगतिपथांचे उगम थबकले शुभद तुझ्या पाउली
आगमनाने तुझ्या म्हणुन ही नगरी आनंदिता !

अशा तऱ्हेची स्तवन-कवनांची निर्मिती करून गदिमांनी मराठी शाहिरी अधिकच समृद्ध केली आहे.

□

१२

# माडगूळकरांची विविधरंगी शाहिरी

भूपाळी :

शाहिरीतही विविध रंग-ढंग आहेत. शाहिरी वाङ्मय म्हटलं की, लावणी आणि पोवाडा यांचीच फक्त चटकन आठवण होते. परंतु शाहिरी वाङ्मयातले हे दोन मुख्य प्रकार सोडले तरी देखील गण, गौळण, भेदिक, भूपाळी, रणगीते...असे कितीतरी प्रकार आहेत. आणि नवल असे की, फक्त दोन-तीनच प्रकार अपवादात्मक वगळले तर बहुतेक शाहिरी प्रकार गदिमांच्या सिद्धहस्त लेखणीने अत्यंत यशस्वीरीतीने हाताळलेले आहेत.

मराठी शाहिरांनी 'भूपाळी' लिहिलेली आहे. संतांनीदेखील भूपाळ्या रचलेल्या आहेत.

"घनःश्याम सुंदरा श्रीधरा अरुणोदय झाला।
उठि लवकरी वनमाळी उदयाचळी मित्र आला।।'

ही शाहीर होनाजीची भूपाळी मराठी माणसाच्या मनात सदैव घोळत असते.

'ऊठ झाला प्रातःकाळ तुझे गोपाळ आले घननीळा।
पूर्वदिशे उदयला भानू आला उदयाचळा।'

अशा मुखड्याची भूपाळी शाहीर परशुराम यांनी लिहिलेली आहे.

भूपाळी हे एकप्रकारचे स्तवनच आहे. प्रात:काळच्या प्रसन्न समयी भूप रागात ईश्वराला आळवण्यासाठी जे गीत म्हटले जाते त्याला भूपाळी असे म्हणतात. देवाला जागं करण्यासाठी भूपाळी म्हटली जाते. नामदेव, रामदास, होनाजी यांनी आपल्या भूपाळ्यांमधून यशोदा बाळकृष्णाला आणि कौसल्या बालरामाला प्रात:काळी अशी गीते म्हणून उठवीत असत, असे म्हटलेले आहे. भूपाळी, 'प्रभातसमय झाला आहे. देवा, आता जागे व्हा आणि विश्वाचा उद्धार करा !' अशी प्रार्थनाही असते.

गदिमांनी भूपाळी हा शाहिरी वळणाचा गीतप्रकार फारच प्रभावीरीतीनं निर्मिलेला आहे. त्यांच्या चित्रमय शैलीनं आणि काव्यसौंदर्यानं गदिमांची भूपाळीत प्रसन्न आणि लावण्यसुंदर बनलेली आहे. 'वंदे मातरम्' नामक चित्रपटामधली त्यांची भूपाळी कशी सुरेख आहे पहा :

ऊठ सावळ्या गोविंदा रे
फुटे गाऊल्यांना पान्हा
हंबरती बोलावीती
तुज लडिवाळा कान्हा
ऊठ सावळ्या गोविंदा रे
पैंजणाचा ऐक नाद
पाणियासी जातां जातां
देती गवळणी साद
ऊठ सावळ्या गोविंदा रे
गोपबाळ आले दारी
गायीवासरे सांगाती-
दह्याभाताची शिदोरी
ऊठ सावळ्या गोविंदा रे
सारे जागले गोकुळ
उदयाचळी आला देव
झाले सोन्याचे आभाळ !

'संत जनाबाई' नामक चित्रपटातही गदिमांची अत्यंत सुरेख आणि सुरेल अशी भूपाळी आहे :

प्रभातसमयो पातला,
आता जाग बा विठ्ठला !
दारी तव नामाचा चालला गजरु
देव-देवांगना गाती नारद-तुंबरु

दिंड्या-पताकांचा मेळा
तुझिया अंगणी थाटला !
दिठी दिठी लागली तुझिया श्रीमुखकमलावरी
श्रवणीमुखी रंगली श्रीधरा, नामाची माधुरी
प्राणांची आरती, काकडा नयनी चेतविला !

'पंचारती' नामक चित्रपटात पंढरीच्या पांडुरंगाला जागे करण्यासाठी म्हटलेली भूपाळी आहे. भूपाळीतली कोमलता, वत्सलता तर या भूपाळीत भावतेच, पण त्याचबरोबर काव्यसौंदर्यदेखील मन प्रसन्न करून टाकते. सकाळ हीच एक कळशी आहे आणि तिच्यात विठ्ठलाची आवडती चंद्रभागा अवतरली आहे, ही कल्पना जितकी भव्य आहे तितकीच चैतन्यकोमल आहे. मुलीबाळींनी अंगणात काढलेल्या रांगोळीच्या रेषांतून विठ्ठल--रुखमाईचे रूप प्रकट होते, ही कल्पनाही भक्तिवात्सल्याने ओथंबलेली आहे. रेषांबरोबरच रंगाचेही भान आहेच. सर्वत्र पसरलेल्या काळ्या मातीतून सावळ्या रंगाच्या पांडुरंगाचा जिव्हाळा गदिमांना दिसतो. गदिमांची रंगरुपाने माखलेली ही भूपाळी अशी आहे :

गाव झाला जागा
आता उठा पांडुरंगा !
उजळली उगवती
जथे पाखरांचे गाती
सकाळच्या कळशीत आली चंद्रभागा !
घरोघरी सवाशिणी
सडे शिंपिती अंगणी
साद थकलेले गाती तुक्याच्या अभंगा !
रेखितात पोरीबाळी
चार रांगोळीच्या ओळी
विठो-रुक्मिणींचे रूप दावितात रेघा !
मराठीच्या मुलुखात
जिथे तिथे पंढरिनाथ
माय धरित्रीहि ल्याली सावळ्याच रंगा !

'प्रेम आंधळं असतं' या चित्रपटातील-

जाग रे यादवा, कृष्णा गोपालका
फिकटल्या तारका, रात सरली
पक्षिगण जागले, किलबिलू लागले
अजुन का लोचनी नीज उरली ! ...

ही प्रसन्न-सुंदर भूपाळी आणि 'नार निर्मिते नरा' नामक चित्रपटातील-

लोचने उघडा नारायणा
लोचने उघडा नारायणा !
गीते गाउनी थकले पक्षी, दर्शना द्या चरणा !
लोचने उघडा नारायणा !

ही भक्ति-हृदयानं आर्जव करणारी भूपाळी, ह्या गदिमांच्या दोन्हीही भूपाळ्या मराठी संतकवींच्या भूपाळीरचनेस समृद्ध करून काव्यवाहिनीचा हा वेगळा प्रवाह पुढे नेणारा व वर्धिष्णू करणारा आहे.

दुसऱ्या भूपाळीतील सकाळच्या सचैल धरणीचं प्रसन्न अक्षरचित्र गदिमांनी फारच सुंदर रेखलेलं आहे :

देवी धरणी दवांत न्हाउन
पूजादाणी संगे घेउन
ओलेत्याने उभी कधीची करावया पूजना
लोचने उघडा नारायणा ! ...

श्रीविठ्ठल, श्रीकृष्ण यांच्यावरील गदिमांच्या भूपाळ्या जशा लावण्यसुंदर आहेत तशी त्यांची गणपतीवरील भूपाळी देखील नितांत देखणी आहे. गदिमांच्या काव्यरचनेतली रसाळ प्रासादिकता आणि रेखीव चित्रमयता ही वैशिष्ट्ये या भूपाळीत फारच उत्कृष्टपणाने उतरली आहेत. 'अन्न आणि अन्न' या चित्रपटातील गणपतीची ही भूपाळी अशी आहे :

तुझ्या कांतिसम रक्तपताका पूर्वदिशा फडकती
अरुण उगवला, प्रभात झाली, ऊठ महागणपती...
सूर्याआधी दर्शन घ्यावे तुझे मूषकध्वजा
सुभद्र सुमंगल सर्वांआधी तुझी पाद्यपूजा
छेडुनि वीणा जागवीत तुज सरस्वती भगवती ।
अरुण उगवला, प्रभात झाली ऊठ महागणपती...
आवडती तुज म्हणूनि आणिली रक्तवर्ण कमळे
पाच-मण्यांच्या किरणांसम ही हिरवी दूर्वादळे
शूर्पकर्णका, ऊठ गजमुखा, उठी रे मोरेश्वरा
तिन्ही जगाचा तूच नियंता, विश्वाचा आसरा
तुझ्या दर्शना अधीर देवा, हर ब्रह्मा श्रीपती
अरुण उगवला, प्रभात झाली, ऊठ महागणपती ..

भेदिक :

लौकिक स्वरूपाच्या काव्यरचनेहून निराळी आणि पारमार्थिक किंवा शाश्वत विचाराच्या निकट अशी रचनाही शाहिरांनी केलेली आहे. समर्थ रामदासांनी 'डफ गाणे' लिहिले आहे. डफ-गाण्यांप्रमाणेच 'भेदिक गाणे' आणि 'देहावरचे गाणे' असे आणखी काही प्रकार जुन्या शाहिरीत आहेत. हे सगळेच प्रकार अर्थात गेय आहेत. परमार्थ, अध्यात्म, ईश्वरशरणता, उपदेश आणि सामान्यज्ञान इत्यादी विषयांवर शाहिरांनी लावण्या लिहिलेल्या आहेत. राम जोशी यांची–

नरदेहामधि येऊन गड्या त्वां हित केले नाही।
दारधनाचा लोभ सोडशी तर साधंल तुज काही ।।
हरिची माया अगाध जेथे ब्रह्मादिक फसले।
तू तर मानवमनुचे पामर त्यांतहि कामादिक वसले ।।

ही लावणी, तशीच–

दो दिवसाची तनु ही साची, सुरतरसाची करुनी मजा।
गमजा करिता मनी उमजाना हे सुख न पुढे पडेल वजा ।।
भाई सावध व्हा ।।

ही लावणी, या दोन्हीही लावण्या उपदेशात्मक स्वरूपाच्या असून देहाचे क्षणभंगुरत्व व नरजन्माचे सार्थक कशात आहे, हे सांगणाऱ्या आहेत.

अनंतफंदींनी उपदेशपर 'फटका'च लिहिलेला आहे. फटक्याच्या शेवटी त्यांनी म्हटले आहे :

सुविचारा कातरू नको । सत्संगत अंतरू नको।
हरिभजनाला विसरू नको।
गावयास अनंतफंदीचे फटके मागे सरू नको ।।...

परशरामाची 'मानवी जीवनाची कहाणी' आणि 'काळी-गोरीचे भांडण' ह्या लावण्याही आध्यात्मिक विचाराकडे झुकणाऱ्याच आहेत.

या परंपरेला जवळची अशी शाहिरी रचनादेखील गदिमांनी केलेली आहे. राम जोशींच्या 'भज भज भवजलधीमाजि मनुजा शिवाला' या रचनेतील आशयाची आठवण करून देणारी गदिमांची रचना अशी आहे :

स्मर मन, राधा-माधव प्रीत !
गा रसने, नित प्रेमरसांकित हरिचरिताचे गीत !
गोपरूप प्रभु गोकुळिं रतले
असार जीवन त्यांनी मथिले
राधेकरवी स्वयें भक्षिले प्रेमतत्त्व-नवनीत !

ध्यास हरीचा ती तर भक्ती
प्रपंच-विस्मृति तीच विरक्ती
वरुनी मुक्ती व्रजललना ती उरली मायातीत !
करि पुरुषोत्तम अविरत लीला
जाणिव जाणे अर्थ त्यातला
आत्मज्ञानही रसाळ झाले नंदाच्या नगरीत !

एका गीतात गदिमांनी या जगरहाटीचे फारच सुरेख, सुलभ पण चिंतनात्मक असे वर्णन केलेले आहे :

रहाट फिरतो रहाट ग
दिवस संपता पडते झांजड, पुन्हा उगवते पहाट ग !
दिसे पोहरा जाता येता
खाली भरतो, वरी पालथा
कोण चालवी रहाट असला ? कसले त्याला चऱ्हाट ग !
सूर्य समुद्री असाच बुडतो
उजेड सांडित वरती चढतो
पिढ्या संपल्या तरी फिरतसे रहाट ऐसा जुनाट ग !
फुलवंतीचे जिणे देखणे
सहज उमलणे आणिक हसणे
एका हसण्यावरी शेवटी मातीसंगे सपाट ग !

एका गीतात गदिमांनी ' मायेची किमया ' अशाच सहजपणाने, नित्य व्यवहारातल्या गोष्टींचे दृष्टांत देऊन, अतिशय उत्कृष्ट रीतीने वर्णन केलेली आहे. ही मायेची किमया वर्णन करताना गदिमांच्या प्रतिभेची आणि भाषेची किमयादेखील लक्षात आल्यावाचून राहात नाही :

कसे चालले असेल जग हे विचार याचा वाया रे
ही मायेची किमया अवघड, आधीं कळस मग पाया रे !
वाफेमधुनी उफळे पाणी, बीज फळाच्या पोटीं रे
शिशिर जाळतो झाडेवेली नव्या वसंतासाठी रे
मुळे वरी आणि खाली फांद्या अशी मानवी काया रे !
पृथ्वीवरती निळा घुमट हा आभाळाचा राही रे
आभाळावर वसली पृथ्वी नीट न्याहाळुनी पाही रे
उजेड मारी अंधारा, पण त्याची आई छाया रे !
पोट फाडल्यावाचुन धरणी बीज धरीना रोपाचे
पुण्याईच्या खोडा फुटती नवे धुमारे पापाचे

पापावांचून पुण्याईच्या कशा पोसतील राया रे !
कळसावरती असतो पाया, पायावरती कळस चढे
चक्रगतीने फिरते जग हे, अंतामागे जन्म घडे
तोयनिधींतुन मेघ जन्मती, तेच निर्मिती तोया रे ! ...

'पोटापुरता पसा पाहिजे...' या गीताचे वळण आणि तालही शाहिरी ढंगाचा आहे. दिमडीच्या तालावर गायल्या जाणाऱ्या या पदाची शब्दकळाही लोकभाषेतील आहे. तसेच या पदाचा आशय देखील सामान्य माणसाच्या दैनंदिन गरजेशी निगडित असा आहे. 'अनंत हस्ते कमलावराने, देता किती घेशिल दो कराने' या सुभाषिताचा 'देणाऱ्याचे हात हजारो, दुबळी माझी झोळी' हा गदिमांनी केलेला सुबोध, सुलभ अनुवाद किती मऱ्हाटमोळा आहे !

अपरिग्रह-असंग्रह ह्या नैतिक-धार्मिक व्रतांची महती देखील या पदात गदिमांनी नित्य व्यवहारातील प्रतिमांद्वारे सहज सुलभपणाने काव्यबद्ध केलेली आहे. त्यांचे हे पद असे आहे :

पोटापुरता पसा पाहिजे, नको पिकाया पोळी
देणाऱ्याचे हात हजारो, दुबळी माझी झोळी !
हवाच तितुका पाडी पाऊस देवा, वेळोवेळी
चोचीपुरता देवो दाणा मायामाउली काळी
एक वितीच्या भुकेस पुरते तळहाताची थाळी !
महालमाड्या नकोस नाथा, माथ्यावर दे छाया
गरजेपुरती देई वसने, जतन कराया काया
गोठविणारा नको कडाका, नको उन्हाची होळी !
सोसे तितुके देई, याहुन हट्ट नसे गा माझा
सौख्य देइ वा दुःख ईश्वरा, रंक करी वा राजा
अपुरेंपणही नलगे, नलगे पस्तावाची पाळी !

माणसाचे जीवनवस्त्र सुख आणि दुःख अशा ताण्याबाण्यांनी विणलेले असते. दुःखाच्या उन्हाळ्यात कधी जीव तगमगतो, तर कधी सुखाच्या झुळकीने सुखावतो. एखादा दिवस एखाद्याच्या आयुष्यात एखाद्याला हत्तीवरच्या अंबारीतून मिरवतो, तर एखाद्याला एखादा दिवस हाती चौपदरी देऊन दारोदार हिंडवतो. ऊन-सावलीसारखाच हा सुखदुःखाचा खेळ मानवी जीवनात चाललेला असतो. या खेळात बहुधा 'सुख पाहता जवापाडे, दुःख पर्वताएवढे' अशीच अवस्था असते. हा खेळ खेळणारा खेळिया कुठे असतो हे जसे कळत नाही, तसेच सुख-दुःखाचा जीवनपट विणणारा विणकरही दिसत नाही. कर्ता अदृश्य आहे, कर्म दृश्य आहे. पण भलेबुरे कर्मफल भोगीत असतानाही अदृश्य कर्त्याची जाणीव माणसाने ठेवली पाहिजे. तो

दिसत नसला तरी विणाइतली त्याची चातुरी उमगून घेण्याचा प्रयत्न केलाच पाहिजे. हा एकप्रकारे तत्त्वज्ञानाच्या पातळीवरचा अवघड विचार गदिमांनी ' एक धागा सुखाचा–' या पदात त्यांच्या अत्यंत वैशिष्टचपूर्ण शैलीत, वैशिष्टचपूर्ण प्रतिमांद्वारा किती रसाळ, प्रासादिक केलेला आहे. गदिमांचे हे गीत असे आहे :

एक धागा सुखाचा, शंभर धागे दुःखाचे
जरतारी हे वस्त्र माणसा तुझिया आयुष्याचे
पांघरसी जरी असला कपडा
येसी उघडा, जासी उघडा
कपडयासाठी करिसी नाटक, तीन प्रवेशांचे
मुकी अंगडी बालपणाची
रंगित वसने तारुण्याची
जीर्ण शाल मग उरे शेवटीं, लेणे वार्धक्याचे !
या वस्त्रांते विणतो कोण ?
एकसारखी नसती दोन
कुणा न दिसले त्रिखंडात त्या हात विणकऱ्याचे !

' रहाट फिरतो रहाट ग ' या गीतात गदिमांनी जगरहाटीचे वर्णन केलेले आहे. तर ' जग हे बंदीशाला ' या गीतात त्यांनी मानवी जगाचे स्वरूप दाखवलेले आहे. हाही विषय तसा तत्त्वज्ञानाच्या पातळीशी निकट असाच आहे. पण तोही अत्यंत दृश्य स्वरूपात गदिमांनी सर्वसामान्य माणसाच्या आटोक्यात आणून ठेवलेला आहे. त्यांचे हे गीत असे आहे :

जग हे बंदीशाला
कुणी न येथे भलाचांगला, जो तो पथ चुकलेला !
ज्याची त्याला प्यार कोठडी
कोठडीतले सखे सौंगडी
हातकडी की अवजड बेडी–
प्रिय हो ज्याची त्याला !

जो तो अपुल्या जागी जखडे
नजर न धांवे तटापलीकडे
उंबरांतले किडेमकोडे–
उंबरिं करिती लीला !

कुणा न ठाउक सजा किती ते
कोठुन आलो ते नच स्मरते

सुटकेलागी मन घाबरते
जो आला तो रमला !

अकबर बादशहानं एकदा दरबारात 'सगळचात मोठा राजा कोण ?' असा प्रश्न उपस्थित केला होता. त्यावर बिरबलाशिवाय सगळचाच मानकऱ्यांनी 'खविंद, आपणच !' असे उत्तर दिले होते. कारण ते सगळेच्या सगळेच बादशहाची मर्जी सांभाळण्यासाठी धडपडणारे 'होयबा' होते. पण बिरबल तसा नव्हता. म्हणून तो आधी गप्पच होता. पण बादशहानं त्यालाच विचारल्यावर त्यानं सांगितलं, "हुजूर, सर्वात मोठा आणि श्रेष्ठ राजा म्हणजे 'मेघराजा' !"

बिरबलाच्या या स्पष्टोक्तीवर बादशहा आधी रागावलाच होता, पण बिरबलानं जेव्हा मेघराजाची कर्तबगारी विषद करून सांगितली, तेव्हा बादशहालाही त्याचे म्हणणे पटले. बादशहा खूष झाला.

मेघराजाच्या कृपादृष्टीसाठी शेतकरी तर डोळचात प्राण गोळा करून बसलेला असतो. तापलेली धरणीही त्याच्या आगमनाची वाट पाहात असते. अशा मेघराजाची आळवणी करणारे, शाहिरी ढंगाचे गीतही गदिमांनी लिहिलेले आहे. मेघराजाला त्यांनी 'आभाळाच्या हत्ती' असे म्हटलेले आहे. गीत शेतकरी स्त्री-पुरुषांच्या तोंडी असल्यामुळे त्यांच्या भावभावना त्यांच्याच भाषेत गदिमांनी या गीतात मोठचा समर्थपणाने व्यक्त केलेल्या आहेत :

आसुसली माती
पिकवाया मोती
आभाळाच्या हत्ती, आता पाऊस पाड गा
पाऊस पाड !
पुरुष– मेघांच्या राजाला जाऊन सांग
ढगांनी काजळू दे डोंगरांची रांग
डोंगरांच्या तळी
करपली काळी
हरळीची मुळी पुन्हा घेऊ दे वाढ गा !
स्त्रिया-चारा नाही गाउल्यांना, दूध नाही वासरा !
धाराविना पेरा नाहीं, कोण आम्हां आसरा ?
नदी-नाला आटे
काळजांत तुटे
वृंदावनी वठे दारी तुळशीचं झाड गं !
पुरुष–धरणीच्या पोटांत साठू दे ओल
रुजू दे बियाणं खतात खोल

आल्यावर उन्हं
निवतील मनं
कुबेराचं धन मग मोत्याला मोड गा !

मेघराजाची कृपा झाली नाही तर दुष्काळाच्या खाईत भुकेच्या वणव्यात माणसं होरपळून निवतात. भुकेचा टाहो चहुबाजूंनीं उठतो. भूक काय करीत नाही ? 'बुभुक्षितः किं न करोति पापम् ?' भुकेलेला माणूस कसले म्हणून पाप करणार नाही ? पोटाची भूक भागवण्यासाठी तो वाटेल ते करायला तयार होतो. भुकेल्या विश्वामित्राने डोंबाघरची कुत्र्याची तंगडीही चघळायला कमी केले नव्हते !

परंतु माणसाला पोटाची किंवा अन्नाचीच भूक असते असे नाही. भुकेची रूपेही अनेकविध असतात. एका भुकेपायी अनेक अधर्म, अत्याचार, अन्याय घडू शकतात. भूक आदिम आहे. ती दुबळीही आहे आणि समर्थही आहे. मानवी माणसाच्या जीवनात भुकेला एक आगळे वेगळे अढळ असे स्थान आहे. भुकेची ही महती एका भेदिक वळणाच्या कवनात गदिमांनी फार सुरेखरीतीने प्रत्ययकारी शब्दात वर्णिलेली आहे :

भूक आभाळाची छाया भूक शेषाची ग फणा
ऋषीमुनींना सुटेना असा भुकेचा उखाणा ! !
भूक पापाची पखाल भूक वैराग्याची झोळी
भूक भल्याची भाकरी भूक अधाशाची होळी
भूक दुबळ्याचे बळ भूक बळवंता शाप
भूक वितीच्या उंचीची भूक वेडी आडमाप
भूकबाईच्या हाताने हले जगाचा पाळणा !
भूक भांडेल देवाशी भूक खाईल माणसा
भूकबाईच्या डोळ्यांत आज-उद्याचा आरसा
भूक बंडाची बहीण भूक शांततेला धाक
भूक आणि उद्योगाची एकमेका आणभाक
येता माणूस जन्मासी होतो भुकेचा पाहुणा !
भूक अनादी काळाची देवाधर्माहून जुनी
भुकेवाचुनिया जीव नाही बघितला कुणी
एका वितीच्या पोटात भुकेचं या मूळपीठ
तिच्या संगती वागती हातीपायी वीस बोटं
भूक वाहविते रक्त, भूक पिकविते दाणा !

'पुढचं पाऊल' या चित्रपटातील 'झाला महार पंढरीनाथ' हे गदिमांचं

गीत तर फारच लोकप्रिय ठरलेलं आहे. गवयांच्या बैठकीपासून ते दारोदार भीक मागत हिंडणाऱ्या भिकाऱ्यांपर्यंत त्याच्या अंगभूत ठसकेबाजपणामुळे तोंडोतोंडी घोळत असलेलं आढळतं.

जुन्या शाहिरांनी पौराणिक कथांवर शाहिरी साज चढविलेला आहे. चरित-कथा गायलेल्या आहेत. गदिमांनी देखील संत दामाजीच्या जीवनातील लोकमानसात दृढ असलेली एक आख्यायिका काव्यबद्ध केली आहे. भक्तासाठी देव कसा आणि कशा रूपात धाव घेत असतो, ह्या चमत्काराचे अत्यंत सुंदर असे अक्षरचित्र गदिमांनी या गीतात रंगविलेले आहे :

काय देवाची सांगू मात ?
झाला महार पंढरीनाथ !
नेसला मळिन चिंधोटी
घेतली हातामधें काठी
घोंगडी टाकिली पाठी
करी जोहार दरबारात !
मुंडाशात बांधली चिठी
फेकतो दुरून जगजेठी
' दामाजीनं विकली जी कोठी–
त्याचं घ्यावं दाम पदरात !'
खळखळा ओतिल्या मोहरा
' घ्या जी मोजून, पावती करा '
ढीग बघून चमकल्या नजरा
शहा घाली बोट तोंडात !

' जगावेगळी गोष्ट ', ' जगाच्या पाठीवर ', ' कुबेराचं धन ', ' प्रपंच ', ' उतावळा नारद ', ' फकिरा ', इत्यादी चित्रपटांसाठी गदिमांनी लिहिलेली ही कवने आहेत. परंतु ' सिनेमातली गाणी ' अशा शेरेबाजीच्या फटकाऱ्यासरशी ती निकालात काढता येणार नाहीत. त्यांना त्यांचे स्वतःचे असे एक व्यक्तिमत्त्व आहे. शाहिरीतल्या ' भेदिक ' या प्रकाराशी नातेगोते सांगणारे ते आहे. म्हणून गदिमांच्या शाहिरी रचनेचा विचार करताना या गीतांचाही विचार करणे आवश्यक आहे. भेदिक वळणाची गदिमांची सगळीच रचना इथे प्रस्तुत करणे शक्य नाही. ही केवळ वानगीच म्हणता येईल. परंतु या वानगीवरूनही गदिमांच्या काव्यप्रतिभेचा चिंतनशील असा पैलू दिसून येतो.

### उपहास–विनोद :

मनोरंजन हा शाहिरी वाङ्मयाच्या निर्मितीमधला एक प्रधान हेतू असतो

आणि याला अनुसरूनच विविध रसांचा आविष्कार शाहिरी वाङ्मयात झालेला दिसतो. वीर, शृंगार, भक्ती, अध्यात्म, स्थल व व्यक्ती, प्रशस्ती इत्यादींबरोबरच शाहिरी वाङ्मयात उपहासात्मक विनोदालाही स्थान मिळालेले आहे. 'झगडा' या प्रकारात अशा प्रकारच्या विनोदाचा आढळ झालेलाच आहे. गदिमांनी विनोद-प्रचुर झगडा तर रंगवलेला आहेच, पण त्याशिवाय देखील शाहिरीबाजाची विनोदी रचना केलेली आहे.

'गुरुकिल्ली' नामक चित्रपटात गदिमांनी तंबाखूची व्यंगात्मक प्रशस्ती केलेली आहे. तंबाखूला त्यांनी 'अजब गुणाची वनस्पती' ठरवून तिची 'रसाळ पोथीच' गायिलेली आहे. ही पोथी गाताना विठ्ठल, गणपती, व्यंकटेश आणि मारुती या देवमंडळींच्या दर्शनमूर्तींचा फार मजेदाररीतीने अर्थ लावलेला आहे. हा अर्थ हास्यात्मक आहे. विनोदी आहे. गदिमांची तंबाखूची 'रसाळ पोथी' ही अशी आहे :

अजब गुणाची वनस्पती ही साऱ्यांनी खावी
तंबाखूची रसाळ पोथी गातो ऐकावी
खा तंबाखू खा तंबाखू, हुकूम देवाचा
हरिनामापरि तंबाखूने उद्धरते वाचा
तंबाखूची थोरवी अन् ह्या देवांना ठावी
अजब गुणाची ......

पंढरपुरचा विठ्ठल ठेवी कमरेवर हाता
तंबाखूचे झाड केवढे ते सांगे जगता
कमरेइतकी उंची त्याची जाणुनिया घ्यावी
अजब गुणाची......

गावोगावची गणेशमूर्ती चिमूट एक दावी
जगास सांगे ही तंबाखू कशी किती घ्यावी
चिमूट घ्यावी, चिमूट द्यावी, देव घेव व्हावी
अजब गुणाची......

हात पसरतो का व्यंकोबा देवचक्रपाणी
तंबाखूचे पान म्हणे तो तळहातावाणी
शाहिराची वाणी तुम्ही पडताळुन घ्यावी
अजब गुणाची......

चिमटीहून जर अधिक खाल तर होईल रे काय ?
हात उभारून उभा ठाकला श्रीमारुतीराय

थोबाडीत तो ठेवून देईल जाण बाळगावी
अजब गुणाची .....

'कोण्या एका देशी' नावाचे एक कथागीत गदिमांनी रचलेले आहे. अजाण-अडाणी माणसाची फसगत कशी होत असते, हे गदिमांनी एका भिकाऱ्याच्या गोष्टीतून विनोदाच्या अंगाने दाखवलेले आहे. पण या गोष्टीतील विनोदाला करुणेचाही एक पदर आहे. हे कथागीत असे आहे :

कोण्या एका देशी होती, आटपाटपूर नामे नगरी
त्या नगरीतच नांदत होता, नावावाचुन एक भिकारी
घराघरांतुन भीक मागता, कुणी दानशूर त्यास पावला
तुटक्या झोळीमध्ये त्याच्या, भरून गव्हाचा शेर ओतला
संध्याकाळी परतुन आला, झोपडीत तो मुका भिकारी
निवडू लागला गहू आपुले, पुढचात घेउनि रासच सारी
मिण मिण होती तेवत पणती, पिवळट फिक्या ज्योतीची
बोटांनी तो गहू चाचपी, खडे, किडे तो बाजुस टाकी
तांबुस, लालसर गव्हासारखा, खडा एक ये त्याच्या हाता
कठिण लागता बोटाला तो, दूर फेकी त्या सहज निवडता
झोपडीभंवती हिंडत होत्या, कैक कोंबड्या बारा घरच्या
टिपीत होत्या खडे, किडे त्या, पुढचात पडला गहू तयांच्या
कोंबड्यास त्या बघुनी खाता, मुका भिकारी मनात बोले
पचती जर का खडे माणसा, किती चांगले असते झाले.
गहू निवडुनी, पुनः पाखडुनी, थोडे सडुनी खाय उकडुनी
भरल्या पोटी निजे भिकारी, वाकळ रकटे करुनि पथारी
दुसऱ्या दिवशी कोणी ब्राह्मण, भिकाऱ्यास त्या शोधित आला
म्हणे गड्या तू बहु भाग्याचा, लाभ मण्याचा तुला जाहला
'कुठला मणि अन् कसला लाभ', पुसे अडाण्यापरी भिकारी
गुप्तदान तुज काल मिळाले; गव्हात माणिक होते भारी
आठवला त्या भिकाऱ्यास मग, काल फेकला तांबूस दाणा
गट्टच करी त्या कुणी कोंबडी; आता पुसावे जाउन कोणा ?
आठवणीला ताण देउनि, तीच कोंबडी काढुनि धुंडुन
खुळ्यापरी तो बघे भिकारी; कोंबडीस त्या कांडून खंडुन
पचून गेले होते माणिक, कधीच त्या तर पक्ष्या पोटी
फिरू लागला पुन्हा भिकारी, मूठ पसाभर दाण्यासाठी
माणिक आणिक गहू यांतला फरकहि ज्यांना नाही उमगत
देव दैव त्या देइल कोठुन, अजाण त्याची अशीच फसगत !

गदिमांनी साहित्य व चित्रपट या आपल्या व्यवसायक्षेत्रातल्या गमतीजमती देखील शाहिरी अंगानं, मजेदाररीतीनं लिहिलेल्या आहेत. १९४०-४१ सालच्या सुमारास रत्नागिरी येथे प्रा. ना. सी. फडके यांच्या अध्यक्षतेखाली 'मराठी साहित्य संमेलन ' भरले होते. त्या संमेलनाला अनुलक्षून ' शारदेचा दरबार ' नावाचा विनोदी पोवाडा रचलेला होता. हा पोवाडा सर्वच्या सर्व मला उपलब्ध झाला नाही. त्यातील काही भागच हाती आला. तो पुढे देत आहे.

त्यातील त्यावेळी प्रसिद्ध असलेल्या श्रीमती मीनाक्षी कराडकर, शांताबाई नाशिककर ह्या लेखिका किंवा श्री. नानासाहेब चाफेकर ह्या साहित्यिकांचे उल्लेख आजच्या पिढीच्या कदाचित लक्षातही येणार नाहीत. तसेच 'दौलत', ' अटकेपार ' या फडक्यांच्या त्या काळात गाजत असलेल्या कादंबऱ्याही कदाचित आठवणार नाहीत. परंतु गदिमांनी 'तत्कालीन मराठी साहित्यजगत' या पोवाडयात आणलेले आहे. त्या पोवाडयातील उपलब्ध झालेला भाग असा आहे :

रत्नांचा मुकुट मस्तकी। वीणा घे अंकी
छेडिते तार। छेडिते तार। झंकार शारदा करी।
नाद महीवरी। आले मानकरी। भरला दरबार। भरला दरबार।
हे पहा साहित्यभास्कर। तात्या केळकर।
' केसरी ' आसनी पहिले। आसनी पहिले।
त्यापुढे हे चाफेकर बदलापूरकर। येवोनि बसले ॥
तलवार ज्यांची लेखणी। साहित्याग्रणी। शूर नरमणी।
लेखणीने रानच उठविले। वाणीने दळ ज्यांच्या हाले।
सावरकर वीरासनी बसले।
' दौलत ' मोठी कीर्ति गेली की ' अटकेपार '।
कमल फुलांचे सडे अंथरा आले सरदार।
कमलपाकळ्या मोदे उधळी कमला बंबेवाले।
मीनाक्षी या राजकारणी फेकिती भाले।
शांताबाई कोरीव लेणी लेखणीने कोरी।
प्रेमा कंटक कादंबरीची करी एक वारी।
शांता आपटे चुकून शिरल्या या दरबारात
रत्नागिरीचे रत्नपारखी फसले सौद्यात !...

रत्नागिरीनंतर सोलापूर येथे झालेल्या साहित्य संमेलनात गदिमांचा हा पोवाडा शाहीर नानिवडेकर यांनी म्हटला होता व तो बराच गाजलाही होता !

त्या सुमारासच गदिमांनी गमतीने सिनेमाचाही एक पोवाडा लिहिला होता. हा पोवाडाही संपूर्ण असा उपलब्ध झाला नाही. त्यातील दोन कडवी किंवा चौक

फक्त हाती लागले. नटी, हीरो आणि दिग्दर्शक, डायरेक्टर यांच्याविषयीचा हा मजेदार भाग पहा :

ब्रह्मदेवा, एक विनवणी ।
तुझिया चरणी ।
श्रीमंती देऊ नको गरिबाला
म्हातारपण देऊ नको नटीला ।
गाता येईना तान मारते
लिहिता येईना लेख छापते ।
पोहता येईना उड्या मारते ।
अशक्य सारे नटी एकटी
शक्यामध्ये आणते ।
अकलेच्या नावानं झिरो ।
सिनेमात ठरे तो हिरो ।
फुगलेला देह वातानं ।
चालतो बायकी डौलानं ।
फिड्ल-पियानो इंद्रसभेमधे कोठूनिया येती
या मौजाचा ब्रह्मदेव त्याला डायरेक्टर म्हणती ! ..

राम गणेश गडकरी ऊर्फ कवी गोविंदाग्रज यांना 'प्रेमाचा शाहीर' असे म्हटले जात असे. गोविंदाग्रजांनी 'गुलाबी कोडे' नावाची एक प्रेमकविता लिहिलेली आहे. गडकऱ्यांच्या 'गुलाबी कोडया'ला गदिमांनी गमतीने उत्तर दिले आहे :

अपरा-पूर्वा जाया दोन्ही असती सूर्याला
सवतीमत्सर दोघींमधला विकोपास गेला
दोन्ही टोका दोन मंदिरे बांधून मग दिधली
रविरायाने कायमची ती कटकट मिटवीयली ॥
अपरा दारी दिनकर येता मनात लाजे ती
सहज गुलाबी रंग रंगला तिचिया गालावरती

अपेरच्या गाली असा अनुरागाने गुलाबी रंग चढला, तर तिकडे मत्सर-रागाने पूर्वा लालीलाल झाली, असे उत्तर देऊन गदिमांनी म्हटले होते-

गोविंदाग्रज फुका गुंतला गुलाबी कोडयात
स्त्रीहृदयाचे अमर कवीला उमगे इंगित !

□

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. 25593
काव्य

१३

# माडगूळकरांची समरगीते

शरपंजरी पडलेल्या भीष्माचार्यांना श्रीकृष्णाने पांडवांना 'राजधर्म' सांगण्याची विनंती केली, तेव्हा भीष्म म्हणाले,

" या प्राणांतिक अवस्थेत मी कसला धर्मोपदेश करणार ?"

त्यावर श्रीकृष्णाने भीष्माला वर दिला.

भीष्म म्हणाले, " कृष्णा, एवढ्या सायासाने हे ज्ञान माझ्या मुखाने कशाला वदवितोस ? त्यापेक्षा तू स्वतःच या पांडवांना राजधर्म सांग."

श्रीकृष्ण म्हणाले, "आपण तीन पिढ्या राजशकट चालविला आहे. आपल्या शब्दांमागे प्रत्यक्ष अनुभवाचे सामर्थ्य आहे. आपल्या मागे आपली कीर्ती शाश्वत राहावी यासाठी मी हा आग्रह धरतो आहे."

शेवटी श्रीकृष्णाची सूचना मानून भीष्माचार्यांनी राजधर्म सांगितला. कथनाच्या ओघात ते म्हणाले, "युद्धापेक्षा सामयोजना ही केव्हाही श्रेष्ठ. तथापि, केवळ सामाचीच आस बाळगणारा राज्यकर्ता हा दुर्बल मानला जातो. सामसंपादन करणाऱ्या राजानेही आपले सामर्थ्य सदैव वाढवीत असावे. दुर्बलाला युद्ध जिंकता येत नाही. सामही साध्य होत नाही. आपल्या प्रजेत वीरवृत्तीचे व सामर्थ्याचे संगोपन होईल असेच धोरण कोणत्याही राजाने धरावे. मेघापासून जशी जलाची अपेक्षा केली जाते, तशीच शूरांपासून सामान्यजन संरक्षणाची अपेक्षा करतात. म्हणून राजाने आपल्या प्रजाजनांमध्ये वीरवृत्तीचे संवर्धन केले पाहिजे."

" क्षात्रधर्म हिंसात्मक आहे म्हणून तो पापरूप आहे, ही कल्पना चुकीची

आहे. शेतातील धान्य नीट वाढण्यासाठी त्याच्या सभोवती वाढणारे तण समूळ उपटून काढावे लागते. साधूंचा आणि धर्मनिष्ठ प्रजेचा अभ्युदय व्हावा म्हणून दुर्वृत्तींचा संहार करावा लागतो. तो अधर्म होत नाही. धर्मपालनच होते. राजाने जसे यज्ञासाठी सिद्ध असावे, तसे राजयज्ञासाठीही सिद्ध असावे.

" स्वधर्माच्या आणि सज्जनांच्या रक्षणासाठी जे वीर धारातीर्थी पतन पावतात ते योग्यांप्रमाणेच उत्तम गतीला जातात. संग्रामकाळी वीराच्या देहातून जो रक्तप्रवाह वाहतो तो त्याचे सर्व पाप धुवून टाकतो. तो त्याला निष्पाप करतो. शय्येवर मरण हे योद्धयाचे सर्वात मोठे दुर्भाग्य. रणांगणांत मृत्यू हे त्याचे महद् भाग्य. "

महाभारतातील शांतिपर्वामधील हा प्रसंग श्री. ग. दि. माडगूळकरांच्या समरगीतांचा विचार करताना सहज आठवला. आणि आठवणीचा हा धागा याही पलीकडे जसा जाऊन पोचला, तसाच तो अलीकडेही येऊन ठेपला.

पलीकडे म्हणजे पार ऋग्वेदातील ' मन्युसूक्ता ' पर्यंत. ऋग्वेदांतील ज्या चौदा सूक्तांमध्ये ' मन्यु ' देवतेची आराधना केलेली आहे, ते ' मन्युसूक्त ' म्हणून ओळखले जाते. तसे पाहिले तर हे सूक्त म्हणजे प्राचीन ' समरगीत ' किंवा 'संग्राम संगीत 'च. कारण ह्या सूक्तांच्या गायनाने मन्युदेवतेची स्तुती करून शत्रूशी दोन हात करण्यासाठी प्रत्यक्ष त्वेषपूर्ण क्रोधालाच आवाहन केलेले आहे. मन्यूही त्वेष, क्रोध, संताप यांचीच देवता आहे. मन्यूच्या स्तवनाने, तिच्या कृपाप्रसादाने आपले वीर बाहू स्फुरण पावोत, अशी शूरांची प्रार्थना आहे :

' हे मन्यो, स्वतःसंबंधी अभिमान वाहावा असाच तू. आम्ही तुला धारण करतो. युद्धप्रसंगी कष्ट देणाऱ्या आणि आमच्यापेक्षा शिरजोर असणाऱ्या शत्रूवर चाल करून आम्ही त्यांना पराभूत करू; पण शत्रूंना असह्य अशा तुझ्या प्रतापी तेजाच्या सहाऱ्याशिवाय हे शक्य नाही.

' हा मन्यू इन्द्र, अग्नि, वरुण इत्यादी स्वरूप आहे. साक्षात तेज हेच मन्युस्वरूप आहे.

' हे मन्यो, तुझी सारखीच प्रीती आम्हां सकलांवर असू दे. तू आमच्याकडे दयेने पहा ......'

अशी प्रार्थना करून त्याला आवाहन केले आहे.

'आमच्या या यज्ञात तू प्रकट हो; आणि बलाढ्य शत्रूंचा नाश कर. तू शत्रुसंहारक आहेस. युद्धामध्ये ओज निर्माण कर. सर्व बांधवांना जागृत कर आणि शत्रूंचा नाश कर. हे मन्यो, तू सतत आमचा सहाय्यकर्ता असलास म्हणजे आम्ही

सर्व विजयश्रीसाठी एकसारखा सिंहनाद निनादू ...' असा या सूक्तांचा थोडक्यात सारांश आहे.

मन्युसूक्तांप्रमाणेच वेदांमध्ये रणसंग्रामात यशश्रीने माळ घालावी यासाठी वज्रबाहू–' इन्द्रविजय स्तोत्र ' देखील दिलेले आहे. या स्तोत्रपठणाने अभूतपूर्व अशा तेजाचा उद्‌भव होतो आणि त्यायोगे शत्रू निष्प्रभ ठरतो, अशी श्रद्धा. याच श्रद्धेने कुरुक्षेत्रावर भारतीय महायुद्धाच्या वेळी अर्जुनाने ही स्तुती केली होती. या स्तोत्राचाही सारांश असा :

' अतिशय वेगाने चाल करून जाणारा हा इंद्र, सदैव प्रखर असणारे वज्र हे आपले हत्यार नेहमी पाजळून ठेवीत असतो. संग्रामात भीमकाय बैलाप्रमाणे मुसंडी मारुन शत्रूला घायाळ करून, भयग्रस्त करतो...

' हे महाप्रतापी इंन्द्रा, तू पुरातन कालापासून सर्वांचा युद्धकला–शिक्षक आहेस. तू विजयी रथावर आरूढ हो. हे इन्द्राच्या मित्रस्वरूप देवांनो, तुम्ही पराक्रमी इंद्राच्या मागे राहून शौर्य गाजवा......'

' शत्रूचा ध्वज जवळ आला असता जी घनघोर लढाई चालू होईल त्यामध्ये इंद्र आमचे रक्षण करो. ब्रह्मदेवाने धार लावून तयार केलेल्या बाणरूपी शस्त्रा, तू शत्रूच्या शरीरात प्रवेश कर आणि शत्रूपैकी एकही मनुष्य शिल्लक ठेवू नकोस......"

श्रीमत्‌भगवद्‌गीतेत तर प्रत्यक्ष श्रीकृष्णांनीच अर्जुनाला उपदेश करून कर्तव्य व स्वधर्म म्हणून युद्धप्रवृत्त केलेले आहे. गीतेची ' गीताई '–विनोबांनी तयार केली. गीताईमध्ये म्हटले आहे :

स्वधर्म तोहि पाहूनि न योग्य डगणे तुज ।<br>
धर्म–युद्धाहुनी कांही क्षत्रियास नसे भलें ।।<br>
प्राप्त झाले अनायासें स्वर्गाचे द्वार मोकळें ।<br>
क्षत्रियास महाभाग्ये लाभतें युद्ध हें असे ।।<br>
हे धर्म–युद्ध टाळूनि पापात पडशील तूं ।<br>
स्वधर्मासह कीर्तीस दूर सारूनिया स्वये ।।<br>
अखंड लोक गातील दुष्कीर्ती जगती तुझी ।<br>
मानवतांस दुष्कीर्ति मरणाहूनि आगळी ।।<br>
मेल्यानें भोगिसी स्वर्ग जिंकिल्याने मही–तळ ।<br>
म्हणूनि अर्जुना ऊठ युद्धास दृढ–निश्चये ।।<br>
हानि लाभ सुखे दुःखे हार जीत करीं सम ।<br>
मग युद्धास हो सिद्ध न लागे पाप ते तुज ।।

'युद्धाय कृतनिश्चयः' अशीच हाक गीतेने दिलेली आहे. आणि 'यदा यदा हि धर्मस्य' म्हणून निस्तेज होत चाललेल्या धर्माच्या संरक्षणासाठी व तेजवान धर्माची पुन्हा प्रतिष्ठापना करण्यासाठी आपण स्वतःच अवतार घेतो. 'संभवामि युगे युगे' असे श्रीकृष्णाने सांगितले आहे.

या बाबतीत मराठी संतही मागे नाहीत. संतांनी स्वधर्म, स्वदेश यांची महती मानलेलीच आहे. मूल्यामूल्यविवेक आचरिला आहेच. 'भले तरी देऊ कासेची लंगोटी। नाठाळाचे काठी हाणू माथां' किंवा 'मऊ मेणाहूनी आम्ही विष्णुदास। कठिण वज्रास भेदू ऐसे।' अशी आपल्या सबल–सज्जनतेची ग्वाहीच त्यांनी दिलेली आहे. त्यांचे संतत्व, साधुत्व किंवा सज्जनपणा म्हणजे दुर्बलपणा नव्हता. तुकारामाने तर आणखी म्हटले आहे :

होईल तैसे बळ। फजीत करावे ते खळ॥
तुका म्हणे त्यांचे। पाप नाही ताडणाचे॥

रामदास तर रोखठोक. शिवरायांच्या स्वराज्य संस्थापनेच्या कार्यात त्यांचा हातभार. 'राजियांचा राजधर्म' त्यांनीही सांगितलाच आहे :

गनीमांच्या देखता फौजा। रणशूरांच्या फुर्फुरती भुजा।
ऐसा पाहिजे की राजा कैपक्षी–परमार्थी॥
तयास देखता दुर्जन धाके। बैसवी प्रचीतीचे तडाखे।
बंड पाषांडाचे वाख। सहजचि होती॥
ही धूर्तपणाची कामे। राजकारण करावे नेमे।
ढिलेपणाच्या संभ्रमे। जाऊ नये॥
हुंब्यास हुंबा लावून द्यावा। टोणप्यास टोणपा आणावा।
लौंदापुढे उभा करावा। दुसरा लौंदा॥
धटाशी आणावा धट। उद्धटासी पाहिजे उद्धट।
खटनटासी खटनट। अगत्य करी॥

हा सगळा प्रपंच येथवरी एवढ्याचसाठी केला की, आपल्या समरगीतांनाही अशी एक भक्कम परंपरा आहे. कालमानानुसार, बदलत्या परिस्थितीनुसार राहणीमानात किंवा वेशभूषेत जसा फरक पडत जातो, तसा मूळ विचार व चिरंतन मूल्ये यांच्या अभिव्यक्तींच्या आविष्कारातही बदल होत असतो. 'स्वातंत्र्य' हे एक शाश्वत, चिरंतन मूल्य आहे. म्हणून त्याच्या प्राप्तीसाठी आणि संरक्षणासाठी प्राणपणाने झटणे, लढणे, प्रसंगी हौतात्म्यही पत्करणे श्रेष्ठ व उचित मानले गेले आहे, त्यासाठी–

'मारितां मारितां मरावे । तेण गतीस पावावें ।
फिरोनि येतां भोगावे । महद्‌भाग्य ॥'

अशा शब्दात रामदास उपदेश करतात, तर-

'मारित मारित मरण्यासाठी । उभा भारतीय चाळिस कोटी'

अशा शब्दात माडगूळकर, आक्रमणाच्यारूपाने भारतभूमीवर चालून आलेल्या चिनी पिवळ्या पिशाच्चाला हटविण्यासाठी भारतीय जवानांना आवाहन करून प्रोत्साहन देतात-

लढा वीर हो, लढा, लढा।
पराक्रमाने अधिक उंचवा हिमालयाचा कडा कडा।

हिमालय केवढा महान। 'स्थावराणां हिमालयः' अशा शब्दात श्रीकृष्णाने गीतेतल्या विभूतियोगात त्याला आपली एक विभूती मानून त्याचा केवढा गौरव केलेला आहे! आणि कविश्रेष्ठ कालिदासाने तर 'कुमारसंभव' काव्याच्या प्रारंभीच या हिमराजाचा महिमा गायिलेला आहे :

अस्त्युत्तरस्यां दिशि देवतात्मा।
हिमालयो नाम नगाधिराजः ॥

कालिदासाने हिमालयाला 'देवतात्मा' म्हणून संबोधिले आहे, पण आणखी 'पृथ्वीचा मानदंड' म्हणूनही गौरविलेले आहे. भारतीय मनात गंगा आणि हिमालय यांना एक विशेष परम-पावित्र्याचे आणि आदराचे स्थान आहे. म्हणूनच हिमालयावर जेव्हा परकीयांकडून आक्रमण झाले त्यावेळी भारतीय मन दुःखाने कळवळले आणि प्रतिकारार्थ चेतून जाऊन प्राणपणाने उभे ठाकले!

ग. दि. माडगूळकरांसारखा कवी आपल्या समरगीतातून मोठ्या त्वेषाने म्हणू लागला :

शेजाऱ्याचे शूर शिपाई
सीमारेषा पुसूनी पायी
लुटूं पाहती तुमची आई
त्या ढोंग्यांच्या मुसक्या बांधा,
भ्याडा हाती भरा चुडा!
लढा वीर हो, लढा, लढा।

बोलून चालून हे समरगीतच! त्याची धाटणी, जडणघडणही तशीच आवेशपूर्ण असणार! क्रोधालाच इथे आवाहन! चीड-संताप यांनाच इथे निमंत्रण! मग ही चीड शब्दाशब्दातून व्यक्त झाली नाही तरच नवल! त्यातून शत्रूही शत्रूसारखा सरळ सरळ दंड थोपटीत आलेला नव्हता. आक्रमणाच्या पूर्वी काही

थोडकीच वर्षें 'हिंदी-चिनी भाई भाई!' अशा गर्जना दिल्या होत्या. पं. नेहरूंच्या 'पंचशील' तत्त्वाचा पुरस्कार केलेला होता. त्या तत्त्वांत शांती–प्रस्थापनेसाठी झटण्याची आणि परस्परांवर आक्रमण न करण्याची प्रतिज्ञाही होती. पण हे सर्व चिन्यांनी पायी तुडविले होते. शांतीची, अनाक्रमणाची आणि बंधुत्वाची भाषा बोलत बोलतच बगलेतली सुरी बाहेर काढलेली होती. म्हणून या कपटाचा व विश्वासघाताचा विशेष धक्का बसलेला होता आणि क्रोध व चीड उभ्या देशात संचरली होती! या क्रोध–चिडीतूनच माडगूळकरांचे शब्द उमटले होते :

काल बिलगले भाऊ म्हणुनी
आज शांतिला दुर्बल गणुनी
काढू पाहती मूळच खणुनी
तोडा त्यांचे हात अडाणी, कबंध तुडवित चढा, चढा!
लढा वीर हो, लढा लढा!
कपटासंगे शौर्य भांडु द्या
तसूतसूवर रक्त सांडू द्या
आक्रमकांचा श्वास कोंडु द्या
तुमच्या तोंडी विजयश्रीचा, सूर लागु द्या खडा, खडा!
लढा वीर हो, लढा, लढा!

आणि रणांगणावर, देशाच्या सीमेवर जे आपले जवान प्राणाची कुरवंडी करीत होते, त्यांना कवी आश्वासनपूर्ण शब्दांत सांगत आहे :

रणमर्दांने तुमच्या पाठी
मारित मारित मरण्यासाठी
उभा भारतीय चाळिस कोटी
हटवा मागे पिशाच्च पिवळे, उडु द्या तोफा धडा, धडा!
लढा वीर हो, लढा, लढा
पराक्रमाने अधिक उंचवा हिमालयाचा कडा, कडा!
लढा वीर हो, लढा, लढा

गदिमांची अशी ही तेजस्वी वाणी, समरगीतांमधून एका ओजस्वी रूपात प्रकटते. त्यांच्या लेखणीने मराठी काव्याच्या दालनात आपल्या सामर्थ्याची प्रचीती विविध प्रकारांनी दिलेली आहे. 'आला वसंत देही मज ठाउकेच नाही', किंवा 'स्वप्नात पूजिले ज्यास गडे, ते रूप ठाकलें आज पुढे' अशा ललितमधुर भावगीतांनी त्यांच्या लेखणीनं भुरळ पाडली, तर 'बुगडी माझी सांडली ग जाता साताऱ्याला' अशा खटकेबाज लावणीने इष्काचे रंग दाखवले. 'फिरत्या चाकावरती देसी मातीला आकार, विठ्ठला, तूं वेडा कुंभार!' अशा भक्तिगीतांनी

हृदय ओलावले, तर 'नाच रे मोरा, आंब्याच्या बनांत, नाचरे, मोरा नाच'! अशा बालगीतांनी अंगण-ओसरी नाचरी केली...! गदिमांच्या लेखणीचे हे विविध आविष्कार पाहून मन खरोखरच थक्क होऊन जाते! होनाजी या एका जुन्या शाहिराने अनंत फंदी नामक दुसऱ्या शाहिराच्या काव्याची तारीफ करताना 'फंदी अनंत कवनांचा सागर' असे म्हटले आहे. पण ती तारीफ आता माडगूळकरांच्या विपुल आणि विविध काव्यरचनेला अनुलक्षून 'गदिमा अनंत कवनांचा सागर' अशी थोडी बदलून म्हटली गेली पाहिजे. म्हणजे गदिमांचे केवळ 'कवित्व'च नव्हे, तर ती 'तारीफ' ही सार्थ होईल!'

गदिमांच्या व्यक्तित्वात भावकवीइतकाच समर्थ व दमदार असा एक 'शाहीर' होता. लावणी-पोवाडे या शाहिरीबाजाप्रमाणेच त्याने समरगीतेही रचली. स्वातंत्र्यपूर्व कालात स्वातंत्र्यलढ्यात स्फूर्ती निर्माण करण्यासाठी जशी स्वातंत्र्यगीते रचली, तशी स्वातंत्र्योत्तर कालात चीनच्या व पाकच्या आक्रमकांच्या वेळी स्वातंत्र्य-रक्षणासाठी राष्ट्रात क्षात्रतेज जागृत करण्याच्या उत्कट भावनेने समरगीतेही रचली!

समरगीतांची प्राचीन परंपरा प्रारंभी आठवणींच्या स्वरूपात उल्लेखली आहेच. ही दिव्य परंपरा अर्वाचीन काळातल्या कवींनीही मोठ्या दमदारपणानं जोपासलेली आहे. स्वातंत्र्योत्तर परकी आक्रमणाच्या काळात अशी समरगीते तर हस्ताच्या पावसासारखी कोसळली! उदंड निर्माण झाली. पण त्यातली कवीवर्य कुसुमाग्रज आणि वसंत बापट यांच्या समरगीतांनी मराठी घर आणि मन त्वेषाने भारून टाकले. गदिमांची कामगिरीही अशीच तेजस्वी! त्यांच्या ओजस्वी समरगीतांनी राष्ट्रप्रेमी नागरिकांचे बाहू फुरफुरल्याशिवाय राहिले नाहीत.

झडल्या भेरी, झडतो डंका
पुढचे पाऊल पुढेच टाका!
तोंड लागले आज लढ्याला
चहुबाजूंनी येईल घाला
छातीवरती शस्त्रे झेला.
फिरू नका रे डरू नका!
पुढचे पाऊल पुढेच टाका!
शपथ तुम्हाला शिवरायाची
मराठमोळ्या मर्दुमकीची
समर्थ गुरूची श्री टिळकांची
विजयाच्या या ऐका हाका!
पुढचे पाऊल पुढेच टाका!

निशाण आपुले उंच धरा
शूरपणाची शर्थ करा
कराच किंवा रणीं मरा
बहाद्दूरानो मरणा जिंका !
पुढचे पाऊल पुढेच टाका !

स्वातंत्र्यलढ्याच्या काळात गदिमांनी देशबांधवांना दिलेली ही चेतावणी अजून विरलेली नव्हती. स्वातंत्र्यनिष्ठ मनात ती जागीच होती. म्हणून चीनचे आक्रमण होताच ती पुनश्च गदिमांच्याच शब्दात प्रकट झाली–

माणूसकीच्या शत्रूसंगे युद्ध आमुचे सुरू
जिंकू किंवा मरू, जिंकू किंवा मरू !

बेचाळीसच्या लढ्याच्या वेळी गांधीजींनी ' Do or Die ' 'करेंगे या मरेंगे' अशा अटीतटीच्या भाषेत भारताला समरमंत्र दिलेला होता. त्याचाच अनुवाद त्या वेळी ' कराच किंवा रणी मरा ' अशा गीतपंक्तीत गदिमांकडून अवतरला होता, तर सुमारे वीस वर्षांनी, १९६२ साली तो ' जिंकू किंवा मरू ' अशा प्रतिज्ञेत प्रकटला होता :

लढती सैनिक लढू नागरिक
लढतिल महिला लढतिल बालक.
शर्थ लढ्याची करू...! जिंकू किंवा मरू !

देश आमुचा शिवरायाचा
झाशीवाल्या रणराणीचा
शिरतळ हाती धरू...! जिंकू किंवा मरू !

शस्त्राघाता शस्त्रच उत्तर
भुई न देऊ एक तसूभर
मरू, पुन्हा अवतरू...! जिंकू किंवा मरू !

हानी होवो कितीहि भयंकर
पिढ्या पिढ्या हे चालो संगर
अंती विजयी ठरू...जिंकू किंवा मरू !

स्वातंत्र्याची दुर्दम्य आकांक्षा किंवा स्वतंत्रतेची अमोल महनीयता गदिमांच्या शब्दाशब्दांतून, सज्जनतेच्या रक्षणार्थ स्तंभातून प्रकट झालेल्या नृसिंहासारखी खवळून, मूर्तिमंत क्रोध होऊनच अवतरलेली दिसते. म्हणूनच 'मरू, पुन्हा अवतरू !' असे स्वातंत्र्यासाठी अविरत, जन्मोजन्मी झुंज घेण्याच्या एका आगळ्या दिव्य वेडाचा ध्यासही तिच्याठायी दिसतो. या ध्यासाला 'शस्त्राघाता शस्त्रच

उत्तर' हे कठोर तत्त्वही ठाऊक आहे. 'आधी गाजवावे तडाखे । मग भूमंडळ धाके!' ही समर्थांची शिकवणही माहीत आहे.

त्यामुळेच परक्यांचा हल्ला होताच उभा देश मरगळ झटकून उठतो आणि–

'चवदा भाषा उठल्या गर्जत
जय मृत्यूंजय, जय हिम पर्वत
जय रणचंडी, जय जय भारत
जय भारत, जय हिंद !

असा धीर गंभीर घोष दशदिशांतून दुमदुमू लागतो. जातपात, धर्मपंथ, वेश–भाषा, वर्ण–पक्ष हे एरवीचे अमंगल भेद उरत नाहीत. त्यांच्या ठिकऱ्या उडतात. आणि प्रत्येक स्वातंत्र्यभक्तांच्या ओठावर रणचंडी रणगान नाचू लागते :

उत्तर सीमेवरती वैरी
फैरी मागून झाडी फैरी
जळले आमुचे देह तरीही,
हात राहतील अस्त्रे वर्षत...
जय भारत जय हिंद !

जवान हिंदी तरणेताठे
हिंदू, मुस्लिम, शीख, मराठे
घराघरातुन उठले योद्धे
परंपरागत शौर्या परजित...
जय भारत जय हिंद !

भेद संपले सरल्या जाती
ऐक्य ठाकले उभ्या भारतीं
द्रव्य, संपदा आणि अन्नदा
रणचंडीच्या आता अंकित
जय भारत जय हिंद !

एक ध्येय हे एकच शिक्षण
स्वातंत्र्याचे अभेद रक्षण
मायभूमिच्या कणाकणास्तव
रणांत होतिल प्राण समर्पित...
जय भारत जय हिंद !

चढो तीव्रता कितीही लढ्याची
आज सिद्धता तीन पिढ्यांची

शिवेत येता पाय शत्रुचा,
त्याच क्षणी तो जळेल निश्चित...
जय भारत जय हिंद !

गदिमांचे हे समरगीत राष्ट्रभक्तांना केवळ युद्धसन्मुख करण्याचे किंवा स्वातंत्र्याच्या रक्षणार्थ बलिदान करण्याचेच आवाहन करीत नाही, तर ते आपल्या उच्चस्वरांत सांगत आहेच, पण युद्धमग्न राष्ट्राला आवश्यक असणारी ऐक्याची आणि सर्वस्वदानाची रणनीतीदेखील शिकवीत आहे. पण या गीतात हे काम त्यांनी जाता जाता केल्यासारखे आहे असे वाटते आणि याची जाणीव त्यांनाही असावी. म्हणूनच मग ह्यासाठी त्यांनी हे स्वातंत्र्यगीत लिहिले आहे. राष्ट्रासाठी प्राणपणाने झुंज हे तर खरेच, पण सैन्य पोटावर चालते हेही खरेच ! त्यासाठीच गदिमा म्हणतात–

धनदान करा, श्रमदान करा
ह्या देहातिल रक्त भक्त हो, मायभूमिला मुक्त करा !
वावटळासम शत्रू येतो
धर्मभूमीवर पाय रोवतो
गडकोटाचे रूप येऊ द्या या देशांतिल घरां घरां !
शस्त्रासाठी अस्त्रांसाठी
उघडा कुलपे सोडा गाठी
सोने, चांदी, पैसा यांनी मायभूमिचा कोष भरा !
उद्योगांना आणा भरती
घाम पाजुनी पिकवा शेती
सशक्त तो तो सैनिक आता, मारा किंवा रणी-मरा !
काळ जगाच्या बळा तोलतो
धर्मासंगे विजय चालतो
बघू कुणाला धर्म उमगला, कोण नीच अन् कोण खरा !
मायभूमिला मुक्त करा !

युद्धासारख्या आपत्तीत जेव्हा राष्ट्र सापडते, तेव्हा सर्वच गोष्टी युद्धपातळीवरून तातडीने व समर्पणभावनेने करावयाच्या असतात. म्हणून रणांगणावर लढणारे जवान जेवढी महत्त्वाची कामगिरी बजावत असतात, तेवढ्याच तोलामोलाची कामगिरी शेतकरीही आपल्या शेतात राबून पार पाडत असतात, कामगार आपल्या कारखान्यातून कष्ट करीत असतात. आणि हे महत्त्व लक्षात घेऊन आणि आपला देश प्रामुख्याने शेतीप्रधानच आहे, हेही ध्यानात धरून भारताचे दुसरे पंतप्रधान

श्री. लालबहादूर शास्त्री यांनी 'जय जवान ! जय किसान !' अशी घोषणाच दिली होती. त्यावेळी भारत-पाक युद्ध चाललेले होते आणि देशात स्वातंत्र्याच्या रक्षणार्थ समर्पण-यज्ञ मांडलेला होता. अशा वेळी लालबहादूरजींची यथोचित मंत्रघोषणा, त्यातील मार्मिक आशयासह गदिमांनी गीतबद्ध केली :

एक सूर, एक ताल, एक गाऊ विजयगान !
जय जवान, जय किसान!

अखिल देश पाठिशी, 'जवान' व्हा रणी चला
किसान होउनी कसा भूमि सस्य श्यामला
यौवनास योग्य ते शौर्य आणि स्वाभिमान
जय जवान, जय किसान !

शत्रु-मित्र जाणुनी, सावधान सर्वदा
आपुल्या श्रमे करू, प्रसन्न देवि अन्नदा
उभ्या जगात आपुली, सदैव उंच ताठ मान !
जय जवान, जय किसान !

अजिक्य सैन्य आमुचे, गाजवी पराक्रमा
भूमिदास दाखवी, निर्मितीत विक्रमा
स्वतंत्र हिंद देश हा स्वतंत्र सिंधु आसमान
जय जवान, जय किसान !

या गीतात बहाद्दर जवानांबरोबरच कर्मवीर शेतकऱ्यांचा जसा जयजयकार केलेला आहे आणि प्रत्यक्ष युद्ध जिथे चालते तेच तेवढे समरांगण नव्हे, तर धनधान्यादी उत्पादनाची प्रक्रिया जिथे चालते, ती सर्व क्षेत्रे म्हणजे देखील समरभूमीच आहे, हे महान सत्य गदिमांनी सांगितलेले आहे. या दृष्टीने पाहता गदिमांची समरगीते ही फारच वैशिष्टयपूर्ण आहेत. माता, भगिनी, मुले म्हणून आपले राष्ट्राशी काय कर्तव्य आहे हे जसे त्यांनी काही गीतांमधून सांगितलेले आहे, तसेच प्रत्यक्ष सैनिक म्हणून व त्या सैनिकांविषयी आम्ही नागरिक म्हणूनही आमचे काय नाते आहे, हे त्यांनी फार सुरेख रीतीने सांगितलेले आहे. हा पहा त्यांचा सैनिकच काय सांगतो आहे—

उभा पाठिशी सदैव माझ्या, तेजोमय इतिहास
उभे पाठिशी प्रताप, शिवबा, उभे शौर्य विश्वास,
उभे पाठिशी भगतसिंगजी उभे गुरु गोविंद
उभा पाठिशी सुभाष योद्धा गर्जतसे जयहिंद !
या देशीचा मी संरक्षक

भारत माझे गाव...सैनिक माझे नाव !

मी न मराठी राजस्थानी, धर्म जाति मम हिंदुस्तानी
मायभूमिचा मी अभिमानी, या अभिमानी धर्मव्रतांचा
अवघा अंतर्भाव...सैनिक माझे नाव !

जननी माझी भारतमाता, या भूमीतच पिके वीरता
जन्म-मृत्युची मला न चिंता, देह विनाशी हा तर केवळ
आत्म्याचा पेहेराव...सैनिक माझे नाव !

जितेन आणि जगेन लोकी, रण–क्रीडांगण माझ्यालेखी
खड्ग पडो की मुकुट मस्तकी, देशकार्य ते देवकार्य मज
अढळ अंतरी भाव ..सैनिक माझे नाव !

उरीं निर्भयता, नयनीं अग्नी, उन्नत मस्तक करी शतघ्नी
उभा इथे मी असा निशिदिनी, बघू कोणता शत्रू करतो
कुठुनी धीट उठाव...सैनिक माझे नाव !

स्वत:चे लौकिक नाव, गाव, जात नि धर्म विसरलेला आणि 'देशकार्य हेच देवकार्य' मानणारा व भारतीय सैनिक–सैनिक म्हणून कर्तव्यदक्ष तर आहेच आहे, पण जन्म-मृत्यूची पर्वा न करणारा, विनाशी देह म्हणजे आत्म्याचा कोष समजणारा, आणि मस्तकावर खड्ग पडो किंवा मुकुट चढो-दोन्ही सारखेच मानणारा, श्रीमत्भगवद्गीतेचे तत्त्वज्ञान झोकलेला व पचवलेला स्थितप्रज्ञच आहे !

हा असा स्थितप्रज्ञ असला आणि लौकिक नाती बाजूला सारून देशरक्षणासाठी रणांगणाकडे चालला असला तरी त्याची आई, ही आईच आहे आणि पत्नीही पत्नीच आहे ! आईला या आपल्या कर्तव्यदक्ष, शूरवीर मुलाचा अभिमान आहे ! ती वीरकन्या, वीरपत्नी व आता वीरमाता म्हणून उभी आहे. ती या आपल्या वीर घराण्याची परंपरा जाणून आहे. पण सूनबाई नवीन आहे. नाही म्हटलं तरी तिच्या काळजात लढाईची धडकी भरलेली आहे, ती स्वाभाविकही आहे, कारण नवोढा तशी अजून अननुभवीच आहे. म्हणून प्रेमळ सासूबाई आपल्या घराण्याची थोरवी सांगून तिला रीतभात शिकवीत आहेत. दूर देशी जाणारा निर्विघ्नपणे लवकर सुखरूप परत यावा म्हणून निरोपाच्या वेळी त्याच्या हातावर दही घालण्याची जुनी कौटुंबिक, वत्सल रीत आहे. मुलगा रणी चालला आहे, तर त्याची आई आपल्या सुनेला सांगते आहे–

दही घाल हातावरती रणा बाळ जाई
चुडा तुझा सावित्रीचा, गडे सूनबाई !

नको पाणवू ग डोळे, नको अशी पाहू

रणांगणी गेले याचे वडिल दोन भाऊ
रणांगणी रमतो मरतो, मराठा शिपाई !
बडीवार वंशाचा या तुला का न ठावा ?
वेड झुंजण्याचे आहे तुझ्या आडनावा
अशा निरोपाची नाही, घराण्या नवाई !
शिवप्रभूइतके बाई, जुने हे घराणे
सांगतात सनदा, याद्या, कीर्तीची पुराणे
पुरुष पुरुष वंशांतिल या, खेळला लढाई
युद्ध हीच तारुण्याला असे तीर्थयात्रा
पाहु दे हिमाद्रि, याला नदी ब्रह्मपुत्रा
विरह दुःख कुंकासंगे, कपाळास लेई !
फार काय सांगू बाळे, बोलवे न आता
दुवा दुला देते आहे, एक वीर माता
गळा परि दाटूनि येई, रडे आत आई...!

वरून धैर्याने वागणारी व शौर्यगाथा पूजणारी वीरमाता 'आई' म्हणून आतून पुत्रप्रेमाने रडत आहे, किंबहुना वीरमातेला असे उघड रडताही येत नाही, तिने असे रडायचेही नसते, तर सर्व उमाळे, उसासे उरातल्या उरात दाबून हसायचे असते ! आई म्हणून हा केवढा कोंडमारा सहन करायचा असतो. कर्तव्य किती कठोर असते, हे गदिमांनी या समरगीतात किती हळुवार, हृद्य रीतीने दाखवलेले आहे !

खरे तर, समरगीताचा तोंडवळाच त्यांनी इथे बदलून टाकला आहे. समरगीत म्हणजे ठिणगीसारखे शब्द आणि ज्वालेसारख्या भावना ही समरगीतांबाबतची एक सर्वसामान्य साचेबंद कल्पना गदिमांनी इथे पुसट करून टाकलेली असून, अशातऱ्हेच्या हृद्य–कौटुंबिक भावना हेलावून टाकणाऱ्या समरगीतांनी मराठी समरगीतांनाच एक वेगळे परिमाण प्राप्त करून दिले आहे. नवीन पैलू पाडला आहे. आणि ही त्यांची विशेष कामगिरी आवर्जून लक्षात घेतली पाहिजे.

नवा पैलू दर्शविणारे हे असेच दुसरे समरगीत :

याल कधी हो घरी, घरधनी
याल कधी हो, घरी ?
उगाच आले मन अंधारून
भीती दाटली उरी !
नको तेच मज दिसते डोळा
नयनी येतो उष्ण उमाळा

मुकेपणाने विरहदुःख हे कुठवर साहू तरी !

असाल कोठे कुठल्या ठायी
कुठे चालली घोर लढाई
रक्त गोठते म्हणती तेथे बर्फाच्या डोंगरी !

हे दुबळेपण मज न शोभते
सुदैवेच हे दुःख लाभते
सात पिढ्यांनी अशीच केली देशाची चाकरी !

वीरपत्नी मी वीरकन्यका
गिळून टाकिल्या व्यथा हुंदका
नका तुम्हीही घरां आठवू शर्थ करा संगरी !

मघाची ती वत्सल माता, तर ही प्रिया पत्नी ! भीतीने, विरहाने मन कातर बनलेली. घरधनी, रक्त गोठवणाऱ्या बर्फाळ डोंगर प्रदेशातून कधी घरी परत येईल म्हणून अस्वस्थ झालेली. पण लगेच सात पिढ्यांची मर्दुमकी आणि देशसेवा आठवून स्वतःचा दुबळा तोल सावरणारी व्यथा आणि दुःखाचा फुटू पाहणारा हुंदका घट्ट मनाने गिळून टाकून घरधन्यालाच, 'नका तुम्हीही घरां आठवूं, शर्थ करा संगरी !' असा आधार, दिलासा आणि कर्तव्याची जाणीव देणारी. एका स्त्रीच्या दोन मनांचे हे खेळ गदिमांनी किती सहज, पण समर्थपणाने टिपले आहेत !

ही झाली घरगुती चित्रे. घरच्या आईला, बायकोला अशी काळजी किंवा कातर हुरहूर वाटणे मनुष्यस्वभावाला धरूनच आहे. भावना आणि कर्तव्य यांच्यात होणारी मानसिक ओढाताणदेखील तशीच स्वाभाविक आहे. त्यामुळे या गीतातले हार्द हृदयाला हलवून जाते.

परंतु असाच, पण याहून थोडा वेगळा असा हृदयस्पर्शी अनुभव गदिमा आणखी एका समरगीतात अत्यंत हळुवार जिव्हाळ्याने व्यक्त करतात—

भारतीय नागरिकांचा घास रोज अडतो ओठीं
सैनिकहो, तुमच्यासाठी !

वावरतो फिरतो आम्ही
नित्यकर्म अवघे करतो,
राबतो अपुल्या क्षेत्री
चिमण्यांची पोटे भरतो,
परि आठव येतां तुमचा, आंतडे तुटतसे पोटी !
सैनिक हो, तुमच्यासाठी !

आराम विसरलो आम्ही
आळसा मुळी ना थारा,
उत्तरेकडुनिया इकडे
वार्तांसह येतो वारा,
ऐकताच कथा अश्रूंची, डोळ्यात होतसे दाटी !
सैनिक हो, तुमच्यासाठी !

रक्षिता तुम्ही स्वातंत्र्या
प्राणास घेऊनी हाती
तुमच्यास्तव आमुची लक्ष्मी
तुमच्यास्तव शेतीभाती
एकट्या शिपायासाठी, झुरतात अंतरे कोटीं !
सैनिक हो, तुमच्यासाठी !

राष्ट्र एकदा युद्धमान बनले, घरातला तरुण सैनिक बनून रणांगणावर गेला म्हणजे तो त्याच्या एकट्या घराचा राहात नाही, तर त्याच्यासाठी गाव, प्रदेश आणि सारा देशच घर बनते ! या मोठ्या घरातल्या सर्वच देशबांधवांना त्याच्याविषयी प्रेम, आदर, कृतज्ञता व जिव्हाळा वाटत असतो. त्याच्यासाठी देशवासीयांचा घास रोज ओठात अडखळतो ! गदिमांनी व्यक्त केलेली ही मोठ्या घरातली जिव्हाळ्याची व कृतज्ञतेची भावना किती हृद्य, सुंदर आणि थोर आहे !

मराठा जवान देशरक्षणाच्या ईर्षेने रणांगणावर दूर दूर जातो, घरापासून दूर जातो, म्हणून त्याच्या मनातील घर थोडंच दूर जाणार ? त्याचे गाव, मुलूख निसर्ग...हे सगळे थोडेच त्याला विसरता येणार ? जिथे तो जन्मला, ज्यांच्या अंगाखांद्यावर खेळला–बागडला, जिथे वाढला...त्या सगळ्यांपासून शेकडो मैल दूर गेला, म्हणून ते सर्व थोडेच त्याच्या स्मरणातून पुसणार ?... छे ! छे ! घरादारापासून दूर परमुलुखात आल्यावर त्यांची आठवण तर कधी नव्हे तेवढी येणार ! मन घराकडे ओढ घेणार...! पण छे ! छे ! असे करून तरी कसे चालणार ? तो थोडाच गमती–जमतीसाठी किंवा मजेने सहलीसाठी इकडे आला आहे ? –तो तर देशाचा रक्षक, सैनिक म्हणून आला आहे ! तेव्हा त्याला ते सर्व विसरता आले नाही, तरी विसरले पाहिजे. विसरणे भाग आहे. आणि मराठ्यांचे हे संचलनगीत लक्षात ठेवले पाहिजे :

बळ शत्रूचे जोखा, पाऊल पुढती टाका !
दूर राहिला मुलुख मराठी, दूर राहिले गाव
हिंदभूमिचा उमदा सैनिक हेंच शरीरा नाव
एकच रस्ता लाखा, पाऊल पुढती टाका !

दूर राहिली मुलें लेकरे, दूर राहिली माय
मायेमध्ये गुंतू नका रे, नका विसावू पाय
एक राहु द्या ठेका, पाऊल पुढती टाका !

विसरा आता निंबबाभळी विसरा हिरवे माड
बाळपणाच्या वेशीवरचे उंच वडाचे झाड
मंत्र लढयाचा घोका, पाऊल पुढती टाका !

सुगीसराई विसरा, विसरा लिंबुर हुरडा गोड
बहादुरांनो आज लागली मरणासंगे होड
रणी यमाला जिंका, पाऊल पुढती टाका !

'जय भारत' हा एक राहु द्या ओठावरती बोल
देशासाठी आज द्यायचे सर्वस्वाचे मोल
शिंग वाजते ऐका, पाऊल पुढती टाका !

देशावर आक्रमण झाल्यावर तरुण तेवढे सैनिक बनून समरांगणावर जाणार आणि तरुणी काय महिला म्हणून अबला म्हणून घेणार ? ते शक्य नाही. महिला तर महान शक्तिशालिनी आहेत. त्यांच्याही पाठीशी बलशाली आणि स्फूर्तिशाली पराक्रमाचा इतिहास उभा आहे. प्रतापी, तेजस्वी वारसा सिद्ध आहे ! मग अशा वेळी त्या थोडयाच मागे राहणार ? छे ! त्या तर पुढे सरसावत म्हणणार–

पिढयापिढयांच्या निर्भय आम्ही भारतीय भगिनी
घराघरांचे दुर्ग झुंजवू झुंजू समरांगणी
आम्ही भारतीय भगिनी !

अष्टभुजेच्या वंशज आम्ही महिषासुर मारू
देवत्वाच्या गुढया उभारू, दानव संहारू
वलय होउनी वज्र नांदते आमुच्या करकंकणी
आम्ही भारतीय भगिनी !

रणधीरांच्या सन्निध आम्ही स्फूर्तीसह राहू
रथचक्राच्या आंसाखाली घालू निज बाहू
घडवू रामायणे शत्रूचा मद उतरवू रावणी
आम्ही भारतीय भगिनी !

शस्त्रहि दिसते शोभुनी अमुच्या शोभिवंत हाती
भीम मातता चारू त्याला सैन्यासह माती
स्त्रीहट्टाच्या बळें बहरवू स्वर्गसुखे अंगणी !
आम्ही भारतीय भगिनी !

रणयागांतरि सर्वस्वाच्या आहुति आम्ही टाकू
अभिमन्यूच्या बसू रथावर अश्वाते हाकू
सती उत्तरे परी आवरू डोळ्यातिल पाणी
आम्ही भारतीय भगिनी !

जिजा, अहिल्या, झांशीवाली आमुचींच रूपे
सुतावतारे जितली युद्धें अमुच्या संतापे
आ–शशितरणी स्वतंत्र राखू भारतीय धरणी
आम्ही भारतीय भगिनी !

भगिनी अशा पुढे सरसावल्यावर तेजाचीच बाळे अशी भारतीय मुले का स्वस्थ बसतील ? गदिमा भगिनींप्रमाणेच त्यांनाही विसरलेले नाहीत, हे विशेष ! तीही गर्जत उठणार–

आम्ही भारतवासी मुले
असू विजेची फुले !
थोर आपुल्या तपोबलाने···
देव शोधिला ध्रुवबाळाने
प्रल्हादाने नरसिंहासी धरणीवर आणिले !
आम्ही भारतवासी मुले !

तनें पुराचे अडवी पाणी
गुरुजींसाठी बाळ आरुणी
ज्ञानासाठी नचिकेतानें स्वर्गलोक पाहिले !
आम्ही भारतवासी मुले !

शिवयोग्याशी भोजन द्याया
देहच अपुला देई चिलिया
अभिमन्यूने चक्रव्यूहाते सामर्थ्यें भेदिले !
आम्ही भारतवासी मुले !

मायभूमिच्या मुक्तीकरिता
बाल शिवाजी नेता झाला
शिरीष, हेमू बालवीरांनी प्राणार्पण केले !
आम्ही भारतवासी मुले !

परंपरा या आम्ही उजळू
शांतीसाठीं बळ सांभाळू
निष्ठा ठेवू, अचूक अनुसरू थोरांची पाउले !
आम्ही भारतवासी मुले !

या दोन गीतांमधून भारतीय महिलाशक्तीची व बालशक्तीची केवढी देदिप्यमान परंपरा गदिमांनी थोडक्या-मोजक्या, पण प्रभावी शब्दांतून उभी केली आहे. प्राचीन वेद-पुराणांपासून तो अलीकडच्या स्वातंत्र्यलढ्यापर्यंतची इतिहासाची उज्ज्वल सोनेरी पाने एखाद्या चलत्‌चित्रासारखी डोळ्यांपुढून फडफडून जातात !

गदिमांच्याच शब्दात शुभेच्छा व्यक्त होतात—

भारतसेना विजयी असो!
या भूमीच्या स्वातंत्र्याला आक्रमणाचा धाक नसो !
या बुद्धीच्या भूमीवरती अखंड नांदो समर्थ शांती
ज्ञाती निर्भय करो साधना, किसान आपुलें शेत कसो !

शतदलकमळापरी भारती
एका देठी, अनेक जाती
प्रत्येकाच्या मनी-मानसी लोकशाहीचा मान वसो !

ठरो अयोध्या नगरी नगरी
अजिक्य गावे, डोंगर डगरी
क्षात्रतेच या जिवंत देशी विजेसारखे नित्य रसरसो

वैनतेय हे चाळीस कोटी
सुधा शोधतिल मातेसाठी
भयाण कोणी उडता अजगर नखाग्रास ना तिच्या डसो !

हा एवढा संगर-यज्ञ मांडल्यावर आणि एवढी सर्वस्वाची आहुती देण्यास राष्ट्रवेदीवर सिद्ध झाल्यावर समिधांमधूनदेखील मंगल आशीर्वाद उमटतील—
'शेवटी, विजय तुझा भारता !'

पाळण्यातले पोरही उठले, वळुनी बाळ मुठी
हरोत हरल्या चार चमचकी, विजय तुझा शेवटीं,
भारता, विजय तुझा शेवटी !

ज्या भूमीला भारून गेले, दधिची जैसे मुनी
त्या भूमीला जिंकिल कैसा पोट भागला चिनी ?
गडकोटासम लढतिल नगरे, गावे, सदने, कुटीं
भारता, विजय तुझा शेवटी !

विजय विजय तो काय वेगळा, धर्माची सावली
विजय घालतो लोटांगण रे, सत्याच्या पाउली

रजस्नान हो, लाव शरीरा अरिरक्ताची उटी
भारता, विजय तुझा शेवटी !

भारताचा शेवटी विजय होणार हे निश्चितच ! 'सत्यमेव जयते !' सत्याचाच अखेरीस जय असतो. असत्याच्या कपाळी पराभव गोंदलेलाच असतो.

हे सर्व ऐकले, वाचले म्हणजे गौरव-अभिमानाने छाती फुलून जाते ! रक्त सळसळते ! नेत्र विस्मयाने विस्फारतात ! आणि बाहू स्फुरण पावतात ! !

ही सारी गदिमांच्या ओजस्वी शब्दशक्तीची, तेजस्वी शाहिरीबाजाची आणि मनस्वी स्वातंत्र्यनिष्ठ कवित्वाचीच किमया !

□

१४

# माडगूळकरांची स्वातंत्र्य-कवने

चाळीस–बेचाळीस वर्षापूर्वीचा काळ. भारताबाहेरच्या जगात महायुद्ध पेटलेले होते आणि भारतात स्वातंत्र्याचा लढा चेतलेला होता. स्वातंत्र्यलढा तसा कितीतरी आधीच सुरू झालेला, पण या सुमाराला त्याने अधिक उग्र रूप धारण केलेले होते. स्वातंत्र्याचा हा अंतिम लढा आहे, अशा भावनेनेच तो प्रखर बनलेला होता. गांधीजींनी इंग्रजी सत्तेला ‘ छोडो भारत–चले जाव ’चा निर्वाणीचा आदेश फर्मावलेला होता आणि भारतीयांना ‘ करेंगे या मरेंगे ’ अशा शब्दांत लढ्याचा संदेश दिलेला होता. देशातले वातावरण स्वातंत्र्यभावनेने भारावून गेलेले होते. देशभक्तांची मने स्वातंत्र्यासाठी प्राणाची बाजी लावण्याच्या ईर्षेने तेवून निघालेली होती. स्वार्थाला तिलांजली देऊन परसत्तेशी झुंज घ्यायला बेगुमानपणे सिद्ध झालेली होती. स्वातंत्र्याच्या भुताने अनेक तरुण झाडे झपाटलेली होती. आपापल्या परीने शर्थ करीत होती...अशा झपाटलेल्या झाडांपैकीच एक प्रतिभासंपन्न झाड होते–ग. दि. माडगूळकर.

त्या विलक्षण दिवसांना गदिमांनी ‘ मंतरलेले दिवस ’ असेच म्हटलेले होते. या दिवसांतील आपल्या मन:स्थितीचे शब्दांकन करताना त्यांनीच म्हटले आहे, “...फैजपूर कॉंग्रेसला जाऊन आलो. तिथेच माझे मन कशाने तरी झपाटले. मेणासारख्या कोवळ्या मेंदूवर भलत्याच विचाररेखा मुद्रित झाल्या. माझे डोके पार बिथरले. घर विसरले. वडील विसरले. घरचे दारिद्र्य विसरले. भावंडे विसरली. सारे काही विसरले. आपण देशासाठी बलिदान केले पाहिजे, हा एकच छंद मनाने घेतला... ‘ गृहप्रपंच सगळेच करतात, मला हुतात्मा व्हायचे आहे ! ’

हा विचार मनात पक्का ठसला होता..."

बेचाळीसचा लढा सुरू झाला. सातार्‍यात प्रतिसरकारची स्थापना झाली. गदिमा त्याचे प्रचारकच बनले–

'...चिंता नका करू रे पोटाची।
कोठारं भरली सरकाराची।
खुशाल ती आपण लुटायाची। जी जी जी
फोडुनी तिजोर्‍या त्यांच्या।
फुका पैक्याच्या।
आपल्या घामाच्या।
स्वतंत्र करू नवे सरकार
शांतीसाठी आधी धरू हत्यार
आपला आपण करू कारभार। जी जी जी

पोवाडे, गाणी, लावण्या, प्रात:स्मरणे–कितीतरी स्फूर्तिकवने या काळात त्यांनी लिहिली आणि शाहीर शंकर निकमांनी गावोगाव जाऊन, ती आपल्या खड्या आवाजात गाऊन, लोकांना जाग आणली.

परंतु त्याशिवायही या झपाटलेल्या झाडाने आणखी वेगळे कवित्व केलेले होते. त्यातील काही कानी आले होते, क्वचित वाचले होते. अलीकडच्या काळात खुद्द गदिमांच्या तोंडूनही अर्धेमुर्धे ऐकले होते, पण ते पूर्णपणे परवापरवापर्यंत वाचायला मिळालेले नव्हते. मात्र एकदा अचानक ते हाती आले.

१९३९ ते १९४६ च्या दरम्यानची गदिमांची ही काव्यरचना असावी. कवितेच्या उशापायथ्याशी स्थळ–दिनांकाची नोंद नाही. पण दोन वह्यांत एकूण ७८ कविता सुबक अक्षरांत लिहिलेल्या आहेत. लाडांच्या संग्रही त्या सुमारे तीस–बत्तीस वर्षे तरी आहेत.

ह्या मुद्रणसिद्ध अशा ७८ कवितांच्या संग्रहाला गदिमांनी 'किनरी' असे नाव दिले आहे. आपल्या पहिल्या काव्यसंग्रहाचे 'किनरी' असे जरी नामाभिधान त्यांनी केलेले असले, तरी त्यात 'किनरी' नामक स्वतंत्र अशी कविता नाही. त्याचप्रमाणे 'जोगिया' ही देखील कविता या संग्रहात नाही. याचा अर्थ असा की; 'जोगिया' ही कविता त्यांनी १९५० नंतर केव्हा तरी लिहिली, आणि १९५७ साली कविता–संग्रह प्रसिद्ध करताना 'किनरी' हे नाव बदलून 'जोगिया' हे नाव नव्याने ठेवले. 'किनरी' हस्तलिखित संग्रहातील ७८ कवितांपैकी ३२ कविता 'जोगिया'मध्ये आलेल्या आहेत, ३ कविता–गीते 'सुगंधी वीणा' (१९५०) या संग्रहात

दाखल झालेली आहेत; आणि बाकीच्या कविता 'जोगिया' नंतरच्या कवितांप्रमाणेच ग्रंथरूपाने संग्रहित झालेल्या नाहीत. 'जोगिया' नंतरच्या दुसऱ्या काव्यसंग्रहाला 'पूरिया' आणि 'चैत्रबन', नंतरच्या चित्रपट-गीतसंग्रहाला 'वैशाखी' अशी नावे देण्याची इच्छा गदिमांनी अनेक वेळा बोलून दाखवलेली होती.

'किनरी'तील असंग्रहित असलेल्या कवितांपैकी १५ कवितांमधून त्यांची तत्कालीन झपाटलेली मनःस्थिती व्यक्त होते.

'चले जाव'चा ठराव राष्ट्रसभेने ८ ऑगस्ट १९४२ रोजी पास केला, आणि ९ ऑगस्टपासून लढा सुरू झाला. परकी ब्रिटिश सत्तेला उद्देशून गदिमांनी 'निरोप' ह्या शीर्षकाची कविता लिहिली :

'टळा येथुनी तुम्ही आता
अमची आम्ही पेलू सत्ता!

जातीयतेचे वाद माजवू
अन्नावाचुन मरून जाऊ
सौख्य, ऐक्य वा इथें नांदवू
तुम्हांस का रे त्याची चिंता?

लुटायचे ते तुम्ही लुटले
तुमचे-अमुचे नाते तुटले
नीतिस तुमच्या स्थिरचर विटले
आता का रे उगिचच शिणता?

कळल्या तुमच्या वाटाघाटी
मंत्र शांतिचा हसऱ्या ओठी
अशुभ कांहिसे घेउन पोटीं
कालहरण का लटके करता?

पळा मित्र हो, मुहूर्त साधा
चंबुगबाळे अपुलें बांधा
भलतीसलती होइल बाधा
युद्ध कशाला जाताजाता?

प्राप्त घडी तो तुम्हि पाळिलें
स्वत्व आमुचे पार जाळिले
सुंभ जळाला, पीळ राहिले
कशास आता तेहि उकलिता?

धड देहाने करा पलायन
पापपुण्य घ्या अशेष बांधुन
नको अशुभ ते फिरुनी दर्शन
स्मरणहि तुमचे त्याज्य भारता !
सुखात राहो तुमची भूमी
तुम्हीच तुमचे रहाल स्वामी
सुखरुप पोंचा जा निजधामीं
नांदो तुमच्या घरी सुबत्ता !
अधीर झाला सिंधु-सागर
नाविक घेती वरती नांगर
ध्वजा तिरंगी लाल गढीवर
चला जाहली सर्व सिद्धता !
तुमच्या देशी असतिल कोणी
अमुच्यावाणी दीन अडाणी
निरोप सांगा त्यांना जाउनि
स्वतंत्र भारत देइल हाता !
टळा येथुनी तुम्ही आता
अमुची आम्ही पेलू सत्ता !'

यात चीड आहे, उपहास आहे, परिहास आहे, परंतु त्याचबरोबर कवीचे भारतीय संस्कृतीने पुनीत झालेले, शत्रूचेही अभीष्ट चिंतणारे मोठे मन आहे ! तिकडल्या दीनांना आश्वासनही आहे ! म्हणजे झपाटलेपणातही तथाकथित आततायीपणा नाही.

'ब्रिटिश साम्राज्यावर सूर्य कधीच मावळत नाही' अशी दर्पोक्ती साम्राज्यवादी आणि त्यांचे बगलबच्चे उच्चारीत असत. पण स्वातंत्र्याची ज्योत अंतरात धडधडत असणारा हा कवी उत्कटतेने 'सूर्य आणि साम्राज्य' या कवितेच्या चारच ओळीत उत्तरतो :

'दास्यवृत्तिने बुरसटलेल्या म्हणोत कोणी मृतवाचा
"अखंड तळपे सूर्यबिंब या साम्राज्यावर आंग्लांच्या."
"सूर्यावाचुन नांदू आम्ही" म्हणती स्थिरचर वनस्पती
-आंग्लांची पण सत्ता नलगे नेताजींच्या भूवरती !'

त्या वेळच्या तरुण मंडळींना नेताजी सुभाष बोस हे आपले नायक-हीरो-वाटत असत. भारताबाहेर जाऊन त्यांनी 'आझाद हिंद सेना' उभारली आणि

'चलो दिल्ली' अशी गर्जना केली. गदिमांनाही नेताजींच्या शौर्य, धैर्य, साहसाने व उत्कट देशभक्तीने मंत्रित केले होते.

'अनल होउनि, अनिल होउनि
क्रोधाने वा होउनि राजी
स्वर्गधरेतुनि, पाताळातुनि
दिक्कालातुनि या नेताजी !
या नेताजी ! या नेताजी !
साद कोंदला गगनामाजीं
हाकेसरशी गजेन्द्रमोक्षा
गरुडावरुनी या नेताजी ! ...'

असे आवाहन तर त्यांनी केले आहेच, पण 'पोचल्या दिल्लीला पलटणी' या कवितेत इच्छापूर्तीची स्वप्नेही रंगवलेली आहेत. गदिमांचे एक 'विशफुल थिंकिंग' पहा–

'भर दिवसाची 'स्वप्ने' आली वार्ता ही घेउनी
"पोचल्या दिल्लीला पलटणी !"
लालगढीचे कवाड तुटले, सुटले सैनिक झणीं ! पोचल्या...
'रक्त ! रक्त !' ची समर घोषणा शांत जाहली मनीं !
पोचल्या...
पराजितांचे पाप परतले सिंधु–सागरातुनी ! पोचल्या...
'जयहिंद !' गर्जना घुमल्या वाऱ्यातुनी
अन् ध्वजा तिरंगी डुलली आनंदुनी
हे स्तब्धलोचने दृश्य पाहुनी मनी !
खलहिंसेचे मंत्र बोलला गंभिर मौनांतुनी ! पोचल्या...
स्वतंत्रतेला वंदन करिती नेताजी प्रगटुनी ! पोचल्या...
बंगाल्याची गूढ जादु जणु आली आकारुनी ! पोचल्या...
किंचित् वरती क्षणात चढल्या कोटयवधि संगिनी ! पोचल्या...
तो नाद ऐकता डोळे पाणावले
का हात मुनीने थोडे उंचावले
आश्चर्य विलक्षण सूर्याने पाहिले
अहिंसकाच्या पदी वाहिली हिंसा नेताजिनी ! पोचल्या...'

'गवसली माझी मोहनमाळ' नामक आणखी एका कवितेत गदिमांनी नेताजींविषयी असेच इच्छास्वप्न रंगवले आहे. शीर्षकाच्या खाली कंसात टीप दिलेली आहे–'सुभाषचंद्रांच्या आगमनाने धरतीमातेला झालेला आनंद.'

'गवसली माझी मोहनमाळ !
उगा घेतला शेजीबाई दैवावर मी आळ !

मंगलसूत्रामधी गुंतुनी
सौभाग्यांतच भाग्य गुंफुनी
सोनसाखळी खेळु लागली गळयात ही लडिवाळ !

प्राणाहुनही मज आवडती
न कळे कोठे लपली होती
प्राप्तीसाठी हिच्या हिंडले डोळे रानोमाळ !

सुतकी तोंडे कुणीं म्हणाली,
"हिला झडपुनी घार पळाली"
दीप्ती पण ही साहुं न शकले तेजाचे आभाळ !

कुणी अपेशी वाचा वदली,
'भूगर्भी ही असेल दडली'
पचवु न शकले चोरी पण ही शेषाचे पाताळ !

पाणवठ्यावर सखी बोलली,
'जळात माळा असेल बुडली'
करू न धजला रत्नाकर या रत्नाचा प्रतिपाळ !

माझ्या हाते मीच हरवली
मलाच अवचित आज गवसली
श्रियाळराणी जशी लाधली चिमणे चिलिया बाळ !

जगास होते बाई विटले
संसारातुन होते उठले
माळ परी ही सोनमण्यांनी फुलविल पुढचा काळ !'

भूमिगत राहून परसत्तेशी झुंज घेणाऱ्या शूर, साहसी देशभक्तांविषयी गदिमांच्या मनीमानसी केवढा प्रेमादर वसत होता हे 'तुझी कंकणे' नामक कवितेवरून लक्षात येते. शीर्षकाच्या खाली कंसात टीप आहे, 'बेचाळीस सालच्या उठावाच्या महान् कार्यकर्त्या अरुणा असफअल्ली यांना उद्देशून'–

'स्वतंत्रतेच्या देवी अरुणे
देइ अम्हाला तुझी कंकणे !

शतवर्षांच्या परदास्याने
शौर्य झिजविले क्षणाकणाने

विगलित बाहू, अवनत वदने
अशक्य झाले शस्त्र पेलणे !

तुझी कंकणे वीरभूषणे
तेजोवलये, जिवंत स्फुरणे
जागीं करतिल निजस्पर्शाने
मनगटांतली रुद्र-नर्तने !

इतिहासाची वृत्ती परजुन
पौरुष आमुचे देई परतुन
तुझ्या पदांची मेंदी लेवुन
भाळी मिरवू तीच लांछने !

दे आज्ञा मग रणमर्दांना
रणभेदीच्या घुमु दे ताना
करू आडवे येतिल त्यांना
भिजवुन काढू रण-रक्ताने !'

क्रांतिसंगरात अनेक अद्‌भुत घटना घडल्या, अनेक चित्तथरारक प्रसंग आले नि गेले. गदिमांच्या प्रतिभेने असे विलक्षण साहस-नाट्यही टिपलेले आहे. 'आसरा' नामक कवितेत भूमिगताच्या जीवनातील असाच एच प्रसंग त्यांनी चित्रमय शैलीने शद्बबद्ध केलेला आहे. तीस सशस्त्र पोलीस लांडगे पाठीशी असताना अंधारातून काट्याकुट्यांतून एका भूमिगताची दोन पावले त्यांना चुकवीत चालली आहेत.

" देह वाहिला मातृभूमिला,
मरणाची तर नव्हती भीती ।
वीराला पण गमले लांच्छन,
जिवंत जाणे अरिच्या हाती ॥

पळता पळता मनात फिरती,
विचार भीषण भवितव्याचे ।
" सापडता मी त्यांच्या हाती,
ग्रामराज्य का नष्ट व्हायचे "

आणि या विचारासरशीच तो एका दाराशी आला. एका नवाढेने दार उघडले.

" तुफान... सैनिक... शत्रूमागे...।'
शब्द एवढे तिने ऐकिले
कोपऱ्यातली समई विझली,
पळांत आणिक दार लागले ।

घरभेदे लांडगे शोध घेत आले. दारावर थाप दिली. घरातल्या वृद्धेने दार उघडले. करड्या आवाजात दांडग्या अधिकाऱ्याने चौकशी केली :

" लपविलास तू काय थेरडे,
झोपडीत या कुणी फरारी ?
" देवाशपथ नाही दादा "
दोन कापरे ओठ हालले
गलित देह तो बाजुस सारून
झोत विजेचे आतच घुसले,
" कोण दोन ते त्या खाटेवर ?"
पुसे शत्रुचा एक शिपाई
लाजुन, दबकुन सांगे वृद्धा
' दादा, माझी लेक–जावई "

हे ऐकल्यावर अचकट बोलत–हसत ते शिपाई परतले, आणि मग–

अंधारातच खाटेवरुनी
क्रांतिवीर तो बाजूस होई
नवोढेस त्या म्हणे, " पुन्हा मी
तुझ्याच पोटी येईन आई !"

नवोढेसही गहिवर दाटे,
शब्द फुटेना नयनी गंगा
" कूस फाडुनी तुझ्यासारख्या
रणमर्दाला द्यावी जागा !"

सखोल डोळे गळू लागले
कुरवाळुनिया त्या दोघांना
अश्रूखाली पुनश्च भिजवी,
वीराला ती वृद्ध अंगना
बेचाळिसच्या बलवंतांना
असा लाभला दिव्य आसरा
लोकशक्तिच्या सामर्थ्यावर
चिरंजीव हो मग सातारा !

क्रांतीत पेटून उठलेल्या दुशेरे गावची अशीच वीरकथा ' कृष्णाकाठी 'नामक कवितेत गदिमांनी सांगितलेली आहे.

क्रांतीत पेटुनी उठे चिमुकला गाव
घातले तयाने साम्राज्यावर घाव !

पण कधी अंधारात वाट चुके आणि बाभळीचे झुडूपच वैर साधे. यमाची नजर तिथे फिरे आणि गोळीपाठोपाठ किंकाळीच कानी पडे. या वीराला 'अखेरची सलामी' देताना त्याचे सहकारी म्हणतात–

नाही आम्ही खांदा दिला शेवटच्या
पालखीला
नाही शास्त्रोक्त मंत्राग्नी, नाही दानधर्म
केला !
नाही वाहिला गुलाल, नाही घातले पांढरे
नाही अर्पियले तुम्हा सुगंधित हारतुरे।
स्वराज्याचे सेनापती शिष्य आम्ही जातिवंत
प्राणपणे लढा लढू होऊ स्मारके जिवंत।

पारतंत्र्याची एवढी चीड गदिमांना होती की 'अक्षयतृतीया' नामक कवितेत त्यांनी पितरांना 'या गोऱ्या परसत्तेला शाप द्या' असे म्हटले आहे. अक्षयतृतीयेला पितरांच्या नावे कलशपूजा करून त्यांना संतुष्ट करण्याची प्रथा आहे. गदिमांना हे सर्व संस्कार, प्रथा, यांविषयी विशेष आस्था होती. त्यांच्या अनेक कवितांमधून वेदपुराणांतील दाखले जसे आढळतात, तसेच इतिहासातील संदर्भ, उल्लेखही दिसतात. कारावासात प्रदीर्घ उपोषण करून प्राणत्याग करणारा बंगालचा क्रांतिकारक यतींद्र दास त्यांना भारताच्या दुष्काळग्रस्त अवस्थेत आलेल्या अक्षयतृतीयेच्या निमित्ताने आठवला आहे :

'उजाडला वैशाख काय हो ? अक्षयतृतिया का आली ?
स्वर्गामधुनी उतरणार का पितरे आजच भूमितली ?
यतींद्रदासा करुनी नेता, बंगाल्यातिल भूकबळी
दुर्वासासम मागणार का इच्छाभोजन या वेळी ?
अन्नकणास्तव मरतो आम्ही, काय घालणे पितरांना ?
संतापुनि ते शापतील का तुम्हा अम्हा सर्वांना ?
द्यायचाच तर द्या पितरांनो शाप पांढऱ्या सत्तेला
सुजलसुफल हा देश जियेने स्वार्थासाठी नागविला !'

पारतंत्र्यामुळे देशाला जी अवकळा प्राप्त झाली आणि इथला उज्ज्वल इतिहास जो काळवंडून गेला, त्याची विलक्षण खंत, विलक्षण दुःख भारताची गौरवगाथा वंदनीय असणाऱ्या स्वातंत्र्यप्रिय गदिमांच्या उरी कसे सलत होते, हे 'येणाऱ्या

वसंतास–' ह्या कवितेतील ओळीओळीतून प्रकट होते. कवीचे हतबल, खचलेले मन इथे दिसते, पण भविष्यकाळ पुनरपी उजळून जाईल अशी त्याच्या मनातली आशाही जाणवते. येऊ घातलेल्या ऋतुराज वसंतालाच ते म्हणताहेत–

'शिशिरच लिहिला भाळी जर त्या अदय विधात्याने
व्यर्थ वसंता काय फुलविसी वासंतिक सुमने ?
सुवर्णकिरणे काय फेकिसी शरयूच्या सलिलीं ?
रामराज्य जर नाही आम्हा दीनांच्या भाळी !
काय घुमविसी पवनाच्या या त्रिखंड पाव्यात
श्रीकृष्णाची गीताधेनू चरली या येथ !
आनंदभुवनी प्रपात का रे निर्मितोस व्यर्थ
रायगडाच्या रणमर्दांचा झाल्यावर अंत ?
वसंतगौरी काय सांगसी आम्हा पूजाया
जोहारीं त्या कधींच जळल्या राजपुती आर्या !
आम्रतरूवर कोकिलकूजित कशास घुमवीसी
अर्थ उकलण्या कुठून आणणे कवि गोविंदासी ?
यायचेच तर जिवंत कर हा उज्ज्वल इतिहास
इतिहासाच्या पुनरुत्थाने घडवि भविष्यास !'

हाच सूर आणखी एका कवितेत आढळतो. माणसाने झुंजून, झुंजून तरी किती नि कसे झुंजायचे ? झपाटलेपणाची धुंद तरी किती नि कशी टिकावी ? मातीच्या माणसाच्या मनाचे चैतन्यदेखील कठोर वास्तवापुढे क्षणकाल तरी कोमेजणारच. याच कठोर वास्तवाची जाणीव 'कुठे चाललो आहो आपण ?' अशा स्वतःलाच विचारलेल्या प्रश्नांकित मुखवट्याच्या कवितेत व्यक्त झालेली आहे. शीर्षकाखाली कंसातली टीपही प्रश्नांकितच आहे. 'ऑगस्ट निर्णयवाद्यांची मने आज हेच गीत गात असतील, नाही का ?'–

'कुठे चाललों आहो आपण ?
अजुनी येते तेच आवाहन !

भीमबळाची पाठ लागली
पुनरपि द्विगुणित शक्ती झाली
लाखपट परी वाट वाढली

नजरेपुढती माळच भीषण !

माथ्यावरती जळे नीलिमा
मरुभूमीवर चढे रक्तिमा

कैक शिपाई आले कामा
रक्तहि त्यांचे गेले करपुन !
आग लागली सर्वांगांना
चूड लाविती स्नायू प्राणा
क्षणाक्षणाला चुकवित मरणा
कुठवर जाणे या दिव्यांतुन ?
ज्वाळांमाजी अश्रू जळले
असेल तेथे पाणी कुठले ?
शरीर असुनी नसते बनले
आंस रखडते अस्थी उचलुन !
आला आला क्षण शेवटचा
मिटले डोळे, मिटल्या वाचा
पांग फिटू द्या या कानांचा
सांगा कोठे ते नंदनवन ?
किती योजने सुदूर येथुन
स्वातंत्र्याचे अक्षय उपवन ?
कलेवरांना स्कंधी घेउन
हौतात्म्य तिथे जाइल चालुन !'

लांबलेल्या वाटेवर निराशेची सावली पसरलेली असली तरी त्या नंदनवनात स्वातंत्र्याच्या अक्षय उपवनात हौतात्म्य पत्करून जाण्याची अतीव ओढ या मृत्युंजयांना आहेच !

आणि ही ओढ विलक्षण चिवट, ज्वलंत आहे. म्हणूनच या कठोर वास्तवावरदेखील ती मात करते. कवीचे मनही असेच विलक्षण संवेदनशील, झपाटलेले, आशावादी, जिद्दी. ते निराशेची मरगळ झिडकारते, झटकते आणि त्याचीच रसवंती त्याला म्हणते, 'तू शाहीर अन् मी रसवंती.' शाहीर गदिमा 'आपण दोघे' नामक कवितेत म्हणतात–

तू शाहिर अन् मी रसवंती
चल वाहवू गंगा ओघवती !
परदास्याचे खडक फोडुनी
विश्वक्रांतिची घुमवित वाणी
जवे धावु दे अवखळ पाणी
रणराग गाऊ दे जलवंती !

समाधिस्थ जे थोर हुतात्मे
क्रांतियुगाचे आद्य प्रणेते
शिपुन त्यांची राख अमृते
चल उठवू तीतुन नवाकृती !

नव्या युगाचे कुणी भगीरथ
पृथ्वीसंगे असतिल झुंजत
हात तयांचे करण्या पूनित
ही प्रगट करू या भागिरथी !

शतमार्गांनी असली गंगा
स्वैर जाऊ दे घालित पिंगा
नाच करिती जे उगाच नंगा
ते बुडून जाउ दे तळाप्रती !

उघडच्या माळावरती जेथे
निष्पापांची पडली प्रेते
ओघ जाउ दे अपुला तेथे
त्या मढ्यात भरण्या नवस्फूर्ती !

अंवती भंवती पिकवित शांती
मानवतेवर उधळित मोतीं
सवेग गंगा मिळु दे अंती
रे ! स्वतंत्रतेच्या उदधिप्रती !

या गंगेची प्रतिमा म्हणुनि
येरवड्याच्या थोर प्रांगणी
बुद्धवटाची ढापी रोवुनि
कुणि करतिल पूजा दिनराती !

त्या ढापीचा वृक्ष होउनी
डोलत राहिल वातावरणी
छायेखाली त्याच्या बसुनी
नवकवी गुंजतिल शब्दतती,
"तू शाहिर अन् मी रसवंती !"

क्षणकाल हरपलेले झपाटलेपण पुन्हा नव्या जोमाने, नव्या उमेदीने गदिमांना रणराग गाण्यासाठी लाभले असल्याची साक्ष या रचनेवरून मिळते.

त्याच सुमारास सुरू असलेल्या दुसऱ्या महायुद्धाची घृणा आणि तिटकारा

व्यक्त करणाऱ्या एकदीन कविताही आहेत. "युद्ध आजचे 'अमानुषा'ची गाठी सरहद्द" असे उद्गार काढले असले तरी त्यापुढेच 'कवी लढतसे याच्यापुढचे शतवार्षिक युद्ध !' असेही आत्मविश्वासाचे उद्गार काढलेले आहेत :

'आणि शेवटी युद्ध होउनी देव-मानवांचे
शास्ते होतिल ज्ञाते मानव देव-दानवांचे !
एकदाच पण हाय ! असे ही घटना जगतांत--
त्या घटनेला आम्ही वैदिक म्हणतो 'कल्पांत'!'

इतकेच नव्हे, तर गदिमा तिसऱ्या महायुद्धालाही 'लपतोस कशाला कलिपुरुषा ! ये टाक जगावर यमपाशा।' असे हिणवण्याच्या स्वरात म्हणताहेत. कारण 'शून्याच्याही नाशामधुनी। निसर्ग निर्मिल नवी मेदिनी !' हे शाश्वत सृजनतत्त्व त्यांना पक्के ठाऊक आहे.

विशी-पंचविशीत झपाटलेल्या या प्रतिभासंपन्न झाडाने व्यक्ती नि समष्टी, राष्ट्र नि विश्व या नात्यांतील आपली बांधिलकी अशा अनेक समर्थ रचनांमधून प्रकट केलेली आहे. ह्या आस्तिक, सौंदर्यवादी, मानवतावादी आणि स्वातंत्र्यनिष्ठ कवीची या सगळ्यातून एकच एक अपेक्षा व्यक्त होते--

'काजळकोरींवाचुन नाही
सौंदर्यावर जिथे काळिमा
कलंकशोभा चंद्रकलेवर
सुदृढतेवर रम्य रक्तिमा !
स्वातंत्र्याच्या त्या स्वर्गात
चिरंजीव हा होवो भारत !

आणि जवळजवळ दीड शतकानंतर १५ ऑगस्ट १९४७ चा शुभमंगल दिवस उगवला ! पारतंत्र्याचा अंधार संपला ! कित्येक हुतात्म्यांचे, योद्ध्यांचे, वीरांचे, देशभक्तांचे, लहानथोर कोट्यवधी भारतीयांचे स्वप्न साकार झाले ! भारत स्वतंत्र झाला ! गदिमांच्या हर्षोन्मादित प्रतिभेने ललकारी दिली :

हिमालयावर झडली नौबत !
स्वतंत्र झाला राजा भारत !!
इतिहासाच्या दिल्ली शहरी,
अभिषेकाची होय तयारी
मयूर-सिंहासनी हासरी
चढली मूर्ती डोलत डोलत !
हा तर राजा स्वतंत्र भारत !!

आर्य आसनी पुन्हा बैसला
घुमट नभाचा नादे भरला
सत्य शांतिचा जय जय बोला
शिरी कोहिनूर हिरा झळाळत !
शांतिदूत हा राजा भारत ! !

कटीस त्याच्या दिसे 'भवानी'
शिवरायांची यशोदायिनी
मर्त्य नेत्र हो, घ्या ही बघुनी
भवितव्याची अतर्क्य दौलत !
चक्रवर्ति हो पुनश्च भारत ! !

आस्तिक्य भावना आणि श्रद्धाळूपणा ही गदिमांच्या व्यक्तित्वात ओतप्रोत होती. देव, धर्म यांच्याप्रमाणेच ती देश, भाषा यांच्या संदर्भातही त्यांच्या लेखनातून प्रकट झालेली आहे. 'वंद्य वंदे मातरम्' हे त्यांचे एकेकाळी गाजलेले 'वंदे मातरम्' चित्रपटातील गीत. 'वंदे मातरम्' गीताला आणि घोषणेला भारतीय जनमानसातच एक वेगळचा आदराचे, अभिमानबिंदूचे स्थान आहे. या शब्दांनी इतिहास घडविलेला आहे. गदिमांच्या लेखी या शब्दाला वेदमंत्राचीच गौरव–प्रतिष्ठा होती असे नव्हे, तर त्याहूनही काही अधिक होते. म्हणूनच त्यांनी म्हटले आहे–

वेदमंत्राहुन आम्हा वन्द्य 'वन्दे मातरम्'!
माऊलीच्या मुक्ततेचा यज्ञ झाला भारती
त्यात लाखो वीर देती जीवितांच्या आहुती
आहुतींनी सिद्ध केला मंत्र 'वंदे मातरम्'!
याच मंत्राने मृतांचे राष्ट्र सारे जागले
शस्त्रहीनां एक लाभे शस्त्र 'वंदे मातरम्'!
निर्मिला हा मंत्र ज्यांनी, आचरिला झुंजुनी
ते हुतात्मे देव झाले स्वर्गलोकी जाउनी,
गा तयांच्या आरतीचे गीत 'वंदे मातरम्'!

भारत स्वतंत्र झाला. देवरूप झालेल्या हुतात्म्यांच्या आरतीचे गीत गायले गेले. देशाची नवी घडण सुरू झाली. गदिमांनी नवे 'पुरुषसूक्त' रचले.

वेदांमधल्या ऋचा थांबल्या
काळ धावला पुढे युगांनी
स्वेदामधल्या ऋचा नव्या या
यंत्रयुगेऽ स्विन्नवसूक्तानी !
सहस्रशीर्षा समाजपुरुषा

तुझा तूच गा जागृत होई
तुझ्या प्रकोपे यज्ञ चेतवी
तुझा तूच घे हविर्भागही !
अग्नितत्त्व तू शुभ-प्रलयंकर
सृजनशील तू, तू शिवशंकर
विश्व तोच तू, तू विश्वंभर
कराल तो तू, तू गंगाधर !

अशा रीतीने नव्या भारतीय समाजाला त्यांनी त्याच्या आत्मबलाची जाण देऊन त्याला स्वतःचे असे विराटदर्शनच घडवलेले आहे. सहस्रशीर्ष व सहस्रपाद अशा या विराट पुरुषाला त्यांनी हे दर्शन केवळ आत्मतुष्टीच्या ग्लानीत रममाण होण्यासाठी घडवलेले नसून शेवटी सांगितले आहे–

तुच सांग रे वेद ऋषींना
विचारधारा काव्यकथांना
चक्र सुदर्शन घेऊनी हाती
गीता पाजीव मूढ अर्जुना !
आणिक अंती सहस्रनेत्रा
नयनांतुन तू निर्मि शक्ति
चामुंडेतुन नटव अन्नदा
शांतिः शांतिः शांतिः शांतिः

नव्या घडणीचे चक्र फिरू लागले. देशाचा 'कायाकल्प' होऊ लागला––

जेथे होते रखडत नांगर
बैलामागे मारित रेघा
टोकरुनिया ढेकुळ काळे
जिराइताच्या बुजवित भेगा
तेथे आता फिरतो ट्रॅक्टर
विहिरीवरती बसले एंजिन
सलग तरारे हिरवी शेती
उरली नाही ती दैवाधिन
शेवाळाने उदासलेली
जेथे होती धार वाहती
तेथे आता धरण मनोहर
शेते-भाते त्यावर पिकती

कविमनाने आपल्या क्रांतदृष्टीने पाहिलेले हे चित्र आहे. त्यातले रंग हे असे आदर्श, ठळकच असणार ! पण हे असे हवेहवेसे घडून देखील कवी-मनाला खिन्नतेने ग्रासले आहे :

हाय ! परंतु वारा तिथला
उगाच सोडी दीर्घ उसासे
म्हणे 'येथूनी गेली कोठे
जिती जागती जुनी माणसे ?'

होत्याचे नव्हते आणि नव्हत्याचे होते असे घडत होते, पण लावण्यखनी गोमंतकाची भूमी अजून पारतंत्र्यातच खितपत होती. गोवामुक्तीसाठी संगर उभे ठाकले नि गदिमांची स्वातंत्र्यलेखणी धगधगीतपणे उमटली :

फिरंग्यानो, अटळ नाश रे आता तुमच्या तख्ताचा ।
भारतहाती द्या गोमंतक, भारतियांच्या रक्ताचा ॥
महाभूतेही धांवुन आली भूमातेच्या हाकांना
आभाळ ओकिल आग तुम्हावर, सागर खाइल नौकांना
प्रलयाहुनहि क्रोध भयंकर सत्य-शांतिच्या भक्तांचा !
संतापुढती काय ठेवता राजदंड तो पापांचा,
चेतविल्याविण वळवा मागे दुबळा तांडा तोफांचा,
टाका शस्त्रे, घोष करा मग श्रीयेशूच्या सूक्तांचा !
नका होऊ रे भक्ष्य अकारण जनशक्तिच्या कोपाचे,
लोकराज्य ते राज्य जगावर आकाशातील बापाचे,
नका गर्जना करू फुकाच्या, सूर ओळखा वक्ताचा !

गोमंतकही मुक्त झाला. भारताची तसूभरही भूमी आता पारतंत्र्यात नव्हती, पण यास्तव जे लढले, पडले ते कुठे होते ?

देशासाठी फकीर झाला
वंद्य पुढारी मला भेटला
दिसतीं मातापितरें त्याची अन्नास्तव हैराण !

अशी ही शाप की वरदान, असा संभ्रम उत्पन्न करणारी स्थितीही कवी-मनाला व्यथित करून गेली आहे आणि त्यातूनच वास्तविक मानवी सत्ताकांक्षी मनाचे भान झाले आहे. अपूर्वाईतला अपुरेपणा लक्षात आला आहे. पण क्रांति-वादी वीरांचा प्रवास राजकारणातील क्षणिक आभास टाळुन पुढे चालणार आहे, याचीही खात्री आहे. आणि म्हणूनच त्यांच्यासाठी हे संघगीत–

चला जाऊ द्या पुढे काफला ।
मार्ग न सरला अजुन आपला ।।
मरुभूमीवर हे पाणस्थळ,
कैक दिसांनी दिसली हिरवळ,
ढळू लागले चरणांचे बळ,
मोहाला या वळसा घाला !

उरी आवरा फिरती भोवळ,
करा पालथी भरली ओंजळ
अवघे जीवन जेथे निर्जळ
शीतलतेचा सोस कशाला ?

असतिल आले उंट उठवणी
खेचा त्यांच्या तंग वेसणी
मदारीतही नसु दे पाणी
दिवस आपुल्या पुढे चालला !

निष्ठा ठेवा आत्मबलावर
मरणासंगे करणे संगर
लंघुन जाता सिकतासागर
विश्वासाने पाऊल उचला !

अस्[illegible]ची वसती दधिची
श्र[illegible] बालध्रुवाची
[illegible] भगीरथाची
तहान वाहुन अगस्तिमुनीला !

स्वये स्वतःचे धुरीण होऊ
स्वातंत्र्याच्या गावा जाऊ
खुणा पदांच्या मागे ठेवू
नव्या दमाच्या नव्या पिढीला !

सुमारे पंधराएक वर्षे स्थिरावलेल्या स्वातंत्र्यावर उत्तरेकडून चीनच्या परचक्राचे सावट आले. परकी आक्रमणापासून देशाच्या स्वातंत्र्यरक्षणासाठी भारतीय जनता सिद्ध झाली. गदिमांची समरगीते घरोघरी पोचून उत्साह भरू लागली---

लढा, वीर हो लढा, लढा !
पराक्रमाने अधिक उंचवा हियालयाचा कडा, कडा
......

जिंकू किंवा मरू.. ...
माणुसकीच्या शत्रुसंगे युद्ध आमुचे सुरू !
चौदा भाषा उठल्या गर्जत
जय मृत्युंजय, जय हिमपर्वत
जय रणचंडी, जय जय भारत
जय भारत, जय हिंद !

......

भारतसेना विजयी असो !
या भूमीच्या स्वातंत्र्याला आक्रमणाचा धाक नको !

अशी कितीतरी समरगीते गदिमांनी चीन व पाकिस्तान युद्धाच्या काळात रचली. ही समरगीते एका स्वतंत्र लेखात दिली आहेत, म्हणून त्यांचा विस्तार येथे न करताही लक्ष वेधू इच्छितो की, गदिमांनी स्वातंत्र्यपूर्व काळात काय किंवा स्वातंत्र्योत्तर काळात काय, जनजागृतीच्या दृष्टीने फारच मोठी कामगिरी केलेली आहे. या गीतांचे स्वरूप तसे खरे म्हणजे प्रचारकी आहे, पण असे असून देखील त्यांतील काव्यगुण, भाषा, संस्कृतिसंकल्पना आणि उत्कटता यामुळे ती कुठेही उथळ झाली नसून उत्कृष्ट अशी स्वातंत्र्यसूक्तेच बनलेली आहेत !

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
2576
दा. क्र. 25593
काव्य
25/7/88
संद. शाखा